२५०.१९२६

म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

सं. क्र.

REFBK-0003409

গ্রং ১৭৫২৮

म. ग्रं. सं. ठाणें
क्रमांक
नं.

# गोमंतकांतील

# भट्ट-प्रभु-पंथे

# प्रकरण

संपादक
रामचंद्र दत्तात्रेयशास्त्री किंजवडेकर
कार्यवाह, भट्ट-प्रभु ऐक्य परिषद्, गोवा:
नि॥ शंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर.

१९२७

किंमत २ रुपये.

गोमंतकांतील

# भट्ट-प्रभु-पद्ये प्रकरण

संपादक

रामचंद्र दत्तात्रेयशास्त्री किंजवडेकर

कार्यवाह, भट्ट-प्रभु-ऐक्य परिषद्, गोवा

नि॥ श्रीशंकराचार्य — सं. संकेश्वर व कारवीर.

शके १८८४

REFBK-0003409

पुणे

किंमत २ रुपये

प्रकाशक—रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, ८४८ सदाशिव, पुणें.

मुद्रक—अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# प्रस्तावना

गतवर्षी गोमांतकांत भट्ट-प्रभु-पद्ये-प्रकरणीं श्रीशंकराचार्य यांच्या आज्ञे-वरून एक जाहीरसभा भरविण्यांत आली होती. तिचें अध्यक्षस्थान मीं स्वीकारावें अशी श्रींच्याकडून मला आज्ञा झाली. त्याप्रमाणें अध्यक्षस्थान स्वीकारून सभेच्या प्रारंभीं मीं जें भाषण केलें तें या पुस्तकाच्या परिशिष्ट-संग्रहांत पृष्ठ १३ ते २० यः ठिकाणीं सांपडेल. प्रस्तुत वादग्रस्त प्रकरणा-विषयीं माझे विचार. कांय आहेत हें

या भाषणावरून कळून येईलच.

सभेला जाण्यापूर्वी मीं या प्रकरणांतील कांहीं कागदपत्र पाहिले होते. त्यांवरून भट्ट-प्रभु हे पद्यांतीलच असल्याविषयीं माझी खात्री झाली होती. आणि सभेच्या प्रसंगीं जी खासगी चर्चा व जाहीर भाषणें झालीं त्यांत विरुद्ध बाजूनें जो युक्तिवाद करण्यांत आला व जे पुरावे मांडण्यांत आले त्यांनीं माझें मत मुळींच बदललें नाहीं. उलट विरोधाच्या कसोटीवर घासल्यानें तें अधिकच स्पष्ट व स्वच्छ झालें. शिवाय त्यानंतर या पुस्तकांत छापलेले विद्वज्जनांचे अभिप्राय मला सविस्तर वाचावयास मिळाले. त्यांनींही माझ्या मतास एकंदरीनें पुष्टिच मिळाली.

सभेंत ठराव झाल्याप्रमाणें श्रींकडून निर्णयात्मक आज्ञापत्र मिळावयाचें तें अद्यापि मिळालेलें नाहीं. तथापि तें आज्ञापत्र कोणत्याही स्वरूपाचें असलें तरी श्रींनीं सभा भरवून जाहीर चर्चा करवून या प्रश्नास जें एक वळण दिलें तें फार महत्त्वाचें आहे. श्रींच्या आज्ञापत्राची अपेक्षा ठेवणें चांगलें व तें मिळण्याला किंचित् कालावधि लांगला तरी अवश्य वाट पहावी. पण त्याचबरोबर मला हेंही माहीत आहे कीं, असले सामाजिक प्रश्न केवळ आज्ञापत्रानें निकालांत निघत नाहींत. विशिष्ट सुधारणेची गोष्ट घडवून आणण्याला लोकांचें मन आंतून प्रवृत्त झालें असेल तर आज्ञापत्रा-

चा उपयोग ती सुधारणा कांहीं थोडा वेळ आधीं घडवून आणण्यास होतो इतकेंच. पण समाजाची तशी प्रवृत्ति नसेल तर आज्ञापत्र हा जुलूम असा मानला जातो; आणि जुलमी आज्ञापत्राकरितां धर्मगुरूंनाही बहिष्कृत ठेवल्याचें उदाहरण मला माहीत आहे. तरी प्रस्तुत प्रकरणीं इष्ट ती सुधारणा घडून येण्यास लोकांची मनःप्रवृत्ति हाच मुख्य आधार असें समजलें पाहिजे. आणि ही प्रवृत्ति करण्यासारखे महत्त्वाचे अभिप्राय शास्त्री, पंडित, गृहस्थ व संशोधक यांनीं दिलेले या पुस्तकांत आढळून येतील. ज्याला या प्रश्नाचा विचारच करावयाचा नसेल त्याची गोष्ट वेगळी; पण ज्याचें मन दुराग्रहपीडित नसेल त्याची विवेचक बुद्धि जागृत करण्याइतका अनुकूल युक्तिवाद व पुरावा या अभिप्रायांतून खचित सांपडेल. परिषदेंत अध्यक्ष या नात्यानें मी केलेल्या शेवटच्या भाषणांत भट्ट-प्रभु यांना अनुकूल असे कागदपत्र सांपडण्याचा संभव आहे असें मीं सुचविलें होतें. व माझी अपेक्षा सफल होण्यासारखे कागद जे सभेच्या वेळीं उपलब्ध नव्हते ते आज होऊन या पुस्तकांत छापले गेले आहेत; विशेषतः रा० रा० बांबर्डेकर यांचें संशोधन हा सामाजिक प्रश्न चांगल्या रीतीनें सुटण्याला चांगलेंच उपयुक्त झालें आहे, असें म्हटल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

असले प्रश्न सुटण्याला लोकमत अनुकूल झालें पाहिजे. पण लोकांनाही वाचून, चर्चा करून, मनन करून, मत बनविण्याला भरपूर साधन हवें असतें. म्हणून श्रींकडून या प्रश्नाचा निकाल कसाही लागला तरी या चळवळींतील परिषदेपूर्वीचा इतिहास, परिषदेची हकीकत व अनुकूल-प्रतिकूल अभिप्रायांचे सर्व कागद नांवनिशीसह छापून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावे अशी सूचना मीं केली ती फलद्रूप झाली हें पाहून मला आनंद वाटतो. या पुस्तकाच्या उपयुक्ततेच्या मानानें त्याच्या छपाईवर झालेला खर्च हा वास्तविक कांहींच नाहीं. या पुस्तकांचा प्रसार झाल्यानें भट्ट प्रभूंच्या कार्याला लोकमत अनुकूल झाल्याशिवाय राहणार नाहीं असा माझा भरंवसा आहे. व तो व्यक्त करण्याकरितांच प्रस्तावनारूपी हे दोन शब्द प्रकाशकांच्या विनंतीवरून लिहिले आहेत.

पुणें,
ता. १८ डिसेंबर १९२६

न. चिं. केळकर.

# उपोद्घात

गोव्यांत चालू असलेल्या भट्ट प्रभु पद्ये ग्रामण्याचा निकाल काय करावा हें ठरविण्याचें काम आपल्या समाजांतील विद्वान्, पुढारी व धर्माध्यक्ष यांचें आहे. या प्रकरणाची हकीकत काय आहे व यांत पुरावा म्हणून दाखल केलेल्या कागदांतून यासंबंधीं उल्लेख काय आहेत वगैरे मुद्द्यांचें निवेदन ऐतिहासिक दृष्ट्या मी येथें करणार आहे.

प्रथम हें प्रकरण उपस्थित कसें झालें तें पाहूं. गोव्यांत फोंडें तालुक्यांत बोरी व शिरोडें या नांवाचे दोन गांव आहेत. व या दोन्ही गांवांत मिळून भट्ट प्रभूचीं सुमारें ३०।४० घरें आहेत. शिवाय पियोंळ, कुंडई व बांदिवडें येथेंही भट्ट-प्रभूंचें एखाददुसरें घर असेल. या सर्व गांवांत मिळून एकंदर भट्ट-प्रभूंची संख्या ४१६ भरते. भट्ट-प्रभूंचे सर्व आचार द्राविड ब्राह्मणांसारखेच असून, मुख्य मुद्द्याची गोष्ट ही कीं, ते इतर द्राविड ब्राह्मणांप्रमाणें श्रीशंकराचार्यांच्या शिष्यपरंपरान्तर्गत आहेत. गोमांतकांतील गौडसारस्वत आहारादिकांच्या व गुरुपरंपरेच्या दृष्टीनें पंचद्राविडांहून भिन्न आहेत व ह्या कसोटीनें भट्ट-प्रभूंची गणना गौड ब्राह्मणांत होऊं शकत नाहीं. पण भट्ट प्रभूंची गणना गौडांत होत नसली तरी ते द्राविड ब्राह्मणांतील आहेत किंवा नाहींत असा संशय उत्पन्न झाल्यामुळें भट्ट-प्रभु समाजाची कुचंबणा होत आहे. कऱ्हाडे, पद्ये व कोंकणस्थ या गोमांतकांतील द्राविड ब्राह्मणांशीं भट्ट-प्रभूंचा शरीरसंबंध तर राहोच; पण रोटीव्यवहारदेखील मोकळ्या मनानें होत नाहीं. यामुळें भट्ट-प्रभूंचा अनेक प्रकारें संकोच व ऱ्हास होत आहे. अवघ्या चाळीस घरांच्या समाजांत सात मुके मुलगे व दोन मुक्या मुली असून शिवाय विधुर, विधवा व अविवाहित यांची संख्याही बरीच आहे; इत्यादि चिंताजनक परिस्थिति पाहून भट्ट-प्रभूंतील विचारी पुढाऱ्यांनीं आत्मनिरीक्षणास सुरुवात केली. तेव्हां "आपण येथीलच पद्ये-ब्राह्मणांपैकीं आहों व केवळ गैरसमजामुळें अगर

विस्मृतीमुळें त्यांचा आमचा संबंध तुटला आहे' असें या पुढाऱ्यांच्या निदर्शनास येऊन त्यांनीं आपली हकीकत संकेश्वर मठाधिपतींकडे कळविली; व श्रीमच्छंकराचार्यांकडे धर्मगुरु म्हणून दाद मागितली. श्रींनीं प्रथम पूर्ण चौकशी करून हें प्रकरण विचारांत घेण्याजोगें आहे अशी खात्री झाल्यावर त्याची सर्व बाजूनें छाननी व्हावी म्हणून १९२६ च्या एप्रिल २३।२४ तारखेस श्रीक्षेत्र कपिलेश्वर (ता. फोंडा–गोवा) येथें समस्त द्रविड ब्राह्मणांची जाहीर सभा भरविली. तीच **भट्ट-प्रभु-ऐक्यपरिषद्** होय. या परिषदेचें अध्यक्षस्थान केसरीचे सन्मान्य संपादक श्री० **नरसिंह चिंतामण केळकर** यांजकडे श्रींकडून देण्यांत आलें होतें; व त्या सभेंत गोमांतकांतील व बाहेरील अनेक पंचद्रविड ज्ञातींतील विद्वान् व शास्त्रवेत्ते आले होते व त्यांनीं भट्ट प्रभू हे पंचद्राविडचें आहेत या मताचा जाहीररीतीनें पुरस्कार केला. शिवाय भट्ट-प्रभु निकटसंबंधांनें ज्या जातींत मोडतात त्या पद्ये ज्ञातींतील सरासरीं दोनशें इसमांच्या सहीचा संमति लेख सभेच्या पूर्वी श्रींकडे दाखल झाला होता. अशा प्रकारें भट्ट-प्रभूंच्या मागणीस अनुकूलता दर्शविणारें सार्वत्रिक लोकमत असलें तरीही प्रतिकूलता दर्शविणारे कांहीं लोक सभेंत हजर होते, हें विसरतां कामा नये. "आज बरींच वर्षें भट्ट-प्रभु व पद्ये हे स्वतंत्रपणें नांदूं शकले तसे यापुढेंही त्यांना नांदण्यास काय हरकत आहे? चालू वहिवाट मोडून नवा शिरस्ता पाडला पाहिजे असा कोणता प्रसंग पद्ये-प्रभूंवर ओढवला आहे? शिवाय भट्ट-प्रभु हे पद्ये ब्राह्मणांतीलच आहेत अशाबद्दल कागदोपत्रीं कायपुरावा आहे?" अशा अर्थाच्या हरकती आक्षेपकांच्या होत्या. त्यांच्या निरसनार्थ जे ऐतिहासिक उल्लेख पुढे करण्यांत आले आहेत त्यांतील मुद्द्यापुरता सारांश कालानुक्रमानें असा सांगतां येतोः—

## शके १०९६ कदंबांचा शिलालेख.

श्रीकादंबशिवचित्तदेवस्य प्रथममहिषी श्रीकमलादेवी राजधानीं गोपकपुरीमधिष्ठाय धर्मतः स्वराज्यमनुपालयत्यनुदिनमनुश्रूयमाणपुराण-धर्मशास्त्रेषु संस्तूयमानं भूमिदानस्य च ब्राह्मणानां च महिमानमा-

कर्ण्य सकलवेदवेदान्तवेदिनः समस्तन्यायमीमांसासांख्ययोगवेदान्त-स्मृतीतिहासपुराणतत्त्वार्थदर्शिनः षट्कर्मनिर्माणनिरतानशेषवर्णाश्रमधर्म-धुरंधरानकलितपःप्रभावतेजसः परिशीलितपरज्योतिषो निखलभुवनाभ्युदयनिमित्तप्रतिपन्नजन्मनो नानादेशनिवासिनो महानुभावान्ब्राह्मणान्सबहुमानमानाय्य स्थापितवर्ती। अथ सप्तत्यधिकद्विशतोत्तरचतुःसहस्रेषु कलियुगसंवत्सरेषु परावृत्तेषु प्रवर्तमाने च श्रीकादंबशिवचित्तदेवस्य प्रवर्तमानाविजयराज्य संवत्सरे अष्टाविंशे जयाव्हये मार्गशीर्षे अमावास्या-(यां) भौमवासरे सूर्यग्रहणपर्वणि शिवचित्तदेवस्य प्रथममहिषी श्रीकमलादेवी पादप्रक्षालनगंधपुष्पाक्षताभ्यर्चनपुरःसरं तेभ्यो नानाचरणगोत्रेभ्यो ब्राह्मणेभ्यो सप्तकोटीश्वरंदेवश्रीपादसंनिधौ सहिरण्यधारापूर्वकं दत्तवती तत्र हरितकाश्यपिवत्सकौशिकलोहितविश्वामित्रकाश्यपवसिष्ठशांडिल्य-गोत्राणां—श्रीधरादित्यरुद्रभानुगोविंदद्रोणकेशवसोमेश्वरपद्मनाभ गंगा-धर नाम्नां भट्टोपाध्यायानां प्रत्येकमेकैकावृत्तिः। वासिष्ठकौ-शिकवसिष्ठविश्वामित्रभरद्वाजवसिष्ठभरद्वाजकाश्यपभरद्वाज गोत्राणां—रुद्र. कालिदास सोमेश्वर प्रभाकर ब्रह्मदेव पुरुषोत्तम माधव श्रीधर नारायण नाम्नां भट्टोपाध्यायानां प्रत्येकमेकैका त्रिपादवृत्तिः। वासिष्ठ काश्यप वासिष्ठ वत्स वासिष्ठ शालावत गार्ग्य हरित वासिष्ठ वत्स शालावत भरद्वाज गोत्राणां—लक्ष्मीधर चौंडराय श्रीधर कालिदेव वैजनाथ सोमेश्वरादित्य कुमारस्वामि नारायण सर्व-देव चौंडराय कुमारस्वामि नरसिंहनाम्नां भट्टोपाध्यायानां प्रत्येक-मेकैका त्रिपादवृत्तिः।

कंदबांच्या मूळ शिलालेखांतून अवश्य तेवढा भाग दिला आहे. या शिलालेखांत गोव्यांत श्रीशके १०९६ सालीं राज्य करणाऱ्या शिवचित्त कदंबाची पट्टराणी श्रीकमलादेवी इनें पुराणें आणि धर्मशास्त्र यांमध्यें ब्राह्मणांचें महत्त्व ऐकून चतुःशास्त्रसंपन्न, सदाचारनिरत असें तीस ब्राह्मण निरनिराळ्या देशांतून आणिलें व त्यांना यथाविधि भूमिदान केलें असा

मजकूर आहे. त्यांत प्रत्येक ब्राह्मणाचें नाम, गोत्र आणि उपनांव यांचा उच्चार केला आहे. त्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही कीं, या सर्व तीसही ब्राह्मणांना 'भट्टोपाध्ये' या उपनांवानें संबोधिलें आहे. त्यांत भट्ट म्हणजे वेदवेत्ता हें प्रद पूर्वीच्या ब्राह्मणांच्या पद्धतीप्रमाणें पदवी. म्हणून नेहमीं मुख्यनांवापुढें लावण्यांत येत असे. उदाहरणार्थ, नारायणभट्ट, कुमारिलभट्ट, जगद्दीशभट्ट, इ० इ० तेव्हां तें निराळें काढल्यास उपाध्ये हेंच उपनाव शिल्लक राहतें व त्यावरून हे सर्व ब्राह्मण उपाध्ये होते, निदान गोव्यांत कदंबांनीं आणल्यानंतर ते उपाध्ये म्हणून सर्वांस मान्य असले पाहिजेत. तेव्हां गोव्यांत उपाध्ये आणले ते शके १०९६ मध्यें, हें ठरलें. लौकिक प्रवादही उपाध्यांस कदंबांनीं आणलें असाच आहे. (पृष्ठ १५५ पहा.) आज गोव्यांत अंत्रुजप्रांतांत या उपाध्यांची बरीच वस्ती असून वेळोवेळीं राजदरबारीं त्या त्या राजानें त्यांच्या उपाध्येपणाच्या अधिकाराचें रक्षणच केलेलें आढळतें. (पृष्ठ १५९ पहा.) यांची राहणी साधी जुन्या तऱ्हेची असून बहुतेक ब्राह्मण आगरें करूनच राहिलेले आहेत. निरनिराळे गांव यांनीं नवीन (नारळी सुपारीच्या बागा) वसविले असून आजही हे ब्राह्मण ग्रामाधिकारी, देसाई अशा अधिकारावर सुप्रतिष्ठित आहेत. मूळ कदंबांनीं जीं तीस घराणीं आणलीं तीं सर्वच आज हयात असलेलीं दिसत नाहींत. उलट त्याच घराण्यांमध्यें मागाहून आलेल्या ब्राह्मणांची भर पडलेली आहे. हे मागून आलेले ब्राह्मण शके तेराशेंच्या सुमारास आले असावे. त्या वेळीं शंभर वर्षें गोव्यांत विजयानगरच्या राजाची कारकीर्द होती व माधवारण्य त्या प्रांताचे अधिपति होते. त्या वेळींही नवे ब्राह्मण गोव्यांत आले असावे. कारण माधवारण्यांनीं श्रीशके १३१३ चैत्र ३० सूर्यग्रहणकाळीं बारा ब्राह्मणांस अग्रहार दिला आहे (पृष्ठ. १४५ पहा). त्यांत उपाध्यांशिवाय पटवर्धन, घैसास, आणि प्रभु या उपनांवाचे ब्राह्मण नवे आहेत. व त्यांस इतर ब्राह्मणांशीं भेदभाव न मानतां यथाविधि भूमिदान केलें आहे. हे तीनही ब्राह्मण कऱ्हाडे असून त्यांपैकीं घैसास (कोंकणस्थांतील घैसास व पटवर्धन हे दुसऱ्या गोत्रांचे आहेत) व पटवर्धन हीं घराणीं आज अंत्रुजींत पद्ये ब्राह्मणांत अवशिष्ट नाहींत.

येथपर्यंत पद्ये ब्राह्मणांत भेद पडून पद्ये आणि प्रभु असा पोटभेद पडलेला नव्हता हें निर्विवाद आहे. याच्या पुढच्या एक दोन शतकांत तो पडला असावा. कारण सुमारें शके सोळाशेंच्या पूर्वी म्हणजे शिवाजी-महाराजांच्या कालीं कागदोपत्रीं प्रभु आणि पद्ये असा भेद केलेला दृष्टीस पडतो ( पुराव्याचे कागद 'अ' 'आ'—पृष्ठ १६२ ते १६३ पहा ). यावरून त्या पूर्वी कोणतें तरी कारण होऊन पद्ये ब्राह्मणांत ही तुटातूट झालेली आहे. गोत्रांच्या दृष्टीनें विचार केल्यास सातशें वर्षांपूर्वी कोणत्या गोत्राचे ब्राह्मण आले, त्यानंतर पांचशें वर्षांपूर्वी त्यांत भर काय पडली, नंतर त्यांच्यांत चारशें वर्षांपूर्वी फूट पडून पद्ये व प्रभु असे भेद कसे पडले आणि आज पद्ये व प्रभु यांच्यांत हयात गोत्रें कोणतीं आहेत याचा तपशील समजून घेण्यास सोईचें पडावें म्हणून तो कोष्टकरूपानें पुढें दिला आहे. त्यावरून उपलब्ध माहितीच्या आधारें बोलावयाचें झाल्यास कदंबकालीन व माधवारण्यकालीन गोमांतकांतील गोत्रांच्या पोटांत पद्ये व प्रभु यांच्या गोत्रांचा समावेश होतो; आणि भट्ट-प्रभूंच्या पांच गोत्रांपैकीं चार गोत्रें आजही पद्यांत आढळतात. आणि पांचवें वत्स गोत्र गोव्यांत आलेल्या कदंबकालीन ब्राह्मणांच्या गोत्रांपैकीं आहे. म्हणजे भट्ट-प्रभूंचीं पांचही गोत्रें गोव्यांतील ब्राह्मणांपैकींच आहेत.

मिति मार्गशीर्ष वद्य ७<br>शके १८४८

दत्तात्रय विष्णु आपटे

# संपादकीय निवेदन

शके १८४५ सालीं भट्ट-प्रभु-पद्ये-प्रकरणास सुरुवात होऊन १८४७ पर्यंत हें प्रकरण फारसा गाजावाजा न होतां मंदगतीनेंच चाललें होतें. पण गेल्या वर्षीं श्रींनीं या प्रकरणांत बरेंच लक्ष घालून श्री० तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भट्ट-प्रभु-ऐक्य परिषद् भरविल्यापासून या प्रकरणास व्यापक स्वरूप प्राप्त होऊन गोव्यांतील सर्व ब्रह्मवृंदांच्या चर्चेचा कांहीं काल हा मुख्य विषय होऊन बसला आणि गोमांतकांतील व महाराष्ट्रांतील विद्वानांपुढें हा प्रश्न विचाराकरितां जाऊन त्या त्या विद्वानांनीं या प्रकरणाचा पूर्ण विचार करून आपापला अभिप्राय दिला. तसेंच इतिहाससंशोधनाच्या दृष्टीनेंही बरेच प्रयत्न करण्यांत आले व त्या-प्रमाणें पद्ये व भट्ट-प्रभु यांच्या मूळ इतिहासावर प्रकाश पाडणारे कांहीं जुने कानदोपत्रीं पुरावे उपलब्ध झाले. भट्ट प्रभूंचा हा भेद शंकराचार्यांच्या आज्ञापत्रानें कदाचित् पडला असेल म्हणून त्या दृष्टीनें श्रीसंकेश्वर संस्थानचें ज्ञातिधर्मप्रकरणीं दप्तर तपासण्यांत आलें; पण त्यांत यासंबंधीं कांहीच सांपडलें नाहीं. उलट जसजसा जास्ती शोध केला तसतसा संकेश्वर पीठस्थ आचार्य व भट्ट-प्रभु यांचा अगदीं अलीकडच्या काळा-पर्यंत गुरुशिष्यसंबंध अखंड चालत होता व संकेश्वरपीठस्थ आचार्य ज्या ज्या वेळीं गोव्यांत आले त्या त्या वेळीं भट्ट प्रभूंच्या येथें मुक्काम करून त्यांच्याकडील पाद्यपूजेचा व भिक्षेचा स्वीकार करून भट्ट प्रभूंस त्यांनीं उपकृत करून ठेवलें होतें; असें दृष्टोत्पत्तीस आलें. ज्या तऱ्हेचा प्रयत्न संकेश्वर-मठांत करण्यांत आला त्याचप्रकारचा प्रयत्न शृंगेरी मठांतही करण्यांत आला. तेथील श्री० व्हीं. एल्. नरसिंह गरू, डेप्युटी अंमलदार यांच्या साहाय्यानें जुनीं सर्व दप्तरें तपासलीं; परंतु तेथेंही भट्ट-प्रभूंस पंक्तिबाह्य केल्याचें किंवा बहिष्कृत केल्याचें अज्ञापत्र वगैरे कांहींच उपलब्ध झालें नाहीं. त्यावरून व भट्ट-प्रभूंच्या येथें चाललेलीं पद्ये, कोंकणस्थ, कऱ्हाडे वगैरेंचीं सहानुष्ठानें पाहिल्यावरून भट्ट-प्रभूंचें पातित्य कोणत्याही तऱ्हेनें

सिद्ध होत नाहीं. अशा स्थितींत होत असलेली भट्ट-प्रभूंचीं कुचंबणा निघून जावी; एतदर्थ ही सर्व खटपट असून शके १८४५ ते १८४८ पर्यंतच्या चार वर्षांत जी चळवळ झाली ती पुस्तकांत कालानुक्रमानें आलेल्या लेखांवरून ध्यानीं येईल. भट्ट-प्रभूंना मिळालेले अभिप्राय, आमच्याकडे आलेले अभिप्राय, भट्ट प्रभु पद्ये ऐक्यास विरुद्ध असलेल्या लोकांची कैफियत, अनुकूल पक्षानें त्या कैफियतीस दिलेलें उत्तर, पुराव्याचे कागद, प्रसिद्ध इतिहास संशोधक व मठगांवचा 'शिलालेख' या ऐतिहासिक ग्रंथाचे कर्ते रा० ब० बांबर्डेकर यांचा भट्ट-प्रभु-पद्ये प्रकरणीं ऐतिहासिक लेख आणि भट्ट-प्रभूंचा चळवळीचा इतिहास व विरुद्ध पक्षाचा प्रादुर्भाव कसा झाला हें दाखविणारें पत्र. इतके विषय या पुस्तकांत आले असून विचारवंतांनीं ते एकवार दृष्टीखालीं घातल्यास भट्ट-प्रभु पद्ये-चळवळीचें साद्यन्त स्वरूप पूर्णपणें लक्ष्यांत येऊन स्वतःचा अभिप्रीय ठरविण्यास सुलभ होईल अशी आमची खात्री आहे. तसेंच परिशिष्टविभागांत भट्ट प्रभु-ऐक्य-परिषदेचा साग्र वृत्तान्त विद्वान् वक्त्यांच्या भाषणासह दिला आहे तोही वाचल्यास गोमांतकांतील द्राविडांचें याविषयीं काय मत आहे तें अजमावण्यास सोईचें होईल. आतां मजकुराच्या दृष्टीनें लिहावयाचें म्हणजे आज पुस्तकरूपानें जितका मजकूर छापला आहे तेवढाच सरासरी मजकूर अजून छापावयाचा आहे. परंतु तो सर्व अनुकूलच असून पुस्तकांत येऊन गेलेला विषयच त्यामध्यें थोडयाअधिक फरकानें असल्यामुळें तो न छापल्यामुळें कोणत्याही प्रकारची उणीव भासणार नाहीं. म्हणून तो मजकूर नाइलाजानें आम्हाला गाळावा लागला. अगोदरच कल्पनेच्याबाहेर पुस्तक वाढलेलें, त्यांत पुन्हा तितकीच निष्कारण भर पडल्यास हें पुस्तक सहाशें पृष्ठांचें तरी झालें असतें व वाचकांचा वेळ व्यर्थ गेला असता; तो न जावा म्हणून पुस्तक छापतेवेळीं तें शक्य तितकें आटोपशीर करण्यांकडे मनाची प्रवृत्ति ठेविली होती. ती कितपत साधली आहे तें वाचकांना कळेलच.

भट्ट-प्रभु ऐक्य-परिषदेचे सन्मान्य अध्यक्ष व केसरीपत्राचे संपादक श्री० तात्यासाहेब केळकर, पुणें यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहून भूषाविल्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्याचप्रमाणें

प्रसिद्ध इतिहास संशोधक श्रीयुत दत्तात्रेय विष्णु आपटे, बी. ए. मॅनेजर आनंदाश्रम, यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून भट्ट-प्रभु पद्ये-प्रकरणास आपल्या इतिहास-संशोधनांत स्थळ दिलें व त्या दृष्टीनें उपोद्घात लिहून आम्हांस उपकृत केलें याबद्दल त्यांचे आभार मानतों. हें पुस्तक बनण्यास अनेक तऱ्हेनें साहाय्य करणार वेदशास्त्रसंपन्न ती० दत्तात्रेय तुकाराम शास्त्री पणशीकर, पेडणें गोवा यांचें आम्हास व भट्ट-प्रभु-ऐक्य-चळवळीस इतकें सहाय्य झालें, तें न होतें तर आज आपल्या पुढें असलेलें भट्ट-प्रभु-पद्ये-प्रकरण या स्वरूपास आलें असतें किंवा नाहीं याबद्दल शंकाच आहे. तेव्हां अशांचे आभार कोणत्या शब्दानें मानावें? असो. सरतेशेवटीं श्रीमच्छंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर यांनीं भट्ट प्रभु-ऐक्य-परिषदेचें कार्यवाहकत्व माझ्याकडे देऊन समाजसेवा करण्याची उत्तम संधि दिली याबद्दल श्रींचे अनंत उपकार आहेत. अशीच सेवा पुढेंही देऊन कृपा करावी अशी त्यांजपाशीं नम्र प्रार्थना आहे.

पुणें, मिति मार्गशीर्ष
वद्य १४ शके १८४८

रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.
भट्ट-प्रभु-ऐक्य परिषद्, गोवा
नि॥ श्रीशंकराचार्य सं. संकेश्वर

# भट्ट-प्रभु-पद्ये-प्रकरेण

# अनुक्रमणिका


पृष्ठांक.

प्रस्तावना
उपोद्घात
संपादकीय निवेदन
१ भट्ट-प्रभूंनीं ब्राह्मणांस केलेला अर्ज ... ... १.
२ वरील अर्जास आलेलीं उत्तरें:— ... ... २–३८
१ गोविंद लक्ष्मणशास्त्री उपाध्ये ... ... २
२ नारायणभट्ट तोटेकर उपाध्ये ... ... ३
३ विठ्ठल माधव उपाध्ये ... ... ४
४ कृष्णभट्ट कथने } ... ... ५
५ शंकर वामन उपाध्ये }
६ महादेवशास्त्री निगळ्ये } ... ... ८
७ रामचंद्र विनायक उपाध्ये }
८ दत्तात्रयशास्त्री पणशीकर ... ... ९
९ केशवशास्त्री सावईकर ... ... २३
१० गदाधरशास्त्री केळकर ... ... २४
११ हरि वासुदेव फडके ... ... २५
१२ शिरोडें (गोवा) येथील सर्व ब्राह्मण ... २६
१३ अनंतशास्त्री सहकारी ... ... २५
१४ गणेशशास्त्री चांफाडकर ... ... २७
१५ रामचंद्र पांडुरंग वैद्य ... ... ,,
१६ वासुदेवशास्त्री पित्रे ( सांखळी )... ... २८
१७ गणेश महेश्वरभट्ट ठाकूर ... ... ,,
१८ नारायण अनंत नाईक पाटणकर ... २९
३ भट्ट-प्रभूंचा सर्व ब्राह्मणांस दुसरा अर्ज ... ... ३९.
४ वरील अर्जास एकशें बावन्न ब्राह्मणांचें उत्तर ... ४०
५ भट्ट-प्रभूंचें संस्थानीं दाखलं झालेलें पाहिलें विनंतिपत्र ४६.

६ त्यास संस्थानाकडून उत्तर ... ... ...४७–४८
७ भट्ट-प्रभूंनीं श्रीसंस्थानीं दाखल केलेला दुसरा अर्ज ... ४९
८ वरील अर्जास उद्देशून सभेविषयीं निघालेला श्रींचा जाहिरनामा ५१
९ सभेच्या कार्यवाहांची श्रींकडून नेमणूक ... ५२
१० कार्यवाहांचें विनंतिपत्र ... ... ... ५३
११ कार्यवाहांकडे आलेलीं अभिप्रायपत्रें ... ...५३–७१
१ महादेवशास्त्री बाक्रे ( मुंबई ) ... ... ५३
२ विठ्ठलशास्त्री निगळ्ये ( केरी–गोवा ) ... ५५
३ वासुदेवशास्त्री पणशीकर ( मुंबई ) ... ,,
४ हरि मोरेश्वर जोशी (संपादक–'स्वधर्म' पुणें) ५७
५ वासुदेवशास्त्री अभ्यंकर, पुणें
६ श्रीधरशास्त्री पाठक ,,
७ बाळशास्त्री उपासनी ,,
८ शंकरशास्त्री मारुलकर ,, ... ,,
९ रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डी ,,
१० कृष्णशास्त्री कवडे ,,
११ सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, ,,
१२ रघुनाथशास्त्री पटवर्धन ,, ... ६०
१३ अनंतशास्त्री फडके ,, ... ,,
१४ महादेवशास्त्री जोशी ,, ... ६१
१५ वासुदेव श्रीधरशास्त्री मराठे ( सत्री-गोवें ) ... ,,
१६ श्रीपाद महादेव जोशी, सोलापूरकर ... ,,
१७ सदाशिव रामचंद्रभट्ट परांजपे ( शिरोडें-गोवें ) ६३
१८ बाबू पुरुषोत्तमभट्ट ... ... ,,
१९ रामचंद्र विठ्ठल देवारी ... ... ६५
२० सांवतवाडी येथील तीस ब्राह्मणांचें अभिप्रायपत्र ,,
२१ दत्तात्रेय दामोदर जांभेकर ( कोरगांव ) ... ६८
२२ पेडण्याच्या एकोणतीस ब्राह्मणांचें अभिप्रायपत्र ,,
२३ शंकर वामन बोरकर ... ... ६९

२४ विद्याभूषण तांबेशास्त्री ... ... ७०
२५ सांखळीच्या चबदा ब्राह्मणांचें अभिप्रायपत्र ७१
१२ पुराव्याकरितां शृंगेरी संस्थानीं केलेलें विनंतिपत्र ... ,,
१३ भट्ट प्रभु-ऐक्य-परिषदेनंतरचा अध्यक्षांचा जाहिरनामा ७२
१४ अध्यक्षांकडे आलेलीं पत्रें ... ... ७३
१ शंकर वामनभट्ट बोरकर ... ... ,,
२ विरुद्धपक्षाची कैफियत ... ... ७४
३ विरुद्धपक्षाच्या कैफियतीस उत्तर ८१–१४४
१५ पुराव्याचे कागद ... ... १४५–१६६
शके १३१३ तिल ताम्रपट ... १४९
१६६३ मधील उपाध्ये व भट्ट-प्रभु करार १५०
१८०२ श्रींकडून भट्ट-प्रभूंस दोन पत्रें ... १५४
१७०७ गणेश अनंत ग्रामाधिकारी यांचा लेख १५५
१७०९ ,, ,, देसाई यांचा लेख १५७
१६१६ मधील सप्रे प्रकरणींचा ठराव ... १५८
१६५३ पंचोपाध्यांचा करार ... १६०
(१७००) पाळीसंबंधाचा स्मरणलेख ... १६२
शिक्कालीन लेख 'अ' ... १६३
'आ' कागद ... ... १६४
गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें १६४१–६५
१२२१ तिम्ममंत्री यांचा ताम्रपट ... १६५
११८३ तेरवण ताम्रपट
१६ पुराव्याचे सदरांत दाखल केलेल्या कागदांची कालानुक्रमवार यादी १६६
१७ भट्ट प्रभु पद्यांतीलच ... ... १६६ते१७२
रा. अनंत बांबर्डेकरांचा लेख
१८ कार्यवाहांस भट्ट-प्रभूंचें पत्र ... ... १७२ते१७९
परिशिष्ट पाहिलें–१८४५ च्या भट्ट-प्रभु समाजाच्या सभेचें वृत्त १–५
सदर वृत्तान्ताची पुरवणी ... ५–६
परिशिष्ट दुसरें–१८४८ भट्ट-प्रभु-ऐक्यपरिषदेचा साग्र वृत्तान्त ६–३९

# गोत्र-पट

| शके १०९६ कादंबकालीन ब्राह्मणांचीं गोत्रें. | शके १३१३ माधवारण्यकालीन ब्राह्मणांचीं गोत्रें. | पद्यांचीं गोत्रें. | भट्ट-प्रभूंचीं गोत्रें. |
|---|---|---|---|
| ... ... ... | १ अत्रि | १ अत्रि | १ अत्रि |
| १ काश्यप | २ काश्यप | २ काश्यप | ... ... |
| ... ... ... | ... ... ... | ३ कुत्स | ... ... |
| २ कौशिक | ३. कौशिक | ४ कौशिक | २ कौशिक |
| ३ गार्ग्य | ४ गौतम | ५ कौंडिण्य | ३ कौंडिण्य* |
| ... ... ... | ५ नैध्रुव | ... ... ... | ... ... |
| ४ भारद्वाज | ६ भारद्वाज | ६ भारद्वाज | ४ भारद्वाज |
| ५ लोहित | ... ... ... | ... ... ... | ... ... |
| ६ वत्स | ... ... .... | ... ... ... | ५ वत्स |
| ७ वासिष्ठ | ... ... ... | ७ वसिष्ठ. | |
| ८ विश्वामित्र | | | |
| ९ शाला (क्ष?) वत | | | |
| १० शांडिल्य | | | |
| ११ हरित | | | |

* हें गोत्र पंचवीस वर्षांपूर्वीच नामशेष झालें. सदर गोत्रजाची बहीण अद्याप हिवेरीस आहे.





"शंभोर्मूर्तिश्चरति भुवनं शंकराचार्यरूपा"

3406

श्रीभारतीविजयते

# भट्टप्रभु-पद्ये प्रकरण

## भट्टप्रभूंनीं ब्राह्मणांस केलेला अर्ज—अनुक्रम नंबर १.

शिरोडें. श्री चैत्र शुद्ध ११ शके १८४५.

वि. वि.—पत्र लिहिण्यास कारण कीं, आम्ही प्रांत गोवा, गांव बोरी व शिरोडें येथें राहणारे भट्टप्रभू या संज्ञेनें ओळखले जाणारे ब्राह्मण-पंचद्राविडांतर्गत पद्ये ब्राह्मणांशीं गोत्र, उपनांव, कुलदेवता, कुलपुरुष, धंदा, इत्यादिकांनीं समान असतां आम्हांशीं पंचद्राविडांचा अन्नादि संबंध होत नाहीं. याचें कारण काय हें आपण धर्मशास्त्र, प्राचीन इतिहास, विश्वसनीय लेख, वगैरेंचा विचार करून आम्हांला खरोखरीच कांहीं दोष असल्यास त्याबद्दल योग्य तो शास्त्राधारें धार्मिक विधि कळवावा. आणि आम्हांला पंचद्राविडांशीं अन्नादिसंबंधानें संलग्न होण्यास आपली संमति देण्याची कृपा करावी. आमचीं केवळ तीस-चाळीसच घरें स्वतंत्र असल्यानें आम्हांला धार्मिक व सामाजिक कार्यांत वरचेवर फारच अडचणी सोसाव्या लागतात. तरी आपण उदार अंतःकरणानें आमच्याबद्दल योग्य तो अभिप्राय देऊन आम्हांला आभारी करावें अशी नम्र विनंति आहे. आपण सुज्ञ व ब्राह्मणवर्गाचे उन्नतीबद्दल कळकळ बाळगणारे आहांत. तेथें विशेष काय लिहावें ? कळावें, कृपाभिवृद्धि असावी हे नमस्कार.

आपले नम्र कृपाकांक्षी

(सह्या) रामजी विश्वंभर प्रभु गांवकर.
गुणबा शिव प्रभू देसाई.
रघुनाथ शाबा प्रभू.
बाबू पुरुषोत्तम भट.
सीताराम नारायण भट.

ता. क.—उत्तर पाठविण्याचा पत्ताः—

रामजी विश्वंभर प्रभू गांवकर,
मुक्काम व पोस्ट शिरोडें—गोवा.

# वरील विनंतीपत्रास पाठविलेलीं उत्तरें.

अ० नं. २

श्रीयज्ञपुरुषायनमः

केरी. चैत्र शुद्ध १२ शके १८४५.

श्रीयुत रा० रा० रामजी विश्वंभर प्रभु गांवकर, रा० रा० गुणबा शिव प्रभू देसाई, रा० रा० रघुनाथ शाबा प्रभू सावकार, मुक्काम बोरी यांसी— कृतानेक आशीर्वाद वि.—

लिहिणेस कारण कीं, आपलें पत्र पोंचून मजकूर समजला. भट्टप्रभु यांचा पंचद्राविडांशीं अन्नादि संबंध होण्यास माझी पूर्ण संमति आहे. धर्मशास्त्र व इतिहास या दृष्टीनें यांत कांहीं विचारणीय असेल असें वाटत नाहीं. विश्वसनीय लेख जगद्गुरूंच्या दप्तरांत असल्यास त्यांचा मात्र विचार केला पाहिजे. आणि या देशांतील पद्ये, कऱ्हाडे व कोंकणस्थ ब्राह्मणांतून कांहीं विद्वानांचे अनुकूल अभिप्राय मिळविले पाहिजेत. नाहींतर समाजांत जूट उत्पन्न होण्यासाठीं केलेल्या प्रयत्नानें उलट असलेल्या जुटीचा नाश होईल. म्हणून मिळतील तितके अभिप्राय मिळवून लोकसंमतीनें हें कार्य करावें असें माझें मत आहे. 'नहि वरविघाताय कन्योद्वाहः' हें तत्त्व ध्यानांत ठेवून समाजऐक्याविषयीं जपलें पाहिजे. म्हणून थोडेंफार लिहिलें यांत विरुद्ध भाव असेल अशी शंकाही मनांत आणूं नये. हें कार्य मला अत्यंत इष्ट वाटतें. सुज्ञास विशेष लिहिणें नलगे. लोभ असावा.

(सही) गोविंद लक्ष्मण उपाध्ये, अग्निहोत्री.

---

अ० नं. ३

ह्यादोळ. श्रीर्जयति चैत्र वद्य ७ शके १८४५.

श्रीयुत रामजी विश्वंभर प्रभु गांवकर यांस—सा. न. वि. वि. आपलें पत्र पोंचून अभिप्राय समजला. गांव बोरी व शिरोडें येथें राहणारा भट्टप्रभु नामें समाज त्याचे आचारविचार, आहारविहार, कुलधर्म, कुलगुरुप इत्यादिकांवरून पंचद्राविड ब्राह्मणांतीलच आहे, असें मला वाटतें व

त्यावरूनच त्यांच्याशीं आपला–म्हणजे पंचद्राविडांचा भट्टप्रभूंशीं अन्नादि संबंध होण्यास कांहींच आडकाठी माझ्या मतें नाहीं. उलट ह्या कार्यास माझी मनःपूर्वक संमतिच आहे. धर्मशास्त्र व इतिहासांत तर यासंबंधीं कांहींच आढळत नाहीं. नाहीं म्हटल्यास फक्त एकच कायती गोष्ट परंपरांगत ऐकण्यांत येते–श्रींची स्वारी दोनशें अडीचशें वर्षांपूर्वी श्रीकपिलेश्वर मुक्कामीं आली त्यावेळीं केरी, शिरोडें, कवळें वगैरे सात गांवांतील पद्ये ब्राह्मणांस तीर्थप्रसादास बोलविण्यांत आलें. पांच गांवांतील पद्ये ब्राह्मण योग्य वेळीं पोंचले व बोरी व शिरोडें या गांवांतील ब्राह्मण मागें राहिले. अर्थात् जाग्याच्या अभावीं त्यांना दुसऱ्या पंक्तीस बसावें लागलें. इतकें झाल्यानंतर श्रींची स्वारी रवाना झाली व त्या दिवशीं नाइलाजानें दुसऱ्या पंक्तीस राहिले गेलेले ब्राह्मण निष्कारण अपंक्त असें मानण्यांत येऊं लागले. व या समाजांत तरी ह्या वेळीं श्रीमंत वगैरे बरेच असल्यामुळें ऐक्यप्रकरणीं तोऱ्यानें कांहींच करण्यास गेले नाहींत. इतकेंच कायतें उपलब्ध आहे. धर्मशास्त्र व इतिहास यांत कांहींच दिसून येत नसल्यावरून मी ही एकी व्हावी असें इच्छितों. हें कार्य सर्व बाजूंनीं–धार्मिक, सामाजिक वगैरे–आज अत्यावश्यक आहे. कळावें, मुज्ञास जास्ती लिहिणें नको. लोभ, कृपा, ममता असावी.

आपला

(सही) नारायण पु. भट्ट तोटेकर (उपाध्ये)

---

अ० नं. ४

आगापूर. श्री आश्विन शुद्ध ५ शके १८४५.

श्री० रा० रा० रामजी विश्वंभर प्रभु गांवकर, गुणबा शिवबा प्रभु देसाई प्रभृति यांस—सा. न. वि. वि.

आपलें अभिप्रायाखातर पाठविलेलें पत्र पोंचलें. फार आनंद झाला. इतकीं वर्षें होऊन जावयाचें काम इतक्या उशीरानें कां होईना; पण करण्यास आज तरी आपण पुढें सरल्याचें पाहून फार आनंद झाला. मी किती दिवस तरी ह्या गोष्टीचा विचार करतों आहें परंतु तो योग आज आपण जुळवून आणल्याबद्दल आपलें अभिनंदन केल्याशिवाय राहवत नाहीं.

इतकें मी सांगितल्यावर मी निराळा अभिप्राय म्हणून लिहून देण्याची गरजच नाहीं. कारण माझी संमति आपणांला माझ्या आजपर्यंतच्या तुमच्या आमच्या ऐक्यप्रकरणीं असलेल्या वरील उत्सुकतेच्या वाक्यांवरून दिसतेच आहे. आणि कोणी झाला तरी आपल्या ह्या कार्यास धर्मशास्त्र बिलकुल विरुद्ध नसतांना आपले आचारविचार, आहारविहार, धंदा, कुलदैवतें वगैरेंची साम्यता पाहिली असतां विरोध करण्यास धजणार नाहीं. कारण आपण आमच्यांतीलच आहां हें पूर्वापार चालत आलेल्या कथेवरूनसुद्धां सिद्ध होत असून आपले ऐक्यदर्शक मुद्दे तर तुमच्या-आमच्या ऐक्याबद्दलचे सबळ पुरावेच आहेत. आपल्या अपंक्तपणाविषयीं इतिहासांत कांहींच मिळणें शक्य नाहींसें दिसतें. असो. आपली खटपट बरीच जोरांत चालू आहे असें ऐकूं येतें. आनंद वाटतो. चळवळ अशीच चालवा. जनतेची मान्यता घ्या. श्रीपाशीं विनंती करा. व लवकर आमच्यांत मिसळून आमची ज्ञात सबळ करा. एवढीच तुमच्यापाशीं विनंती करून हा अभिप्राय पुरा करितों. कळावें, लोभ असावा ही विनंती.

आपला हितचिंतक
(सही) विठ्ठल माधव उपाध्ये.

---

अ० नं. ५

वोलिंग. श्रीसद्गुरुप्रसन्नोस्तु आश्विन शुद्ध ५ शके १८४५.

राजश्रीया विराजमान राजश्री—

रघुनाथ शाबा प्रभु सावकार–बोरीकर
रामजी विश्वंभर प्रभुगांवकार–शिरोडें
गुणबा शिवं प्रभुदेसाई वास्तव्य–मैंगाळ
बाबू पुरुषोत्तम भट्ट राहणार–कुंडई
सीताराम नारायण भट्ट, शिरशिरेकर

यांसी कृतानेक नमस्कार वि. वि. आपलें अभिप्रायार्थ पाठविलेलें पत्र वाचून भावार्थ समजला. गांव शिरोडें व बोरी वगैरे स्थळीं राहाणारे भट्ट-प्रभु यांचा व इतर ब्राह्मणांचा एकत्र अन्नसंबंधादि व्यवहार कां होत नाहीं याबद्दलची माहिती सांगण्यास माझ्या लक्षीं प्रसिद्ध लेख वगैरे

कांहींच वाचनांत नाहीं. तथापि चालू व्यवहारावरून इतकें मात्र स्पष्ट सांगूं शकतों कीं, आपले कुलदेव, कुलपुरुष, गोत्रें, स्वभाव, स्नान-संध्यादि पंचमहायज्ञ, सहानुष्ठान, पूजावृत्ति, बागाईत वगैरे निर्वाहाचीं साधनें व ग्रामासंबंधीं अधिकार इ० भट्टप्रभूंचीं आणि कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पाध्ये ( पद्ये ) उपनामक ब्राह्मणांचीं सर्वच आचरणें एकाच तऱ्हेचीं असून फलाहार–उदक इत्यादिकांचा स्वीकार प्रसिद्धरीत्या एकत्र सर्वत्र सुखानें होतो. मात्र या उभयतांत फेरफार दिसतो तो इतकाच कीं, प्रभु यांची भाषा बदलली आहे. व भट्टप्रभूंशीं इतर ( द्राविड ) ब्राह्मणांचा अन्नसंबंध होत नाहीं. याशिवाय भेददर्शक कांहींच दिसेना. याचें कारण काय असावें ? याचे शोधांतीं इतकीच एक वार्ता श्रुत होते कीं, सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमच्छंकराचार्य सद्गुरूंशीं एकदां प्रसादानिमित्त झालेल्या आज्ञेचें चुकीनें कालातिक्रमण होऊन भट्टप्रभु हे इतर ब्राह्मणांच्या आणि श्रीसद्गुरूंच्या भोजनोत्तर पोंचले. त्या प्रसादसेवनकालीं श्रीसद्गुरूंनीं अज्ञानकृत दोषाबद्दल दंड व प्रायश्चित्त नेमलेलें श्रुत नाहीं. मात्र तन्निमित्तानें कांहीं घरगुती कलहाच्या मंडळीनें ती संधि लक्षीं ठेवून 'हे बहिष्कृत' अशा भाषेचा वृथा गवगवा करून द्वेषाभिवृद्धि केली. ती भाषा सामान्य मानून रा० भट्टप्रभूंनींही तदुपेक्षाच केली. पण त्या दिवसापासून तों आजमितीपर्यंत यांचा व इतर ब्राह्मणांचा एक पंक्त्युपविष्ट अन्नसंबंध सुटला, तो पुनः जमला नाहीं. इतकी वार्ता श्रुत होते. म्हणून यांस पतित म्हणावें तर हे आचारभ्रष्ट नाहींत. इतकेंच नव्हे तर कर्मनिष्ठ, पुजारी, उपाध्याय, हेही आहेत. आतां यांस प्रभु कां म्हणावें ? तर नेत्रावळींत असलेले रा० रा० देसाई यांसही प्रभु हें नाम प्रसिद्ध आहे. यावरून अस्मज्जातीयांतर्गतच हे होत असें सिद्ध होतें. तथापि बहुकाळाचा निराळेपणा असल्यावरून सद्यःस्थितीप्रमाणें कऱ्हाडे, पाध्ये ( पद्ये ) कोंकणस्थ इ० अस्मद्देशस्थ ब्राह्मण-समुदायाचा अनुकूलाभिप्राय व त्या अभिप्रायासह श्रीमच्छंकराचार्य सद्गुरूंची आज्ञा शुद्धिपत्राची उपलब्धी करून बदललेल्या भाषेची सुधारणा, कित्येक आचरणाची फेरबदली आणि वेदशास्त्राचें–आज आहे त्यापेक्षां–पुढच्या बुद्धिमान् अपत्यांस शिक्षण, इतकें केलें असतां निःसंशय हे

सर्व ब्राह्मणांत पंक्तिपावन होण्यास योग्य आहेत. मात्र ऐक्यतेच्या समारंभाच्या प्रसिद्धीकाळीं एखादें ऋक्संहिता-स्वाहाकारासारखें महदनुष्ठान करून तन्निमित्तानें ऐक्यत्वाची एकपंक्तीत अन्नसंबंधानें जुळणी होणें सर्वथा विहित आहे, असें मला वाटत असलेलें मी या लेखद्वारें कळवीत आहें. या माझ्या भाषेंत मदज्ञानानें प्रमाद असल्यास क्षमा करून आज जगांत चालत असलेल्या स्व-स्वजातीच्या प्रत्येक समाजाकडे लक्ष देऊन आज ब्राह्मणजाति अल्प म्हणून इतरांकडून होत असलेल्या निष्कारण उपद्रवाच्या विचारानें या आपल्यापासून सुटलेल्या अस्मदवयवरूप 'प्रभु' मंडळीचा स्वीकार करणें सर्वथा विहित आहे, असें मला निःसंशय वाटतें. सर्व ब्रह्मवृंदांस इतकी विनंति करून या वाढलेल्या लेखाचा उपरम करितों. कळावें, ( हें ब्रह्मवृंदीं सादर पोंचविणें ) स्नेहाभिवृध्द्यर्थ पुनः विनंति.

(सही) कृष्णभट्ट कथने, मुक्काम वेलिंग.

प्रेम व नम्रतापूर्वक वि. वि.—सदर अभिप्रायास माझीही संमति असल्यावरून निराळा लेख न लिहितां यावरच सही केली आहे. राग नसावा, लोभ असावा हीच विनंति.

मिति-सदर

आपला नम्र

(सही) शंकर वामन भट्ट उपाध्ये—बोरीकर.

---

अ० नं. ६

कपिलेश्वर. श्रीशंकरप्रसन्नोऽस्तुः। भाद्रपद वद्य ५ शके १८४५.

अंत्रुज प्रांतांत बोरी व शिरोडें वगैरे भागांत भट्टप्रभु ( भटपरोब ) या जातिदर्शक नांवानें प्रसिद्ध असलेलीं सुमारें ४०।५० द्राविड ब्राह्मणांचीं घराणीं आहेत. त्यांच्याशीं इतर पद्ये, चित्तपावन, कऱ्हाडे जातींचा भोजनादि संबंध कैक कालापासून सुटलेला दिसतो. वरील भट्टप्रभुमात्र पद्ये वगैरे जातींकडे भोजन करितात. ह्या वहिवाटीला किती काल झाला हें समजणें अशक्य दिसतें. भट्टप्रभु हे मूळचे पद्ये मंडळींतील आहेत असें परस्परांच्या गोत्र व कुल दैवतैक्यांवरून व कांहीं ऐकीव दंतकथेवरून दिसतें. असें कोणी कोणी म्हणतातः—कीं, " एकदां

श्री मज्जगद्गुरूंची स्वारी कपिलेश्वरी असतां त्यांच्या आमंत्रणाप्रमाणें जी मंडळी भोजनास वेळीं हजर झाली नाहीं अर्थात् तीर्थप्रसादास अंतरली; तीच, भट्टप्रभु हें नांव धारण करून स्वतंत्र राहिली व शरीरादि संबंध आपसांतच तिनें सुरू केला." असें भट्टप्रभु प्रभृतींच्या बोलण्यांत येतें. सांप्रत वरील स्वतंत्र मंडळीचा समाज बराच कमी होत असल्यामुळें विवाहादि संबंधांत त्यांना फार अडचण भासूं लागली आहे. त्यामुळें त्यांना आज स्वतंत्र राहणें फारच अशक्य कोटींतलें वाटूं लागलें आहे. म्हणून मूळ एक असलेल्या पद्ये जातींत आपला रोटीबेटीव्यवहार चालू व्हावा अशाबद्दल त्यांचा प्रयत्न सुरू आहे. कांहीं वर्षांपूर्वी वे. शा. सं. वामनशास्त्री इस्लामपूरकर यांनीं या ऐक्याबद्दल खटपट केली होती. पण त्यांना ताद्दश यश आलें नाहीं असें ऐकण्यांत येत आहे. तूर्त जो समाजैक्याचा प्रयत्न चालू आहे, त्यांतच कांहीं विद्वान्, पुढारी, पुरोहित, ग्रामस्थ वगैरेंचे अभिप्राय घेण्याचें काम सुरू आहे. त्यांतील कांहीं अभिप्राय मला दाखवून तो देण्याबद्दल भट्टप्रभूंतील एक दोन पुढाऱ्यांनीं बराच आग्रह केला. त्या आग्रहास मान देण्यासाठीं मला सुचतील तसे अभिप्रायादाखल दोन शब्द लिहिणें भाग आहे. वास्तविक या कामास बराच माहितगार व अधिकारी मनुष्य असावा लागतो. यांचा (भट्टप्रभूंचा) आचारपरंपरा, चालीरीति वगैरेंत कमीजास्तपणा कांहीं असल्यास त्याची माहिती किंवा अनुभव मला मुळींच नाहीं; करितां मी अभिप्राय कसा द्यावा हें मलाच मोठें गूढ वाटतें.

'संहतिः कार्यसाधिका' 'संघे शक्तिः कलौ युगे' या तत्त्वांच्या दृष्टीनें वरील जात्यैक्य होणें कोणालाही विरुद्ध वाटेल असें मला वाटत नाहीं. मात्र ज्या पद्ये मंडळींत हा भट्टप्रभु वर्ग मिसळूं पाहतो त्या मंडळीचा अन्नोदकादि संबंध ज्या कऱ्हाडे, कोंकणस्थ, वगैरेंशीं आहे, त्यांची या संबंधांत ताटातूट न होतां परस्परांत ऐक्य राहून ह्या कामांत सर्वांची भरपूर मान्यता असली पाहिजे. नाहीं तर आहे तें बरें असें म्हणण्याचा प्रसंग येईल तो न यावा. दुसरें—आचारविचार, भाषा, वेदशास्त्रादिकांचें अध्ययन, निदान अत्यावश्यक तेवढें तरी आन्हिककर्म आचरणांत आणणें, शुचिर्भूतपणा ठेवणें, वगैरे ज्या गोष्टी ब्राह्मणांस अवश्य आहेत त्यांपैकीं आपल्या

समाजांत कोणत्या गोष्टींची उणीव आहे तिचा विचार ठरवून ती भरून काढण्याविषयीं फार झटलें पाहिजे. अशा रीतीनें सर्वांत घुढें भरारी मारल्यास ज्यांच्याजवळ आज तुम्हांला आम्ही तुमच्यांत येऊं का असें सविनय विचारावें लागत आहे तें न लागतां तुम्ही आमच्या मंडळींत खुशाल या असेंच ते म्हणूं लागतील व अशा रीतीनें ऐक्य पावण्यांत भट्टप्रभु मंडळींना मोठें भूषण आहे व तें भूषण या वरील मंडळींनीं गमावूं नये. पद्ये वगैरे मंडळींची जी आज भट्टप्रभु वर्गांस आपल्यांत मिळविण्याबद्दल साशंकवृत्ति आहे ती माझ्या मतें आपल्यांत वरील सुधारणा झाल्यानंतर राहणार नाहीं मग ऐक्य होण्याला काय उशीर ? याप्रमाणें उभयपक्षांस हें जात्यैक्य आवडलें तर श्रीमज्जगद्गुरूंची (मान्यता) कृपा होण्याला सुलभ पडेल. आज भट्टप्रभूंनीं अभिप्राय, सह्या घेणें वगैरे काम जोरानें चालू केलें आहे तें बरेंच आहे पण ऐक्य उत्पन्न होण्याला ती साधनसामुग्री संपादिली पाहिजे. तिची व्यवस्था सर्वांत पूर्वी ह्यांनीं निरालस्यतेने करावी व धार्मिक व नैतिक शिक्षण, आणि सदाचारसंपादन वगैरेनें थोडक्याच काळांत सर्वांस चकित करून सोडावें अशी माझी या भट्टप्रभु वर्गांस सविनय सप्रेम सूचना आहे. वरील होऊं पहाणाऱ्या ऐक्यास धर्मशास्त्रांदिकांचा अडथळा कांहीं दिसत नाहीं. असल्यास त्याचा पंडित लोक विचार करितील. बाकी सूचित केलेल्या सुधारणेच्या पूर्वीच उभय-पक्षैक्य सर्वसंमत झालें तर बरें हें खरें; पण मागासलेल्या वर्गानें वर्चस्वी-पणा मिळवून या, या, असें म्हणून घेऊन त्या मंडळींत मिसळणें त्याहून उत्तम असें माझें मत आहे. मात्र थोडे दिवस त्रास व अडचण सोसावी लागेल त्यास इलाज नाहीं. कारण, टाकीचे घाव सोसल्यावांचून देव-कळा मिळत नसते. कदाचित् निर्दिष्ट सुधारणा करूनसुद्धां उद्दिष्टैक्य लाभलें नसेल तर क्षति दिसत नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. परमेश्वरानें भट्टप्रभूंचा आजचा सद्धेतु लवकरच पूर्ण करावा अशी त्याची सविनय प्रार्थना करितों. असो, मला वाटलें तें मीं लिहिलें आहे. न्यूनातिरिक्ताची क्षमा असावी. हे विनंति. (सही) महादेव पांडुरंग निगळ्ये.

वरील अभिप्राय मलाही मान्य आहे.

(सही) रामचंद्र विनायक उपाध्ये.

---

अ० नं. ७

पेडणें–गोवा.

श्रीविजयतेतराम्

सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत् ।
यद्भूतहितमत्यंतमेतत्सत्यं मतं मम ॥ १ ॥

—महाभारत, शांतिपर्व.

श्रीयुत राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री—
रामजी विश्वंभर प्रभुगांवकर
गुणबा शिव प्रभुदेसाई
रघुनाथ शाबा प्रभु सावकार
बाबू पुरुषोत्तम भट
सीताराम नारायण भट

राहणार बोरी–शिरोडें यांसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष. आपण पाठविलेलें चैत्र शुद्ध ११ गुरुवार शके १८४६ चें प्रेमपत्र पोंचलें. पत्राभिप्राय लक्षांत येऊन अत्यंत संतोष झाला. आपल्या पत्रांत आपण "आम्ही प्रांत गोवा, गांव बोरी व शिरोडें येथें राहणारे, भट्टप्रभु या संज्ञेनें ओळखले जाणारे, पंचद्राविडांतर्गत पद्ये ब्राह्मणांशीं गोत्र, कुलदेवता, कुलपुरुष, धंदा इत्यादिकांनीं समान असतां आमच्याशीं पंचद्राविडांचा अन्नादि संबंध होत नाहीं याचें कारण आपण धर्मशास्त्र, प्राचीन इतिहास, विश्वसनीय लेख वगैरेंचा विचार करून आम्हांला खरोखरीच कांहीं दोष असल्याबद्दल योग्य तो शास्त्राधारें विधि कळवावा आणि आम्हांला पंच-द्राविडांशीं अन्नादि संबंधानें संलग्न होण्यास आपली संमति देण्याची कृपा करावी. आमचीं केवळ तीस चाळीसच घरें असल्यानें आम्हांला धार्मिक व सामाजिक कार्यांत वरचेवर फारच अडचणी सोसाव्या लागतात. तरी आपण अंत:करणपूर्वक आमच्याबद्दल योग्य तो अभिप्राय देऊन आम्हांला आभारी करावें." इत्यादि मजकूर लिहिला आहे. वरील विषयावर अभिप्राय देण्यास मजपेक्षां जास्त अनुभवी व विद्यातपोवयोवृद्ध अशा व्यक्तिच अधिकारी होत. तथापि ज्यांस जें पटेल तें निर्भयपणें बोलून दाखविण्यास ज्यास त्यास अधिकार आहे हें लक्षांत ठेवून माझें प्रामाणिक मत कळवीत आहें.

आपल्या पत्रांतून विचारणीय मुद्दे निघतात ते हेः—

(१) भट्टप्रभु नांवाचा अल्पसंख्याक वर्ग पंचद्राविडांतील अमक्या एका जातीपैकीं आहे असें मानण्यास प्रमाण काय ?

(२) तो अमक्या विशिष्ट वर्गाचा आहे असें ठरल्यास त्यानें त्यास ( भट्टप्रभु वर्गास ) बाहेर टाकण्यास कारण कोणतें ?

(३) दुसऱ्याविषयीं पुरेसें समर्पक कारण नसेल तर विमुक्त वर्गास संशयाचा फायदा देऊन मुख्य वर्गानें त्यास आपल्यांत एकजीव करून घेणें न्यायाचें होईल कीं नाहीं ?

याचा आतां आपण यथाक्रम विचार करूंः—

१—भट्टप्रभुवर्ग पद्ये जातीपैकीं असल्याचें सांगण्यांत येतें. विशेष पूस-तपास करतां पद्ये आणि भट्टप्रभु या उभय समाजांत समानत्व दाखविणाऱ्या खालील गोष्टी आढळतातः—

१ भारद्वाज, कौशिक, वत्स आणि अत्रि हीं गोत्रें दोहोंतही आहेत.

२ दोहोंतही महालसा व नवदुर्गा या कुलदेवता आहेत.

३ भिक्षुकी, पुजारीपणा, बागबागाईत वगैरे धंदे दोघांचेही आहेत.

४ दोहोंतही सावित्री, मंगलागौरी वगैरे व्रतें आचरितात.

५ उभयतांतही सहानुष्ठान चालू असून गांवकीचा अधिकारही सारखाच आहे.

६ गांवकर, प्रभु, देसाई, प्रभुदेसाई वगैरे उपनामें दोन्ही समाजांत असून अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे—

७ दोन्ही समाजांत शाकाहार चालतो, आणि जन्मतः प्रवृत्तमांस धर्माचा जो सारस्वत समाज त्याच्याशीं पद्यांप्रमाणें भट्टप्रभूंचाही अन्नोदक संबंध मुळींच होत नाहीं.

वरील साम्यदर्शक मुद्दे लक्षांत घेतले असतां भट्टप्रभु हा वर्ग निःसंशय पद्ये वर्गापैकींच आहे, असें ठरतें. अर्थात् पद्ये हा वर्गही कऱ्हाडे ज्ञातीचाच पोटभेद असल्यानें भट्टप्रभूंचा लागाबांधाही कऱ्हाड्यांशीं निगडित आहे, यांत शंका नाहीं. एकंदरींत सांगावयाचें हें कीं, भट्टप्रभु हे इतर साहश्यें बाजूस ठेवलीं तरी मुख्यत्वेंकरून उपनामसाहश्य आणि गांवकीचा (गांवकीचा

अधिकार ) आणि स्वतः पद्ये हे त्यांस आपल्यांतील समजतात; या निर्बाध घुराव्यानें हें पद्ये-समाजांतील आहेत असें निर्विवादपणें आमच्या मतें ठरतें.

२ भट्टप्रभु हे याप्रमाणें पद्यांपैकीं आहेत असें निश्चित झाल्यावर ते पद्ये-समाजापासून वेगळे कां झाले ? याचा आतां विचार करावयाचा. आणि तोच प्रश्न अत्यंत नाजूक व महत्त्वाचा आहे. हा विचार पूर्वेतिहास व तद्विषयक विश्वसनीय अशी लेखी तोंडी माहिती घेऊन करावयाचा. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या बाबतींत एका लंगडया दंतकथेशिवाय दुसरें कांहींही ऐतिह्य साधन नाहीं. व शोधाशोध करूनही मिळण्याची आशा नाहीं. घडलेली गोष्ट लिहून ठेवण्याची आमची जुनी चालच नव्हती, त्यास एवढयापुरता तरी अपवाद कसा घडेल ? तरी एक बरें झालें कीं, ऋषिवर्यांनीं गोत्र-प्रवरांचें दावें आमच्या गळ्यांत अडकविल्यामुळें त्यांची आमची चुकामूक होण्याची भीति नाहीं. व आजोब्बांचें नांव नातवास ठेवण्याची प्रायः पद्धति असल्यानें त्रयीचीं नांवें गहाळ होत नाहींत; परंतु हाही प्रघात आतां मागें पडत चालला आहे. असो.

साधनाच्या अभावीं भट्टप्रभूंबद्दल आतां आम्हांला अनुमान-प्रमाण व आनुषंगिक गोष्टी यांवरच भिस्त ठेवून यथामति निर्णय करणें भाग आहे. भट्टप्रभूंशीं अन्नसंबंध होत नाहीं, पण त्यांच्या येथील हव्यकव्यादि कृत्यें पद्ये व इतर ब्राह्मण करितात. इतकेंच नव्हे, तर त्यांच्याशीं सहानुष्ठान संबंधही चालत असून सार्वजनिक देवालयांतून पुजारीपणाही भट्टप्रभूंपैकीं ब्राह्मण ( बोरी येथें नवदुर्गेचे पुजारी ) करीत आहेत. यावरून असें अनुमान करावें लागतें कीं, भट्टप्रभूंशीं पद्ये ब्राह्मण व तदितर ब्राह्मण जो अन्नसंबंध करीत नाहींत तो त्यांवर कोणत्या तरी कारणानें केव्हां तरी अज्ञात अशा पूर्वकालीं कायदेशिर बहिष्कार पडला होता म्हणून नव्हे तर हा कसला तरी हेव्यादाव्याचा किंवा हटातटाचा परिणाम आहे. या अनुमानाला गमक हें कीं—हा तसा खरोखरा बहिष्कार असता तर त्यांच्याशीं सहानुष्ठानाचा वगैरे संबंध चालू राहता ना.

आरूढपतितं विप्रं मंडलाच्च विनिःसृतम् ।
उद्बद्धं कृमिदष्टं च स्पृष्ट्वा चांद्रायणं चरेत् ॥

—प्रायश्चित्तमयूख.

या स्मृतिवचनाप्रमाणें पाहिलें असतां मंडलाद्विनिःसृत म्हणजे स्वज्ञातींतून बाहेर पडलेला; अर्थात् समाजानें वाळीत टाकलेला जो ब्राह्मण त्याला स्पर्श केल्यास चांद्रायण प्रायाश्चित्त सांगितलें आहे. समाजाचा निर्बंध –मर्यादा सोडून वागणारा असा मंडलाद्विनिःसृत या पदद्वयाचा अर्थ केला तरी चालेल.

एवंच कोणत्याही तऱ्हेनें समाजांतून फुटून गैरवर्तन करणाऱ्या व्यक्तीस स्पर्श केला तर चांद्रायण सांगितलें आहे. जर भट्टप्रभूंचा समाज इतका दोषी असता तर त्याच्याशीं यजन-याजन सहानुष्ठानादि संसर्ग–धर्माचरणाचे निर्बंध कांटेतोलपणानें ज्या वेळीं पाळले जात होते त्या वेळीं शक्य तरी होता काय ? याचा विचार निःपक्षपाती विवेककोविदांनीं आपल्या मनाशीं करावा. सांगावयाचें काय कीं, इतिहासाची दृष्टि पोंचत नाहीं, इतक्या मागच्या अज्ञातकालापासून भट्टप्रभु आणि पद्ये यांच्यांत ज्यापक्षीं सहानुष्ठानादि व्यवहार चालत आहे त्यापक्षीं भट्टप्रभूंचा वर्ग मागें कधीं बहिष्कृत नव्हता व आतांही नाहीं असें आम्हांस वाटतें.

तर मग "पद्ये वगैरे ब्राह्मणांची भट्टप्रभूंशीं अन्नसंबंध न करण्याची वहिवाट कां पडावी?" हा प्रश्न शिल्लक राहतोच. या बाबतींत आख्यायिका आहे ती अशीः—

"कपिलेश्वर मुक्कामीं श्रीजगद्गुरूंनीं सभोंवतींच्या सातही गांवांतील ब्राह्मणांस तीर्थप्रसादास बोलाविलें असतां बोरी व शिरोडें येथील ब्राह्मण अव्यवस्थितपणामुळें वेळीं भोजनास न जातां मुख्य पंक्तीचें भोजन उरकून श्रीस्वामींची स्वारी तेथून निघून गेल्यावर पोंचले. आणि जाग्याचा संकोच असल्यामुळें कोठें तरी मागच्या बाजूस ( आम्हांस वाटतें पाहिल्या पंक्तीचीं उष्टीं काढलीं नव्हतीं ) मागच्या पंक्तीस जेवले हें निमित्त पुढें करून ( श्रींची स्वारीही निघून गेल्यामुळें त्यांच्या हातचा तीर्थप्रसादही मिळाला नाहीं हेंही निमित्त असेल.) त्यांस बाकीचे ब्राह्मण अपंक्त समजूं लागले. तेही चांगले संपन्न असल्यानें;

ह्या चुकभुलीची शहानिशा करून घेऊन त्यांनीं ऐक्य जोडलें नाहीं. आणि बेपर्वाईनें समाजास न जुमानतां तसेच राहिले."

अशा आशयाची ही वदंता आहे. स्वरूपतः पाहिलें तर ही आख्यायिका वृद्ध आजीबाई कच्चाबच्चांस कहाण्या सांगतात तशी असंबद्धशी वरवर पाहणारास वाटते; परंतु या आख्यायिकेस कांहीं तरी मूळ आहे. 'कारणाशिवाय कार्य नाहीं' हा सिद्धान्त खोटा नाहीं. तांदळाच्या गोणींत कारखानदार गारगोटीचा चुना मिसळतात त्याप्रमाणें माल-मसाला लावून फुगवून सांगण्याची वक्त्याची सहजप्रवृत्ति, श्रोत्याचे कान लांब आणि बहुकाल-पर्याय अशा तीन कारणांनीं तींत बेरूप करणारीं कांहीं तरी भेसळ झाली आहे. तेव्हां विचाराच्या चाळणीनें गाळून त्यांतील चोथा टाकून दिला तर तिचा सत्य निर्णयास बराच उपयोग होणार आहे

आमच्या मतें एक मोठें ग्रामण्य तत्कालीन भट्टप्रभूंचा वर्ग निर्माण होण्यास कारण झालें असावें. कपिलेश्वर मुक्कामीं श्रीजगद्गुरूंनीं सदर ग्रामण्याचा अखेर निकाल करून आरोपित व्यक्तीस पंक्तिपावन करण्या-साठीं आरोपिताखेरीज पंचक्रोशींतील ब्राह्मणांस तीर्थप्रसादाकरितां बोलाव-ण्यांत आलें असेल. त्या वेळीं आरोपिताच्या विरुद्ध-पक्षांतील कांहीं दुर-भिमानी कंदांस हा स्वामींचा निकाल पसंत न पडल्यामुळें ते बुद्धिपुरःसर तीर्थप्रसादास गेले नसतील. परंतु ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच बहुधा असल्यानें तीर्थप्रसादाच्या भोजनसमारंभांत कोणी दरकार न करितां तो समारंभ आटपून श्रींची स्वारी निघून गेली. पुढें हा स्वामींचा व ब्रह्मवृंदांचा केलेला उपमर्द सहन न होऊन सर्व ब्राह्मणांनीं कट करून त्यांच्याशीं व्यवहार बंद केला असावा. मागच्या पंक्तीस जेवणें, आणि तेंही स्वामी गेल्यावर, व कानाकोपऱ्यास बसून जेवणें ही गोष्ट जे सधन, मानी व पक्षाभिमानी असतील त्यांच्याकडून सहसा घडावयाची नाहीं. मनुष्यधर्माचा विचार करील त्यास हें माझें म्हणणें पटल्याशिवाय राहणार नाहीं. आणि यासाठीं आख्यायिकेंतील 'पाठीमागून जेवले' या म्हणण्यापेक्षां मीं केलेला अर्थ अधिक संभवनीय व सुसंगत आहे.

अथवा कावेबाजपणाच्या दृष्टीनें असेंही असेल कीं, आरोपिताशीं सह-भोजनाचा प्रसंग तर चुकावा आणि श्रींच्या आज्ञेचा अवमान केला असें

न म्हावें अशा दुहेरी डावपेंचानें ते मुद्दाम पाठीमागून गेले आणि आचारीवाढप्यांच्या पंक्तींत कदाचित् जेवले असतील. अर्थात् हा त्यांचा कावा ओळखून श्रींची आज्ञा शिरोधार्य समजून ज्या जातिगंगेनें दोघी व्यक्तीस पंक्तिपावन केलें आणि आपल्या पोटांत घेतलें तिला चीड येणें अनैसर्गिक नाहीं. त्याप्रमाणें त्यांच्याशीं व्यवहार बंद करण्याचा वर सांगितल्याप्रमाणें कट झाला असेल. एकंदरींत कोणताही अर्थ घेतला तरी आमच्या तत्त्वास बाध येत नाहीं.

यावरून लक्षांत घ्यावयाचें तें हें कीं, भट्टप्रभूंच्या पूर्वजांशीं प्रथम इतर ब्राह्मणांनीं अन्नसंबंध बंद केला तो सामुदायिक कट करून केला. योग्य व रीतसर बहिष्कार घालून नव्हे. ही गोष्ट मनांत जागती ठेवली म्हणजे भट्टप्रभूंच्या संग्रहा-संग्रहाविषयींचा विचार करितांना अन्याय घडणार नाहीं.

वरीलप्रमाणें सर्व ब्राह्मणांनीं अन्नादि व्यवहार बंद ठेवल्यावर "आम्हीं सधन आहों, आमचें यांच्यामुळें कांहींच अडणार नाहीं" अशा आढ्यतेच्या गुर्मीनें भट्टप्रभूंच्या पूर्वजांनीं कांहीं तडजोड केली नसावी. पुढें होतां होतां लग्नाबांध्यांचीं व नात्यागोत्यांचीं कांहीं घरें त्यांस सामील होऊन त्यांचा आटोपशीर व सुटसुटीतसा 'भट्टप्रभु' नांवाचा समाज बनला. धनिकत्वामुळें व पहिल्या ताठरपणानें धार्मिक व सामाजिक कार्यांत त्यांस अडचण भासली नसावी व भासली असल्यास नेटानें त्यांनीं कशी तरी वेळ मारून नेली असावी. परंतु पुढें पुढें केवढाही श्रीमंत असला तरी त्यास समाजापुढें नमावें लागणारच. या न्यायानें भट्टप्रभूंना अडचणी भासूं लागल्या व इतर ब्राह्मण गरीब असल्यानें त्यांनाही धनिकाश्रय असावासा वाटूं लागला. तेव्हां हळुहळू उभयतांतील पीळ कमी पडत जाऊन पद्ये वगैरे ब्राह्मण भट्टप्रभूंच्या येथें हव्यैकव्यें व सहानुष्ठानें करूं लागले असावे. याप्रमाणें तडजोडीनें अर्धवट झालेलें ऐक्य तेंच आज पद्ये व भट्टप्रभु यांत दिसत आहे.

आमच्या प्रचलित आख्यायिकेचा खरा ऐतिहासिक अर्थ येथपर्यंत सांगितल्याप्रमाणें आहे व तो सुसंगतही दिसून शिवाय त्याचा प्रकाश भट्टप्रभूंच्या मूल इतिहासावर पडून त्यांविषयीं सहानुभूतीनें निर्णय देण्यास तज्ज्ञांस सुलभ जाईल अशी आमची खात्री आहे.

वर नमूद केलेल्या अर्थाचीं उदाहरणें अशक्य कोटींतील नाहींत. आमच्याकडे चाळीस वर्षांमागें पुनर्विवाहाचें प्रसिद्ध ग्रामण्य सुरू होऊन सुमारें २५।३० वर्षें चाललें होतें हें सर्वांस महशूर आहे. त्या प्रकरणांत झालेला विहाह हा पुनर्विवाह नाहीं असा श्रींनीं निकाल दिला व शब्द-दोषाबद्दल मुलीच्या बापास पंक्तिपावन करून घेण्यास आज्ञा दिली. त्या प्रसंगींही वरीलप्रमाणें ८।१० विरुद्ध पक्षाचीं घरें स्वामींचा निकाल अमान्य करून वेगळीं राहिलीं आणि पुढें गरिबी आणि इतर अडचणींमुळें नाइलाज होऊन त्यांतून एकेक फुटतां फुटतां २५।३० वर्षांनीं सर्व मंडळी ज्ञातगंगेस मिळून शेवटीं गंगेचें पाणी गंगेंत एकरूप झालें. आणि भट्ट-प्रभूंचा समाज पूर्वकालीं बराच सधन असल्यानें बेफिकीरपणाच्या ताठ्यांत तसाच राहिला. तो ह्या घटकेपर्यंत तसाच त्रिशंकूसारखा लोंबकळत आहे. एवढाच काय तो ह्या दोन उदाहरणांत फरक. सारांश, विकार-वशता व ब्राह्मणांची कलहप्रियता ह्यांपासून असे प्रकार घडतात व शेंकडों घडले आहेत. याबद्दल श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं आम्हांला सर्टिफिकीट दिलें आहे, तें पहाण्यासारखें आहेः—

**गुरुत्व आलें नीच याती । कांहींएक वाढली महती ।**
**शूद्र आचार वुडविती । ब्राह्मणाचा ॥ १ ॥**
**हें ब्राह्मणांसि कळेना । त्यांची वृत्ती वळेना ।**
**मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ २ ॥**
**राज्य गेलें म्लेंच्छक्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ॥**
**आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ३ ॥**
**ब्राह्मणांस ग्रामण्यानें बुडविलें । श्रीविष्णूनें श्रीवत्स मिरविलें ।**
**त्यास विष्णूनें शापिलें । परशुरामें ॥ ४ ॥**
**आम्हीहि तेचि ब्राह्मण । दुःखीं बोलिलों वचन ।**
**वडिल गेले ग्रामण्यें करून । आम्हांभोंवतीं ॥ ५ ॥**
**आतांच्या ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें झालें ॥**
**तुम्हां बहुतांच्या प्रचीतीस आलें । किंवा नाहीं ॥ ६ ॥**

—दासबोध.

यावरून ही ब्राह्मणांची आत्मघाताची ग्रामण्यलीला आजकालची नाहीं. भृगूंनीं आपल्या शांतीची परीक्षा श्रीविष्णूकडे दिली. दुर्वास-मुनींनीं अंबरीष राजर्षीकडे दिली; ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

तेव्हां भट्टप्रभूंचा नवावतार होण्यास हे किंवा अशाच जातीचे दुसरे आमचे गुण कारण झाले आहेत, यांत शंका नाहीं.

३—आतां तिसऱ्या म्हणजे शेवटच्या मुद्द्याचा विचार करावयाचा. तो म्हणजे भट्टप्रभु समाजास बाहेर टाकण्यास समर्पक कारण कोणतें घडलें हें जर समजण्यास मार्ग नसेल तर त्या समाजास पद्ये वगैरे ब्राह्मणांनीं आपल्यांत सामील करून घेण्यास हरकत कोणती ?

वर दोन मुद्द्यांचा विचार केला. त्यावरून कोणाच्याही लक्षांत येईल कीं, भट्टप्रभु समाजावर अमका एक पातित्य दोष शाबीत होण्या-जोगा पुरावा मुळींच नाहीं. दंतकथेचें मूळ खरें असलें तरी श्रीस्वामींची आज्ञा ( तीर्थप्रसादास येण्याबद्दलची ) मोडल्यामुळें स्वामींकडून त्यांस आज्ञापत्र प्रसिद्ध करून बहिष्कृत केल्याची गंधवार्ताही सदरहू दंतकथेंत नाहीं. अन्नसंबंधच नुसता वर्ज केल्यानें पातित्य सिद्ध होत नाहीं. सहभोजन न करितां यजन-याजन, सहानुष्ठान अपांक्तेयांशीं केलें तरी चालतें अशी कोणाची समजूत असेल तर तो भ्रम आहे.

**यौनस्त्रौव मुख्यैस्तु संबंधैःसद्य एव पतति**

—प्रायश्चित्तमयूख.

असें सुमंतुवचन आहे. यौन म्हणजे बेटीव्यवहार, स्त्रौव म्हणजे यजन व मुख्य म्हणजे अध्ययनाध्यापन. तेव्हां या तीन संसर्गांपैकीं एखादा संसर्ग सतत एक वर्षपर्यंत केल्यास पातित्यास कारण होतें असें आहे. तेव्हां आज विचार केला तर भट्टप्रभूंशीं अन्नसंबंधाशिवाय बाकी सर्व व्यवहार चाललेले आहेत. यावरून भट्टप्रभु हे पद्ये समाजाहून वेगळे होण्यास मुळांत हटातटाशिवाय दुसरें तिसरें दोषास्पद कारण नसलें पाहिजे, असें ठरतें. आणि यावरून संशयाचा फायदा उदार मनानें भट्टप्रभु समाजाला देऊन पद्ये व इतर ब्राह्मणांनीं त्यांस आपल्यांत अवश्य मिळवून घेण्यास धर्म, न्याय आणि सत्य या तिन्ही गोष्टींनीं

कोणतीच हरकत नाहीं; असा माझा अखेरचा प्रामाणिक अभिप्राय आहे. आणि त्याचेवर विद्वान निग्रहानुग्रह समर्थ असे श्रेष्ठ ब्रह्मवृंद व श्रीस्वामी जगद्गुरु सदय अंतःकरणानें करितील अशी आशा आहे.

ज्या पक्षीं भट्टप्रभूंच्या ठिकाणीं आम्हांला कांहीं दोष दिसत नाहीं त्या पक्षीं कोणताही एखादा धर्माविधि सांगण्याचें कारण नाहीं. परंतु ज्ञातीच्या 'इहामुत्र निःश्रेयसा'ची भावना मनांत ठेवून सार्वजनिक स्वरूपाचा भट्टप्रभूंनीं मिळून एक अनुष्ठान समारंभ असा करावा कीं, ज्यांत शेंकडों ब्राह्मणांचा समावेश करितां येईल–आणि माझ्या मतें हें अनुष्ठान म्हणजे ऋक्संहिताहोम किंवा पवमानहोम उत्तमपक्षानें करावा. आणि या यज्ञीयतीर्थांत भट्टप्रभूंसह सर्वांचें अवगाहन–प्रसंगानें संमेलन घडावें. असें झालें म्हणजे एकंदरींत हा प्रसंग चिरस्मरणीय होईल व कोणत्याही तऱ्हेचा किंतु जुन्या मताच्या लोकांत राहणार नाहीं. श्रीमंत रघुनाथ शाबा प्रभु सावकार व रामजी विश्वंभर प्रभुगांवकर, यांनीं मनावर घेतल्यास हें काम सहज होणार आहे. मात्र हें अनुष्ठान करण्याबद्दल समेटाचा ठराव झाल्यावर बृहवृंदाची संमति घ्यावी. अनुष्ठानाच्या अटीवर समेटाचा प्रश्न अवलंबून नसावा. अनुष्ठानाचा प्रश्न हा ऐक्योपबृंहणासाठीं माझ्या सद्बुद्धीस वाटलें म्हणून सुचविला आहे. त्याचा युक्तायुक्त विचार सुज्ञांनीं करावा.

शेवटीं भट्टप्रभूंतील धुरीणांच्या द्वारें त्या समाजास माझी जिव्हाळ्याची विनंति आहे कीं, दुर्दैवानें ज्या वेळीं आपल्या समाजांतून त्याला विलग करण्यांत आलें त्या दिवसापासून आजमितीपर्यंत मध्यें किती कालपर्याय व्यतीत झाले असतील तें समजण्यास साधन नाहीं. अर्थात् इतक्या दीर्घ कालांत वैदिक आचारविचाराच्या आपल्या बालबोध वळणाच्या समाजाशीं त्यांचें अभ्यंतरींचें संघट्टन क्रमाक्रमानें सुटत जाऊन पंचमहायज्ञ, रीतरिवाज, भाषा, सोवळेंओवळें, इत्यादि आचारविचारांत मालिन्य येणें अपरिहार्य आहे. तेव्हां याप्रमाणें वर दाखविलेल्यापैकीं ज्या ज्या गोष्टी मलिन झाल्या असतील त्या त्या दुरुस्त करून शुद्धस्वरूपानें एव्हांपासूनच जरूर अमलांत आणण्याची व्यवस्था करावी. ज्या गोष्टी मुळांतून सुटल्या असतील त्यांचा परिग्रह करावा. यासाठीं एखादा सदाचारसंपन्न ब्राह्मण

शिक्षणासाठीं ठेवावा लागला तरी हरकत नाहीं; कारण ब्राह्मण्य हें सोपें नाहीं व बाह्यतः मी ब्राह्मण माझ्या येथें वेदोक्त झालें पाहिजे असा त्रागा केल्यानेंही ब्राह्मण्य मिळत नाहीं व ओढून चंद्रबळ आणलें तरी तें पचणार नाहीं. ब्राह्मण हे मुळापासून निराशेच्या गांवचे इनामदार असून उलट्या अंबारींतून मिरविणारे आहेत किंवा होते. दुर्दैवानें भूत-कालाचा निर्देश करावा लागत आहे खरा; परंतु अद्यापही भिक्षुकांच्या घरांत विवेकदृष्टीच्या सूक्ष्मदर्शक यंत्रानें पाहिल्यास ब्राह्मण्याचें मूळ बीज सूक्ष्मरूपानें क्वचित् दृष्टीस पडतें. सारांश, या किरकोळ बाबी समजून उदासीन न राहतां वरील आचार विचार सुधारण्याचा प्रयत्न अवश्य करावा अशी माझी कळकळीची विनंतिगर्भ सूचना आहे.

आडमार्गानें विचार करणाऱ्याच्या मनांत असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, हे पद्यांपैकीं जर आहेत तर भट्टप्रभु हें जोडनांव तेवढ्या वर्गास कां मिळालें? आक्षेप किरकोळ असला तरी समर्पक आहे. आमच्या मतें प्रथम जी मंडळी वेगळी झाली त्यांत भट आणि प्रभु या दोन आडनांवांचींच घरें असावीं आणि आपल्या समाजाहून वेगळेपणा दाखविण्याकरितां उच्चार करण्यास सुलभ असें भट्टप्रभु हें उप-नांव सहज बोलतां बोलतां लोकांत झालें असावें. आणि मागाहून त्या समाजांत आणखी उपनांवाचीं घराणीं सामील झालीं असावीं. यांत अपूर्व असें कांहींच नाहीं. कोल्हापुराकडे "सव्वाशें" नांवाची एक स्वतंत्र जाति अव्यवहार्य म्हणून प्रसिद्ध आहे, असें समजतें. त्यांना पहिल्या १२५ लोकसंख्येवरून जसें नांव पडलें त्याचप्रमाणें हें असावें. भाषापंडितांस हें माझें म्हणणें पटेलसें मला वाटतें.

आतां थोडक्या शब्दांत माझ्या अभिप्रायाचा निष्कर्ष येणें-प्रमाणें आहे:—

१ उपनांव, गोत्र, अधिकार व कुलदेवता यांचें साम्य असल्यानें भट्टप्रभु हे पद्यांपैकींच आहेत.

२ प्रचलित दंतकथेशिवाय कालप्रवाहाबरोबर वाहात आलेला विश्वस-नीय असा अन्य पुरावा नसून त्या आख्यायिकेवरून देखील सदरहु समाजावर मोठासा दोषारोप होत नाहीं. घरावर हाडूक फेंकलें असतां

ज्या कालीं सबंध घराचें घर बाटत असे त्याच्याही मागल्या सोंवळ्या काळांतला हा प्रकार असून रजाचा गज करून भट्टप्रभूंचा समाज बनविला गेला आहे. याकरितां—

३ सहानुष्ठानानें वगैरे संबंध इतर ब्राह्मणांचा भट्टप्रभूंशीं होत असल्यानें भट्टप्रभूंचा समाज, पद्ये, कऱ्हाडे ब्राह्मणांनीं आपल्यात मिळवून घेऊन अन्न व शरीरसंबंधानें त्यास आपलासा करून घेण्यास कांहींही हरकत नाहीं.

पंचद्राविडांतर्गत कऱ्हाडे, पद्ये आदिकरून अखिल विप्रवृंदास प्रार्थना करण्याचें आतां माझें अवश्य कर्तव्य आहे. तें मी करीत आहें.

आतांपर्यंत भट्टप्रभूंबद्दल माझ्या बुद्धीस पटलें तें आडपडदा न ठेवतां निःपक्षपातपणें बुद्धीचा समतोलपणा राखून लिहिलें आहे, त्याचा आपण सहानुभूतिपूर्वक विचार करावा. माझे विचार कदाचित् चुकले असतील ते सुधरून घ्यावे. गतकाळाच्या पोटांत काय काय सांठलें आहे तें बुद्धीच्या मिणमिण्या उजेडांत शोधीत असतां खरी वस्तु जागच्या जागीं राहून कांहीं तरी खोटया विजाच हातीं लागण्याचा पुष्कळसा संभव असतो. म्हणून यांतील खरेंखोटें पारखण्यासाठींच हे माझे विचार मीं सर्व ब्राह्मणांपुढें ठेविले आहेत. त्यांतील ग्राह्याग्राह्यांशाचा निवाडा त्यांनीं करावा अशी माझी सदिच्छा आहे. मला खात्री वाटते, कीं माझ्या लिहिण्यांत थोडातरी ग्राह्यांश आढळला तर भट्टप्रभूंच्या समाजाला आपल्यांत सामील करण्यास ब्राह्मणसमाज कधींही मागें घेणार नाहीं.

देशकालपरिस्थितीचा विचार करून पाहतां आज घटकेला ब्राह्मण-समाजाची काय स्थिति आहे ? हाही विचार भट्टप्रभूंना आपल्यांत सामील करून घ्यावें किंवा नाहीं याचा विचार करतांना जमेस धरिला पाहिजे. मोठी आणीबाणीची वेळ आली असून ब्राह्मणसमाजावर चोहोंकडून हल्ले चढविले जात आहेत ! जो उठतो तो ब्राह्मणावर शस्त्र उगारूं लागतो. अशी ब्राह्मणाची दीनदुबळी स्थिति झाली असतां आम्हीं ब्राह्मणांनीं घरचीं भांडणें उकरून काढावयाचीं, कीं आमच्या समाजाचा कोट एकी घडवून आणून मजबूत करावयाचा याचा विचार शहाण्यांनीं अवश्य केला पाहिजे. समाजधुरंधरांनीं जरा आजूबाजूकडे

लक्ष द्यावें आणि आमची कशी पायमल्ली होत आहे ती पहावी. अशा वेळीं कोणत्याही कारणानें फुटून वेगळे झालेले समाजाचे तुकडे प्रेममय वज्रलेपानें सांधून विस्खलित झालेला समाज सुसंघटित करण्यास सर्वांनीं झटावें. जुनीं ग्रामण्यें विस्कटित बसण्याची ही वेळ नाहीं. ज्या बाजूनें ऐक्य घडेल तें केलें पाहिजे.

" बलिनापि न बध्यंते लघवोऽप्येकसंश्रयाः ।
विपक्षेणापि मरुता यथैकस्थानवीरुधः ॥ "

याचा अर्थ क्षुद्र माणसें सुद्धां एकजुटीनें गोल बांधून एके जागीं राहिलीं तर त्यांचें मोठया बलवंताच्या हातूनही तिळमात्र वांकडें होऊं शकत नाहीं. केवढाही सोसाटयाचा वारा सुटला तरी लहान लहान झुडपांच्या गुच्छाची एखादी डहाळीही त्याच्यानें मोडवणार नाहीं ! यावरून एकीचें सामर्थ्य केवढें आहे याची कल्पना करावी. संध्याकाळच्या वेळीं रानावनांतून एकटें जाण्याचा प्रसंग आला असतां एखाद्या झुडपाखालीं मंडल करून दबा घरून बसलेले शेंपन्नास लावे अकस्मात् भर्रदिशीं उडून घीट मनुष्यालाही कसा घाबरवितात हें बहुतेकांच्या अनुभवांतलें असेलच ! यावरून पशुपक्षीही जमाव करून राहातात तर त्यांतून आम्हां हिंदूंना— विशेषतः वर्णगुरूंना कांहींच शिकण्यासारखें नसेल काय ? इतकें कंटाळवाणें चऱ्हाट वळण्यांत आमचा एवढाच हेतु कीं, काळ वेळ पाहून आम्ही आपसांतील कुलंगडीं विसरून जाऊन ऐक्य वाढविण्यास प्रवृत्त व्हावें. आज जवळ जवळ ४०० लोकांचा ( भट्टप्रभूंचा ) समाज आम्ही हकनाक बाहेर ठेवून आमचा समाज विकल आणि दुर्बल करीत आहोंत ! आजपर्यंत चूक झाली ती होऊन गेली; पण तिची दुरुस्ती करण्याची ही सोन्याची संधि आम्हीं दवडतां कामा नये. व्यतीत झालेल्या शेंकडों वर्षांच्या काळाच्या पोटांत भट्टप्रभूंच्या संबंधानें इतिहास अमुकच आहे असें छातीठोकपणें जर कोणाला सांगतां येत नाहीं तर अशा संदिग्ध परिस्थितींत आपल्यांतलिच ४० घरें व आपल्याच रक्ताचा ४१६ लोकसमुदाय बाहेर कुचंबत ठेवून त्याची गैरसोय व आपलें सामर्थ्य क्षीण करून घेणें मुळींच शहाणपणाचें होणार नाहीं.

भट्टप्रभूंच्या पदरास कांहीं तरी दोष आहे असेंही समजुतीसाठीं घटकाभर कबूल केलें तरी एवढ्या दीर्घकालाच्या तपश्चर्येंत तो दोष धुऊनपुसून निघाला नाहीं काय ? अथवा पद्येब्राह्मणांच्या ज्ञातिगंगेच्या अंगांत येवढें सामर्थ्य नाहीं काय, कीं भट्टप्रभूंच्या समाजाचा लहानसा ओहोळ आपल्या पोटांत घेऊन त्याला आपल्यासारखें करतां येऊं नये ? आमची खात्री आहे, कीं पद्येसमाज मनांत आणील तर निःसंशय असें करण्यास समर्थ आहे. समुदायाचें सामर्थ्य व तेज कांहीं औरच असतें. याकरितां पद्येसमाजानें प्रभुसमाजाला आपण मातृस्थानीं आहोंत असें समजून उदार मनानें त्यांनीं प्रभुज्ञातीला आपल्यांत एकजीव करून घेऊन जगास उदाहरण घालून द्यावें. व समाजाच्या किंवा परंपरेनें ब्राह्मणाच्या उत्कर्षापकर्ष सुखदुःख संवेदना, यांत भट्टप्रभूंना समान भागीदार करून समाजकार्यास प्रवृत्त करावें अशी आमची पद्येब्रह्मवृंदांस प्रार्थना आहे.

या कार्मीं राजसत्ता अनुकूल असावी लागते किंवा ज्ञातीच्या उत्कर्षाचा उत्कट अभिमान पुढाऱ्यांत असावा लागतो. पहिलें उदाहरणः— कोंकणस्थ ब्राह्मणांशीं पूर्वी इतर पंचद्राविडांचा कधींही पंक्तिव्यवहार होत नव्हता, हें जगास महशूर आहे. कै० श्री० बाळाजी बाजीराव म्हणजे नानासाहेब पेशवे यांनीं शहाणपणानें आपल्या राजसत्तेचा उपयोग करून एका मंगलकार्यप्रसंगीं चित्तपावन व इतर पंचद्राविड यांची एक पंगत केली, हें इतिहासज्ञांस माहीत आहेच. आणि त्यापासून कोंकणस्थांचें किती कोटकल्याण झालें हें जग पहात आहे. आतां ज्ञातीचेंच म्हणजे ज्ञातीनेंच विभक्त समाजास आपल्यांत मिसळून घेतल्याचें उदाहरण पद्येसमाज उदार झाला तर आम्हांला पुढें लोकांस दाखवितां येणार आहे. तसें नच झालें तर समाजमंदिराचा एकेक घटक किंवा घटक-समुदाय घडाघड बाहेर फेंकून देऊन तें मंदिर खिळखिळें करण्यांत मोठा ग्रामण्यशूर म्हणून श्रीसमर्थ रामदासांनीं धुतलेल्या इंगळ्यासारखी ज्या आमची कीर्ति गाइली आहे ती यावच्चंद्रदिवाकरौ आमच्या कपाळींची हलणार नाहीं !

समाजधुरंधरांनो ! सभोंवतालची परिस्थिति पाहून व वेनासारख्या जुलमी राजासही गति देऊन नवी सृष्टि निर्माण करणाऱ्या श्रेष्ठ ऋषींचे

जे आम्ही वंशज त्या आम्हां ब्राह्मणांची जगांत चाललेली विटंबना पाहून हृदयास पीळ पडत आहे. आणि त्या ओघांत कांहीं स्पष्ट उद्गार निघाले असतील तर मनास लावून घेऊं नये, अशी विनंति आहे.

माझी सर्व ब्राह्मणसमाजास एवढीच मागणी आहे कीं, यापुढें विधायक बुद्धि जागृत ठेवून भट्टप्रभूंच्या समाजाकडे पहावें. समेटाकडे ओढा ठेवून क्षुद्र गोष्टींकडे कानाडोळा करावा. आणि भट्टप्रभूंला आपल्या समाजाशीं एकरूप करून घेऊन आपला समाज भव्य व धर्मादि-कार्यनिर्वाहक्षम करावा. मागें पाद्र्यांनीं हिंदूंना बाटविण्याचा सपाटा चालविला होता. तेव्हां तो ओसरल्यावर शक्य त्या प्रयत्नानें जुलमानें बाटलेल्यास पावन करून हिंदूंत घेण्याइतकें मनौदार्य त्यावेळच्या ब्राह्मणां-नीं व आचार्यपीठांनींही दाखविलें नाहीं त्याचा परिणाम आतां आम्हांला हरघडी भोंवतो आहे. ज्यांच्यांत आम्हां आर्यांचेंच रक्त परंपरेनें अनु-स्यूत आहे तेच खिस्ती बंधु आपलें मूळ विसरून उलट आमच्याच उरावर बसत आहेत! जुलमानें जो बाटविला गेला त्याचे फारतर शरीर बाटेल मन बाटणार नाहीं. अर्थात् शरीरशुद्धीचे प्रकार शास्त्रकारांनीं सांगितलेले आहेत बजाजी निंबाळकरास विजापूरच्या बादशहानें जबरीनें बाटवून त्याला आपली मुलगी व सरदारीही दिली असतां संधि सांपडतांच त्यास जिजाबाई व श्रीशिवाजीमहाराजांनीं विद्वान् ब्राह्मणांकरवीं महाबळेश्वरा-सन्निध प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून महाराजांनीं आपलें जांवई केलें हें मराठ्यांतील उदाहरण झालें. त्याचप्रमाणें मोगलांच्या तुरुंगांत आठ वर्षें राहून भक्ष्याभक्ष्यविचाराभावामुळें निरुपाय होऊन बाटलेला एक ब्राह्मण संभाजीच्या कारकीर्दीत रघुनाथपंडितांनीं शास्त्री-सभेच्या अनुमतीनें प्राय-श्चित्त देऊन त्यास जातींत घेतलें! हें ब्राह्मणांचें उदाहरण. अशीं आणखीही उदाहरणें सांपडतील. हें लिहिण्याचा मुद्दा हा कीं, प्रत्यक्ष बाटून मुसल-मान झालेले जर पूर्वी प्रायश्चित्तानें व्यवहार्य झाले आहेत, तर नुसत्या संशयानें व पोकळ दंतकथेच्या निमित्तानें, भट्टप्रभूंसारखा आपल्या समाजाचा श्रेष्ठ अवयव, पद्ये व इतर ब्राह्मणांनीं अज्ञात कालापासून आजपर्यंत बाहेर ठेवून उभय समाजाचें नुकसान करावें ही केवढी अक्षम्य चूक होत आहे, हें तुलनेनें दाखविलें आहे. असो.

शेवटीं सांगावयाचें तें हेंच कीं, 'झालें गेलें तें मागें पडलें'; आतां गतचुकीची आवृत्ती न करितां सारासारविचार करून पद्धे आणि इतर ब्राह्मणांनीं भट्टप्रभूंना आपल्यांत संलग्न करून घेण्याचा निश्चय करून श्रीजगद्गुरूंची आज्ञा मागावी. निग्रहानुग्रहसमर्थ आचार्यपादांनींही दयाळू होऊन सदर समाजाशीं अन्नोदकादि व्यवहार करण्यास तदितर ब्राह्मणांस उदारपणें आज्ञा देऊन निग्रहानुग्रहसमर्थत्व जगाच्या निदर्शनास आणावें अशी प्रार्थना आहे.

ओघ आवरतां आवरेनासा होऊन पत्रविस्तार वाढला त्याची माफी असावी. माझ्या पत्राचा विचार सदसद्विवेकशील करतील अशी आशा आहे, कळावें, ही विनंति.

सर्व ब्राह्मणांचा नम्र सेवक

(सही) दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

---

अ० नं. ८

श्रीसद्गुरुनाथप्रसन्न.

जांबावली. चैत्र वद्य ३ शके १८४५.

श्रीयुत रामजी विश्वंभट्ट प्रभुगांवकर प्रभृति भट्टप्रभु, बोरी–शिरोडें यांसी—

सप्रेम नमस्कार विनंति विशेष—

आपणांकडून आलेलें पत्र पोंचून पत्रार्थ लक्षीं घेतला. आपल्या वर्गाचा पंचद्राविडांशीं संबंध असावा; तो होत नाहीं याचें कारण काय वगैरेचा प्रश्न जो आपल्यांत आज उत्पन्न झाला त्याचें परिमार्जन जें आपण तो संबध चालू करण्यांत योजितां तें झालें तर बाईट नाहीं. परंतु तें तेवढें सोपें नाहीं. कारण एखादा मनुष्य जर कांहीं कारणानें..... ठरला तर त्याला पूर्ववत् पंक्तिपावन करणेंदेखील मोठया कष्टाचें होतें. हें तर त्याहून मोठें काम आहे. हीं कार्यें श्रीमत् पूज्यपाद आचार्यांसारख्या विशिष्ट व्यक्तींकडून सहज घडायचीं. अशा वाटाघाटीनें केव्हां काय होईल तें होईल, असा संबंध. असो. मला वाटतें आपल्यावर लोकांचा आदर उत्पन्न होण्याकरितां अगोदर तुम्हीं एक वेदशास्त्र

आंचारशिक्षणशाळा कांढून आपल्या मुलांस विद्वान् व सदाचारी बनविण्याचें काम चालू करावें म्हणजे तशीं कांहीं माणसें तुमच्यांत चमकूं लागल्यावर सहजच आदर उत्पन्न होऊन मंडळी आग्रहानें तुम्हांला जवळ ओढूं लागतील. कायदेशीरपणापेक्षां गुणवंतपणानें मनुष्य विशेष वळतो असें आहे. आणि तें तुम्हांला दोन्हीपरी श्रेयस्कर होईल. 'गुणिनि गुणज्ञो रमते' असें आहे. दुसरें या वेळेला जातिसंबंधाचा प्रश्न कोणी पुढें आणणें चमत्कारिकच. जातीचें युग आतां नाहीं; हें प्रीतीचें युग आहे. 'मनःपूतं समाचरेत्' हा परमहंसांचा विधि सर्वग्राह्य होऊन बसला आहे. असो. आतां धर्म व व्यवहारविषयक अडचणी आपण पुढें मांडतां तरी अडचणींतून तुम्हांला हरएक प्रकारें मुक्त करण्याबद्दल माझी अंतःकरणपूर्वक परिपूर्ण संमति आहे. यांत धर्मशास्त्रविषयक प्रतिबंध येईलसा वाटत नाहीं. मात्र ब्रह्मवृंदमान्यता व धर्म गादीची मंजुरी मिळाली म्हणजे झालें. कळावें, प्रेम असावें, अभिप्रायांत कमी वाटल्यास विषाद वाटूं देवूं नये, हे विनंति.

आपला

(सही) सद्गुरुदास केशव म.शास्त्री सावईकर.

---

अ० नं. ९.

मंगेश. श्री. चैत्र वद्य ३ शके १८४५.

श्रीयुत रा० रा० रामजी विश्वंभर प्रभूगांवकर यांस—

आपल्या भेटींत ज्या मजकुराच्या यादी पाहिल्या त्यावरून आणि पत्रार्थ लक्षांत घेऊन लिहीत आहें. आमच्या व आपल्या जातीचे आहार व आचार एक असून तुमच्या व आमच्यामध्यें अन्नव्यवहार मात्र होत नाहीं. बाकी उपहार इत्यादि होतात. त्याचप्रमाणें आपल्याशीं अन्नोदक-व्यवहार करण्यास धर्मशास्त्राची कांहींच अडचणूक नाहीं. त्याचप्रमाणें गोव्यांत पद्ये म्हणून एक स्वतंत्र जाति आहे. त्यांचे व तुमचे कुलाचार, कुलदेव, कुळधर्म आणि ग्रामाधिकार अशीं बहुत साजात्यें आहेत. आणि ही जाति कऱ्हाडे जात्यंतर्गत आहे. बहुत कारणांवरून यांशीं विवाह इत्यादि करण्यास कांहींच

हरकत नाहीं असें माझ्या (मतें) स्पष्ट दिसतें. तरी या कार्यास एक-जुटीनें झटावें आणि जुने लेख व इतिहास वगैरे शोधून काढावे. या कार्यास माझी पूर्ण संमति आहे. कळावें, लोभ असावा हे नमस्कार.

आपला

(सही) गदाधर विश्वंभरशास्त्री केळकर.

---

अ० नं. १०

शिरोडें. श्रीर्जयति. वैशाख वद्य ६ शके १८४५.

गोमांतकांत विद्यमान असणाऱ्या प्रभुज्ञाति-समाजांतील कांहीं पुढाऱ्यांनीं ऐक्यासंबंधीं अभिप्रायाची मागणी केल्यावरून आमचा अभिप्राय लिहून देत आहों:—

प्रभु या नांवाखालीं जो कांहीं ४००।४५० चा समाज गोमांतकांत आहे, त्याच्या एकंदर आचारविचारांकडे लक्ष दिलें असतां ते मूळचे ब्राह्मणच असून कांहीं क्षुल्लक कारणावरून स्वतंत्र रूपानें राहूं लागले असावे. त्यांचीं गोत्रें, कुलदेव, त्यांच्या धार्मिक रूढि ब्राह्मणांशीं —विशेषतः पद्ये ब्राह्मणांशीं—मिळत्या आहेत. ह्यावरून त्यांच्या ब्राह्मणत्वा-विषयीं निःशंकतेनें मन कबुली देतें. तेव्हां स्वतःच्या मनुष्यांशीं कांहींच योग्य कारण नसतां फटकून वागणें असमंजसपणाचें आहे. सध्यांच्या कालांत ऐक्य, समता, बंधुता इत्यादि श्रेष्ठ तत्त्वें डोकावूं लागलीं आहेत. व त्यांची श्रेष्ठता व आवश्यकता सगळ्या जनतेस भासत आहे. शिवाय ब्राह्मण्यावर अनेक आघात बसत असून धर्मश्रद्धेचा दिवसेंदिवस लोप होत चालला आहे. अशा परिस्थितींत ब्राह्मणांनीं आपल्यांतील क्षुल्लक तेढ विसरून ऐक्यानें—अन्नादि व्यवहारानें वागणें हितपरिणामीं आहे.

तेव्हां प्रभुजाति व इतर ब्राह्मण यांचें परस्परांशीं ऐक्य घडून यावें व शुक्लेंदुवत् वाढत असावें अशी आमची मनीषा ( अभिप्राय ) आहे.

आपला

(सही) हरि वासुदेव फडके.

---

## अ० नं. ११

शिरोडें. ॐतत्सत्। श्रावण वद्य ६ शके १८४५.

गोमांतकांत विद्यमान असलेल्या प्रभु ब्राह्मणज्ञातींतील कांहीं पुढाऱ्यांनीं ऐक्यासंबंधीं अभिप्रायाची मागणी केल्यावरून आम्ही खालीं सह्या करणारे गांव बोरी-शिरोडें इ० येथें राहणारे पंचद्राविड ब्राह्मण ( कऱ्हाडांतर्गत पद्ये व कोंकणस्थ ) खालीलप्रमाणें आमचें मत कळवीत आहोंत–

बोरी-शिरोडें व कुंडई येथें राहणारा भट्टप्रभु नांवें ब्राह्मणसमाज त्यांच्या आचारविचार, आहारविहार इत्यादिकांवरून पाहतां ते पंचद्राविड ब्राह्मणांतीलच आहेत व त्यांची पूर्वापार माहिती–ते वेगळे कां झाले, इत्यादि पाहिली असतां ते आमच्याच कोणत्या तरी वर्गांतील–विशेषतः पद्येब्राह्मणांतीलच होत अशी आमची पूर्ण खात्री आहे. वरून आमच्यांतीलच अशा मनुष्यांशीं फटकून वागणें योग्य नाहीं. वरून त्यांच्याशीं–भट्टप्रभूंशीं–अन्नादि संबंध ठेवण्यास कोणतीच हरकत नाहीं असें आमचें मत आहे–अभिप्राय आहे.

सह्या

| | |
|---|---|
| केशव गोविंदभट्ट पाटील. | शंकर नारायणभट्ट फडके. |
| सदाशिव रामचंद्रभट्ट परांजपे. | दत्तु मुकुंदभट्ट बुकले. |
| सीताराम नारायणभट्ट सहकारी. | शंकर वामनभट्ट बोरकर उपाध्ये. |
| महादेव गोपिनाथभट्ट फडके. | सदाशिव बाळकृष्णभट्ट बोरकर. |
| भिकू बाबुभट्ट गाडगीळ. | विनायक नारायणभट्ट तोटेकर. |

---

## अ० नं. १२

सांवर्डें. श्रीर्जयति. वैशाख वद्य २ शके १८४[illegible].

आसीदस्माकमेषां प्रभुजनजनतांतर्गतानां विरोधः।
सोयं संमार्ष्टुकामैः कतिपयधनिकैः सत्कुले जन्मभाग्भिः ॥
पृष्टोहं साहकारीत्युपपदध्रुगनंताभिधानो द्विजन्मा—
वक्ष्यैतच्चान्नपानादिकमुभयकुलोत्पन्नयोर्भोक्ष्यमेत्थम् ॥ १ ॥

गोमांतकप्रांतगताखिलानां विद्वज्जनानामपि संमतिश्चेत् ।
कर्मण्यमुष्मिन्सुफलं भविष्यत्यल्पावकाशेन हि कार्यमेतत् ॥ २ ॥
रुधिरोद्गारिण्यब्दे उदगयनांतर्गते वसंततौ ॥
वैशाखे मासे स्थितद्वितीयातिथौ प्रदत्तमिदम् ॥ ३ ॥

---

अ० नं. १३

कुंडई. श्रीर्जयति मार्गशीर्ष ५ शके १८४५.

राजश्रिया विराजन्ते राजमान्यजनप्रियाः ।
प्रभवः पद्मविप्रैक्ये यतंते बोधयंति च ॥ १ ॥

तेभ्यः कृतनतिततेः कुंडइग्रामनिवासिनः चाफडकरोपनामकस्य प्रार्थना विशेषस्त्वयं —सदयहृदयैर्भवद्भिः प्रेषितपत्रिकासमालोचनेनातीवाल्हादो जातः। सर्वदा एवमेवानुगृहीतव्यः। प्रभुपद्मयोर्विभक्तिज्ञानं विना ऐक्यसंमतिदानं नोचितम् । कारणं विना कार्यं नोत्पद्यते इत्यनुमितिः सांकर्याद्यभावा भावापत्तिश्च । तस्माज्जगद्गुर्वनुज्ञानुसरणमेवोचितम् अस्माकमिति भाति। तच्छात्रांतःपातित्वात् । अलमतिविस्तरेण शके १८४५ मार्गशीर्षपंचम्यां लिखितम्

(सही) गणेशात्मजानंतवर्णिः

---

अ० नं. १४

केरी. विजयादुर्गा प्रसन्न. आश्विन शुद्ध ८शके १८४५.

बोरी व शिरोडें—प्रांत गोमांतक यथें मुख्यत्वें वस्ती असलेले भट्टप्रभु ब्राह्मण यांचीं गोत्रें, प्रवर, कुलदेव, कुलपुरुष, वैदिक धर्मकृत्यें व गृह्य आचरण किंबहुना आहारविहार इत्यादि गोष्टी येथील कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मणांपासून भिन्न नाहींत. त्यांच्याकडे निर्लेप पदार्थसेवन व उदकग्रहण प्रसिद्धरीत्या चालत आहे. अन्नसेवन आणि शरीरसंबंध यांची वहिवाट प्रस्तुत नाहीं. याचें सयुक्तिक व महत्त्वाचें कारणही परंपरागत दंतकथेवरून नाहीं असेंच वाटतें. यासाठीं एथील द्राविडांतर्गत इतर सर्व ब्राह्मणांनीं अवश्य तो विचार करून जगद्गुरूंशीं आपला अभिप्राय

श्रुत करून त्यांची आज्ञा मिळेल तर म्हणजे प्रतिबंधास योग्य पुरावा नसेल तर त्यांच्याशीं सर्वांचें ऐक्य पूर्णपणें व्हावें असें मला धार्मिक आणि प्रामाणिक बुद्धीनें स्वभावसिद्ध वाटत आहे. हा अभिप्राय मी प्रसिद्धीकरितां प्रभु ब्राह्मणांस लिहून देत आहें.

(सही) रामचंद्र पांडुरंग वैद्य, पानवेलकर.

---

अ० नं. १५

गोवा-सांखळी. श्री चैत्र शुद्ध १२ शके १८४८.

बोरी व शिरोडें प्रांत गोमांतक येथील रहिवासी भट्टप्रभु ब्राह्मण यांची स्थिति कर्णपरंपरेनें ऐकली व दृष्टश्रुतत्वानें अनुभविली. आणि आपल्या मंडळींतील वैदिक व गृहस्थ मंडळींचे संमतिलेख पाहिले. यांवरून कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मणांपैकीं हे आहेत असें निश्चित होतें. तरी येथील द्राविड ब्राह्मणांतर्गत इतर ब्राह्मणांची मान्यता, श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य मठ संकेश्वर यांच्याकडे निवेदन करून ती आज्ञा घेऊन आपल्या मंडळींत प्रसिद्ध जाहली म्हणजे आहारव्यवहार व अन्नसंबंध होण्यास कोणत्याही प्रकारचा संशय नाहीं असें स्पष्ट निर्व्याजपणें आमच्या मनास वाटतें तें प्रभु ब्राह्मणांस कळवीत आहों.

(सही) वासुदेव वेणीमाधव पित्रे.

---

अ० नं. १६

आमोणें. श्री

अंत्रुज महालांतील बोरी व शिरोडें येथील रहिवासी भट्टप्रभुब्राह्मण हे पंचद्राविडांतर्गत कऱ्हाडे ब्राह्मणांचा पोटविभाग पद्ये-ब्राह्मण यांपैकीं असावेत असें कर्णोपकर्णीं व त्यांच्या आचारावरून दिसतें. त्यांस बाहेर ठेवण्याचे संबधीं एक दंतकथा सांगतात त्यांत तथ्य काय असेल तें असो. ज्याअर्थीं पद्ये ब्राह्मणांपैकीं ती मंडळी आहे त्याअर्थीं त्यांतील सुज्ञ व थोर मंडळीनें त्यांची परंपरा लक्षांत घेऊन ते कोणत्या वेळीं कसे फुटून बाहेर राहिले हें पाहून त्यांविषयीं व्यावहारिक व शास्त्रोक्त तडजोड करून

त्यांच्याशीं भोजनादि व्यवहार केल्यास आम्हांस मान्य आहे व त्यांच्या विश्वासावर आम्हीही त्यांच्याशीं भोजनादि संबंध करूं. कळावें.

(सही) गणेश महेश्वरभट्ट ठाकूर.

---

अ० नं. १७

सांगें. श्रीविठ्ठलोजयति ता. २७।५।२३.

श्रीमंत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री—

रघुनाथ शाबाप्रभु सावकार प्रभृति अखिल प्रभुब्राह्मण–राहणार गांव बोरी व शिरोडें, गोवा यांस प्रति असो.

सप्रेम अनेक आशीर्वाद विनंति विशेष–आपल्या समाजांतील प्रमुख मंडळींनीं स्वसहीनिशीं आम्हांकडे चैत्रशुद्ध ५ शके १८४५ मितीचें एक पत्र पाठवून सध्यां आपल्या समाजाचा अन्नोदकसंबंध पूर्ववत् ( सुमारें २५० वर्षांपूर्वीं ) द्राविड ब्राह्मणज्ञातींत करण्याबद्दल चालविलेल्या प्रयत्नाविषयीं आमचा अभिप्राय मागितला होता. आणि या कामीं आमच्याहून विशेष अधिकारी अशाच विद्वान् पंडितांच्या अभिप्रायाची जास्त आवश्यकता आहे. तरी पण त्यांच्या अभिप्रायास आमच्या मतांचा कांहीं पण उपयोग व्हावा म्हणून व पत्रोत्तर म्हणून त्याबद्दल इतिहास, धर्म व व्यवहार लौकिक यांस अनुसरून आम्हांस जें वाटलें तें प्रांजलपणें पुढीलप्रमाणें थोडक्यांत लिहून आपणांस पाठवीत आहें. यांतील कोणत्याही मुद्द्यासंबंधानें आपणांस जास्त माहिती हवी असल्यास समक्ष अथवा पत्रद्वारें देतां येईल. विस्तारयुक्त लिहिण्यास आज सवड नाहीं. अस्तु.

अभिप्राय

संगच्छध्वं संवदध्वं संवो मनांसि जानताम्

—ऋग्वेद.

अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभांक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥

—श्रीमद्भगवद्गीता.

गृहीतो ब्राह्मणो म्लेच्छैः प्रायश्चित्तं चरन् पुनः ।
म्लेच्छैः संकीर्यते नैव तथाभासः शरीरकैः ॥

—पंचदशी—तृप्तिदीप—

म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक्शास्त्रमिदं स्थितम् ।
ऋषिवत्तेपि पूज्यंते किं पुनर्दैवविद्द्विजः ॥

—वराहमिहिर.

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यांति परां गतिम् ।
किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ॥

—भगवद्गीता.

गोमांतकास पूर्वी शूर्पारक म्हणत असत हें महाभारतावरून दिसून येतें. ( महाभारत, शांतिपर्व, अ. ४९ पहा ) ह्या प्रदेशांत पूर्वी त्रेतायुगाच्या उत्तरार्धांत श्रीपरशुरामानें बरीच ब्राह्मणवस्ती आणवून ठिकठिकाणीं वसविली गेली; अयोध्या व जहांगिराबादजवळच असलेल्या गौडप्रांतांतून पंचगौडांतर्गत कांहीं ब्राह्मणकुलें आणून ठेविलीं, असा पौराणिक इतिहास सांपडतो. इतक्यांत या म्हणजे इ. सनापूर्वी १५०० च्या कालीं आर्यावर्तांत सर्वत्र तेरा वर्षांचा महादुष्काळ ओढवला हें सर्वत्र महशूर आहे. याचें वर्णन पुराणांतरीं कथांत आढळतें. या कालीं आर्यावर्ताच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या प्रदेशांतील असंख्य ब्राह्मणसमुदाय विपद्ग्रस्त होऊन अन्नान्नदशेस येऊन बराच मृत्युमुखींही पडला. यांत बंगाली वगैरे सरस्वतीतीरींचे अनेक ब्राह्मण होते. त्यांतील कांहींनीं शक्य तें जीवित संभाळून हळुहळू कोंकणपट्टीनें दक्षिणेकडे—सह्याद्रीच्या पायथ्यानें—वसाहती आणिल्या. याचवेळीं गोव्यांत इतर ब्राह्मण व त्यांचे समुदाय पंचद्राविडांतर्गताादि सर्वत्र पसरले. यानंतर अनेक शतकें या प्रांतीं या सर्वांची सुस्थिति होती. पण घुडें आदिलशाही वगैरे विधर्मी कारकीर्दींचा काळ लागल्यापासून या सर्वांस उतरती कळा लागून इ. सन १५१०त गोवें पोर्तुगीजांनीं घेतल्यानंतर ब्राह्मणांची अधिकच वाताहात झाली. व त्यांतून पंचद्राविड हे गौडांहून अधिकच खालीं पडले. आतां गोव्यांत दिसून येणारी 'पद्ये' नांवाची

एक ब्राह्मणजात, इचा सूक्ष्म इतिहास जरी कळत नाहीं तथापि त्यांच्या आचारविचार, व्यवहारावरून पंचद्राविडांतलिच ही एक जात आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मंगळोर येथें या ज्ञातीचा कांहीं समाज आहे असें ऐकिवांत आहे. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून आपला आचार-विचार पाहतां आपण पूर्णपणें कोणत्यातरी ब्राह्मणवर्गांत मोडणारे व ते पंचद्राविडांतर्गतच असावेत व पद्यांशींच आपलें बहुतेक साम्य वाटतें हेंही बहुतेक सत्य होय. कारण ब्राह्मणांच्या घामधुमीच्या म्हणजे पोर्तुगीज आल्यानंतरच्या एकदोन शतकांच्या जाति-क्रांतीच्या काळांत आमचा समाजही सांपडला व पोर्तुगीजांनीं घरांवर केवळ मांस टाकून शूद्रादिकांस बाटविण्याचा सपाटा चालविला या वेळची यासारखी श्रद्धीय भावना ध्यानीं आणिल्यास केवळ क्षुल्लक कारणांवरून आमच्या ब्राह्मणां-नींही जगद्गुरूंच्या 'बहिष्कार' इतक्याच शब्दाच्या आधारावर आपणांस आपल्यांतून बगळून टाकलें व आपल्या पूर्वजांनींही श्रद्धेच्या तडाक्यांत सांपडून ही गोष्ट बऱ्याच पिढ्या अंमलांत ठेविल्याने आतां आपल्या बाबतींत–" वडिलीं आचरिला जो धर्म । तोचि पाळावा सुनेम ॥ " ही उक्ति कांहीं अज्ञ लोकांस पुढें आणण्यास आयतेंच फावलें आणि अज्ञानपणाचा फायदाही घेण्यास मिळाला ! अस्तु.

आपला समाज केवळ ४०।४५ घरांचा आहे, ही एक विचारणीय गोष्ट होय. समाज कधीं ( गुजराथ प्रांत वगळून ) इतका कमी असूं शकत नाहीं. कऱ्हाडे घ्या, कोंकणस्थ घ्या, कोणतीही जाति घ्या, त्यांचा त्यांचा असख्य व व्यापकच समाज आहे. अर्थातच आपला समाज कधीं तरी ब्राह्मणांपासूनच अलग फुटला हें स्पष्ट होय. शिवाय समाजशास्त्रानें पाहिलें तरी अल्प घराण्यांचा समाज लवकरच ऱ्हास पावतो. एकमेकांत रक्ताचें मिश्रण व्हावें म्हणून समाजांत महाभारतकालीं विवाह-संस्था अंमलांत आल्या. कोणताही समाज वर्धमान होऊन त्याची नीतिमत्ता, शील, वगैरेंची भरभराट होण्यास समाजांत एक प्रकारची अदृश्य देवघेव चालली पाहिजे व दृश्य व्यवहारही चालून एकमेकांत सर्वही मिसळण्यास भरपूर वाव मिळाला पाहिजे. नाहींपेक्षां संततीही क्लिष्ट, व्यंगतायुक्त व निर्बळी अशी निपजते, हें वैद्यशास्त्रावरून सिद्ध होतें.

म्हणूनच आपला समाज वर्धमान होण्यास आपण पूर्ववत् आमच्यांत मिसळणें अत्यावश्यक व योग्य आहे. आणि त्या कामीं सर्वांनीं मान्यता देणें न्यायाचें व सत्याचेंही आहे.

आपलीं गोत्रें व पद्धे ब्राह्मणांचीं गोत्रें एकच आहेत हीही याकामीं भक्कम पुराव्याची गोष्ट होय. आपल्यांत भारद्वाज, वत्स, कौशिक व अत्रि अशीं गोत्रें आहेत व हींहीं पण पद्यांत आहेत. अर्थात् यांत वरेंच साम्य आहे. शिवाय आपल्या लोकांचें व पद्यांचें कुलदैवत एकच म्हणजे नव दुर्गा व महालसा हीं होत. हेंही साम्य एक महत्त्वाचें आहे. आपल्यांत गांवकार व देसाई हीं उपनावें आहेत पद्यांतही अशींच आहेत, हें सुप्रसिद्ध आहे. शिवाय 'देवारी' व 'भट्ट' हींही आपल्यांत आहेत. 'देवारी' या उपनांवाचें साम्य असें वाटतें कीं, इकडे 'नेत्रावळी' नामक गांवीं प्रभु-देसाई नांवाचे ब्राह्मण गृहस्थ आहेत. हे सध्या पद्यांतच मोडतात. ते पूर्वीचे सावैवेरें ( गोवा ) या बाजूचे असून त्यांचें तेव्हांचें आडनांव ( उपनांव ) 'देव' असें होतें अशी ऐकिवांतील एक गोष्ट आहे. हीवरून बराच अनुकूल विचार सुचतो. 'देव' व 'देवारी' हा एकमेकांचा अपभ्रंश असावा. कारण तेही 'भट्ट-प्रभु देसाई' आहेत व त्यांचा आमचा (कऱ्हाडयांचा) अन्नोदकव्यवहार होतोच हें ठळक असल्यानें आपणास यावद्दल म्हणजे त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार करण्यास पुष्कळ आधार आहे. मातुलकन्यापरिणयाची चाल पद्यांत व आपल्यांत सारखीच आहे व आहारअहिंसामय अद्यापि आपल्यांत चालू राहिला, हाही पूर्वसुसंस्कृततेचा उत्कृष्ट मासलाच होय. कांहीं पद्धे ब्राह्मणांचा व आपला कुलपुरुष एकच असून कौशिक गोत्राचा आहे हीही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. वटसावित्र्यादिव्रतें त्यांच्यांत व आपल्यांत एकसारखींच असून धंदाही आज पाहतां त्यांचा आपला सारखाच. म्हणजे बागाईत, भिक्षुकी वगैरे आढळतो. इतर ब्राह्मणांच्या सहानुष्ठानाची चाल आपल्यांत बऱ्याच दिवसांपासून असल्यानें आम्हातुम्हांत बाह्य बाबतींत एकत्र वागण्यास आजपर्यंत संकोच वाटत नव्हताच. तुमच्यांतील एक नवदुर्गेचा पुजारी आहे हीही गोष्ट पुष्टिदायकच होय, व कांहीं दिवसांपूर्वी तुमचा त्यांचा पुरुष एक होता हें एक उत्तमच प्रमाण होय. तात्पर्य, या सर्व विवेचनाच्या दृष्टीनें पाहतां आपण द्रविड ब्राह्मणांतर्गतच पद्यां-

तील आहां असें आम्हांस खास वाटतें आणि म्हणूनच आम्हीं म्हणतों कीं, केवळ एका दंतकथेशिवाय जर आपणांसंबंधीं कोणास विरुद्ध पुरावा सांगतां येत नाहीं अथवा लेखी तर नाहींच नाहीं, तर मग इतक्या दिवसांची परंपरा म्हणून अलग ठेवण्यांत काय अर्थ आहे ? आणि जर नाहीं तर सर्व विद्वानांनीं—

केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो विनिर्णयः।
युक्तिहीनविचारे तु धर्महानिः प्रजायते ॥

या बाबतींत असेंच वागलें पाहिजे व या तत्त्वाकडे नीट लक्ष देऊन आपल्याबद्दल अनुकूल विचार केलाच पाहिजे, असें आम्हांस तरी वाटतें. हें कोणास 'कटु सत्य' वाटलें, तथापि सत्यप्रतिपादनांत भिडेची आवश्यकताच नाहीं.

आज आपला समाज व्यापकतेच्या अभावीं अवनतीला जात आहे. धर्मकार्यें निर्भेळ आचरण्यास समाजाची आकुंचितता आड येत आहे. धर्मकार्यादिकांस ब्राह्मण पाहिजे तर मोठीच अडचण! वरांना वधू मिळण्याची तर पंचाईत ! पण वधूंनाही वर मिळण्यास समाज अवघाच अल्प असल्यामुळें अत्यंत मारामार पडते! व या 'मारून मुटकून वैद्यबोवा'-चा परिणाम समाज-ऱ्हासाकडे व्हावा हें साहजिकच आहे. आमच्या ऐकिवांत असें आहे कीं, आपल्या समाजाची खानेसुमारी ठेवल्यास दर-वर्षीं बरीच संख्या कमी होत आहे. शिवाय मुके, पांगळे, बहिरे वगैरे निपजत आहेत! ही शोचनीय स्थिति सध्यांच्या समानता-बंधुतेच्या काळांत इतरांना दूर करावयास नको काय ? प्रस्तुत शेंकडों वर्षें मुसलमान संस्कृतींत वाढलेल्या लोकांस हिंदु करून घेण्याचें पवित्र शुद्धिकार्य-सत्र-चालू आहे. हजारों 'मलकाने' लोक परत हिंदूंत आले. व यास महान् महान् पंडितांची पूर्ण संमतिही आहे. तर मग केवळ गैरसमजानें बाहेर राहिलेली-बाटलीं नाहींत-कांहीं ब्राह्मण घराणीं आचार-विचारांनीं ब्राह्मणच असतां परत आपल्या ज्ञातींत घेणें कधींही योग्यच ठरेल व हें सद्यःकालीन गोमांतकांत असणारे व इतरकडचे विद्वान् यांचेंही हें कर्तव्यच आहे. यदाकदाचित् लेखी किंवा इतर प्रकारें आपल्याविरुद्ध

कोणास कांहीं पुरावा सांपडलाच तरी पण विद्वान् लोकांनीं त्याचा निर्विकार मनानें विचार करून व श्रीशंकराचार्यांनीं आपले उदार विचार प्रकट करून आवश्यकता असल्यास शक्य तों धार्मिक प्रायश्चित्तविधि आपणाकडून करवून परत स्वज्ञातींत प्रविष्ट करणें अत्यंत भूषणावह आहे. या अभिप्रायाच्या आरंभीं आम्हीं दिलेल्या उताऱ्यांतलिच एक—

**'गृहीतो ब्राह्मणो म्लेच्छैः प्रायश्चित्तं चरन् पुनः'**

हा श्रीविद्यारण्यस्वामींचा पंचदशींतील उतारा आहे. त्या कालींही ब्राह्मण म्लेंच्छ झालेला प्रायश्चित्तानें पुनः ब्राह्मण होऊं शके हें त्यावरून उघड होतें. तर मग ब्राह्मणघराणींच ब्राह्मणांत पुनः—अलग राहिलेलीं एक करणें-घेणें मोठेंसें कांहींच नाहीं, पण् सुविचाराचेंही आहे. आणि म्हणूनच आपण आमच्यांत समाविष्ट होणें धर्मविरुद्ध तर नाहींच नाहीं. उलट कोणाही सद्विचारी इसमास हें योग्य व प्रामाणिकपणाचेंच वाटणार यांत शंका नाहीं.

'सह्याद्रिखंड' नामें, एक प्रक्षिप्त प्रकरण आज मिळेल तेथें पुराणांच्या नांवावर सांवळागोंधळ घालून जातींत मत्सर माजविण्याचें व्रत चालवीत आहे. त्यावरूनच कोणीं 'कोंकणाख्यान' म्हणून एक गचाळ गावाळ स्तोत्र पट कोणींसा छापिल्याचा एकदां पाहिला होता. त्यांत गोव्यांतील ज्ञातींचा यच्चयावत् इतिहास म्हणून अगदीं आधुनिक वरचिक गोष्टी धुसडवून कांहीं तरी ओवीबद्ध प्रलाप काढिले आहेत व त्यांत "भट्टप्रभूं"विषयींही ( आपणांबद्दल ) कांहींसें खरडण्यास ते ग्रंथकार (?) विसरले नाहींत. त्याचें आधार प्रमाणास घेणें म्हणजे 'देमांदमहात्म्या'चा आधार कायदा लढविण्यास घेण्याइतकेंच शहाणपणाचें होय. त्या प्रमाणावर आपला इतिहास शोधणें म्हणजे लहान मुलांनीं केलेल्या कागदी देवळावर मातीच्या नळ्यांचीं कौलेंच चढविणे होय. आधींच पुराणें जपून पुराव्यास घेतलीं पाहिजेत. त्यांतून सह्याद्रिखंडाची नारदी! व त्यांत कोंकणाख्यानी मखलाशी!! येथून तेथून वंध्यापुत्राच्या लग्नास आकाशपुष्पांच्या माला!!! असें सर्वच थोतांड. असें असल्यानें आम्ही त्यांतील कांहींच आधारास घेतलें नाहीं व कोणी घेतलें तर त्या प्रामाण्याचा त्याचा त्यासच उपयोग, हेंच दाखविण्यासाठीं त्याबद्दल येथें एवढा

ऊहापोह केला. याहीनंतर त्या ग्रंथावर कोणी आपल्या विरोधास थारा देऊ लागल्यास ते घुरावे वाऱ्याप्रमाणें उडून जाऊं शकतील, एवढेंच आम्हांस दाखवावयाचें आहे. आपल्याबद्दल जोंपर्यंत खरा प्रामाण्यास टिकणारा एकही आक्षेप अद्याप येऊं शकत नाहीं तर मग केवळ अंध-परंपरेचा आधार घेऊन आपणांस बाहेर ठेवूं पाहणें शहाणपणाचें नाहीं. आतां कांहींजणांस आपल्याशीं अन्नादि संबंध बराच काल सुटल्यामुळें एकदम त्याचा अवलंब करणें कठीण जाईल हें खरें; पण आपण जर निष्कारण बाहेर आहांत तर आतां पण आपणांस पूर्ववत् मिसळून घेऊन आपली समाजसरिता ज्ञातिसागरास नेऊन मिळविणें योग्य आहे, हेंही तितकेंच—किंबहुना त्याहून अधिकच खरें आहे. म्हणून पंचद्राविडांतर्गत सर्व ज्ञातींनीं व विशेष जबाबदारीनें पद्मेब्राह्मणांनीं याचा निर्विकारपणें विचार करणें योग्य असून अनेक वर्षें ब्राह्मण गणलेला समाज आपसांत मिसळून घेण्याचें औदार्य व सौजन्य दाखविणें त्यांना अत्यंत श्रेयस्कर होय.

**'तातस्य कूपोयमिति ब्रुवाणाः क्षारं जलं कापुरुषाः पिबंति'।**

हें या कामांत प्रत्येकानें ध्यानांत ठेविलें पाहिजे. चालू व नवीन पिढीला तें कांहींच वाटणार नाहीं. केवळ सद्यःकालीन जुन्यापुराण्या लोकांस जरी किंचित् संकोच वाटला तथापि तें अधर्म्य तर खास नाहीं, हें त्यांनाही कबूल करावेंच लागेल. शिवाय त्यांच्या बाबतींत आपण असें धोरण ठेविलें पाहिजे कीं, आपणांविषयीं त्यांना कळकळच वाटावी. या बाबतींत श्रीभगवानांचाच उपदेश आपल्या उपयोगी पडेल—

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः॥**

याप्रमाणें आधीं आपल्या कामासाठीं त्यांना 'वंदन' करा. कारण ते प्राचीन धर्माचे अत्यंत पुरस्कर्ते व अधिकारीही आहेत. त्यांच्या केवळ सहानुभूतीनें व आशीर्वादानेंच आपलें कार्य होऊं शकेल. ते सत्यपथी व लोकहितदक्ष आहेत म्हणूनच आपल्या संबंधांत ते अत्यंत सहानुभूतीनें विचार करतील.

**'शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च।'**

या पदवीस पात्र असलेले मनुष्य आपणांस कधींही बाहेर लोटणार नाहींत. कारण त्यांचा 'आर्जव' हा गुण प्रामुख्यानें असतो. इत्याद्यनेक गुणविरहित असतील त्यांचा आपणांस कांहींच उपयोग होणार नाहीं. खरे तत्त्वदर्शीच आपणांस साह्य देतील म्हणूनच त्यांकडून प्रणिपातानें आपलें काम करून घ्या. दुसरें 'परिप्रश्नेन' याही बाबतींत त्यांकडे आपणांस बरेंच विवेचन करितां येईल. आपल्या सर्व अडचणी त्यांस कळकळीनें समजून द्या. समाजाचें हित कसें साधतां येईल हेंही त्यांजपाशीं विचारा म्हणजे आपल्या प्रश्नास योग्य तें उत्तर देतांना आपणांस पूर्ण सहानुभूति देणें अर्थातच त्यांना भाग होईल व आपलें कार्य यशस्वी होण्यास त्याची उघड संमतिही मिळेल. आतां राहिला तो विषय 'सेवया' हा होय. ही सेवा म्हणजे आपण निरनिराळ्या तत्त्वज्ञांची आपल्या कार्यार्थ लेखी व तोंडीं अशी उघड सहानुभूति मिळवा. स्वकार्यार्थ समाजास विनवणी करण्याच्या सेवेनें ते तुष्ट होऊन शेवट 'उपदेक्ष्यंति ते ज्ञानम्' याप्रमाणें कोणत्या मार्गानें गेलें असतां आपलें कार्य सिद्ध होईल याबद्दल सूक्ष्म तत्त्वें ते आपणास सांगून खास उपकृत करतील. अशी त्यांच्या 'विद्याविनयसंपन्नते'वरून खास आशा वाटते. शिवाय त्यांचें हें कर्तव्यच असून 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' याप्रमाणें हतरांसही त्यांनीं बोध करावा. कारण:—

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥**

हा नियम असल्यावरून एकदां समाजनेत्यानीं ही गोष्ट स्वीकारली म्हणजे सामान्य लोकांस कांहींच अवघड वाटणार नाहीं. हा प्रश्न समाजाचा आहे. म्हणून श्रेष्ठांनीं पुढें सरसावलें पाहिजे व त्यांनींच हा प्रश्न आधीं सोडविला म्हणजे त्यांनें 'अनुवर्तन' लोक तेव्हांच करितील व 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' याप्रमाणें या विषयांतही "एतस्यतत्त्वं निहितं गुहायां" असें म्हणण्याची पाळी आली आहे. कारण दंतकथाच जरी खरी मानली तरी 'तोही बहिष्कार अमुक कारणासाठीं झाला' असें सप्रमाण तर कळत नाहीं, पण याबद्दल कांहीं ऐकूंही

येत नाहीं, यासाठीं येथें 'आप्तवाक्यं शब्दः', 'आप्तस्तु यथार्थवक्ता' हीं नैयायिक तत्त्वें घेऊन आप्तप्रमाणावरून 'जगद्गुरुपुढें हजर होण्यास वेळ लागल्याबद्दल बहिष्कार झाला' असें ऐकींव विधान अनुमानित घरून जर पूर्ववृत्तांताची संगति लावावयाची तर हें विधान अगदीं निर्बली म्हणून न्यायानेंच त्याज्य ठरतें व याबरोबरच पक्तिपावनादि करणें ओघानेंच सिद्ध होतें. यांत ओढाताण नाहीं, दुराग्रह नाहीं, हटवाद नाहीं, कांहींही नाहीं; तर सरळ न्यायच आहे. म्हणूनच समाजनेत्यांनीं हें सर्वांस पटवून देऊन त्यांनींच इतरांना 'महाजनो येन गतः स पंथाः' असें म्हणण्यास कृतीनें लाविलें पाहिजे. शंकराचार्यांचीही संमति मिळणें अशक्य नाहीं. कारण संकेश्वरादि मठदप्तरांत आपल्या प्रकरणाबद्दल कदाचित् कांहीं उल्लेख जरी सांपडला तथापि इष्टापत्तिच आहे. त्याचा काय तो विचार करणें व योग्य कृतीनें बहिष्कार झाला होता असेंही सिद्ध झाल्यास—

**अकुर्वन् विहितं कर्म निंदितं च समाचरन् ।**
**प्रसक्तश्चेंद्रियार्थेषु प्रायश्चित्तीयते नरः ॥**

या आधाराप्रमाणें योग्य तो धार्मिक प्रायश्चित्तविधि करवून पावन करून घेणें, श्रीजगद्गुरूंचें पवित्र कर्तव्य आहे. तें ते बजावण्यास कधींही मागेंपुढें होणार नाहींत.

श्रीमदाद्यशंकराचार्य म्हणतातः—

"स द्विजोस्तु भवतु श्वपचो वा वंदनीय इति मे दृढश्रद्धा" व त्यांच्या स्वमतनिदर्शनावरून त्यांचें उदार, लोकसंग्राहक, व परमन्यायी ध्येय स्पष्टपणें दिसून येतें; याच धोरणावर आपलीं पीठें चालावींत अशी त्यांनीं आपल्या मठस्थ शिष्यांस स्पष्ट आज्ञा मठाम्नाय ग्रंथांत लिहून ठेविली आहे.

**वर्णाश्रमाः सदाचारा अस्माभिर्ये प्रसाधिताः ।**
**रक्षणीयास्त एवैते स्वे स्वे भागे यथाविधि ॥**
**यतो विनाष्टिर्महती धर्मस्यात्रप्रजायते ।**
**मांद्यं संत्याज्यमेवात्र दाक्ष्यमेव समाचरेत् ॥**

यावरून देशपरिस्थिति पाहूनच म्हणजे आपणास अनुकूल असाच

त्यांचा अभिप्राय मिळाला पाहिजे हें उघडच आहे. शंकराचार्य म्हणजेच जनता व जनतेचे अध्वर्यु तेच स्वामी असल्यानें विद्वज्जनसंमति म्हणजेच स्वामींची संमति होय. अस्तु.

आतां आपणही ब्रह्मकर्मादि आन्हिक आचरण योग्य असें वर्धमान होण्यासाठीं एकादी संस्कृत शाळा ठेवून समाजांतील सर्व मुलांना वैदिक शिक्षण दिलें पाहिजे. अशानें आपली पूर्वसंस्कृति विशेष ताजीतवानी दिसली म्हणजे आपोआपच आपणाविषयीं आबालवृद्धांत पूज्यभाव येईल व आपलाही अभ्युदय ज्ञानमय सुसंस्कृत होऊन 'क्रियाभिर्ब्राह्मणो भवेत्' हें सर्वांस पटवून दिलें असेंही होईल. याकडे आपण लक्ष द्यावें म्हणजे मग—

**'न हि कस्तूरिकामोदः शपथेन प्रवर्तते'**

असे उद्गार लोक आपोआपच काढतील.

याप्रमाणें आपल्याविषयीं विचार केला असतां आम्हांस जें वाटलें तें स्पष्टपणें कळविलें आहे. आपण असाच प्रयत्न कराल तर 'आत्मैव ह्यात्मनो बंधुः' याप्रमाणें आपलें पूर्वसंस्कृतीचें पद खास गांठूं शकाल. या कार्यास अनेक विघ्नें उभीं राहतील, पण—

**विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः**
**'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति'**

हें भर्तृहरीचें बाणेदार वचन ध्यानीं ठेवून समाजरूपी जनताजनार्दनाची आराधना कराल तर इष्टकार्य-सिद्धि करण्यास तो श्रीजगदीश विलंब करणार नाहीं अशी आम्हांस उमेद आहे. आपलें कार्य सर्वांच्या सहानुभूतीनें सिद्धीस जावो. आपण आमच्यांत लवकर प्रविष्ट व्हाल अशी त्या जगन्नियंत्याशीं योजना मागून अभिप्रायादाखल यथामति लिहिलेले हे चार शब्द पुरे करितों. कळावें, कृपावृद्धि असावी हे आशीर्वाद.

भवदीयः विद्वज्जनकृपाभिलाषी
(सही) संगमस्थो नाईक पाटणकरोपाव्हानंतात्मजो नारायणशर्मा.

---

अ० नं. १८

बोरी-शिरोडें. ॐतत्सत्. आश्विन शुद्ध १० शके १८४५.

श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री गोमांतकप्रांतस्थ समस्त द्राविडांतर्गत कऱ्हाडे, कोंकणस्थ, ( चित्तपावन ) पद्ये व देशस्थ इत्यादि ब्रह्मवृंदांस—

खालीं सह्या करणारे—बोरी व शिरोडें गांवांतील देसाई, गांवकार, साबकार व उपाध्ये ह्या उपनांवांच्या भट्ट प्रभु ब्राह्मण समाजानें अधिकार दिलेले त्याच समाजांतील वर्गी रा० रामजी विश्वंभर गांवकर शिरोडें, रा० गुणबा शिवप्रभु देसाई, शिरोडें, रा० रघुनाथ शाबा प्रभू सावकार, बोरी व बाबू पुरुषोत्तम भट्ट उपाध्ये, कुंडई; ह्या चार गृहस्थांचे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति ऐसीजे.—बोरी, शिरोडें, कुंडई, बांदिवडें व पिर्योळ या गांवीं राहणारे आम्ही भट्ट-प्रभु ब्राह्मण ज्यांची तुम्हां सर्वांस मुळा-पासून ओळख आहे. आमचीं गोत्रें, प्रवर, घरचे धार्मिक सस्कार, हव्य-कव्य, आचारव्यवहार, रीतरिवाज, आहारविहार, सोवळेंओवळें, कुळदेव, कुलपुरुष इत्यादि सर्वांशीं पद्येब्राह्मणाशीं एकरूपता आहे. याबद्दल आपणां सर्वांस माहिती आहे. आपणां सर्व ब्राह्मणांशीं आमचीं वैदिक धर्मकृत्यें, सहानुष्ठानें व निर्लेप पदार्थोदकसेवन इत्यादि व्यवहार प्रसिद्धपणें चालू आहेत. फक्त पंक्तिभोजन आणि शरीरसबंध बऱ्याच वर्षांपासून चालू नाहीं. यामुळें आमच्या समाजाचा फार ऱ्हास होऊन तूर्त ३०-४० घरेंच शिल्लक राहिलीं आहेत. आम्ही आवल्यापैकींच व सारखेच असून अनेक प्रकारच्या अडचणींनीं नष्ट होत आहोंत! एवढा हा प्रतिबंध दूर होऊन तुमचा आमचा अन्नसंबंध व तुमच्यांपैकीं पद्ये यांच्याशीं तरी शरीरसंबंध व्हावा. हें धर्मशास्त्रदृष्ट्या आम्हांस कांहीं विरुद्ध वाटत नसून समाजवृद्धीस मात्र पोषक वाटत आहे. परंतु ज्यास्त वर्षांचा प्रतिबंध दूर होण्यास उभय समाजांची मान्यता आणि श्रीमज्जगद्गुरु-पीठाची आज्ञा मिळविणें अवश्य. प्रथमतः समाजाची मान्यता कितपत आहे, याच्या अंदाजाकरितां आम्हीं प्रांतस्थ धर्मबंधूंतील कित्येकांकडे खासगी पत्रव्यवहार व भेटीचे प्रसंग करून शक्य तितकीं जास्त ब्राह्मणां-चीं मतें मिळवावीं व तीं जगद्गुरूंकडे दाखवून सदरील प्रतिबंध-

निवारणार्थ प्रार्थना करून पहावी, असा आमचा निश्चय झाला आहे. तरी आमची खरी अडचण लक्षांत आणून सर्वांनीं सदयांतःकरणानें आपापल्या मान्यतेच्या सह्या देण्याची कृपा करावी, अशी सविनय प्रार्थना आहे.

आपले

(सह्या) रामजी विश्वंभर प्रभुगांवकर.
गुणबा शिवप्रभु देसाई.
रघुनाथ शाबा प्रभु.
बाबु पुरुषोत्तम भट्ट, कुंडई.

---

अ० नं. १९

सत्यमेव जयते.

गोमांतकस्थ भट्टप्रभु ब्राह्मणसमाजांतील पुढारी वरील चार गृहस्थांनीं सदरील विनंतिपत्रांत लिहिलेला सर्व प्रकार खरा असून येथील पद्ये ब्राह्मणांचीं गोत्रें, प्रवर, कुलदेवता, कुलपुरुष व गृह्यकर्में भट्टप्रभूंशीं एकरूप आहेत. अन्नसंबंध व शरीरसंबंध बरींच वर्षें रूढ नाहीं व यामुळें भट्टप्रभूंचा समुदाय अगदीं आटत जातो, ही शोचनीय स्थिति खरी आहे. म्हणून येथील द्राविडांतर्गत सर्व ब्राह्मणवर्गानें त्यांना आपल्या समाजांत सर्व प्रकारें समाविष्ट करावें. भेदभाव काढून टाकावा. ही गोष्ट उभय समाजांत हितकर व योग्य आहे. तथापि बऱ्याच प्राचीन अशा भेदभावाचें खरें कारण कोणास दाखवितां येत असेल तर तें उघडकीस यावें. आणि तें जर महत्त्वाचें नसेल व श्रीमज्जगद्गुरूंच्या दसरींही भट्टप्रभूंच्या पंक्तिपावनतेला विरुद्ध व अनिवार्य असा दाखला कांहीं नसेल तर, श्रींची आज्ञा मिळाल्यावर भट्टप्रभूंचा व इतर आम्हां, कऱ्हाडे, कोंकणस्थ ( चित्तपावन ), पद्ये व देशस्थ यांचा अन्नादि संबंध होण्यास आमचे मतानें कांहींच हरकत नाहीं. हा अभिप्राय मान्य असलेबद्दल आम्ही खालीं सही करतों.

| अ.नं. | नांव. | गांव. | अ.नं. | नांव. | गांव. |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरि वासुदेव फडके | शिरोडें | १७ | रामचंद्र पांडुरंग वैद्य | केरी |
| २ | महादेव गोपीनाथ फडके | ,, | १८ | पांडुरंग विठ्ठल सहकारी | सांवडें |
| ३ | केशव गोविंदभट पाटील | ,, | १९ | दत्ताराम बाळकृष्णभट अळवणी | पिर्योळ |
| ४ | कृष्ण मुकुंदभट बुकले | ,, | २० | व्यंकटेश विष्णु पाटील | वळवय |
| ५ | विष्णु रामचंद्र किंजवडेकर | ,, | २१ | भिकंभट अनंतभट मणेरकर | मणेरी |
| ६ | सीताराम नारायणभट सहकारी | ,, | २२ | धोंडू विनायकभट मणेरकर | ,, |
| ७ | गोविंदभट जोग | सांकोडें | २३ | काशीनाथभट कृष्णभट धोपेश्वर | बेळगांव |
| ८ | राम अनंतभट बुकलेगांवकर | कवळें | २४ | विष्णु बाबलीगांवकर | खंडेपार |
| ९ | विष्णु केशव ढवळीकर | ढवळी | २५ | नारायण कृष्णाजी साहकारी | कुर्टी |
| १० | वासुदेव आत्मारामभट मराठे | कवळे | २६ | बाबलो देसाई खंडेपार | खंडेपार |
| ११ | सदाशिव रामचंद्रभट परांजपे | शिरोडें | २७ | राम सदाशिव देसाई | शेळडें |
| १२ | नारायण पुरुषोत्तमभट तोटेकर | म्हादोंळ | २८ | गोविंद वामनभट | खंडेपार |
| १३ | सदाशिव बाळकृष्णभट बोरीकर | बोरी | २९ | हरि महादेवभट | पाडेली सत्तर |
| १४ | शंकर वामनभट | ,, | ३० | अनंत राघोबा देसाई | उसगांव |
| १५ | गोविंद लक्ष्मण उपाध्ये | केरी | ३१ | दामोदर नारायण सावकार | पिर्योळ |
| १६ | पुरुषोत्तमभट उपाध्ये | ,, | ३२ | राम नारायणभट साहकारी | केरी |

| अ.नं. | नांव. | गांव. | अ.नं. | नांव. | गांव. |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | विनायक नारायणभट तोटेकर | पिर्योळ | ४९ | विठ्ठल रामकृष्णभट | खंडेपार |
| ३४ | कृष्णभट कथने | वेलिंग | ५० | अनंत माधवभट सावईकार | खांडोळें |
| ३५ | बाळकृष्ण लक्ष्मणभट जठार | केरी | ५१ | दिनकर पांडुरंगभट देसाई | खंडेपार |
| ३६ | कृष्ण विठ्ठल जोशी | ,, | ५२ | काशीनाथ नारायभट म्हातारभोग | सांकोडें |
| ३७ | विठ्ठल महादेवभट | ,, | ५३ | हरी विनायकभट म्हातारभोग | ,, |
| ३८ | रामकृष्ण गोपाळ अध्यापक | पिर्योळ | ५४ | नारायण शंकर गांवकार हुडेकर | केरी |
| ३९ | वामन शामा फडके | शिरोडें | ५५ | गणेश रामचंद्रभट धोणें | ,, |
| ४० | नारायण गोविंद गाळकर | पिर्योळ | ५६ | विष्णु राघोबाभट पुजारी | ,, |
| ४१ | बाळकृष्णभट गोब्रे | खंडेपार | ५७ | विश्वनाथ गंगाराम देसाई | ,, |
| ४२ | राम विठ्ठलभट म्हातारभोग | वेरें | ५८ | काशीनाथ गोपाळभट चांफाडकार | वेरें |
| ४३ | रामचंद्र माधव देसाई | पिर्योळ | ५९ | दत्ताराम नारायणभट गांवकार | खंडेपार |
| ४४ | गोपाळ हरि पद्य पानवेलकर | केरी | ६० | माधव पांडुरंगभट आगाशे | ,, |
| ४५ | वासुदेव विष्णुभट खेडेकार | वेरें | ६१ | सदाशिव गोपाळ देसाई | पिर्योळ |
| ४६ | अनंत सखाराम पैंदरकार | पाळी | ६२ | वासुदेव माधव देसाई | ,, |
| ४७ | कृष्ण गोविंदभट जांभळे | वेरें | ६३ | विठ्ठल विश्वनाथ देसाई | ,, |
| ४८ | सदाशिव चिंतामण शीलकर | ,, | ६४ | पांडुरंग कृष्णाजी देसाई | ,, |

| | | |
|---|---|---|
| ६५ | राजाराम नारायण गाळकर | पिर्योळ |
| ६६ | गोविंद नारायण गांळकर | ,, |
| ६७ | गोपाळ बाळकृष्ण भट्ट अळवणी | ,, |
| ६८ | रामचंद्र गोपाळ अळवणी | ,, |
| ६९ | दत्तु दाजीबा देसाई | ,, |
| ७० | दत्तात्रय सदाशिव देसाई | ,, |
| ७१ | नारायण सदाशिव देसाई | ,, |
| ७२ | विष्णु रामचंद्र खेडेकर | वेरें |
| ७३ | विनायक दामोदर नातू आगापूर | मालवण |
| ७४ | नारायण माधवभट्ट उपाध्ये | कवळें |
| ७५ | सहकारी वासुदेवात्मज पुरुषोत्तम शर्मा | अमरावती |
| ७६ | विनायक बाळकृष्ण भट अळवणी | रामनाथ |
| ७७ | लक्ष्मण विष्णु भट सिकेरकर | सांगें |
| ७८ | कृष्ण विष्णु भट जाण | कोनें |
| ७९ | गोविंद भलंभट जोतकर | कवळे |
| ८० | गोविंद आत्माराम फडके | रामनाथ |
| ८१ | विष्णु यज्ञेश्वर तळेकर | पणजी |
| ८२ | नारायण अनंत नाईक पाटणकर | सांगें |
| ८३ | केशव रघुनाथ काशीकर | पुणें |
| ८४ | दत्ता अनंत बुकले | आगापूर |
| ८५ | गणेश लक्ष्मणभट बुकले | ,, |
| ८६ | विठ्ठल माधव उपाध्ये | ,, |
| ८७ | नारायण रामचंद्र बुकले | आगापूर |
| ८८ | गोविंद बाळकृष्णभट आळवणी | ,, |
| ८९ | गोविंद रामकृष्णभट चिखले | चिखली |
| ९० | विनायक वासुदेवभट भांडणकर | आगापूर |
| ९१ | अनंत रामचंद्र बुकले | ,, |
| ९२ | पांडुरंग लक्ष्मणभट दाते | नागेश |
| ९३ | कृष्ण लक्ष्मणभट वझे | ,, |
| ९४ | पांडुरंगभट पुजारी | बांदिवडें |
| ९५ | कृष्ण गोविंदभट गांवकर | ढवळी |
| ९६ | वामन सिताराम मराठे | बांदिवडें |
| ९७ | विष्णु लक्ष्मणभट दाते | बांदिवडें |
| ९८ | सदाशिव पांडुरंगभट वझे | नागेश |
| ९९ | कृष्ण रामचंद्र भट घोर्णे | वेरें |
| १०० | हरि रामचंद्र भट घोर्णे | ,, |
| १०१ | हरि सांवळाभट कोर्डे गांवकर | पिर्योळ |
| १०२ | रामकृष्ण सांवळाभट कोर्डे गां० ,, | ,, |

| अ.नं. | नांव. | गांव. | अ.नं | नांव. | गांव. |
|---|---|---|---|---|---|
| १०३ | शिवराम बाबलेभट शिकेरकर | पर्वत | ११९ | कृष्ण पांडुरंगभट | वेरें |
| १०४ | रामकृष्ण लक्ष्मण भट अभिषेकी | म्हादोंळ | १२० | दिवाकर अनंत साने | ,, |
| १०५ | आत्माराम कृष्णाजी साहाकारी | कुर्टी | १२१ | दत्तु अनंतभट खेडेकर | ,, |
| १०६ | कृष्ण लक्ष्मणभट बुकले | आगापूर | १२२ | हरि शंकरभट खेडेकर | ,, |
| १०७ | भिकू बाबूभट गाडगीळ | गेरी(सत्तर) | १२३ | आत्माराम अनंतभट सावईकर | खांडोळें |
| १०८ | बिंदुमाधव गणेश जोशी कल्लोलकर | कल्लोळ | १२४ | शंकर विष्णुभट खेडेकर | सावई वेरें |
| १०९ | गणेश भिकंभट अभिषेकी | मंगेश | १२५ | केशव विनायकभट खेडेकर | ,, |
| ११० | गंगाराम भिकंभट रानडे | ,, | १२६ | वासुदेव अनंत चाफाडकर | वेरें |
| १११ | दत्तात्रय वासुदेव पुराणिक | ,, | १२७ | रामचंद्र विष्णु पाटील गांवकर | ,, |
| ११२ | शंकरभट विष्णुभट गोखले | ,, | १२८ | रामकृष्ण विश्वनाथभट सावईकर | ,, |
| ११३ | विश्वंभर भिकंभट अभिषेकी | ,, | १२९ | देवदा विठ्ठलभट कोर्डे गांवकर | पिर्योळ |
| ११४ | भिकू गणेश अभिषेकी | ,, | १३० | विष्णु कृष्ण निगळये | तोटें |
| ११५ | वासुदेव केशवभट पाटणकर | ,, | १३१ | विनायक व्यंकटेश सावईकर | वेरें |
| ११६ | धोंडू केशव पाटणकर | ,, | १३२ | पद्माकर रामकृष्ण सावईकर | ,, |
| ११७ | नारायण अनंत अभिषेकी | वेरें | १३३ | नारायण बाळा पाटील गांवकर | वळवई |
| ११८ | कृष्ण गोपाळभट गुले | ,, | १३४ | रामचंद्र बाबुराव जडये | पारसें |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३५ | दत्तात्रेय हरि वैद्य पानवेलकर | केरी | १४४ | दत्तात्रेय व्यंकटेश जोग | पणजी |
| १३६ | जयराम राघोबाभट गांवकर | कवळें | १४५ | दत्तात्रेय पुरुषोत्तमभट साने | ,, |
| १३७ | गजानन पांडुरंगभट दाते | | १४६ | वासुदेवभट दामले | वेळगें |
| | ( प्रोफेसर आल्मेद कॉलेज, फोंडा ) | बांदिवडें | १४७ | रामचंद्र नारायण देसाई | पणजी |
| १३८ | गणेश रामचंद्र बोडस | आजगांव | १४८ | व्यंकटेश रामकृष्णभट | कवळें |
| १३९ | पांडुरंग बाळकृष्ण उमर्ये | कोरगांव | १४९ | दामोदर विनायक मोने | मळकर्णें |
| १४० | नागेश गोविंद पित्रे | बांदें | १५० | आत्माराम महादेव साठें पुर्णेकर | काकोडें |
| १४१ | पुरुषोत्तम महादेवभट आपटे | म्हापसें | १५१ | सखाराम पांडुरंग वरवे | सुर्ल |
| १४२ | जनार्दन कृष्णभट वझे | सत्री | १५२ | रघुनाथ दामोदर प्रभुदेसाई | नेत्रावळी |
| १४३ | कृष्ण रामचंद्र भट | पणजी | | | |

अ० नं. २०

## भट्टप्रभूंनीं श्रीसंस्थानीं पाठविलेलें पहिलें विनंतिपत्र.

चोरी–शिरोडें. श्री. भाद्रपद वद्य १ शके १८४६.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्येत्यादिविरुदावलिविराजित श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य विद्याशंकरभारती स्वामीमहाराज यांचे चरण सेवेसीं—

नम्र शिष्य—रामजी विश्वंभर प्रभू गांवकर, गुणबा शिव प्रभू देसाई, बाबू पुरुषोत्तमभट्ट उपाध्ये यांचे कृतामित प्रणिपात. वि. वि.—या गोवा प्रांतांत बोरी, शिरोडें व इतर कांहीं ठिकाणीं मिळून एकंदर सुमारें ३०–४० "भट्टप्रभु" या नांवानें ओळखलीं जाणारीं आम्हां ब्राह्मणांचीं घराणीं आहेत हें कदाचित् श्रीसंस्थानींही विदित असेलच. वस्तुतः हीं घराणीं या प्रांतांतील कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मणांपैकींच आहेत, याबद्दल कोणतीच शंका नाहीं. परंतु सांप्रत अत्रस्थ महाराष्ट्रीय पंचद्राविडांतर्गत कऱ्हाडे, पद्ये-कऱ्हाडे व चित्तपावन ब्राह्मण या घराण्यांला पृथक् समजून त्यांच्याशीं पंक्तिव्यवहार करीत नाहींत. त्यामुळें या छोटया समाजाची फारच गैरसोय होत आहे. हा पांक्तिव्यवहार कां बंद झाला याचें योग्य कारणही कोणीच आम्हाला सांगत नाहीं. केवळ गतानुगतिकत्वमात्र सुरू आहे. तेव्हां याविषयींचा निर्णय श्रीमठाकडून तरी करून घ्यावा असा भट्टप्रभू-समाजाचा निश्चय असून त्याला इतर अनेक पद्ये, कऱ्हाडे, कोंकणस्थ यांची सहानुभूतिही आहे.

तेव्हां हा भट्टप्रभु-समाज पुरातनकालापासून श्रीमज्जगद्गुरुशंकराचार्य मठ-संस्थान संकेश्वर याचाच अनुयायी असल्यावरून याबद्दल मठदप्तरीं कांहीं माहिती असण्याचा संभव आहे, असें पुष्कळ तज्ज्ञांचें मत असल्यामुळें मुद्दाम नम्रतापूर्वक श्रीचरणीं विनंति करितों कीं—

महाराजांनीं खालील मुद्द्यांविषयीं अथवा इतर–भट्टप्रभु समाजाविषयीं दप्तरीं असलेली–साधार माहिती आम्हांला मिळवून देण्याची व्यवस्था –आज्ञा करण्याची कृपा १ करावी. भट्टप्रभु समाजाला मठाकडून केव्हां-तरी काहीं कारणानें इतर कऱ्हाडे-पद्ये ब्राह्मणसमाजापासून पृथक् केल्या-बद्दल दप्तरीं कांहीं दाखला असल्यास मिळावा !

२ ब्राह्मणसमाजानेंच आपसांत ठराव करून या समाजाला निराळा केल्याबद्दल पुरावा असल्यास मिळावा ?

जगद्गुरु स्वारीचे आगमनादिकांचे वेळीं अगर भट्टप्रभुसमाजांत कांहीं ग्रामण्यप्रकरणादि उपस्थित झालें असल्यास तत्संबंधीं निर्णयाचे वेळीं त्यांचा महाराष्ट्र द्राविडांतर्गत कोणत्या पोटजातींत अंतर्भाव मानला आहे, कीं पंचद्राविडांतर्गत पण स्वतंत्र जात मानली आहे ?

इत्यादि विषयांचा उल्लेख-निर्देश कागदपत्रीं काय सांपडत असेल तो काळजीपूर्वक दप्तर तपासून आम्हाला मिळवून देण्याची कृपा करावी. या कामीं योग्य तो खर्च आम्ही शक्त्यनुसार देऊं. तूर्त आगाऊ दहा रुपयांची नोट जात आहे. श्रीचरणीं रुजू असावी. कळावें, गरीब शिष्यांवर अखंड दया लोभ असावा, हे विनंति.

श्रीसंस्थानचे नम्र शिष्य

(सह्या) भट्टप्रभु { रामजी विश्वंभर प्रभुगांवकर.
बाबू पुरुषोत्तमभट उपाध्ये.
गुणबा शिवप्रभु देसाई.

दाखल तारीख १८।९।२४ सोबत दहा रुपयांची नोट आली आहे.
ता. ६ माहे आक्टोबर सन १९२४ इसवी.
शा. ध. जा. नंबर ४ शके १८४६ ( अर्जदारांस उत्तर.)

श्रीजगद्गुरुस्वामी यांची स्वारी गोवेंप्रांतीं लवकरच येणार आहे. त्या वेळेस तुमचेबद्दल स्थानिक चौकशी होऊन निर्णय होईल. या बाबतींत पूर्वी श्रींची स्वारी गोवेप्रांतीं आल्यावेळीं तुमचेबद्दल काम चालवून कांहीं निकाल जाहला असेल तर ह्याचा दाखला दप्तरीं पाहून मिळाल्यास तुम्हांस कळविण्यांत येईल.

(सही) दामोदर भास्कर कुळकर्णी.
ज्ञा. ध. का. नि. श्री.

---

अ० नं. २१

अयणी, जि० बेळगांव. श्री. गुरुवार ता. १८-९-२४.

धर्माभिमानी रा० रा० गुणबा शिवप्रभु देसाई यांसी—वैदिक आशीर्वाद. पत्र ले. आपलें भाद्रपद वद्य १ चें पत्र पोंचलें; परंतु श्रींच नांवें पाठविलेलें रजिस्टरपत्र आजपावेतों इकडे दाखल झालें नाहीं. अथणी तालुका बेळगांव जिल्ह्यांत आहे. तरी पत्त्यावर कांहीं चूक झाली असल्यास समजत नाहीं. पण तें इतक्यांत येऊन पोंचेलच, असो! अर्ज दाखल होतांच विचार होऊन योग्य ती तजवीज होईल व विजयादशमी झाल्यानंतर श्रीस्वारीचें येणें तिकडे होईलसें वाटतें व तेथें स्वारी आल्यानंतर सर्व विचार होईल. प्राचीन दाखले वगैरे ज्या कागदांवरून मिळावयाचे असतील ते सर्व कागद त्या प्रांतासंबंधीं स्वारीबरोबर आणविण्याची तजवीज करितों.‡ फक्त तिकडील प्रांतस्थ सद्गृहस्थांचा अभिप्राय श्रीपुढें योग्य तऱ्हेनें येतांच विचार होईल. ठिकठिकाणच्या प्रसिद्ध विद्वानांची संमति त्या कामीं घेणें जरूर आहे. व ती सर्व तजवीज तिकडे येतांच ठरवितां येईल. इकडून योग्य ती तजवीज होण्यास हरकत होणार नाहीं. सुज्ञांस जास्त लिहिणें नको. कळावें.

(सही) धर्माधिकारी—
रघुनाथ वाळकृष्ण जोशी याजकडून.

---

‡ टीप:—संकेश्वर मुक्कामीं आम्ही स्वतः जाऊन तेथील श्रींचे वट्ट मुक्त्यार व कारभारी यांचे परवानगीवरून माहितगार लोकांच्या मदतीनें ज्ञा. ध. प्र. सर्व जुनी दप्तरें तपासून पाहिलीं; परंतु भट्टप्रभूंसंबंधीं अनुकूल वा प्रतिकूल असा कोणत्याही प्रकारचा उल्लेख सांपडला नाहीं.

रा. द. किंजवडेकर.
कार्यवाह—भ. ऐ. प. नि॥ श्री. संस्थान संकेश्वर.

अ० नं. २२

# भट्टप्रभूंनीं शके १८४८ त श्रीसंस्थानीं पुनः दाखल केलेला अर्ज.

कपिलेश्वर. श्री. अधिक चैत्र शुद्ध १ शके १८४८.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्येत्यादि बिरुदांकित श्रीसच्चिदानंद विद्यानृसिंहभारतीस्वामी गुरु श्रीसच्चिदानंद विद्याशंकरभारतीस्वामी जगद्गुरुमहाराज यांचे चरणसेवेसी—

नम्र शिष्य रघुनाथ शाबाप्रभु, रामजी विश्वंभरगांवकर, नारायण व्यंकटेश-प्रभु देसाई. आम्हीं भट्टप्रभु ब्राह्मणसमाजानें निवडून दिलेले प्रतिनिधि राहणार बोरी व शिरोडें, ता. फोंडा-गोवा, प्रांत गोवा यांची श्रीचरणीं विनंति ऐसीजे—

आम्ही बोरी, शिरोडें, कुंडई, बांदिवडें, प्रियोळ या गांवीं राहणारे 'भट्टप्रभु' पंचद्राविडांतर्गत आहोंत. आमचीं गोत्रें, प्रवर, घरचे सर्व वैदिक धर्मसस्कार, हव्यकव्य, आचारव्यवहार, सोंवळेंओवळें, कुल-देवता, कुलपुरुष, इ-यादि सर्व प्रकार कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मणां-चे व आमचे एकच आहेत. तसेंच पद्ये ब्राह्मणांचीं उपनांवेंही आमच्या-सारखींच आहेत. याबद्दल येथील सर्व ब्रह्मवृंदांस माहिती आहेच. त्याचप्रमाणें सदा पद्ये ब्राह्मणांशीं आमचीं वैदिक धर्मकृत्यें, सहानुष्ठाने व उपहार इत्यादि व्यवहार प्रसिद्धपणें चालू आहेत. यावरून येथील कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मण व आम्ही एकाच समाजातील आहोंत. आमचा समाज पद्ये ब्राह्मणसमाजाहून पृथक् नाहीं. जर स्वतंत्र असा आमचा ब्राह्मणसमाज असता तर त्याची स्वतंत्र बरेच ठिकाणीं अधिक व्यासी असणें जरूर होतें. परंतु तशी स्थिति नसून समाजसंख्या थोडे गांवीं व अल्प आहे. याचवरून येथील जास्त समाज असलेला पद्ये ब्राह्मणसमाजाचा घटक असा हा आमचा समाज आहे. मात्र पंक्तिभोजन आणि शरीरसंबंध बऱ्याच वर्षांपासून चालू नाहीं. याचें स्पष्ट कारण कोणा-कडूनही पुढें येत नाहीं; त्यामुळें आमच्या छोट्या समाजाचा अत्यंत ऱ्हास होऊन तूर्त सुमारें ३०–४० सच घरें शिल्लक राहिलीं आहेत. त्यांत कांहीं

चराणीं संततिविहीन असल्यामुळें विवाहादि व्यवहारांत फारच अडचणी येत आहेत. त्यामुळें पुढील दहापंधरा वर्षांत आम्हां भट्टप्रभू ब्राह्मण-समाजावर एकाच गोत्रप्रवरामध्यें शरीरसंबंधादि व्यवहार करण्याची दुर्धर आपत्ति ओढवण्याचा प्रसंग आला आहे. करितां आमचा व येथील धार्मिक बाजूनें आमच्याच सारख्या असलेल्या पद्ये ब्राह्मणाशीं पंक्तिभोजन विवाहादि संबंध घडून आल्यास वरील आपत्ति दूर होतील. याविषयीं धर्मशास्त्रदृष्ट्या कांहींच विरोध दिसत नसून उलट हा प्रकार समाज-वृद्धीस व ब्राह्मण्यसंरक्षणार्थ योग्यच होणार आहे. परंतु जास्त वर्षांचा अंधपरंपरेनें होत गेलेला प्रतिबंध दूर होण्यास सर्व समाजांची एकवाक्यता होण्यास श्रींची आज्ञा मिळणें अत्यावश्यक आहे. याविषयीं पूर्वी झालेली समाजाची मान्यता व विद्वानांचे अभिप्राय पाहून श्रींनीं आम्हांस त्वरित पंक्तिपावन करून आमच्या सर्व आपत्ति–धार्मिक अडचणी–दूर व्हाव्यात, अशी श्रीचरणीं सविनय मागणी आहे. आजपर्यंत ह्या कामीं मिळालेले विद्वानांचे अभिप्राय व समाजांचीं मान्यतादर्शक पत्रें यांच्या अस्सलवरहुकूम नकलेच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. यांत न्यूनाधिक्या-बद्दल क्षमा करणार श्री समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विनंति.

श्रींचे नम्र शिष्य–

(सह्या)
रघुनाथ शाबा प्रभु
रामजी विश्वंभर प्रभुगांवकर
नारायण व्यंकटेश प्रभु देसाई
विठ्ठल विश्वंभर प्रभुगांवकर
गोविंद मंगेश प्रभु.

ग्रंथ संग्रहालय दाभो
ग्रं. सं. 3402

अ० नं. २३

## श्रीशंकर जाहिरनामा.

शिक्का.

मुक्काम श्रीस्थळ कपिलेश्वर, फोंडा-गोवा. अधिक चैत्र वद्य १ शके १८४८.

श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठसंस्थान संकेश्वर व करवीर यांचे वट्टमुखत्यार व कारभारी हल्लीं मुक्काम श्रीस्थळ कपिलेश्वर, फोंडा–गोवा यांजकडून मठानुयायी अखिल ब्राह्मणशिष्यवृंद यांसी कळविणेंत येतें कीं, ता. फोंडागोवापैकीं बोरी व शिरोंडें गांवीं राहणारे पंचद्राविडांतर्गत, भट्ट-प्रभु नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या ब्राह्मणसमाजाकडून आलेल्या ऐक्य-प्रकरणीं अर्जाचा योग्य विचार करणेकरितां ता. २३ ते २५ एप्रिल १९२६ पर्यंत कवळें येथें श्रीशंकराचार्यमंदिरानजीक उभारलेल्या भव्य मंडपांत श्री० नरसिंह चिंतामण केळकर यांचे अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरविण्याचें ठरविलें आहे; तरी सदरहु ऐक्यप्रकरणीं अनुकूल अगर प्रतिकूल मतें असलेल्यांनीं सभेच्या वेळीं समक्ष हजर राहून अगर पत्रद्वारें आपापलीं मतें कळवावींत.

सभेंत ठराव पास झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं. ता. ३०।३।१९२६ इसवी.

विशेष सूचनाः—सदर सभेंत इतरही योग्य त्या धार्मिक बाबींचा विचार अध्यक्षांच्या परवानगीनें केला जाईल. व प्रतिनिधींची भोजनाची सोय केली जाईल.

( सही इंग्रजी )
जी. पी. इनामदार
कारभारी व वट्टमुखत्यार नि॥ श्रीस्वामी-
जगद्गुरु सं. मठ संकेश्वर व करवीर.

टीप–वरील जाहिरनामा केसरींतून २ वेळ प्रसिद्ध केला होता, शिवाय गोव्यांतील समस्त ब्रह्मवृंदांचे घरींही पोंचविण्याची व्यवस्था केली होती.

कार्यवाह.

---

## अ० नं. २४.

( भट्ट-प्रभु ऐक्यपरिषदेच्या कार्यवाहांची नेमणूक )

श्रीशंकरो विजयते

शिक्का.

मुक्काम संकेश्वर. ता. १३।४।२६.

श्रीसच्चिदानंद विद्यानरसिंह भारती गुरु श्रीसच्चिदानंद विद्याशंकर भारती स्वामी जगद्गुरु संस्थान मठ संकेश्वर व करवीर यांचे कारभारी व वट्टमुखत्यार यांजकडोन—

सनातन वैदिक धर्माभिमानी व मठाभिमानी वे॥ रा० राजश्री रामचंद्र-शास्त्री दीक्षित किंजवडेकर यांसी.—आम्हीं गोवे प्रांतीं श्रीक्षेत्र कवळें येथें भट्टप्रभु ब्राह्मणसमाजाकडून आलेल्या ऐक्यप्रकरणीं अर्जाचा विचार करणेंकरितां श्रीशंकराचार्यमंदिरात श्री० नरसिंह चिंतामण केळकर यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरविणेचे ठरविलें आहे. तरी आपण सदर सभेचे 'कार्यवाह' म्हणोन कार्य करावें अशी आमची इच्छा आहे. कळावें, कृपा लोभ असावा हे विनंति.

( सही इंग्रजी )

जी. पी. इनामदार,

कारभारी व वटमुखत्यार नि॥ श्रीस्वामी,

जगद्गुरु सं. मठ-संकेश्वर व करवीर.

---

अ० नं. २५

## ( भट्टप्रभु ऐक्यपरिषद्–गोवा )

कपिलेश्वर, पोस्ट फोंडा–गोवा. विनंतिपत्र. अधिक चैत्र वद्य ८.

गोमांतक प्रांताचेकीं बोरी व शिरोडें या गांवीं राहणाऱ्या पंचद्राविडांतर्गत पद्ये ब्राह्मणांपैकींच्च असलेल्या, परंतु कांहीं कारणामुळें बरींच वर्षें त्यांहून अलग असलेल्या भट्टप्रभू समाजाची ऐक्यपरिषद् श्रीस्थळ कपिलेश्वर, ता. फोंडा-गोवा येथें श्री० नरसिंह चिंतामण केळकर यांचे अध्यक्षतेखालीं १९२६ एप्रिल ता. २३ ते २५ पर्यंत श्रीमच्छंकराचार्य संस्थान संकेश्वर यांनीं भरविण्याचें ठरविलें आहे. तरी या कार्याविषयीं कळकळ बाळगणाऱ्या पंचद्राविडांतर्गत अखिल ब्राह्मणांनीं समक्ष किंवा पत्रद्वारें आपापलीं सप्रमाण मतें कळविण्याची कृपा करावी.

सभेस येण्याविषयींच्या निमंत्रणपत्रिका गोमांतकीं सर्वांस पोंचविण्याची व्यवस्था केली आहे. तरी पण कदाचित् निमंत्रण-पत्रिका न पोंचल्यास हेंच जाहीरनिमंत्रण समजून सभाप्रसंगीं येण्याचें करावें. कळावें.

आपला

(सही) रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित किंजवडेकर,

कार्यवाह–भट्ट-प्रभु ऐक्यपरिषद्.

टीपः—सदर विनंतिपत्र महाराष्ट्रांतील प्रमुख नियतकालिकांपधून प्रसिद्ध केलें होतें. कार्यवाह.

---

अ० नं. २६

## कार्यवाहांकडे आलेलीं संमतिपत्रें.

कुडाळ सं. सांवतवाडी. श्रीगुरुःशरणम्। ता. २।४।२६.

### भट्ट-प्रभु व पद्ये या जातींचे ऐक्यास संमतिपत्र.

गोमांतक प्रांतांत हल्लीं 'भट्टप्रभु' या नांवानें ओळखले जाणारे ब्राह्मण व पद्ये शब्दानें ओळखले जाणारे ब्राह्मण हे पूर्वी एकाच ब्राह्मणाचे पोटजातींत समाविष्ट होत असून कांहीं कारणानें इतर ब्राह्मणसमुदायाचा वरील हल्लीं दोन नांवांच्या समुदायाशीं व्यवहार

बंद पडला होता. पण तो श्री १०८ शंकराचार्यांचे आज्ञेनें श्रीचंद्रमौलीश्वराचे तीर्थप्रसादास सर्वांना बरोबर घेऊन सुरू व्हावयाचा असें ठरलें होतें. पण त्या समुदायापैकीं कांहीं लोक त्या प्रसंगीं ठरलेल्या वेळीं येऊं शकले नाहींत व त्यामुळें ते पुढें तसेच राहिले अशी गोष्ट मी गोव्यांत श्रीशंकराचार्यांचे स्वारींतून गेलों होतों त्या वेळीं ऐकली होती. त्या वेळीं श्रीविद्याशंकरभारती स्वामी ( पूर्वाश्रमांतील नांव—वासुदेवशास्त्री भिलवडीकर ) हे पीठारूढ होते. व मी त्या वेळीं मठांत असलेल्या न्यायशाळेंत विद्यार्थी होतों. न्यायाचे अध्यापक गुरुवर्य श्री ६ अनंतशास्त्री जोशी गणेशवाडीकर हे होते, हे हल्लीं संस्थान सांगली येथें न्यायशाळेचे गुरु आहेत. वरीलप्रमाणें भट्ट-प्रभुज्ञातीविषयींची दंतकथा ऐकून मला त्यावेळीं या भट्ट-प्रभुज्ञातीशीं तुटलेला आपला व्यवहार सुरू होणें योग्य आहे व तो झाल्यास चांगलें होईल असें वाटलें होतें व तें तेवढेंच राहिलें. आज त्यानंतर सुमारें २८ वर्षांनीं भट्टप्रभुज्ञातीशीं व्यवहार सुरू करण्याविषयीं तिकडे प्रयत्न सुरू असल्याचें वे० शा० सं० रामचंद्रशास्त्री दीक्षित किंजवडेकर यांजकडून ऐकून फार संतोष झाला. श्रीजगद्गुरूनीं विशेष प्रायश्चित्त न सागतां केवळ तीर्थप्रसादास हजर राहणें एवढ्यावर व्यवहार सुरू करण्याचें ठरविलें होतें. यावरून यांच्या हातून पातित्यहेतु असा दोष घडला नसून कांहीं तरी अल्प कारणानें इतर ब्राह्मणांशीं यांचा विरोध आला असावा व एका पक्षाच्या आग्रहानें तो दीर्घकाल चालून अव्यवहार दृढ झाला असावा असें वाटतें. व आज विरोधाचें कारणही उभयपक्षांचे वंशजांचे स्मरणांतून नष्ट झाल्यामुळें आग्रहही नष्ट व्हावा यांत आश्चर्य नाहीं व म्हणूनच भट्ट-प्रभूंनीं ब्राह्मणांतील आपले अत्यंत अंतरंग पद्धे यांस व्यवहार सुरू करण्याविषयीं विनंती केली व त्यांतील प्रमुख वेदशास्त्रसंपन्न नारायणभटजी तोटेकर, आहिताग्नि—गोविंदशास्त्री उपाध्ये वगैरे वयोविद्यातपोवृद्ध मंडळी व दुसरे विद्वान् ब्राह्मण यांनीं ही अव्यवहार्यता काढून टाकण्याविषयीं अत्यंत आदरपूर्वक संमति दिली हें पाहून मला फार आनंद वाटतो. मीही या कार्यास परमादरपुरःसर संमति देतों.

(सही) महादेव गंगाधर बाक्रे,
शास्त्री, वुइल्सन कॉलेज, मुंबई.

अ० नं. २७

मुंबई. श्री ६ गुरुः शरणम्–संमतिपत्रम्

अधिक चैत्र वद्य ६ रविवार शके १८४८ सन १९२६.

गोमांतक प्रांतांत पद्ये ही एक ब्राह्मण जाति आहे. ही कऱ्हाडे जातीपैकींच होय. परंतु तिला कांहीं कालापासून निराळेपणा आला आहे. वस्तुतः तो खरा नाहीं. कारण उपनाम साम्य, मातुलकन्याविवाह, पद्ये जातींतील निगळ्ये हें उपनाम असलेल्या कांहींचा कऱ्हाडे ब्राह्मणजातीशीं शरीरसंबंध व कऱ्हाडे व कोंकणस्थ या दोन जातींशिवाय दुसऱ्या कर्नाटक इत्यादि जातींचा गोमांतकांत अभाव आहे. असो.

या पद्ये जातीप्रमाणेंच भट्ट-प्रभु हीही एक जाति आहे. ही पद्ये जातीपेक्षां भिन्न नसून आचार व व्यवहार यांनीं परस्परांशीं साम्य आहे. परंतु कांहीं वर्षांपूर्वीं भिन्नपणा परस्परांत उत्पन्न झाला आहे खरा. या भिन्नपणाचें कारण उभयपक्षांत कांहींच उपलब्ध नाहीं. हा पृथक्पणा मोडून ऐक्य करण्याकरितां गोमांतकांतील उभय ज्ञातींतील प्रमुख विद्वानांची संमति, बहुजनसमाजाची अनुकूलता व विरोधी पक्षाचा अभाव ह्या तीन सुयोगांनीं एक ऐक्यरूप सुयोग लवकरच येणार आहे, हें वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित, किंजवडेकर यांजकडून ऐकून फार संतोष झाला. माझी या कार्यास परमादरपुरःसर संमति आहे.

(सही) व्याकरणोपाध्याय–विठ्ठलशास्त्री निगळ्ये.

---

अ० नं. २८

मुंबई, नि. सा. प्रेस. श्रीर्जयति अ.चैत्र कृ.५ शके १८४८.

शनिवार, ३।४।१९२६.

## भट्ट-प्रभूंसंबंधानें साभिप्राय दोन शब्द.

वर निर्दिष्ट विप्रवर्ग, गोवाप्रांत अंत्रेजमध्यें चिरकाल नांदत असणाऱ्या सुप्रसिद्ध पद्येवर्गांतर्गत असून त्यावर्गाशीं भिन्न वर्गीयांप्रमाणें द्वैतानें गटंगळया खात आहे. त्याच्या ऐक्यतेकडे सांप्रत प्रायः प्रांतीय साऱ्या ब्रह्मसमूहाचें औदासीन्य किंवा दुर्लक्ष असल्यावरून एका महात्म्याचें पद्य स्मरतें:—

**शास्त्रज्ञाः सुवचोन्विता बहुजनस्याधारतामागताः**
**सद्वृत्ताः स्वपरोपकारनिरता दाक्षिण्यरत्नाकराः ।**
**सर्वस्याभिमता गुणैः परिवृता भूमंडनाः सज्जनाः**
**धातः ! किं न कृतास्त्वया गतधिया कल्पांतदीर्घायुषः ॥ १ ॥**

हाय! हाय! फार वाईट वाटतें. सांप्रतची दृश्यकालपरिस्थिति ब्राह्मणसमाजाच्या अवनतीची असून त्यावर ब्राह्मणेतरांकडून अपरिहार्य व असह्य नानाप्रकारचे आघात चहूंकडून आदळत आहेत व ते साक्षात् अगर परंपरया पूर्णपणें अनुभवीत असतां आपल्या उत्तरोत्तर झिरपत असलेल्या ऐक्यरूप जुटीकडे मनोदेवता वळत नाहीं. ह्या ब्राह्मणाच्या स्वापावस्थेला काय म्हणावें तेंच समजत नाहीं!!

भट्ट-प्रभु व पद्ये ब्राह्मण या उभय नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या उभय वर्गांची राहणी, रीतिरिवाज, आचार विचार, परस्परांच्या सीमशेजाऱ्यांत वतनवाडया, अबाघ सहानुष्ठानें इत्यादि जी ऐकिव पण विश्वसनीय माहिती मला आहे त्यावरून यांचें ऐक्य जुळण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं असें आमचें मत आहे.

माझें राहणें पेडण्यांत व यांचें अंत्रोजी प्रांतांत, म्हणजे मध्यें बराच दूर प्रदेश असल्यामुळें तिकडचें दळणवळण कमी व विद्यार्थीपणापासून सुमारें ४५ वर्षें–पैकीं कांहीं कोल्हापुरांत व पुढें योगक्षेमार्थ–मुंबईतील निर्णयसागरांत गेलीं. त्यांच्यासंबंधीं वास्तविक माहिती मला देतां येणार नाहीं, ती त्या प्रांतांतील आजूबाजूच्या मंडळाकडून मिळेल.

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य मठ संकेश्वर व करवीर यांच्या मुख्य व्यवस्थापक अधिकाऱ्यांपुढें आपल्या ऐक्याच्या हेतूनें सांप्रत अर्ज गुजरला असून संस्थानदेवतेकडून सदय हृदयानें वरील निर्णयासाठीं मोठी सभा उभारली आहे. ह्या संधींत सभेपुढें लेखांनीं, शिष्टाभिप्रायांनीं व निकटवर्ती विद्वानांच्या तोंडी जबान्यांनीं अनायासें साऱ्या गोष्टींचा विचार व निर्णय होण्याचा सुयोग संनिध आला ही मोठया सुदैवाची गोष्ट आहे. श्रीकृपेनें वरील सभा यशस्वी होवो व भट्ट-प्रभु आणि पद्ये

ब्राह्मणांतील द्वंद्व तुटून परस्परांत अबाधित ऐक्य उत्तरोत्तर अधिकाधिक वाढो असा आमचा पूर्ण अभिप्राय आहे.

(सही) वासुदेव लक्ष्मण भट्ट पणशीकर, पेडणें–गोवा.

---

अ० नं. २९

स्वधर्म कार्यालय, पुणें. ॐ। चैत्र वद्य ७ शके १८४८.

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित किंजवडेकर हे भट्ट-प्रभु प्रकरणाविषयीं लोकमत पाहण्यासाठीं येथें आले असतां ते मला भेटले. दोन वर्षांपूर्वीं मी स्वतः गोमांतकांत गेलों असतां या प्रकरणाची सर्व माहिती मला मिळाली होती. हें प्रकरण इतकें स्पष्ट आहे कीं, त्या बाबतींत विचारी गृहस्थांचा मतभेद होण्याचें कारणच नाहीं. परंतु दैववशात् सर्व देशालाच विपरीत परिस्थिति आलेली असल्यामुळें धर्म किंवा तत्त्वज्ञानविषयक गहनवादांत पडण्याऐवजीं ब्राह्मणांना अशा वादांत पडावें असें वाटणें स्वाभाविक आहे. या प्रकरणाबाबद निरनिराळ्या पक्षीयांकडून मी जी हकीगत ऐकली आहे, त्यावरून भट्ट-प्रभु व पद्ये यांचे पूर्ववत् सर्व व्यवहार होण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाहीं असें माझे मत झालें आहे. हा विचार गहन-धर्मशास्त्राचा नसल्यामुळें विशेष कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. कोणतेंही धार्मिक आचरण करावयाचें झालें तरी देश, काल परिस्थितीचा पूर्ण विचार करण्यास शास्त्रकारांनीं बजावून सांगितलेलें आहे. शास्त्रकारांची ही आज्ञा विचारवंतांनीं उल्लंघूं नये एवढीच सर्व गोमांतकीय बंधूंना विनंति आहे. विशेषतः हिंदुधर्म व हिंदुजात भयंकर संकटांत आहे. व ब्राह्मण जातिवर तर आकाश कोसळूं पहात आहे. ब्राह्मण म्हणतांच तो वैदिक, वेदान्ती, तत्त्वज्ञानी किंवा धर्मशास्त्रज्ञ असे. आज ती स्थिति जाऊन ब्राह्मण म्हणजे आचारी, पाणक्या किंवा कारकून एवढाच अर्थ होऊं लागला आहे. शिवाय केवळ ब्राह्मण म्हणूनच त्यांचेवर कशीं संकटें ओढवत आहेत याचा महाराष्ट्रानें चांगला अनुभव घेतला आहे. 'ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः' ही आचार्यांची उक्ति सर्वांनीं जाणावी, हीच विनंति आहे. ब्राह्मणांचें संरक्षण होईल तरच 'ब्राह्मण्य' जगावितां येईल व तेव्हांच धर्मरक्षण होईल. हें परस्परावलंबित्व

लक्षांत आणून धर्मरक्षणासाठीं म्हणूनच या आपत्कालीं जाणती दृष्टि सर्वांनीं आंगीं आणली पाहिजे. सुज्ञांस विशेष लिहिणें नलगे. या प्रकरणीं विचारवंत गोमांतकीय बंधु योग्य मार्ग स्वीकारतील असा पूर्ण भरंवसा आहे.

(सही) ह. मो. जोशी.

---

अ० नं. ३०

श्रीशंकर. चैत्र कृष्ण १२ शके १८४८.

श्रीमदादिबिरुदावलि विराजमान श्रीमत्परमहंस, परिव्राजकाचार्य-वर्य श्रीमत्संकेश्वरपीठाधीश्वर विद्यमान श्रीमज्जगद्गुरुचरणकमलीं अनंत साष्टांग नमस्कार प्रणातिपूर्वक सविनय निवेदन कीं:—

श्रीचरणांकडून आज्ञापत्र आलेलें वाचलें. त्यांत भट्ट-प्रभु-प्रकरण-संबंधीं अभिप्राय कळविण्याविषयीं आज्ञा आहे. तदनुसार कळविण्यांत येतें कीं, भट्ट प्रभूंसंबंधीं वे० रा० रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित, किंजवडेकर कार्यवाह, भट्ट-प्रभु ऐक्यपरिषद् यांनीं दाखविलेले कागदपत्र पाहिले. आम्ही गोमांतक प्रदेशासंबंधानें अपरिचित आहोंत. व हा विषयही धर्मशास्त्रीय नाहीं. तथापि श्रींची आज्ञा झाल्यावरून निवेदन करीत आहों कीं:— तद्देशस्थ विद्वज्जनांच्या संमतीप्रमाणें श्रींची आज्ञा व्हावी. शास्त्रीयदृष्ट्या मिथ्याभिशस्तीही विचारणीय आहे. तदर्थ कांहीं धर्मानुष्ठान करण्याविषयीं भट्ट प्रभूंना श्रींची आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होय.

(सह्या)
वासुदेव शास्त्री अभ्यंकर.
श्रीधर शास्त्री पाठक.
बाळशास्त्री उपासनी.
शंकर शास्त्री मारुलकर.
रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डी.
कृष्णशास्त्री कवडे.

---

## अ० नं. ३१

श्रीशंकरो विजयतेतराम्

पुणें पेठ शनवार घ.नं. ५९८. चैत्र कृष्ण १२ शके १८४८.

श्रीमदादिविरुदावलिविराजमान श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य श्रीमत्संकेश्वरपीठाधीश्वर विद्यमान श्रीमज्जगद्गुरुचरणकमलीं—अनंतकोटि—साष्टांग प्रणामपूर्वक निवेदन कीं:—

वेदशास्त्रसंपन्न रा० रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित, किंजवडेकर, कार्यवाह, भट्ट-प्रभु ऐक्य परिषद्, यांनीं दिलेलें श्रींचें आज्ञापत्र वाचलें. त्याप्रमाणें कळवितों कीं, कपिलेश्वर येथें झालेल्या परिषदेची हकीगत व वेदशास्त्रसंपन्न रा० किंजवडेकर यांनीं दाखविलेले कागदपत्र वाचून असा अभिप्राय देण्यांत येतो कीं:—भट्ट-प्रभु हे मूळचे पंचद्राविडांतर्गत पद्ये ब्राह्मणांपैकींच आहेत याबद्दल संशय वाटत नाहीं. केवळ दंतकथेस अनुसरून अनुमित होणाऱ्या कारणावरून किंवा अन्य कांहीं तरी घडलेल्या अज्ञात क्षुद्र कारणावरून भट्ट-प्रभु हे पद्ये ब्राह्मणसमाजांतून कांहीं काळ अलग राहिले. करितां तद्देशस्थ पद्ये ब्राह्मणांच्या व इतर विद्वज्जनांच्या बहुजनास श्रींनीं त्यांच्यावर अनुग्रह करण्याचें देशकालास अनुसरून व " केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो हि निर्णयः । युक्तिहीने विचारे तु धर्महानिः प्रजायते ॥" या वाक्यास अनुसरून योग्य होईल. त्यांना पंक्तिपावन करून घेण्यास ज्ञातिगंगा व श्रीचरण हे समर्थ आहेत. तथापि कोणत्याही क्षुद्र कारणामुळें कां होईना; परंतु ते कांहीं काल स्वज्ञातीहून अलग राहिले म्हणून त्यांच्याकरवीं कांहीं तरी विद्वत्संमत असें पुण्यकर्मानुष्ठान करवून एक होण्यास संमति द्यावी. सारांश, भट्ट-प्रभूंस पावन करून घेण्यास पद्ये ब्राह्मण, ज्ञातिगंगा व विद्वज्जनसमाज यांच्या बहुमतास अनुसरून श्री पूर्ण समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय.

शिष्यांतर्गत

(सही) बाळशास्त्री उपासनी.

अ० नं. ३२

पुणें. श्रीः। वैशाख वद्य ११ शके १८४८

## भट्ट-प्रभु व पद्ये यांच्या ऐक्यास संमति.

१ हे दोनही वर्ग कऱ्हाडे ब्राह्मणज्ञातींतील आहेत.

२ त्यांच्या म्हणजे भट्ट-प्रभूंच्या हातून कोणतेंही अपकृत्य घडल्याचा पुरावा नाहीं. उलट ते एकच आहेत, याबद्दल अनेक सबळ पुरावे आहेत.

३ गोवें प्रांतांतील सध्यांचे सर्व सुप्रसिद्ध पंडित या ऐक्यास अनुकूल आहेत.

४ त्यांचें ऐक्य होऊन त्यांच्यांत रोटी बेटी-व्यवहार सुरू झाल्यास शास्त्रीयदृष्ट्या कोणताही आक्षेप उत्पन्न होणें शक्य नाहीं.

५ करितां श्रीमज्जगद्गुरूंनीं या सरळ असणाऱ्या प्रकरणाचा ताबडतोब अनुकूल निर्णय करावा अशी त्यांना आमची नम्रतापूर्वक विनंति आहे.

सह्या { सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.
रघुनाथशास्त्री पटवर्धन.

---

अ० नं. ३३

घुणें, पेठ सदाशिव सरदार श्री. वैशाख वद्य ७ शके १८४८.

पटवर्धनवाडा ८६६.

वेदशास्त्रसंपन्न रा० रा० रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, कार्यवाह—भट्ट-प्रभु ऐक्य परिषद नि॥ श्रीसंस्थान संकेश्वर यांसी—अनंतशास्त्री फडके, मु॥ घुणें—साष्टांग नमस्कार वि. वि. आपण समक्ष भेटींत दाखविलेले भट्ट प्रभु-प्रकरणीं लेख व विद्वदभिप्राय पाहिले. त्यांवरून भट्ट-प्रभु हे पंचद्राविडांतर्गत-च आहेत अशी खात्री होते. श्रींनीं या प्रकरणीं अनुकूल निकाल देऊन त्यांजवर अनुग्रह करावा, असा माझा अभिप्राय आहे. कळावें, हे विनंति.

(सही) अनंतशास्त्री फडके.

---

अ० नं. ३४

घुणें, ४०९ सदाशिव पेठ.

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, कार्यवाह—भट्ट-प्रभु ऐक्य परिषद् गोवें यांसी—

साष्टांग नमस्कार विनंति विशेष. आपण दाखविलेले भट्ट-प्रभु प्रकरणाचे लेख वाचून पाहिल्यावरून भट्ट-प्रभु हे पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण असून कऱ्हाडे ब्राह्मणांतर्गत पद्ये ब्राह्मणांचाच तो एक भाग आहे, अशी खात्री होते. त्याकरितां बरींच वर्षें पद्ये ब्राह्मणांहून दूर असलेल्या समाजाकडून संहितास्वाहाकारासारखें एकादें धार्मिक कृत्य करवून त्यांस पंचद्राविडांमध्यें सामील करून घेण्यास हरकत वाटत नाहीं, कळावें, हे विनंति.

आपला

(सही) महादेवशास्त्री जोशी.

---

सदाशिव पेठ २६९ घुणें. वैशाख वद्य ८ शके १८४८.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, कार्यवाह—भट्ट-प्रभु ऐक्य परिषद् निसबत श्रीसंस्थान संकेश्वर यासी—

वासुदेवशास्त्री मराठे, राहणार आबेली, सत्तर गोवा. आपण समक्ष दाखविलेलें भट्ट-प्रभु प्रकरण पाहिलें. त्यावरून भट्ट प्रभु हे पंचद्राविडांतर्गत आहेत अशी खात्री होते; तरी श्रींनीं या प्रकरणीं अनुकूल निकाल देऊन त्यांवर अनुग्रह करावा असा माझा अभिप्राय आहे. कळावें, हे विनंति.

(सही) वासुदेव श्रीधरशास्त्री मराठे.

---

अ० नं. ३६

सोलापूर. अधिक चैत्र वद्य ११ भृगुवार शके १८४८.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रामचंद्र दत्तात्रेय दीक्षित किंजवडेकर, हे भट्ट-प्रभु प्रकरणीं लोकमत अजमावण्याकरितां येथें आले ते मला भेटले. मी पूर्वी कांहीं वर्षांपूर्वी गोव्यांत गेलों असतां त्या ठिकाणीं पद्ये आड-

नांवाची एक जाति आहे. ती पूर्वी पंक्तिपावन नव्हती. त्याच्याही पूर्वी कांहीं वर्षें श्रीशंकराचार्य जगद्गुरु संकेश्वर व करवीर यांची स्वारी संचारार्थ गेली असतां पद्ये ब्राह्मण यांना पंक्तिपावन करून घेण्यांत आलें त्यावेळीं त्यांच्यापैकीं कांहीं पद्ये ब्राह्मण पंक्तिभोजनास योग्यवेळीं आले नसल्यानें ते अपंक्तच राहिले व त्यांनाच पुढें भट्ट-प्रभु या नांवानें संबोधिलें गेलें. पद्ये व प्रभु यांचीं गोत्रें, कुलधर्म वगैरे एकच असोन कऱ्हाडे कोंकणस्थ पद्ये यांच्याशीं भट्ट-प्रभु समाजांतील ब्राह्मणांचीं सहानुष्ठानें चालतात. एकंदरींत पाहतां भट्ट-प्रभु हे षट्कर्मी पंचद्राविडांतर्गत ऋग्वेदी आहेत. करितां इतर पचद्राविडांसी अन्नादि संबंध होण्यास हरकत नाहीं असें माझें मत आहे. कळावें.

(सही) श्रीपाद महादेव जोशी, सोलापूरकर.

---

अ० नं. ३७

श्रीमहालक्ष्मीप्रसन्न. वैशाख शुद्ध २ गुरुवार शके १८४८ क्षयनाम संवत्सर.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रामचंद्रशास्त्री किंजवडेकर यांसा कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति वि आपलें पत्र पोंचून पत्रार्थ समजला. मी सदाशिव रामचंद्रभट्ट परांजपे, मुक्काम शिरोडें ऋग्वेदी कोंकणस्थ ब्राह्मण, वय ३६ श्रीचरणास स्मरून सांगतों कीं, मी भट्ट प्रभूंच्या इथें आज १४।१५ वर्षें बहुतेक धार्मिक कृत्यें करीत असतों. माझे वडीलही धार्मिक कृत्यें करीत असत. त्यामुळें त्यांच्या धार्मिक आचारांची माहिती माझ्या समजुतीप्रमाणें प्रायः मला आहे. भट्टप्रभूंपैकीं देसाई मिरींकर, ( गोत्र कौशिक ) प्रभु, सावकार, ( गोत्र भारद्वाज ) कुंडईकर, बोरकर, ( गोत्र-वत्स ) या उपनांवांच्या सुमारें ७।८ घरात धार्मिक कृत्यें पद्ये कोंकणस्थ ब्राह्मणांना सहाय्यास घेऊन ऋग्वेदी मंत्रांनीं पूर्वापार चालत आलेल्या याज्ञिक प्रयोगांवरून करीत असतों. त्यावरून लिहितों कीं, भट्ट-प्रभूंची सर्व आचारपद्धति द्राविड ब्राह्मणांसारखीच असून कुलधर्म, कुलाचार वगैरे विषयांत पद्यांशीं पूर्ण साम्य आहे. यांच्या इथें आम्हां पंचद्राविडांचा जलादि पेय पदार्थ व इतर सर्व खाण्याचे जिन्नस सहपंक्तीनें त्यांचे

हातचे सेवन करण्याचा प्रघात आहे. मात्र अन्न ( भात ) आम्ही त्यांचा हातचें सेवन करीत नसतों. यांचें कारण काय तें मला माहीत नाहीं. भट्ट-प्रभूंचा इथें देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव होत असतात. आम्हां पंचद्राविडांच्या इथें संतर्पणासही ( पंक्तिभेदानें ) भट्ट प्रभु ब्राह्मण चालतात. तशींच त्यांचीं व आमचीं सहानुष्ठानेंही होतात. भट्टप्रभूंमध्यें वेदाध्ययनाध्यापनपरंपरा अबाध चालत असून तूर्त सांगली व इतर ठिकाणीं त्यांचीं मुलें अध्ययन करीत आहेत. एकंदरींत भट्ट प्रभु हे पंचद्राविडांतर्गत ऋग्वेदी षट्कर्मी ब्राह्मण असून कुलधर्म, कुलदवता, कुलपुरुष, गोत्र, प्रवर इत्यादि प्रकारांवरून पाहतां ते पद्ये-ब्राह्मणांतर्गतच आहेत असें मला वाटतें. तरी श्रींनीं त्यांच्यावर असलेला सामाजिक प्रतिबंध दूर करून पद्ये-ब्राह्मणांशीं पूर्ण संलग्न होण्यास आज्ञा द्यावी. कारण भट्ट प्रभूंचा समाज विवाहादि कार्यांत असलेल्या संकोचामुळें एकसारखा ओहोटीला लागला असून कांहीं वर्षांनीं सगोत्रविवाह करण्याचा प्रसंग आहे. कळावें, लोभ असावा हे नमस्कार. वरील माहिती आपण विचारल्यावरून माझ्या माहितीप्रमाणें श्रींला स्मरून सत्य तीच लिहिली आहे.

आपला नम्र
(सही) सदाशिव रामचंद्रभट्ट परांजपे.
दस्तुर खुद्द.

---

अ० नं. ३८
श्रीजयति.
बोरी. ता. २७।५।२६.

वे० शा० संपन्न रा० राजश्री रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, कार्यवाह—भट्ट-प्रभु ऐक्य-परिषद् यांसीः—

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेषः—आपलें पत्र वाचून अभिप्राय समजला. मी बाबू पुरुषोत्तमभट्ट, मुक्काम कुंडई, धंदा उपाध्येपणा, वय वर्षें ४२, आपण 'भट्ट-प्रभु'प्रकरणीं माहिती विचारल्यावरून श्रींला स्मरून माझ्या माहितीप्रमाणें सत्य तें लिहीत आहें.

१. भट्ट-प्रभूंतील भिक्षुकी पत्करलेल्या ब्राह्मणांना अखिल गोव्यांत एकंदर अतिशूद्रव्यतिरिक्त हिंदुज्ञातींतून द्राविडांबरोबर दानदक्षिणा निर्वेधपणें मिळत आहे.

२. सारस्वतांत होम-हवनादि कृत्यांत कऱ्हाडे, कोंकणस्थ व पद्ये यांसह 'भट्ट-प्रभु' ब्राह्मणांनीं कृत्यें केलेलीं आहेत. याबद्दल थोडा पुरावा खालीं देत आहों. गेल्या ७।८ वर्षांमागें कुंडई गांवांत श्रीयुत कुंडईकर व रा० रा० अच्युत सोयरू कामत यांचे येथें अयुतहोमपुरःसर वास्तु-शांतीस असलेले ऋत्विज खालील होते. वेदशास्त्रसंपन्न वासुदेवशास्त्री धुपकर व तदनुयायी ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न रा० रा० अनंत गणेशशास्त्री धुपकर, व तदनुयायी ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न रा० नारायणभट्ट तोटेकर व मी बाबू भट्ट (प्रभु) वगैरे एकंदर १२ ब्राह्मण होते. श्रीमंत कुंडईकर यांचे येथें हवनद्वारा नवचंडीकृत्यांत वेदशास्त्रसंपन्न रा० ना. पु. तोटेकर. रा० रामचंद्रभट्ट तोटेकर, रा० विनायकभट्ट तोटेकर व मी बाबू पुरुषोत्तम भट्ट (प्रभु), रा० काशीनाथभट्ट (प्रभु), रा० रा० रघुनाथभट्ट (प्रभु), रा० यशवंतभट्ट (प्रभु), वेदशास्त्रसंपन्न अनंतभट्ट चांफाडकर वगैरे ब्राह्मण होते.

३. बोरी गांवांत श्री नवदुर्गेचा पुजारी,(भट्ट-प्रभु)पद्ये,कऱ्हाडे,चित्पावन, भट्ट-प्रभु ब्राह्मण लघुरुद्रादि कृत्यें उभय वर्गांतील ब्राह्मण मिळून निर्बाध-[illegible]

४. याच कुंडई गांवांत गेल्या १३ वर्षांपूर्वी कोंकणस्थ, कऱ्हाडे, पद्ये व आमची मंडळी श्रीनवदुर्गाप्रतिष्ठा (नवीन मूर्तिस्थापना) उत्सवास सहानुष्ठानास लागली होती.

५. समाराधनेंत पद्ये भट्ट-प्रभु मिळून विवक्षित संख्यापूर्ति होत असते. गेल्या ८ वर्षांपूर्वी चंडीकृत्यांत श्रीमंत कुंडईकर यांचे येथें तोटेकरादि ८।९ भट्ट प्रभूंतील ५।६ ब्राह्मणसुवासिनी कर्मसांगतासिध्द्यर्थ समा-[illegible]

६. भट्ट-प्रभूंच्या घरचे भात वर्ज करून इतर एकंदर शिजलेले, भाजलेले, तळलेले पदार्थ येथील चित्पावन, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मण राजरोसपणें स्वीकारतात.

७ नेत्रावळीकर हे प्रभु-देसाई व त्यांचें गौत्र कौशिक असें समजतें. भट्ट-प्रभूंत असलेले प्रभु-देसाई यांचेंही गौत्र कौशिकच आहे व गेल्या १५।२० वर्षांमागें कौंडिण्य गौत्र नामशेष झाल्याचें स्मरत आहे. कळावें. लोभाची वृद्धि व्हावी ही विनंति.

आपला कृपाकांक्षी.

(सही) बाबू पुरुषोत्तमभट्ट.

दस्तुर खुद्द.

---

अ. नं. ३९

वैशाख कृष्ण ५ शके १८४८.

वेदशास्त्रसंपन्न रा० रा० रामचंद्र दत्तात्रेयशास्त्री किंजवडेकर यांसी— कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष. आपलें ता. २५।५।२६ चें पत्र पावलें. पत्रांत विचारलेल्या मुद्यांपैकीं मला जी माहिती आहे ती खालीं लिहिली आहे.

येथें बोरी गांवांत श्रीनवदुर्गादेवीच्या देवळांत मी रामचंद्र विठ्ठल देवारी, (भट्ट-प्रभु ब्राह्मण), शंकर वामनभट बोरकर व सदाशिव बाळकृष्ण-भट बोरकर ( पद्ये ब्राह्मण ) असे पूजाअर्चेकरितां आहोंत. येथें देवालयांत कांहीं अनुष्ठानें झालीं तर पद्ये, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांबरोबर मीही असतों. शिवाय गांवांतही ब्राह्मणांकडे कांहीं अनुष्ठानें असलीं तर तेथेंही त्यांच्याबरोबर आम्ही अनुष्ठानास असतों व त्या अनुष्ठानांतील कामें त्यांच्याबरोबर आमच्याही वांटणीला येत असतात.

आमच्या पंच द्रावि० भट्ट प्रभु ब्राह्मणसमाजांत भिक्षुकी करणारे अगदीं थोडे ब्राह्मण आहेत. अत्रि गोत्री देवारी दोन घरें, वत्स गोत्रांत दोन घरें व कौशिक गोत्रांतील दोन घरें मिळून सहा घरें आहेत.

येथें बोरी-शिरोडें व आसपासचे गांवांत नवग्रहशांति, वास्तुशांति, भुवनेश्वरी, उपनयन, चौल, कन्यादान वगैरे कार्यांत पद्ये, कऱ्हाडे व चित्पावन ब्राह्मणांबरोबर आमचेही ब्राह्मण होमहवन जपजाप्य वगैरे करितात. तसेंच येथील श्रीनवदुर्गामंदिरांत शके १८४२ सालीं रा० वामन पांडुरंग कामत, नंदगडकर यांनीं सपत्नीक नवचंडी केली होती.

स्या नवचंडीचे आचार्य वे॥ सखारामभट्ट उमर्ये, सदस्य वे॥ दत्तात्रेय तुकारामशास्त्री पणशीकर, गाणपत्य आण्णाशास्त्री करमरकर, हे असून तोटेकर, फडके, उपाध्ये ब्राह्मणही होते. सदर अनुष्ठानांत भट्ट-प्रभु ब्राह्मणांपैकीं विनायक नारायणभट, श्रीपाद कृष्णभट, विश्वंभर यशवंत देवारी व मी ( रामचंद्र वि. देवारी ) अशी चार मंडळी होती. यानंतर सुमारें एक महिन्यानें ( कोनसें गांवांत सोमनाथ देवाची प्रतिष्ठा झाली होती. त्यांत अनंतशास्त्री चांफाडकर, रामचंद्रभट तोटेकर, वगैरे पद्ये कऱ्हाडे ब्राह्मणांबरोबर वर उल्लेखिलेले व सीताराम नारायणभट ( हे भट्ट प्रभु ) ब्राह्मणही होते. कवळें येथील शांकरविद्यालयाचे तूर्त असलेले शास्त्री निगळ्ये हे रा० सीताराम नारायण भट्ट-प्रभु यांच्या येथें उपनयनसमारंभास मुद्दाम आले होते. त्या वेळीं त्यांनीं त्रिविक्रम महादेव या बटूस ब्रह्मचर्य-धर्माचा उपदेश केला होता. त्याच वेळीं सदर भट्टप्रभूंच्या हातचे फराळाचे जिन्नस व कॉफी वगैरे इतर ब्राह्मणांबरोबर सहपंक्तीनें घेतली होती. याच शास्त्र्यांच्या अध्यापकत्वाखालीं असलेले शांकरविद्यालयांत भट्ट-प्रभूंचे सहासात मुलगे अध्ययनास सुमारें दोन वर्षेंपर्यंत होते. सदर शास्त्री निगळ्ये हे, त्या विद्यार्थ्यांकडून घरांतील कामें ( पाणी वगैरे आणणेचीं ) करून घेत असत.

वरील माहिती श्रीचरणांस स्मरून सत्य तीच लिहिली आहे. कळावें, लोभ असावा हे विनंति.

(सही) रामचंद्र विठ्ठल देवारी.

---

अ० नं. ४०

श्रीशंकर.

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेयशास्त्री किंजवडेकर, कार्यवाह भट्ट-प्रभु ऐक्य-परिषद् नि॥ श्रीसंस्थान संकेश्वर. आज मुक्काम पेडणें, यांसी—

कृ. सा. न. वि. वि.—आपण ता. २० ऑगस्ट सन १९२६ चें आमच्याकडे पाठविलेलें पत्र पोंचलें. त्याप्रमाणें आम्ही खालील मंडळी सावंतवाडींतील श्रीगणपतीचे देवालयीं ता. ५ सप्टेंबर सन १९२६ रोजीं

जमून पुढीलप्रमाणें ठराव केला आहे. सर्व गोष्टींचा विचार होऊन जें जें ठरेल ते वेळीं आम्हांला कळेल अशी आशा आहे.

## ठराव.

या प्रांतीं भट्ट-प्रभू या वर्गाची वस्ती नसल्यामुळें त्यांची माहिती व रिवाज आम्हांला माहित नाहीं. तरी तेथील म्हणजे बोरी व शिरोडा या प्रांतांच्या आसपासच्या कऱ्हाडे, कोंकणस्थ, देशस्थ व पद्ये जातींतील ज्ञाते व पुढारी मंडळीकडून माहिती मिळवून श्री जी आज्ञा करितील ती आम्हांस मान्य आहे. कळावें, हे विनंति.

(सह्या)

गुंडो जगन्नाथशास्त्री देवस्थळी धर्माधिकारी.
विठ्ठल विष्णुभट अळवणी.
वासुदेव गोविंद फळणीकर.
नारायण भास्कर परांजपे.
नारायण दामोदरभट शेंबेकर.
शंकर नीलकंठशास्त्री देवस्थळी.
वासुदेव महेश्वरभट्ट कशाळीकर.
केशव जनार्दन घांटे.
वामन महेश्वर ढोरे.
जनार्दनशास्त्री कशाळीकर.
नारायण विश्वनाथ वझे.
रामकृष्ण हरि मराठे.
नारायण जनार्दन सिद्धये
हरि दामोदर जडचे.
नारायण जनार्दनभट्ट मराठे.

पुरुषोत्तम नारायण आठवले.
दत्तात्रय राजारामभट्ट कशाळीकर.
नारायण रघुनाथ माईणकर.
सदाशिव कृष्ण कोळंबेकर.
जनार्दन पद्माकर टेंगशे.
सीताराम व्यंकटेशभट्ट खांडेकर.
अनंत गणेशभट्ट ढोरे.
श्रीकृष्ण सीताराम मुंडले.
विनायक आत्माराम धोपेश्वरकर.
राजाराम नारायण मुंडले.
रामचंद्र शंकरभट्ट सप्ते.
हरि भास्करभट्ट जडचे.
विठ्ठल रामकृष्ण आपटे
श्रीपाद लक्ष्मण जांभेकर.
दत्तात्रेय अनंत कोळंबेकर,
राजोपाध्ये.

अ. न. ४१

कोरगांव. श्रावण वद्य ११ शके १८४८.

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेयशास्त्री किंजवडेकर, कार्यवाह, भट्ट-प्रभु-ऐक्य-परिषद्. कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि.—लिहिण्यास कारण कीं, भट्ट-प्रभू पद्ये यांच्यांत चालू असलेली दंतकथा मी सुमारें ४० वर्षांपूर्वी-पासून ऐकत आहें. भट्ट-प्रभु हे पद्यांतलेच आहेत अशी माझी खात्री आहे. त्याकरितां उभयतांमध्यें चाललेला लढा मिटून ऐक्य व्हावें असें मी इच्छितों. करितां श्रीस्वामींनीं भट्ट-प्रभूंस ताबडतोब आज्ञापत्र देण्याची कृपा करावी. कळावें, लोभ असावा हे विनंति.

(सही) दत्तात्रेय दामोदर जांभेकर.

---

अ. नं. ४२

श्रीर्जयति.

वैशाख शुद्ध ४ शुक्रवार शके १८४८, तारीख १६ माहे एप्रिल सन १९२६ इसवी. या दिवशीं पेडणें येथें श्रीदत्तमंदिरांत भरलेल्या पेडणें महालांतील समस्त ब्रह्मवृंदांच्या सभेकडून खालीलप्रमाणें ठराव करण्यांत येत आहे:—

( १ ) अंत्रुज प्रांतांत बोरी व शिरोडें येथें राहणारे भट्ट-प्रभु या नांवानें संबोधिले जाणारे ब्राह्मण हे गोमांतकीय पद्ये ब्राह्मणांच्या तुलनेनें पाहतां आणि पद्ये, कऱ्हाडे, कोंकणस्थ इत्यादि ब्राह्मणसमाजांतील थोर थोर प्रतिष्ठित विद्वान् पुढाऱ्यांचे अभिप्राय, लेख व समुच्चयात्मक संमतिपत्रें विचारांत घेतां आचारविचार, आहारविहार, गोत्र, कुल, कुलदैवत, कुलपुरुष, कुलधर्म इत्यादि संस्कृतिधर्माच्या समानत्वामुळें पद्ये ब्राह्मणांपैकींच आहेत अशी आमची निःसंशय खात्री होत आहे. त्याचप्रमाणें यांच्याशीं इतर ब्राह्मणांचा अन्नादिसंबंध बंद होण्याजोगा पातित्य दोष यांच्यावर असल्याचा दाखला श्रीसंकेश्वर मठांतही मिळत नसल्यावरून तसेंच इतर ब्राह्मणांचा यांच्याशीं यजनयाजनादि संसर्ग अव्याहत चालू असल्यावरून हे बहिष्कृतही नाहींत असेंच आम्हांस वाटतें. तेव्हां पद्ये ब्राह्मणांनीं भट्ट-प्रभू ब्राह्मणांस आपल्यांत मिळवून घेण्यास कोणतीच हरकत

नाहीं असें ह्या सभेचें मत असून त्याप्रमाणें श्रीजगद्गुरुचरणांनीं योग्य तो विचार करून तशी आज्ञा द्यावी अशी आमची अपेक्षा आहे.

(सह्या)

गजानन कृष्ण पणशीर उपाध्यक्ष. भालचंद्र सखारामभट ताटकर.
बाळकृष्ण रघुनाथ पणशीकर. कृष्ण महादेवभट देवुस्कर.
शंकर रामचंद्र किंजवडेकर. मुकुंद विनायकभट ताटकर.
रावजी सदाशिवभट बर्वे. शंकर दत्तात्रेयभट धुपकर.
बाळकृष्णभट आचारी. जनार्दन शिवभट पणशीकर.
रामकृष्ण बाळकृष्णभट पित्रे. दत्ताराम लक्ष्मणभट पराष्टेकर.
पांडुरंग बाळकृष्ण उमर्ये. दिवाकर विनायकभट पणशीकर.
रामकृष्ण पांडुरंग पित्रे. गंगाधर पुरुषोत्तम पणशीकर.
महादेव कमळाकरभट शेवडे. जनार्दन शिवभट पणशीकर.
दामोदर जनार्दनभट मिरवणकर. गणेश जनार्दन पराष्टेकर.
गणेश जनार्दन पराष्टेकर. विष्णु हरि पराष्टेकर.
यशवंत आत्माराम धुपकर. के. प. जोशी पुराणिक.
शंकर महेश्वर कुडके. गोविंद पांडुरंग निगळ्ये.
बाबू कृष्णभट आचारी. दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.
विष्णु सदाशिव निगळ्ये. लेखनाध्यक्ष ब्रह्मवृंदसभा, पेडणें.

---

अ० नं. ४३

चोरी. श्रीजयति. चैत्रशुद्ध १० शके १८४८.

कृ. न. वि. वि. भट्ट-प्रभु समाजाबद्दलचा माझा अभिप्राय मी वेदशास्त्रसंपन्न कृष्णबुवा कथने, मुक्काम वेलिंग यांच्या अभिप्रायावर संमति देऊन त्यांचा जो अभिप्राय तोच माझा हें नमूद केलें आहे. फक्त त्यांत कुलपुरुषासंबंधाची थोडी हकीगत लिहिण्याची राहिली ती खालीं देत आहें.

आमचे घरचा व भट्ट-प्रभु समाजापैकीं मिरीकर यांचा कुलपुरुष एकच असल्याचें आमचे चुलते वगैरे वडील माणसें सांगत होतीं व इतर लोकांकडूनही हा मजकूर खरा असल्याचें समजतें. यावरून आमचा-(पद्ये) समाज व भट्ट-प्रभूंचा समाज एकच यांत संशय दिसत नाहीं. या कुलपुरुषाचें स्थान शिरोड्यांपैकीं मैंगाळ वाड्यावर तलावाच्या कांठीं* आहे. कुलपुरुषासंबंधानें मला माहिती आहे ती इतकीच. कळावें, लोभ असावा हे विनंती.

(सही) शंकर वामनभट्ट बोरकर (उपाध्ये).

* हें फार प्राचीन देवालय आम्ही प्रत्यक्ष पाहिलें आहे.

—कार्यवाह.

---

अ० नं. ४४

खामगांव–वऱ्हाड. श्री. ता. १०।४। १९२६.

साष्टांग नमस्कार विनंति विशेष. प्रभुजातीचा समावेश पद्ये व कऱ्हाडे यांत होऊन (मूळचा होताच) एकाच वृक्षाच्या या तीन शाखांचें विसरलेलें नातें पुनः जोडेल व बेटी व्यवहारादिकांनीं सर्व एककुटुंबी होऊं असें ईश्वरानें करावें व या कामीं श्रींनीं व गोमांतकस्थ ब्रह्मवृंदांनीं साक्रिय सहानुभूति दाखवावी असें मी इच्छितों.

(सही) विद्याभूषण तांबे शास्त्री.

---

अ० नं. ४५

सांखळी–गोवा. श्री. चैत्र शुद्ध १३ शके १८४८.

अनेक नमस्कार विनंति विशेष. भट्ट-प्रभूंच्या ऐक्य-प्रकरणासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या जाहिरनाम्याला अनुसरून सांखळींतील मंडळींचें मत कळवितों ऐसाजे:—भट्ट-प्रभु हे अन्नोदकसंबंधाविषयीं ग्राह्य वा अग्राह्य याचा सप्रमाण घुरावा व त्यांच्याविषयीं कोणतीच माहिती वगैरे आम्हाला नाहीं. करितां आमच्या प्रांतस्थ सर्व ब्राह्मणसमाजाचें ऐक्य नष्ट न होतां सर्व वर्गाचे अन्नोदकव्यवहार सरळ चालू राहून जें संस्थान

देवतेच्या मतानें ठरेल त्याला खालीं सही करणारी मंडळी अनुकूल राहणार हें निराळें लिहिणें नको.

(सह्या)

नारायण श्रीनिवासभट्ट बाक्रे — लक्ष्मण कृष्णभट.
अष्टाधिकारी — नारायण केशवभट किंजवडेकर.
आपाभट किंजवडेकर. — गणपती श्रीपादभट बाक्रे.
परशुरामभट बाक्रे. — शंभु सखारामभट बाक्रे.
अनंत महादेवभट सायनेकर. — व्यंकटेश दत्तात्रेयभट मोने.
पांडुरंग बुवा पित्रे. — दत्तात्रय दिवाकरभट बाक्रे.
पांडुरंग विठ्ठल बाक्रे. — रामकृष्ण नारायणभट वाळवे.

---

अ० नं. ४६

## पुराव्याबद्दल श्रीशृंगेरी संस्थानी केलेलें विनंतिपत्र.

शृंगेरी. श्रीशंकरःशरणम् ता. १४।७।२६.

श्रीशृंगेरी जहागीर डेप्युटी अमलदारसाहेब यांचे सेवेशीं अर्जदार रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर, कार्यवाह—भट्ट-प्रभु ऐक्य परिषद्. नि॥ श्री॥ संस्थान संकेश्वर याचा अर्ज असा कीः—सध्यां गोमांतक प्रांतांतील बोरी व शिरोडें (अंतूर्ज), ता. फोंडा-गोवा येथें राहणाऱ्या पंचद्राविडांतर्गत भट्ट-प्रभु नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या ब्राह्मणसमाजाकडून आपणांस पंक्तिपावन करण्याबद्दलचा श्रीसंस्थान संकेश्वर येथें अर्ज आल्यावरून त्या प्रकरणाची स्वतंत्रतेनें जाहीर चवकशी करण्याकरितां श्रीस्थळ कपिलेश्वर, ता. फोंडा—गोवा येथें श्रीयुत न. चिं. केळकर यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरविली होती व त्या सभेंत जी माहिती पुढें आली त्यांत "श्रीशृंगेरीसंस्थानाधिष्ठित जगद्गुरु गोव्यांत अंतूर्ज देशीं कपिलेश्वर येथें आले असतां तेथील अपंक्त असलेल्या सर्व पद्ये ब्राह्मणांना पंक्तिपावन करून घेण्यांत आलें आणि त्याच वेळीं त्याच पद्यांपैकीं प्रभु देसाई उपनांवाचे कांहीं ब्राह्मण वेळेवर भोजनास न आलेमुळें मागें राहून अपंक्त राहिले, व त्यांसच पुढें अपंक्त

पण ब्राह्मणांतील हें दर्शविण्याकरितां भट्ट हा शब्द मागें लावून प्रभु-देसाई म्हणूं लागले. तेच आजचे भट्टप्रभु होत. तसेंच शृंगेरी जगद्गुरु गोव्यांत अंतूर्जमध्यें श्रीशालिवाहन शक १६०४ व १६०८ मध्यें गेल्याचें तेथील क्रमवंत जोश्यांस पंक्तिपावनत्वाविषयीं दिलेल्या आज्ञापत्रावरून सिद्ध होत आहे. त्या वेळीं-१६ शेंच्या सुमारास-अंतूर्जमध्यें सौंधेकर यांचें राज्य होतें. तेव्हां आपल्या मठीय प्राचीन दप्तरांत गोव्यांतील पद्ये ब्राह्मणांस पंक्ति-पावन केल्याबद्दलचा उल्लेख गोव्यांतील अंतूर्ज प्रांतांतील बोरी व शिरोडें या गांवीं राहणाऱ्या प्रभु-देसायांचा उल्लेख काय आहेत तें पाहून आम्हांस कळविण्याची प्रार्थना आहे. तसेंच सदरील भट्ट प्रभु किंवा पद्ये यांच्याकडून मागें आलेल्या पूजा द्रव्याचा उल्लेख असल्यास तो कशा पद्धतीचा आहे? याचीही आम्हांस जरूरी आहे. हे उल्लेख कानडी किंवा मराठी या दप्तरांतही असूं शकतील; तसेंच पद्ये ब्राह्मण वा भट्ट प्रभु यांकडून आपल्या मठांत कांहीं प्रकरणाबद्दल अर्ज वगैरे असल्यासही पाहून कळविण्याविषयीं विनंति आहे. कळावें, सेवेशीं श्रुत होय.

श्रीमज्जगद्गुरुचरणांकित
(सही) रामचंद्रशास्त्री किंजवडेकर,
कार्यवाह-भट्ट प्रभु ऐक्य प., नि॥ श्री संस्थान संकेश्वर.

---

अ० नं. ४७

केसरी कचेरी. पुणें. ता. १ माहे मे. १९२६.

# जाहिरनामा

श्रीजगद्गुरु श्रीशंकराचार्य यांच्या आज्ञेवरून कपिलेश्वर-फोंडा (गोवा) येथें भट्टप्रभु-पद्ये यांच्या ऐक्याच्या विचार करण्याकरितां ता. २३ व ता. २४ रोजीं जाहिरसभा भरविली होती. त्या सभेंत ठराव झाल्या-प्रमाणें या प्रकरणीं ज्या कोणास अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय कळविणें असतील त्यांनीं ते साधार लेखी सहीनिशीं आमचेकडे पुणें येथें ता. ३१ माहे मे १९२६ पर्यंत पाठविण्याची तजवीज करावी. सदर

सारखेपुढें येणाऱ्या अभिप्रायांचा विचार करितां येणार नाहीं पाकिटावर "भट्टप्रभु–पद्ये" हीं अक्षरें लिहावीं.

(सही) न. चिं. केळकर
अध्यक्ष, जाहिरसभा–कपिलेश्वर, फोंडा–गोवा.

टीप—वरील जाहिरनामा ता. ४ मे १९२६ च्या केसरींत छपून प्रसिद्ध केला होता. —कार्यवाह.

---

अ० नं. ४८

वोरी. श्रीर्जयति। ता. २५।५।२६.

श्रीयुत दे. भ. रा० रा० नरसिंह चिंतामण केळकर, अध्यक्ष–भट्ट-प्रभु-पद्ये-परिषद् यांसीः—

कृ. सा. न. वि. वि.—केसरीच्या ता. ४ मे (१९२६) च्या अंकांत जाहिरनामा दिलेला पाहिला. भट्ट-प्रभुसंबंधानें जाहीर दिसत असलेला एक दाखला खालील मजकुरांत सादर करीत आहें.

गांव वोरी व शिरोडें येथील रहिवासी–भट्ट-प्रभु हे पद्ये कऱ्हाडे ब्राह्मणाला जवळ आहेत असें मानण्याला आधार दिसतात ते हेः— सदर वर्णित गांवांत श्रीसंस्थानी अगर समाजांत समाराधना (संतर्पण) झाली तर संख्यापूर्त्यर्थ–पांक्तिभेदानें कां होईना–भट्ट-प्रभूंतील ब्राह्मण सुवासिनी घेऊन संख्या पूर्ण करून भोजन तांबूल-भक्षणादि करून सर्व विधान बरोबर करितात. हें काम सारस्वतांतील ब्राह्मणांशीं करण्याचा परिपाठ आम्हां कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांचा नाहीं दुसरेंः–प्रथम यांचा उपाध्येपणा आमच्याकडे (पद्ये ब्राह्मणांकडे) होता. पण पंक्तिलाभास्तव भट्ट-प्रभूंनीं खासगी पुरोहित केले. तथापि "हरकृत्यांत तुमचा हक्क (गणपतिपूजन, गोदान वगैरे ठराविक) बिनहरकत वेळेवर तुम्हांस देण्यांत येईल;" असें त्यांनीं स्वतः लिहून दिलेलें आहे. व तो क्रम बरीच वर्षें अव्याहत चालला. नंतर हल्लींच ३०।३५ वर्षांपासून तो क्रम बंद होत गेला. तेव्हां जर ते सशास्त्र दोषी–बहिष्कृत असते तर पौरोहित्यादि विषय सदर ब्राह्मणांकडून होणार नसते. या कृत्यांस वर्गाचा किंवा

श्रीमज्जगद्गुरूंचा कोणत्याही तऱ्हेनें प्रतिबंध झाला असता. तो दिसत नसल्यावरून शिवाय त्यांच्या घरीं यजन-याजनादि कृत्यांस माझें बरेंच येणें जाणें असल्यावरून एका भाषेशिवाय इतर आचार व्यवहारांत फेरफार दिसून येत नाहीं. या वरील परिस्थितीवरून त्यांच्याशीं अन्नादि-संबंधास मला तर कांहीं हरकत दिसत नाहीं. आतां ही गोष्ट बहुकालगत असल्यानें श्रेष्ठांच्या अनुज्ञेची अपेक्षा करणें युक्तच. व ती खचित मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे. कळावें, कृपा लोभवृद्धयर्थ पुनः विनंती.

आपला

(सही) शंकर वामन भट्ट बोरकर.

टीपः—वरील पत्रांत उल्लेखिलेला भट्ट प्रभूंनीं मूळ उपाध्यायीं केलेला करारलेख २०० वर्षांपूर्वीचा आम्हांस उपलब्ध झाला असून तो पुढें 'पुराव्याचे कागद' या सदरांत दाखल केला आहे. —कार्यवाह.

---

अ० नं. ४९

कवळे. श्रीशंकरः शरणम् ता. १८।९।२६.

## विरुद्ध पक्षाची कैफीयत

श्री० नरसिंह चिंतामण केळकर, अध्यक्ष—भट्ट-प्रभुऐक्य-परिषद्. यांसी—

अध्यक्ष गोमांतकस्थ कोंकणस्थ कऱ्हाडे पद्ये-ब्राह्मण-ज्ञाति-संरक्षक पक्ष; यांजकडून:—गेल्या महिन्याच्या २३।२४ तारखेस श्रीस्थळ कपिलेश्वर (फोंडे) येथें भट्ट-प्रभू-पद्येब्राह्मण-ऐक्य-परिषद् भराविण्यांत आली होती. परिषदेंत एकीबद्दलचा ठराव रीतसर मांडला असता तर या एकीविरुद्ध योग्य आधार दाखवून प्रचंड बहुमतानें इकडच्या पद्ये ब्राह्मणांनीं तो हाणून पाडला असता. पण अध्यक्षांनीं ही गोष्ट जाणून वेळाचे अभावीं मतें घेतलीं नाहींत, असें किंवा अशा प्रकारचें विधान करून ठरावावर मतें घेतलीं नसून, वास्तविक रीतीनें श्रींकडे श्रींच्या आज्ञेसाठीं पाठविण्याजोगें कांहींच केलें नाहीं. तथापि ज्या अर्थीं श्रींच्या आज्ञेनें ही परिषद् भरली गेली त्या अर्थीं प्रतिकूल पक्षानें तीस कोणत्याही

रीतीनें अडथळा आणला नाहीं. पण अध्यक्षांनीं व श्रींच्या कारभाऱ्यांनीं एकीची बाजू तेवढीच पुढें मांडण्यांत यावी अशाबद्दलची खबरदारी घेतली. तेव्हां त्याबद्दल प्रतिकूल मतवाद्यांस सखेदाश्चर्य वाटलें व आपले विचार पुराव्यासुद्धां श्रीचरणीं पोंचते करून एकी होण्यास काय काय हरकती आहेत तें दाखवून देणें आपलें कर्तव्य आहे असें जाणून आम्हीं ही कैफीयत श्रींकडे पाठविण्यासाठीं श्रींच्या आज्ञेवरून अध्यक्षांकडे पाठवीत आहों. खालीं लिहिलेल्या मुद्द्यांचा विचार होणें अत्यंत जरूर आहे.

१. परिषदेंतील अनुकूल भाषणें पुनः पुन्हा वांचून पाहिलीं तरी कोणत्याही भाषणांत 'भट्ट-प्रभु' हे ब्राह्मण असल्याबद्दल खात्रीचा उल्लेख केलेला बिलकूल आढळत नाहीं, मग त्याबद्दल आधाराचें नांव तरी कशाला? प्रत्यक्ष अध्यक्षांच्या भाषणांतही तसेंच आढळून येईल. अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे भट्ट-प्रभु हे ब्राह्मण आहेत हें सिद्ध करण्याची होय. ते पूर्वींचे कोण याबद्दल फक्त दंतकथेचा आधार घेऊन त्यावर इमारत रचून वाटेल त्यांना पद्ये-ब्राह्मणांमध्यें एकीच्या नांवाखालीं दडपून देणें इष्ट होणार नाहीं. जो तो हे ( भट्ट-प्रभु ) ब्राह्मण (पद्ये-ब्राह्मण) असल्याचें गृहीत धरून चालल्यास अशा महत्त्वाच्या वेळीं अनुकूल मतवाद्यांनीं दोन गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत. पहिली अशी कीं:—भट्ट-प्रभु हे ब्राह्मण होत, मग ते कोणत्याही पोट जातींतील कां असेनात. दुसरें:—ते पद्ये-ब्राह्मण आहेत म्हणून इतर पद्ये ब्राह्मणांनीं त्यांना आपल्यांत घेणें इष्ट आहे. ह्या दोन्ही गोष्टींपैकीं अनुकूलमतवाद्यांनीं एकही सिद्ध केली नाहीं. मग ते फक्त ब्राह्मण आहेत असें गृहीत धरून कसें चालेल? ते ब्राह्मण असल्याबद्दल असें सांगण्यांत आलें आहे कीं, " भट्ट-प्रभु व पद्ये यांच्या ऐक्याचा विचार करतांना आनुवंशिक संस्कार व अंतस्फूर्ति हीं लक्षांत घेतलीं पाहिजेत. भट्ट-प्रभूंत ( पद्यांची तशी विलोभनीय स्थिति नसतां ) त्यांच्याशीं एकात्मक करण्याची जी अंतस्फूर्ति होत आहे ती भट्ट प्रभूंवर जर (पद्ये) ब्राह्मणांचे आनुवंशिक संस्कार झाले नसते तर झाली नसती." या म्हणण्यांत बिलकूल अर्थ नाहीं हें स्पष्ट दिसून येईल. शिवाय अशा तऱ्हेचे आधार दाखवून जर एकी करावयाची असेल तर

हा प्रयत्न किती निष्फळ आहे हें व दुसऱ्या चांगल्या आधाराचें अवलंबन करण्यास मार्ग नसल्याचें विदीत होत आहे. कारण खुनी माणसास खून करण्याची प्रवृत्ति झाली तर त्याला खुनी माणसाचा आनुवंशिक संस्कार कशास पाहिजे? सबब आमचें म्हणणें एवढेंच कीं, एकी व्हावी म्हणाऱ्यांनीं ह्या अतिशय जबाबदारीच्या प्रश्नाचा उलगडा केला नसून इतर किरकोळ प्रश्नांचा ऊहापोह माजविला आहे. भट्ट प्रभु जर ब्राह्मण होत तर तें कां स्पष्टपणें दाखविण्यांत येत नाहीं? ते ब्राह्मण नाहींत हें साहजिकरीत्या दाखविलें जाईल. नंबर दोन मधील चर्चेनें हा प्रश्न समजेल.

२. आतां दंतकथेकडे वळूं, ऐक्य-परिषदेंतील अनुकूलवाद्यांस दंतकथेपेक्षां जास्त वजनाचा पुरावा आढळूं नये व तेवढ्याशा दंतकथेनें भाळून जाऊन एकी होण्याबद्दल एवढी खटपट करावी एवढ्यावरून त्यांची बाजू किती लंगडी आहे हें निदर्शनास येईल. अगोदर ही "दंतकथा" सबब त्याच्या सत्यतेबद्दल चौकशी करीत बसण्याचें कारण नाहीं. बरें, ती अध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणें असली तरी त्यावरून काय सिद्ध होतें? श्रींचा प्रसाद ग्रहण करण्यास कित्येक पद्ये-ब्राह्मण उशिरां आले, सबब ते मागच्या पंक्तीस बसले, यालाच बहिष्कार रूप आलें. असें जर असतें तर श्रींची स्वारी जवळ असतां त्यांनीं ताबडतोब या गोष्टीचें निरसन करून घेतलें असतें व खरा प्रकार दिसून आला असता. पण असें कांहींच केलेलें दिसून येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर (जर अध्यक्षांनीं दिलेलें कालमान खरें धरून चाललें तर) १००।१५० वर्षेंपर्यंत (ज्या वेळीं खरें कारण लोकांस माहीत होतें तोंपर्यंत) कोणीच 'आम्हांस जातींत घ्या' म्हणून प्रयत्न करूं नये व दंतकथेवर येऊन थडकल्यावर ह्या दंतकथेच्या जोरावर ऐक्याच्या फुकाच्या गोष्टी करणें योग्य होईल काय? जी दंतकथा पुढें करण्यांत आली आहे तिच्याबद्दल काय पुरावा? सर्वच गोष्टी गृहीत धरून चालणें अशा प्रसंगीं कधीं तरी इष्ट होईल काय? जे मागच्या पंक्तीस राहिले ते पद्येच कशावरून व त्याच पद्यांचे वंशज हे हल्लींचे भट्ट-प्रभु हें तरी कोणी सिद्ध केलें आहे? जर ते पद्ये असते तर त्यांना आपल्यांत घेणें ही गोष्ट पद्यांनीं आनंदानें कबूल केली असती पण तसा प्रकारच नाहीं.

दुसरें जर ते व पद्ये एकच होते व अध्यक्ष सांगतात तें कालमान खरें घरलें तर त्यांच्यांत व पद्यांत सुहृत्संबंध व आशौचादि ( जननाशौच व मृताशौच वगैरे ) ह्या कालांत नष्ट होऊ नये; व तें तूर्त प्रचारांतही दिसत नाहीं. आणि तोंडी माहितीसुद्धां याबद्दल कांहींच मिळत नाहीं. यावरून ते व पद्ये एक म्हणणें मुळींच योग्य होणार नाहीं.

आतां आपण खऱ्या प्रकाराकडे वळूं:—ज्या वेळीं ही दंतकथा घडली असा समज आहे त्यावेळीं गोव्यांतील पांच गांवांत पांच पद्येघराणीं गांवांतील अधिकारावर होतीं हे पद्ये ब्राह्मण कोण याबद्दल कोणाला फारशी माहिती नसल्यामुळें त्यांना इतर ब्राह्मणांनीं आपल्यामध्यें समावेश करूं दिला नव्हता. काहीं काळानें या पांच कुटुंबांपैकीं एका घराण्याचें घर्मसंतान ( कुलक्षय ) झाल्यानें कांहीं तिघां इसमांनीं त्या घराण्याचे अधिकार बळकावण्यासाठीं सरकारांत कांहीं दाखले, पत्रें दाखल करून त्यांचे अधिकार आपले ताब्यांत घेतले. त्यांना ह्या लुच्चेगिरींत दोघे गौड सारस्वतही सामील झाले. मिळून या पांच घराण्यांच्या नांवावर या पद्ये-घराण्याचे अधिकार चालू झाल्याबद्दल लेखी पुरावा मिळेल. पुढें श्रींची स्वारी गोमांतकांत आल्यावर पद्ये ब्राह्मणांनीं श्रींकडे आपणांस ब्राह्मणांत घेण्याविषयीं विनंति केली. त्या वेळीं ह्या तीन इसमांनींही पद्ये असल्या-बद्दल कळविलें. पण श्रींनीं बाकी चारही कुटुंबांतील लोकांस इतर ब्राह्मणांत घेऊन या तीन इसमांस ते पद्ये नसल्याचें कळविलें. हाच तो पंक्तिप्रपंच. श्रींनीं दिलेला निर्णय वाजवी होता. ह्या लोकांनीं जरी अधिकार बळकाविले होते तरी नामशेष झालेल्या पद्ये घराण्याचे दायाद असल्या-बद्दल त्यांजकडे पुरावा नसल्यामुळें श्रींनीं त्यांना ब्राह्मणांत घेतलें नाहीं.

२. भट्ट-प्रभु हे पद्ये होते असें गृहीत धरलें तर " भट्ट-प्रभु " हें नांव त्यांना कधीं व कसें प्राप्त झालें ? याबद्दल एकीकारांनीं काय पुरावा आणला आहे ? भट्टप्रभु ही जात वेगळीच नव्हे का ? या नांवावरूनच असें सिद्ध होतें कीं, यांच्या आणि पद्यांच्या कधींही संबंध नसावा. फक्त पंक्तीला बसावयास मिळालें नाहीं एवढ्याच सबबीवरून त्यांनीं रागानें पद्ये हें नांव सोडून देऊन भट्ट प्रभु हें नांव नाहींना धारण केलें ? काय असेल तें असो. भट्ट-प्रभु हेच ते बहिष्कृत पद्ये एवढें जोंपर्यंत कोणीही

शाबीत करीत नाहीं तोंपर्यंत वास्तविक रीतीनें इतर गोष्टींची चर्चा करणें अनावश्यक आहे. प्रभु या शब्दाचा अर्थ काय? प्रभु ही जात ब्राह्मणांत नाहीं मग हें नांव यावें कोठून? या गोष्टीचा विचार करावयास गेलें असतां 'जातिविवेक' या ग्रथांत जे उल्लेख सांपडतात त्यावरून उलट तिसराच प्रकार निष्पन्न होईल. श्रींची मर्जी असल्यास प्रभु हे कोण व हा शब्द प्रचारांत कसा आला हें स्पष्टपणें कळवितां येईल व भट्ट-प्रभूंचें खरें स्वरूप लक्षांत येईल.

४. आतां आपण त्यांच्या आचारविचारांकडे वळूं. या मुद्द्याकडे नीट लक्ष दिलें असतां आमचें वरील म्हणणें किती सयुक्तिक आहे तें दिसून येईल. भट्टप्रभूंचे आचार व पद्ये यांचे आचार यात किती तरी फरक आहे. पद्ये ब्राह्मण सर्व जातींचें उपाध्ये आहेत; पण भट्ट-प्रभूंना त्यांच्याच जातीचें उपाध्येपण करितां येतें, इतर कोणत्याही जातीचें उपाध्येपण करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांना इतर जातींतील लोक दक्षिणाही (?) देत नाहींत. दक्षिणा घेण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना असतो. मग यांना हा अधिकार नाहीं यावरून हे ब्राह्मण नसले पाहिजेत. जर भट्ट-प्रभु हे पद्यांपैकींच आहेत तर हा आचारभेद कां? बरें, आचार-ही एकच असला तरी त्यावरून काय निष्पन्न होतें? आचारावरून जर जाति ठरवावयाच्या असतील तर दुसऱ्या कित्येक जाति आचारावरून ब्राह्मणांत येऊं शकतील, हें कांहीं नव्यानें आज आम्हीं प्रतिपादन केलें पाहिजे असें नाहीं.

५. आतां या भट्ट-प्रभूंची भाषा देखील वेगळी. एका गांवींच राहणाऱ्या पद्यांची भाषा एक व भट्ट-प्रभूंची निराळी याचा अर्थ काय? एकाच जातीची भाषा निरनिराळ्या देशांत राहून निरनिराळी होऊं शकेल. पण एकाच खेडेगांवांतील या दोघांची भाषा निरनिराळी कां? भाषा निराळी असूं शकेल व असेलही हें म्हणणें फार सोपें आहे. पण तें कां हें सांगणें फार कठीण आहे. नांव, आचार व भाषा या गोष्टी पद्यांच्या नांव, भाषा व आचार ह्यांहून इतक्या भिन्न आहेत कीं, त्यांवरून दोन जातींची एकी करणें म्हणजे एक 'अव्यापारेषु व्यापार' करणें होय असें आढळून येईल.

६. आतां वर कलम १–५ यांत पद्ये व भट्ट-प्रभु यांच्यांतील भिन्नता दाखविली आहे. पण या दोन्ही जातींत समता असल्याबद्दल एकीवाले प्रतिपादन करितात. ही समता इतर जातींमध्येंही असूं शकेल. पण त्यावरून त्या जाति ब्राह्मण जातिच आहेत असें कोण म्हणूं शकेल? एकीवाले असें म्हणतात कीं, भट्ट-प्रभूंचीं व पद्यांचीं गोत्रें एकच आहेत. गोष्ट खरी. पण तींच गोत्रें गौडसारस्वतांतही आहेत. मग त्यांना पद्ये ब्राह्मणांनीं आपल्यांत कां घेऊ नये? पद्यांची व भट्ट-प्रभूंची कुल-देवता एकच आहे म्हणतात पण तीच कुलदेवता सारस्वत व इतर जातींची असूं शकते. तसेंच भट्ट-प्रभु हव्यकव्य करितात व पद्येही करितात; पण वेदोक्त कर्में करण्याचा ज्या जातींना अधिकार आहे त्या जातींमध्येंही या गोष्टी होऊं शकतात. तसेंच सोंवळ्या ओंवळ्याचे बाबतींत ब्राह्मण आणि त्यांच्यासारख्या राहणाऱ्या शूद्रांतही साम्य बरेंच असेल. त्यांचे अवयव (?) सारखे, त्यांची वागणूक सारखी, भाषाही सारखी, सर्व गोष्टी सारख्या असूं शकतील. तरी पण ब्राह्मणांतील ब्राह्मणत्व शूद्रांत असूं शकणार नाहीं. व ब्राह्मणांचे अधिकार त्यांस मिळणार नाहींत. सबब ब्राह्मण त्यांस आपल्यांत घेणार नाहींत. एतदर्थ जरी भट्ट-प्रभु व पद्ये यांमध्यें या किरकोळ बाबतींत साम्य दाखविण्याची खटपट करण्यांत आली आहे तरी ती भट्ट प्रभु हे पद्ये आहेत असें बिलकूल सिद्ध करूं शकत नाहीं.

७. वरील गोष्टींचा विचार केला असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं, अनुकूल मतवाल्यांनीं भट्ट-प्रभु हे पद्येब्राह्मण असल्याबद्दल बिलकूल पुरावा आणिला नाहीं. त्यांचे आचारविचार, भाषा व जातीचें नांव हीं एवढीं भिन्न कां? याबद्दलही साधार विवेचन केलें नाहीं. तर कित्येक क्षुल्लक बाबतींत साम्य दाखवून एक विशिष्ट जात दुसऱ्या जातीवर विनाकारण लादण्याचा हा प्रयत्न केला आहे. जर हा प्रयत्न करण्यांत त्यांना सत्याचें पाठबळ असेल तर श्रींनीं या बाबतींत योग्य कमिशन नेमावें व या कमिशननें सर्व गोव्यांत फिरून लोकांचे जबाब घ्यावे व त्यावरून श्रींनीं आपला निर्णय द्यावा असें आमचें म्हणणें आहे. तसें न केल्यास अन्याय होईल. "ठराव सभेपुढें मांडला त्या वेळीं मतें घेतलीं असतीं तर ठराव प्रचंड बहुमतानें नापास

शाबीत करीत नाहीं तोंपर्यंत वास्तविक रीतीनें इतर गोष्टींची चर्चा करणें अनावश्यक आहे. प्रभु या शब्दाचा अर्थ काय ? प्रभु ही जात ब्राह्मणांत नाहीं मग हें नांव यावें कोठून ? या गोष्टीचा विचार करावयास गेलें असतां 'जातिविवेक' या ग्रथांत जे उल्लेख सांपडतात त्यावरून उलट तिसराच प्रकार निष्पन्न होईल. श्रींची मर्जी असल्यास प्रभु हे कोण व हा शब्द प्रचारांत कसा आला हें स्पष्टपणें कळवितां येईल व भट्ट-प्रभूंचें खरें स्वरूप लक्षांत येईल.

४. आतां आपण त्यांच्या आचारविचारांकडे वळूं. या मुद्द्याकडे नीट लक्ष दिलें असतां आमचें वरील म्हणणें किती सयुक्तिक आहे तें दिसून येईल. भट्टप्रभूंचे आचार व पद्ये यांचे आचार यात किती तरी फरक आहे. पद्ये ब्राह्मण सर्व जातींचं उपाध्ये आहेत; पण भट्ट-प्रभूंना त्यांच्याच जातीचें उपाध्येपण करितां येतें, इतर कोणत्याही जातीचें उपाध्येपण करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांना इतर जातींतील लोक दक्षिणाही (?) देत नाहींत. दक्षिणा घेण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना असतो. मग यांना हा अधिकार नाहीं यावरून हे ब्राह्मण नसले पाहिजेत. जर भट्ट-प्रभु हे पद्यांपैकींच आहेत तर हा आचारभेद कां ? बरें, आचार-ही एकच असला तरी त्यावरून काय निष्पन्न होतें ? आचारावरून जर जाति ठरवावयाच्या असतील तर दुसऱ्या कित्येक जाति आचारावरून ब्राह्मणांत येऊं शकतील, हें कांहीं नव्यानें आज आम्हीं प्रतिपादन केलें पाहिजे असें नाहीं.

५. आतां या भट्ट-प्रभूंची भाषा देखील वेगळी. एका गांवींच राहणाऱ्या पद्यांची भाषा एक व भट्ट-प्रभूंची निराळी याचा अर्थ काय ? एकाच जातीची भाषा निरनिराळ्या देशांत राहून निरनिराळी होऊं शकेल. पण एकाच खेडेगांवांतील या दोघांची भाषा निरनिराळी कां ? भाषा निराळी असूं शकेल व असेलही हें म्हणणें फार सोपें आहे. पण तें कां हें सांगणें फार कठीण आहे. नांव, आचार व भाषा या गोष्टी पद्यांच्या नांव, भाषा व आचार ह्यांहून इतक्या भिन्न आहेत कीं, त्यांवरून दोन जातींची एकी करणें म्हणजे एक 'अव्यापारेषु व्यापार' करणें होय असें आढळून येईल.

६. आतां वर कलम १–५ यांत पद्ये व भट्ट-प्रभु यांच्यांतील भिन्नता दाखविली आहे. पण या दोन्ही जातींत समता असल्याबद्दल एकीवाले प्रतिपादन करितात. ही समता इतर जातींमध्येंही असूं शकेल. पण त्यावरून त्या जाति ब्राह्मण जातिच आहेत असें कोण म्हणूं शकेल? एकीवाले असें म्हणतात कीं, भट्ट-प्रभूंचीं व पद्यांचीं गोत्रें एकच आहेत. गोष्ट खरी. पण तींच गोत्रें गौडसारस्वतांतही आहेत. मग त्यांना पद्ये ब्राह्मणांनीं आपल्यांत कां घेऊ नये? पद्यांची व भट्ट-प्रभूंची कुल-देवता एकच आहे म्हणतात पण तीच कुलदेवता सारस्वत व इतर जातींची असूं शकते. तसेंच भट्ट-प्रभु हव्यकव्य करितात व पद्येही करितात; पण वेदोक्त कर्में करण्याचा ज्या जातींना अधिकार आहे त्या जातींमध्येंही या गोष्टी होऊं शकतात. तसेंच सोंवळ्या ओंवळ्याचे बाबतींत ब्राह्मण आणि त्यांच्यासारख्या राहणाऱ्या शूद्रांतही साम्य बरेंच असेल. त्यांचे अवयव (?) सारखे, त्यांची बागणूक सारखी, भाषाही सारखी, सर्व गोष्टी सारख्या असूं शकतील. तरी पण ब्राह्मणांतील ब्राह्मणत्व शूद्रांत असूं शकणार नाहीं. व ब्राह्मणांचे अधिकार त्यांस मिळणार नाहींत. सबब ब्राह्मण त्यांस आपल्यात घेणार नाहींत. एतदर्थ जरी भट्ट-प्रभु व पद्ये यांमध्यें या किरकोळ बाबतींत साम्य दाखविण्याची खटपट करण्यांत आली आहे तरी ती भट्ट-प्रभु हे पद्ये आहेत असें बिलकूल सिद्ध करूं शकत नाहीं.

७. वरील गोष्टींचा विचार केला असतां असें स्पष्ट दिसून येईल कीं, अनुकूल मतवाल्यांनीं भट्ट-प्रभु हे पद्येब्राह्मण असल्याबद्दल बिलकूल पुरावा आणिला नाहीं. त्यांचे आचारविचार, भाषा व जातीचें नांव हीं एवढीं भिन्न कां? याबद्दलही साधार विवेचन केलें नाहीं. तर कित्येक क्षुल्लक बाबतींत साम्य दाखवून एक विशिष्ट जात दुसऱ्या जातीवर विनाकारण लादण्याचा हा प्रयत्न केला आहे. जर हा प्रयत्न करण्यांत त्यांना सत्याचें पाठबळ असेल तर श्रींनीं या बाबतींत योग्य कमिशन नेमावें व या कमिशननें सर्व गोव्यांत फिरून लोकांचे जबाब घ्यावे व त्यावरून श्रींनीं आपला निर्णय द्यावा असें आमचें म्हणणें आहे. तसें न केल्यास अन्याय होईल. "ठराव सभेपुढें मांडला त्या वेळीं मतें घेतलीं असतीं तर ठराव प्रचंड बहुमतानें नापास

झाला असता " हें सांगणें नको. वास्तविक पाहिलें असतां एकी करण्यास तयार असलेल्या लोकांनीं आपले आधार पुढें मांडून भट्ट प्रभु हे पद्मे ब्राह्मण असल्याचें पूर्णपणें शाबीत केल्याशिवाय श्रींनीं त्यांस कोणतेही बाबतींत उत्तेजन देऊं नये, अशी आमची श्रीचरणीं विनंति आहे.

जर त्यांनीं या बाबतींत श्रींची पुराव्यानिशीं खात्री केली तर कमिशन नेमून लोकांच्या साक्षी घ्याव्या. वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन श्रींनीं या एकीप्रकरणाचे बाबतींत भट्ट-प्रभूंना योग्य तें उत्तर देऊन त्यांनीं चालविलेल्या प्रयत्नास श्रींकडून मदत होणें शक्य नाहीं असें कळवावें. कळावें, हे विनंति.

(सह्या) महादेव पांडुरंग निगळ्ये, अध्यक्ष.
नारायण बळवंत बेहेरे, उपाध्यक्ष.
सदाशिव वासुदेव पेंडसे, चिटणीस.

अ० नं. ५०

# विरुद्ध पक्षाच्या कैफीयतीस उत्तर.

वर्णाऽऽश्रमाः सदाचारा अस्माभिर्ये प्रसाधिताः
रक्षणीयास्त एवैते स्वे स्वे भागे यथाविधि ॥ १ ॥
यतो विनष्टिर्महती धर्मस्याऽस्य प्रजायते ॥
मांद्यं संत्याज्यमेवात्र दाक्ष्यमेव समाचरेत् ॥ २ ॥

——श्रीमदाद्यशंकराचार्यः —मठाम्नाय.

प्रदीप्त वणव्यामध्यें हरिणयूथ कीं सांपडे ।
तसा प्रभुसमाज हा त्रिविध दुःखतापीं पडे ॥
जंगद्गुरु-घनाकडे म्हणुनि तो त्वरें धांवला ।
अनन्यगति होउनी शरण पावलां पावला ॥ १ ॥

नशबि फिरल्यामुळें जननि कोपुनी हाकली ।
पिताहि म्हणतो घरीं क्षणभरी नको हा कली ॥
अशी विषम कातरी पकडिला धरी या जना ।
जगद्गुरु-पदांपुढें म्हणुनि मांडिली यातना ॥ २ ॥

जरी हृदय पाझरी अजि कृपामृताची झरी ।
तदीय लहरी तरी भिजवुंदे अम्हां साजिरी ॥
धरूं तग वरूं बरा प्रगतिचा तजेला नवा ।
जगद्गुरुयशोध्वजा फडकवूं नको वानवा ॥ ३ ॥

करा अनुग्रहच्छाया हाणावा निग्रहाशनी ॥
याहूनि तिसरी कांहीं प्रभूंची नच मागणी ॥ ४ ॥

**श्री० रा० रा० नरसिंह चिंतामण केळकर, अध्यक्ष–भट्ट-प्रभु ऐक्यपरिषद् नि. श्री० १०८ जगद्गुरु शंकराचार्य, संस्थान संकेश्वर यांसी—**

खालीं सही करणारे भट्टप्रभुसमाजाचे प्रतिनिधि यांचे कृतानेक साष्टांग नमस्कार, विज्ञापना विशेषः—

चालू प्रभुप्रकरणीं प्रतिकूल पक्षाकडून सादर करण्यांत आलेल्या कैफीयतीस आम्हीं आमच्या पक्षाच्या बचाबाकरितां उत्तर देत आहों. तें आपल्याद्वारें श्रीचरणांला श्रुत होऊन ते प्रभुसमाजावर अनुग्रह करण्यास प्रवृत्त होतील अशी आशा आहे.

त्यापूर्वी परिषदेचे सन्मान्य अध्यक्ष व श्रीसंस्थानचे वट्टमुखत्यार आणि कारभारी यांजला पक्षपात केल्याचा आरोप, कैफियतीच्या उपोद्घातांत करून त्यांच्याविषयीं श्रींचें मत बिघडविण्याचा प्रतिकूलपक्षानें जो अश्लाघ्य प्रयत्न केला आहे त्याचा खुलासा करणें अवश्य आहे.

" अध्यक्षांनीं व श्रींच्या कारभाऱ्यांनीं एकीची बाजू पुढें मांडण्यांत यावी अशाबद्दलची खबरदारी घेतली " असें विधान प्रतिकूलपक्षानें केलें आहे, त्याचा खोटेपणा यासोबत जोडलेल्या वृत्तपत्राच्या अंकांतील समक्ष घेतलेल्या हकीकतीवरून श्रींच्या लक्षांत येणार आहे. या बाबतींत एकच गोष्ट नमुन्यासाठीं श्रीचरणीं सादर करीत आहों ती ही कीं, परिषदेच्या शेवटच्या दिवशीं प्रतिकूलपक्षानें आपली बाजू पुढें मांडण्याकरितां श्रीसंस्थानतर्फेच्या अळतेकरशास्त्र्यांना आपलें वकीलपत्र दिलें होतें. त्यांस श्रींच्या कारभाऱ्यांनीं " संस्थानच्या तर्फेच्या माणसानें कोणत्याही पक्षाचें वकीलपत्र घेण्यांत संस्थानावर पक्षपात केल्याचा अपवाद येणार आहे " ह्या मुद्द्यावर हरकत घेतली. तेव्हां अध्यक्षांनीं–" मी बोलणार तें प्रतिकूलपक्षाचें मत म्हणून बोलणार आहें,–तें माझें स्वतःचें किंवा संस्थानचेंही मत नाहीं." असा खुलासा अळतेकरांकडून करून घेऊन " असें असेल तर विरुद्धपक्षातर्फें तुम्हांला काय बोलावयाचें तें बोला " अशी त्यांस परवानगी दिली. परंतु " अनुकूलवादी बोलल्यावर मी काय तें बोलणार आहें." असा रा० अळतेकरांनीं हट्ट धरला.

तेव्हां " कोणीं केव्हां बोलावें हें ठरविण्याचा अधिकार तुमचा नाहीं. अनुकूलवाद्यांनीं परिषदेंत मांडलेलें आपलें म्हणणें तुम्हीं ऐकलें असून विषयनियामक कमिटींत झालेला खल व निघालेला निष्कर्ष प्रतिकूल-पक्षाकडून तुम्हांला समजला असला पाहिजे. शिवाय त्यानें तुम्हांला इतर सर्व माहितीही पुरविली असलीच पाहिजे. तेव्हां ठरल्याप्रमाणें विरुद्ध बाजूनें तुम्हांस जें कांहीं सांगावयाचें असेल तें आतांच सांगण्याबद्दल अध्यक्ष या नात्यानें मी तुम्हांस कळवीत आहें. नाहींतर तुम्हांला मागून बोलण्याच्या हक्काला मुकावें लागेल." असें अध्यक्षांनीं बजाविल्यावर " माझें डोकें या वेळीं शांत नाहीं. मी आपली लेखी कैफीयत उद्यां देईन." असें रा० अळतेकरांनीं सांगून आपला बोलण्याचा हक्क गमविला. ही भर सभेंतली गोष्ट आहे. शिवाय परिषदेच्या दोन दिवसांत–परिषदेंत व विषयनियामक कमिटींत आपली बाजू पुढें मांडण्याला प्रतिकूल-पक्षाला भरपूर सवड दिली होती. इतकेंच नव्हे तर अनुकूल वा प्रतिकूल कोणाला काहीं कळवावयाचें असल्यास तें कळविण्यास उभय पक्षांस एक महिन्याची मुदत अध्यक्षांनीं दिली होती. इतकी समतोलपणाची दृष्टि ठेवून, अध्यक्षांनीं परिषदेचें काम निःपक्षपातानें केलें असतां " अध्यक्ष व कारभारी यांनीं प्रतिकूलपक्षाला आपली बाजू पुढें माडूं दिली नाहीं " असें प्रतिकूलपक्षानें आतां मागाहून म्हणावें यावरूनच त्या पक्षाला सत्याचें पाठबळ आणि खऱ्याखोट्याची पर्वा कितपत आहे, हें उघड होतें.

अध्यक्षांनीं ठराव मांडून तो एकमतानें पास करण्याबद्दल परिषदेला विनंति करतांना " कोणास कांहीं विरुद्ध सांगावयाचें असेल तर तसेंही सांगावें, असें कळविलें होतें; परंतु ७।८ मिनिटेंपर्यंत कोणीं एक अवाक्षर उच्चारिलेलें नाहीं. वास्तविक त्या वेळीं " ठराव मतास घाला;" असें कोणीं सांगितलें असतें किंवा " मला एक अशीअशी सूचना " किंवा " भट्ट-प्रभु ब्राह्मण नाहींत " अशा अर्थाचा ठराव मांडावयाचा आहे असें रीतसर कळविलें असतें तर त्याला अध्यक्षांनीं हरकत घेतली नसती. परंतु तसें कांहीं करण्याची प्रतिकूलपक्षांतून एकालाही छाती झाली नाहीं. आणि आतां मागून " ठराव मतास घातला असता तर प्रतिकूल-

पक्षानें तो प्रचंड बहुमतानें हाणून पाडला असता." अशी शुष्क बढाई मारून प्रतिकूलपक्षानें—" पळाला म्हणून सुटला ! नाहींतर अशी अशी रग जिरविली असती कीं काय सांगूं !" असें म्हणून शत्रु, विजय मिळवून गेल्यावर त्याच्या पाठीमागें थापा मारणाऱ्या शब्दशूर वीराचें यथार्थ अनुकरण करावें हें त्याचें त्यालाच शोभतें. वास्तविक परिषदेनें एकमतानें पास केलेला ठराव " परिषदेपुढें आलेल्या मुद्दयांचा विचार करून श्री आज्ञा करतील ती मान्य केली जाईल " अशा अर्थाचा होता. अर्थात् त्याबद्दल मतभेद होणें शक्यच नव्हतें. तेव्हां हा ठराव मताला घातला असता तर तो हाणून पाडून " श्रींची आज्ञाच मानीत नाहीं " असें प्रतिकूलपक्षाला जाहीर करावयाचें होतें कीं काय तें कळत नाहीं. आतां " भट्ट-प्रभु, यांना पद्ये-समाजांत मिळवून घेण्यास हरकत नाहीं " असा किंवा अशा आशयाचा ठराव परिषदेंत मांडून त्यावर अध्यक्षांनीं मतें घेतलीं असतीं तर तो बहुमताच्या जोरावर आम्हीं फेंटाळला असता असें प्रतिकूलपक्षाचें म्हणणें असेल तर त्या बाबतींत अध्यक्षांनीं जें मध्यवर्ति धोरण स्वीकारलें तेंच योग्य होतें हें कोणीही निःपक्षपाती मनुष्य कबूल करील; कारण, ह्या ऐक्यप्रकरणीं परिषदेच्याद्वारा व्यक्त झालेलें लोकमत व पुढें आलेला पुरावा श्रीचरणीं सादर करणें एवढेंच माझें काम असून त्याचा अखेर निर्णय श्रीचरणांनीं करावयाचा आहे, हें अध्यक्षांनीं आरंभींच सांगितलेलें परिषदेचें उद्दिष्ट परिषदेस हजर असलेल्या प्रत्येक मनुष्याच्या कानांत अद्यापि घुमत आहे. तेव्हां अध्यक्षांनीं मांडलेला ठराव योग्य नव्हता असें प्रतिकूलपक्षाशिवाय दुसरा कोणीही म्हणणार नाहीं. शिवाय " आमच्यांत कोणी विद्वान् व शास्त्री नाहीं; अनुकूलपक्षांत मोठमोठे शास्त्री आहेत; आमच्यांत बहुमत आहे, पण तें अज्ञ लोकांचें आहे." असें प्रतिकूल पक्षानें न विचारतांच परिषदेंत सांगून आपल्या पक्षाची लायकी आधींच सांगून टाकली होती. याप्रमाणें कबूल करून सवरून आपलें बहुमत करण्याकरितां परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे ठराव पास व्हावयाचा होता त्या दिवशीं प्रतिकूलपक्षाची मंडळी, आपल्या बरोबर ९।१० वर्षांचीं पोरें घेऊन आली होती! नंतर त्या मुलांस प्रेक्षकांच्या जागेंत बसविण्याच्या कामीं परिषदेचे कार्यवाह-वेदशास्त्रसंपन्न रामचंद्र दत्तात्रेय

किंजवडेकर शास्त्री व स्वयंसेवकपथकाचे मुख्य श्री० लेंगडे यांस किती श्रम पडले ह्याबद्दल त्यांचीच साक्ष घेतल्यास खात्री होईल. आपल्या बाजूच्या म्हणून ज्या सह्या गोळा करून प्रतिकूलपक्षानें त्यांची संख्या फुगवून दाखविली आहे त्यांत मुलांच्या सह्या किती आहेत याची रुजुवात श्रींनीं केली तर खरा प्रकार उजेडांत येणार आहे. तेव्हां त्या दृष्टीनें पाहतां देखील अशा तपलुपी व खोट्या बहुमताच्या ताब्यांत भट्ट-प्रभूंला न्याय देण्याचें काम संपवून तो न्यायच धोक्यांत पाडणें न्यायनिपुण अध्यक्षांस सुरक्षित वाटलें नाहीं तर त्यांत नवल तें काय? सारांश, अध्यक्ष व कारभारी यांनीं पक्षपात केल्याचा कांगावा जो आज प्रतिकूलपक्ष करीत आहे त्यांतला मतलब इतकाच कीं, "भट्ट-प्रभूंची एक पंगत करून आज अनुकूलपक्षी, अशा आशा वाममार्गीनीं धर्म बुडवावयास उठले आहेत!" अशी धर्मसंकटाची भीति श्रीचरणांस घालून त्यांचें मत भट्ट-प्रभूंविषयीं कलुषित करावें! तरी ही कारवाई ओळखून श्रीचरणांनीं एकतर्फी ऐकलेल्या माहितीवरून मत न बनवितां दोन्ही बाजू नीट समजून घ्याव्या व त्या धर्मकांट्यावर तोलून पाहून धार्मिक लढ्याच्या ह्या नाजूक प्रश्नाचा योग्य न्याय करावा अशी आमची निग्रहानुग्रहसमर्थ अशा श्रीचरणांपाशीं मागणी आहे.

येथवर अध्यक्ष व कारभारी यांजवर केलेल्या पक्षपाताच्या आरोपाचें खंडन करून आतां कैफीयतीस उत्तर देण्याचा विचार करूं. सदरहू कैफीयतींत "भट-प्रभु हे ब्राह्मणच नाहींत" असा अगदीं नवा मुद्दा उपस्थित करून ह्या समाजाला माणसांतूनच उठविण्याचा प्रतिकूलपक्षानें घाट घातला आहे! त्या प्रश्नाला पोषक म्हणून सदर कैफीयतींत जे मुद्दे निघतात ते येणेंप्रमाणें आहेतः —

(१) भट्ट-प्रभु ब्राह्मण असल्याचें प्रतिकूलपक्षानें परिषदेंत शाबीत केलेलें नाहीं.

भट्ट प्रभु पद्यांपैकीं असते तर अध्यक्ष सांगतात त्या १००।१५० वर्षांच्या कालांत प्रभु व पद्ये-समाजांतील परस्पर नात्या-गोत्यांचा संबंध व सुहेर आणि सुतक प्रचारांतून कां गेलें?

(३) भट्ट-प्रभूंला अब्राह्मण ठरविण्याकरितां प्रतिकूलपक्षानें रचलेली कोरी दंतकथा!

(४) 'प्रभु' ही जात ब्राह्मणांत नाहीं.

(५) भट्ट-प्रभूंची भाषा पद्यांप्रमाणें नसून ह्या उभय समाजांचे आचार-विचारही सारखे नाहींत. आणि तसे असले तरी केवळ आचार-साम्या-वरून ब्राह्मणत्व सिद्ध होत नाहीं.

आतां हे मुद्दे कसे खोटे आहेत हें अनुक्रमानें दाखवितों.

मुद्दा १ ला:—'भट्ट प्रभूंचें ब्राह्मणत्व अनुकूलपक्षानें शाबीत केलेलें नाहीं, अशा आशयाचा आहे. वरवर पाहणारास हें म्हणणें सकृद्दर्शनीं बरोबर आहे असें भासलें तरी तें साफ भ्रामक आहे. भट्ट-प्रभूंच्या पदरांत न्यायभिक्षा घालतांना श्रींची दिशाभूल व्हावी हाच मतलब नसलेला मुद्दा उपस्थित करण्यांत प्रतिकूलपक्षाचा आहे. वास्तविक खालीं नमूद केलेल्या कारणांवरून भट्ट-प्रभु हे स्वयंसिद्ध ब्राह्मण असल्या-मुळें ते ब्राह्मण आहेत का नाहींत हें ठरविणें परिषदेचें काम नव्हतें. ही गोष्ट सिद्धच आहे.

(१) ब्राह्मणांचा आनुवंशिक संस्कार त्यांच्यांत अनुस्यूत असल्यानें भट्ट-प्रभु हे आपल्याला परंपरेनें ब्राह्मण समजत आहेत.

(२) भट्ट-प्रभु आपणांस ज्या वर्गांतील समजतात तो पद्यवर्गही त्यांना आपल्यांतीलच म्हणत आहे.

(३) "बोरी व शिरोडें येथें रहाणारा भट्ट-प्रभुनामें ब्राह्मण-समाज—त्यांचा आचारविचार, आहारविहार इत्यादींवरून पहातां ते....विशेषतः पद्ये ब्राह्मण समाजांतील होत अशी आमची पूर्ण खात्री आहे" अशा आशयाचा विस्तृत अभिप्राय लिहून त्याखालीं सुमारें ११५ पद्ये ब्राह्मण व ३८ कोंकणस्थ, कऱ्हाडे इत्यादि ब्राह्मणांनीं स्वसंतोषानें सह्या केल्या आहेत. शिवाय स्थानिक व महाराष्ट्रीय विद्वानांचे व्यक्तिशः ९९ अभिप्राय आहेत ते निराळेच. यांत सही करून ज्यांनीं निराळा अभिप्राय दिला आहे त्यांचें मत एकच घरलें आहे.

(४) येथील सारस्वतब्राह्मणसमाज, त्यांना पद्ये ब्राह्मणांतीलच समजतो हें सोबत जोडलेल्या त्यांच्या वृत्तपत्रांतील अभिप्रायांवरून ठरतें.

(५) श्रीजगद्गुरूंकडे सादर केलेल्या विनंतीपत्रांत ( अर्जांत ) आम्ही " आम्ही ब्राह्मण का अब्राह्मण " याचा निर्णय करण्याची मागणी केली नसून शिवाय श्रीजगद्गुरूंच्या तर्फेनें त्या वेळच्या केसरींतून प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्यांत " पंचद्राविडांतर्गत भट्ट-प्रभु नांवाच्या ब्राह्मण समाजाच्या ऐक्य प्रकरणीं विचार करणें " अशाच अर्थाचा मजकूर आहे.

वर लिहिलेल्या गोष्टींवरून भट्ट-प्रभूंचें ब्राह्मणत्व—परिषदेला शाबीत करावयाचें नव्हतें. तर त्यांला पद्यांत ध्यावें कीं नाहीं हेंच मुख्यत्वें पहावयाचें होतें हें उघड होतें. आतां प्रतिकूलपक्षाला जर त्यांचें अब्राह्मणत्व शाबीत करावयाचें होतें तर त्याचे कोणी हात धरलेले नव्हते. भट्ट-प्रभूंच्या ब्राह्मणत्वाचे पुरावे अनुकूलपक्षाच्या इच्छेस आले म्हणून त्यानें मागें दाखविले व पुढेंही तो दाखवील. पण त्यांना अब्राह्मण ठरविण्याचें पुण्य जर प्रतिकूलपक्षाला जोडावयाचें होतें तर त्याचा पुराव्याचा बोजाही कुरकुर न करितां त्यानेंच उचलावयास पाहिजे होता. पण त्यानें परिषदेंत बिनबुडाचे जे आक्षेप काढले व ज्यांचें, अनुकूलपक्षानें तेथल्या तेथेंच खंडन केलें होतें त्याहून प्रतिकूल पक्षानें अधिक कांहींही केलेलें नाहीं. " कालपर्वापर्यंत तुम्ही भट्ट-प्रभूंला पद्ये ब्राह्मणांपैकीं म्हणत होतां म्हणून ते ब्राह्मण " असा जर प्रतिकूलपक्षाला रोख ठोक जबाब दिला तर त्याला त्याचें प्रत्युत्तर मुळींच देतां येणार नाहीं. ह्या सर्व गोष्टी स्पष्ट असतां " भट्ट-प्रभूंचें ब्राह्मणत्व अनुकूलपक्षानें सिद्ध केलें नाहीं " असें कैफीयतींत लिहितांना प्रतिकूलपक्षानें आपल्या मनाच्या टोंचणीची तमा धरली नाहीं; आत्मवंचनेची दिक्कत बाळगिली नाहीं!! आणि सत्यासत्याचीही पर्वा केली नाहीं!!! ह्याचेंच आम्हांला अत्यंत आश्चर्य वाटतें. यांतला लपंडाव हाच कीं,—ब्राह्मणत्वाचा दाखला दाखविणें कोणाही ब्राह्मणाला अशक्यप्राय असल्यानें-तें पुराव्याचें कोडें अनुकूलपक्षाच्या अर्थात् भट्ट प्रभूंच्या गळ्यांत अडकवावें आणि तें त्यांस उकलतां न आल्यानें ते आपल्याच तोंडानें अब्राह्मण ठरलेले पहाण्यास आपण नामानिराळें रहावें !

प्रतिकूलपक्षाला जर आम्हीं विचारलें, " अहो! तुम्हीं आपल्याला जे ब्राह्मण म्हणवून घेतां त्यास आधार काय? " तर त्यास तो काय उत्तर देईल ! " सर्व लोक ज्यांना ब्राह्मण म्हणत असत, त्या मातापितरांच्या

पोटीं जन्माला आलों म्हणून आम्हीं ब्राह्मण " याहून दुसरें समर्पक उत्तर नाहीं. आणि तेंच अगदीं बरोबर आहे. कारण, ब्राह्मणत्वाबद्दल ब्राह्मणाला कोणी सनद दिलेली नसते. तर " मी ब्राह्मण आहें " ही आनुवंशिक भावना आणि लोक न सांगतां 'ब्राह्मण' म्हणतात हाच त्याला पुरावा; याहून महत्त्वाचा दिव्य व अकृत्रिम पुरावा दुसरा काय मिळणार ? तेव्हां ह्या अशाच दिव्य पुराव्यावर भट्ट-प्रभु ब्राह्मण होत. आतां प्रतिकूल-पक्षानें–" भट्ट-प्रभूंत पद्यांशीं एकात्मता करण्याची जी अंतःस्फूर्ति होत आहे ती–भट्ट प्रभूंवर आनुवंशिक संस्कार झाले नसते तर झाली नसती; असें–भट्ट-प्रभु ब्राह्मण असल्याचें कारण, अनुकूलपक्षावडून सांगण्यांत येतें; पण त्यांत बिलकूल अर्थ नाहीं." असें कैफीयतींत लिहून 'त्यांत बिलकूल अर्थ नाहीं', ह्या एवढ्याच भयंकर पुराव्यावर आनुवंशिक संस्काराचा उपहास केला आहे; त्यावरून त्याला आनुवंशिक संस्काराची किंमत शून्यापेक्षां जास्त वाटत नाहीं हें उघड आहे. तरी पण तो पुराण-मताचा अभिमानी असून स्वतःला वैदिकधर्माचा कट्टा संरक्षक म्हणवीत असल्यानें त्यास एकादें श्रुतीचें प्रमाण दाखविलें तर–पाश्चात्यसरणीवरून श्री० पाटणकरांनीं परिषदेंत केलेल्या आनुवंशिक संस्काराच्या समर्थना-प्रमाणें तो बिचकणार नाहीं, या खात्रीवर त्याला एक श्रुतिप्रमाणाचा अहेर बहाल करितों.

छांदोग्योपनिषदांत एक अशी आख्यायिका आहे—" सत्यकाम नांवाचा एक ऋषिकुमार हारिद्रुमत गौतम महर्षींकडे जाऊन म्हणाला–'भगवन्! मी आपल्यापाशीं वेदाध्ययनाकरितां शिष्य म्हणून रहावयास आलों आहें.' त्यावर हा जातीचा ब्राह्मणच आहे का नाहीं याची परीक्षा पहाण्याकरितां 'बाळ! तुझें गोत्र काय ?' असें त्याला ऋषींनीं विचारलें. तेव्हां त्या मुलानें सांगितलें, 'मीं माझ्या आईला गोत्र विचारलें; परंतु ती म्हणाली, 'बाळा! अतीतअभ्यागतांच्या खस्ता आणि पतिशुश्रूषा यांतच माझा सारा वेळ जात असल्यानें त्यावेळीं तुझ्या गोत्राकडे माझें लक्ष पुरलें नाहीं. शिवाय तू माझ्या ऐन तारुण्यांत ( कीं ज्या कालांत विषय-सुखलालसेपुढें गोत्रासारखे गौण प्रश्न खिसगणतींत नसावयाचे ) जन्माला यायला व तुझे वडील तुला व मला सोडून जायला एकच गांठ पडली !

अशा स्थितींत कुठलें गोत्र नी कुठलें काय ? माझें नांव जाबाला आणि तुझें सत्यकाम, एवढेंच मला माहीत आहे. तेव्हां जा आणि गुरुजींना म्हण, कीं मी जाबालेचा मुलगा सत्यकाम आहें'.' हें ऐकून गौतममुनि म्हणाले, 'तर मग तूं ब्राह्मणच आहेस; कोणीही ब्राह्मणेतर, इतकें सरळ, तपशीलवार व खरें बोलता ना. तुला व तुझ्या आईला स्वार्थासाठीं एखादें खोटें गोत्र सांगतां आलें असतें; पण तूं खोटें बोलण्याचा अपराध केला नाहींस जा; समिधा आण. वेदाध्ययनासाठीं मीं तुझें उपनयन करितों'. (खंड ४ था.) श्रुतिमाउलीनें सांगितलेला आनुवंशिक संस्काराचा हा दृष्टान्त वैदिकधर्माभिमानी खऱ्या आर्यपुत्राला शिरोमान्य झाल्याविना राहणार नाहीं. अर्थात् तो प्रतिकूलपक्षालाही मान्य असलाच पाहिजे. मान्य नसेल तर मात्र ब्राह्मण्यरक्षणाचें त्याचें सारें ढोंग आहे आणि भट्ट-प्रभु व तत्पक्षी यांच्यावर द्वेषमत्सराचा सूड उगविण्याचाच केवळ त्याचा हा डाव आहे असें कष्टानें म्हणावें लागेल.

वरील श्रुति एकदां मान्य केली म्हणजे आनुवंशिक संस्काराचें प्रामाण्य कबूल केलेंसें होऊन "भट्ट प्रभूंतील श्रीमंत घराणींही दरिद्री अशा भटाभिक्षुकांच्या समाजांत आज येऊं पहात आहेत हेंच–त्यांच्यांत अनुस्यूत असलेल्या ब्राह्मण्याच्या आनुवंशिक संस्काराचें स्वयंस्फूर्ति गमक होय" असें गेल्या परिषदेंत श्री० पाटणकरांनीं प्रतिपादिलेलें त्रिकालाबाधित तत्त्वही ओघानेंच कबूल केल्याप्रमाणें होणार आहे---"कुलमग्रे परीक्षेत" ह्या आश्वलायनसूत्रांत मुलगी पसंत करतांना साऱ्या गोष्टी बाजूस ठेवून आधीं कुलाची परीक्षा करावी असें जें सांगितलेलें आहे तेंही वाईट कुलांतले हीन संस्कार आपल्या संततींत उतरूं नयेत यासाठींच होय.

पुराणांतलें उदाहरण या बाबतींत विश्वामित्राचें, विचार करण्याजोगें आहे. विश्वामित्र हा जातीनें क्षात्रिय असला तरी त्याचे उत्पत्तिसंस्कार ब्राह्मणत्वाचे होते. भृगुकुलोत्पन्न च्यवनमहर्षींनीं आपली सासू गाधिराजाची पत्नी व तिची मुलगी म्हणजे स्वतः आपली बायको ह्या दोघींच्या प्रार्थनेवरून एक सोन्याचा व एक तांब्याचा असे दोन मंतरलेले पुत्रीय कलश तयार केले. सुवर्णकलशांतील तीर्थानें तेजस्वी ब्राह्मण आणि ताम्रकलशांतील

तीर्थप्रभावानें प्रख्यात क्षत्रिय असे दोन पुत्र व्हावे अशी ऋषींची योजना होती. पण स्त्रीजातीच्या हावरेपणामुळें सासूला वाटलें कीं सुवर्ण-कलश ज्यापक्षीं ऋषींनीं आपल्या बायकोकरितां तयार केला आहे, त्या-पक्षीं त्यांतच कांहीं विशेष आहे. अशी खोटी समजूत करून घेऊन तीनें तो सुवर्णकलश घाईघाईनें पिऊन टाकिला. अर्थात् बाकी उरलेला ताम्रकलश मुलीनें प्राशन केला—शेवटीं त्या अशा अदलाबदलीमुळें गाधीच्या स्त्रियेला ब्रह्मतेजाचा विश्वामित्र व ऋषिपत्नीला क्षात्रतेजाचा जमदग्नि असे दोघींना दोन मुलगे झाले. प्रकृत स्थलीं आम्हांला मुद्दा ध्यावयाचा तो हा कीं, " आपण ब्राह्मण व्हावें " म्हणून जी पुढें विश्वा-मित्राला सारखी तळमळ लागून राहिली होती, तो ब्रह्मतेजाचा संस्कार होय-उगीच कोणाला आपण ब्राह्मण व्हावें असें वाटणार नाहीं. कारण ब्राह्मण होणें सोपें नाहीं, नुसती सुळावरची पोळी आहे ! शंकराचें विष शंकरानेंच ध्यावें ! उलट्या अंबारीचें ब्राह्मणाचें भिक्षा-साम्राज्य पाहिजे आहे कोणाला ? कायस्थ-प्रभू किंवा मराठे हे आपल्याला ब्राह्मण्याचे हक्क मागत नसून क्षत्रियाचेच तेवढे हक्क द्या असें म्हणतात. कोणी ब्राह्मणे-तरानें " आपणांस ब्राह्मण करा व आपल्यांत मिळवा " असें सांगितल्याचें एखादें उदाहरण प्रतिकूलपक्षानें दाखवून द्यावें. एवंच सांगावयाचें काय कीं, ज्या आनुवंशिक संस्कारांच्या प्रेरणेनें भट्ट-प्रभू आपल्याला ब्राह्मण म्हणवितात त्याला साधक असें विश्वामित्राचें पौराणिक उदाह-रण-पुराणें मान्य असतील तर-प्रतिकूलपक्षाला कबूल करणें भाग आहे. आतां पुराणेंच मान्य नसतील तर त्याचा पुराणाभिमान " पुराणांतलीं वांगीं पुराणांत " अशाच मासल्याचा व भट्ट-प्रभूंच्या मुळावर येण्या-घुरताच आहे असें म्हणावें लागेल.

आतां हीं श्रुतिकालीन किंवा पुराणकालीन उदाहरणें फार दूरचीं असल्यानें प्रत्यक्ष पाहिलेल्या किंवा जवळच्या कालांतल्या कर्णोपकर्णीं ऐकिलेल्या उदाहरणाप्रमाणें मनावर परिणाम करीत नाहींत, असें म्हणणें असेल तर लक्षांत भरण्यासारखी गोष्ट नमूद करितोः—आमच्या गोव्यांत खिश्चन झालेल्या हिंदूंत दोन वर्ग आहेत. मूळच्या ब्राह्मणास 'बामण' म्हणतात व ब्राह्मणेतरांस 'चाड्डे' म्हणतात. आश्चर्याची गोष्ट ही कीं, आज

त्यांच्या २५।३० पिढ्या खिस्ती संस्कृतींत गेल्या असतांही त्यांच्यांत ब्राह्मणत्वाचे बुद्धिमत्व इत्यादि उच्च गुण कायम असल्यामुळें त्यांना राज-दरबारांत बौद्धिक जबाबदारीच्या मोठमोठ्या अधिकारावर साक्षेपानें नेमण्यांत येतें! त्याचप्रमाणें त्यांना आपल्या ब्राह्मणत्वाची जाणीव व अभिमान इतका जाज्वल्य आहे कीं, ते बेटीव्यवहार बहुधा चाड्डुयांशीं (ब्राह्मणेतर खिस्त्यांशीं) करीत नाहींत. याची प्रचिती—प्रतिकूलपक्षाला—तो गोव्यांतलाच रहिवाशी असल्यानें पडताळून पाहतां येईल.

"खुनी माणसास खून करण्याची इच्छा झाली तर त्याला खुनी माणसाचा आनुवंशिक संस्कार कशाला पाहिजे?" असा एक प्रतिकूल-पक्षाचा सवाल आहे. यावरून त्यांचें सृष्टिनिरीक्षण किती दांडगें आहे याचें अनुमान होतें. एकाद्या अपवादावरून सगळ्याचा सगळा नियमच बदलूं पहाणाऱ्या प्रतिकूलपक्षाची धन्य खरी! ब्रिटिश हिंदुस्थानांत रामोशी, भिल्ल, बेरड, पेंढारी इत्यादि गुन्हेगार जाति प्रसिद्ध आहेत. त्यांचे खून, दरवडे, वाटमाऱ्या इत्यादि गुन्ह्यांस आळा घालण्यासाठीं त्यांना, कोठें नोकरींत अडकवून ठेव, तर कोठें त्यांच्या मुलांच्या शिक्षणा-ची सोय कर; कोठें जामिनी देऊन त्यांना शेतीच्या कामांत गुंतव. तर कोठें त्यांच्यावर हजिरींचा निर्बंध घाल; अशासारखे उपाय योजून त्यांच्यांतील गुन्हेगारीचा आनुवंशिक संस्कार कमी करण्याचे प्रयत्न इंग्रज सरकार करीत आहे तें कां? याचें उत्तर प्रतिकूलपक्षानें द्यावें. आनुवंशिक संस्कार दृढमूल नसता तर स्वतंत्र गुन्हेगार जाति अस्तित्वांत येण्याचें कारणच नव्हतें. यावरून खात्री होईल कीं, मूळचा आनुवंशिक संस्काराचा तंतु अखंड असल्यामुळेंच उत्कर्षास पावलेल्या सभोंतींच्या सारस्वत ब्राह्मण-समाजांत प्रविष्ट होऊं न पाहतां-चुकलेलें वासरूं शेंकडों गाईंच्या कळपांत आपली आईच तेवढी नेमकी शोधून काढून तिच्या कासेस लागावें, त्याप्रमाणेंच-दर्भपंचपात्री घेऊन भिक्षुकी करणाऱ्या आपल्या मातृसमाजांत—पद्येसमाजांत—प्रविष्ट होण्याची महत्त्वा-कांक्षा, भट्ट-प्रभु हे अंतःस्फूर्तीनें धरीत आहेत.

येथवर पहिल्या मुद्द्याचें खंडन करून आम्हीं खालील गोष्टी सिद्ध केल्या आहेत:—

(१) भट्ट-प्रभूंचें ब्राह्मणत्व स्वयंसिद्ध असल्याचें पद्ये व इतर ब्राह्मणांनींच आपलीं संमतिपत्रें व अभिप्राय देऊन शाबीत केल्यानें ते आणखी नव्यानें शाबीत करण्याची जरूरी व तसा कोणाचा प्रश्न नव्हता.

(२) श्रुति, स्मृति, पुराण व लोकव्यवहार यांचीं निर्विवाद प्रमाणें देऊन आनुवंशिक संस्कारांच्या प्रामाण्याचें महत्व दृष्टान्तांनीं सिद्ध केलें आणि तो आनुवंशिक संस्कार भट्ट-प्रभूंच्या ठिकाणीं प्रभावी होऊन ते ब्राह्मण—इतकेंच नव्हे तर पद्यांतर्गत ब्राह्मण असल्याचें कसें शाबीत करीत आहेत हें स्पष्ट करून दाखविलें आहे.

(३) याप्रमाणें भट्ट-प्रभूंचें ब्राह्मण्य स्वयंसिद्ध असल्याचें दाखवून आम्ही असें सिद्ध केलें आहे कीं, तें ठरविण्याचा विषय परिषदेच्या कार्यक्रमांत नव्हता; अर्थात् त्यासंबंधाच्या घुराव्याचा बोजाही भट्ट-प्रभूंवर नव्हता.

(४) यावरून हेंही उघड सिद्ध झालें कीं, भट्ट-प्रभु ब्राह्मण नाहींत असें ज्याला ठरवून द्यावयाचें होतें त्या प्रतिकूलपक्षाच्या शिरावर त्यासंबंधाच्या एकंदर पुराव्याचा बोजा होता.

मुद्दा २ रा:—"भट्ट-प्रभु पद्यांपैकीं असते तर अध्यक्ष म्हणतात तितक्या १००।१५० वर्षांच्या काळांत पद्ये व भट्ट-प्रभु-समाजांतील नात्याचा संबंध व अशौचसंबंध लुप्त कां व्हावा?" अशा आशयाचा आहे.

अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत 'सुमारें २०० वर्षें' असा उल्लेख केला असतां त्यांत प्रतिकूलपक्षानें हातचलाखीनें ५० वर्षें कमी करून "इतक्या अल्पकालांत उभय समाजांतलें नातें कां तुटलें?" असें तो विचारीत आहे. जसें काय १००।१५० वर्षें म्हणजे कांहीं नव्हत! १५० वर्षांची संख्या गृहीत धरली तरी प्रभु व पद्ये यांच्यांत फूट पडून व्यतीत झालेल्या १५० वर्षांत 'परस्परांतला आप्तसंबंध दाखवा' म्हणणाराचें डोकें तरी ठिकाणावर होतें कीं, 'मुखमस्तीति वक्तव्यम्' हा न्याय समजा. वयाचा! ज्या कालांत आतांच्याप्रमाणें लिहिण्याचीं साधनें नसून एकादी गोष्ट टिपून ठेवण्याची प्रवृत्ति नव्हती—नात्यागोत्याचा संबंध तर लिखाणांत नव्हता—भटांत भिक्षुकांत तर सहीपुर्त्या साक्षरतेचेंही प्रायः वाबडें

असल्यानें ज्या नोंदणीचा अत्यंत अभाव त्या कालांतला परस्पर सुदृढ संबंध दाखवा, नाहीं तर भट्ट-प्रभूंला अब्राह्मण म्हणा हें सांगणें आणि सशाचें शिंग दाखवा नाहीं तर त्याला पक्षी म्हणा हें सांगणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच! भट्ट-प्रभु काय किंवा पद्ये काय, ते कोणी मोठे सरदार दरकदार होते असें प्रतिकूलपक्षी समजतात काय? कीं ज्यांच्या कीर्दवहीला मुलीजांवयाला दिलेलें आंदण व नजरनजराणे यांचा जमाखर्च लिहिलेला वाचावयास मिळेल! आज मोठे इतिहाससंशोधक डोळ्यांत तेल घालून इतिहासाचें संशोधन करीत असतां एकाचा मेळ एकाला नाहीं! श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मतिथीबद्दल आज कोण रणें माजलीं आहेत! हिंदुपदपादशाहीच्या संस्थापकाचे बाबतींत जर ही स्थिति, तर भट्ट-प्रभु व पद्ये यांच्या संबंधांत बोलावयासच नको. असें असतांही ज्यांनीं प्रथम भट्ट-प्रभूंला द्राविडब्राह्मण, म्हणून 'होऊं पहाणाऱ्या ऐक्यास धर्मशास्त्रादिकांचा अडथळा कांहीं दिसत नाहीं, असें स्वतः अभिप्रायांत लिहून दिलें, पुन्हा तें 'विसरून जाऊन भर परिषदेंत त्याला ह्यांस भट पोरांब म्हणतात म्हणून ते कुडाळदेशकर असले पाहिजेत, असें म्हटलें; आणि शेवटीं ह्या दोन्ही गोष्टी विसरून आतां त्यांना ते ( कैफीयतींत ) अब्राह्मण म्हणत आहेत! अशा तऱ्हेनें हातोहात कालपर्वांचें विसरणाऱ्या त्याच प्रतिकूलपक्षाचे अध्यक्ष वे० शा० महादेव पांडुरंग निगळ्ये यांनीं १५० वर्षांच्या विस्मृतिमय अंधाराच्या दीर्घ कालांतला प्रभु व पद्ये यांच्यांतला आप्तसंबंध दाखवा असें सांगणें म्हणजे हें एक जगांतल्या सात आश्चर्यांत भर टाकणारें आठवें आश्चर्य होय!

'नातें गेलें न पुसतां व येणें गेलें न मागतां', ही वृद्धांची म्हण किती अर्थपूर्ण आहे याची किंमत, जगांतच राहून 'शिवशील! शिवशील' म्हणत जगापासून आपल्याला वेगळावून घेऊन एकलकोंडेपणानें वागणाऱ्या वेदाभ्यासजडांखेरीज इतरांस समजतें. ह्याच न पुसण्या न विचारण्याच्या तत्त्वानुसार कालप्रवाहाबरोबर पद्ये व भट्ट-प्रभूंचा आप्तसंबंध स्मृतिशेष झालेला आहे.

तरी पण ह्याच गतकालांत जनतेमध्यें लोकप्रवाहाच्या म्हणजे आख्यायिकांच्या मिषानें ज्ञीं ऐतिह्यार्चीं बीजें विखुरलेलीं असतात त्यांचें शोधन

करून निःपक्षपाती विवेचकाला इतिहासाचा थांग लावतां येतो. कारण मुळांत कांहीं खरें बीज असल्याशिवाय आख्यायिका रूढींत येऊन सर्वतोमुखीं होत नसतात. या विचारसरणीला अनुसरून पाहिलें असतां भट्ट-प्रभूंपैकीं प्रभु-देसाई व पद्यांपैकीं नेत्रावळीचे प्रभु-देसाई ह्या दोन शाखांचा बुंधा--मूळ--एक आहे असें ठरतें. यास आधार, वृद्ध वृद्ध लोकांच्या बोलण्यांत येणाऱ्या माहितीचा आहे. ती माहिती अशीः--पाळीगांवच्या अधिकारी प्रभु-देसायांपैकीं एक पुरुष, आपल्या भाऊबंदाशीं तंटा करून नेत्रावळीस गेला व त्यानें त्या गांवची देसकत ( देसाईपणा ) मिळविली व तेथें तो नादूं लागला. आज नेत्रावळीस विद्यमान असलेले प्रभु-देसाई हे त्यांचेच वंशज होत. असाच एक पुरुष भांडाभांड करून पाळींतून निघून केळोशी रासें ( साष्टीपैकीं ) गांवीं वतनवाडी करून राहिला. पुढें साष्टीप्रांतांत फिरंग्यांचा बाटाबाटीचा भयंकर प्रसंग येतांच ( सुमारें शके १४८७ क्रोधनसंवत्सर ) त्याचे मुलगे. प्राणांपेक्षा प्रिय असा हिंदुधर्म राखण्याकरितां जोडलेल्या वडलार्जित वतनवाडीवर लाथ मारून नदीच्या अलीकडे पिर्योळची वाडी आकार येथें येऊन तेथील एका देवाची पूजा पत्करून राहिले. त्यांचेच पुढें भाऊबंद बांदोडयाच्या महालक्ष्मीचे पुजारी होते. मूळ भतग्रामापैकीं पाळी गांवांतील प्रभु-देसायांच्या घराण्यांतील मंडळी गांवकीच्या बाबतींत तेथें कांहीं भयंकर कलह उत्पन्न झाल्यामुळें संतापून जाऊन क्षेत्रपाल देवापुढें शपथ वाहून सर्व अधिकार सोडून निघाले व शिरोडयास येऊन राहिले. याप्रमाणें हा इतिहास वडील परंपरेनें लोकांच्या बोलण्यांत आहे. पाळी गांवांतील कुळवाडीही, " देसाई येथून सर्व वृत्ति सोडून गेले; त्यांचें येथें मोठें घर होतें. " असें सांगून घराची जागाही दाखवितात. नेत्रावळीकर देसायांच्या घरांत या बाबतींत कांहीं कागदपत्र असले तर पाहून खात्री करून घ्यावी. नेत्रावळीचे पद्ये प्रभु देसाई व शिरोडयांचे प्रभु-देसाई यांचें गोत्र एकच आहे. वरील माहितीला पुष्टि देणारा असा एकादा बराच जुना २०० हून अधिक वर्षांचा स्मरणलेख एका गृहस्थाजवळ आहे. तो कदाचित् कायदेशीर पुरावा होऊं शकला नाहीं तरी प्रामाणिकपणाची खात्री करण्यास पुरेसा आहे, असें निःपक्षपाती विद्वानांस वाटल्या-

शिवाय राहाणार नाहीं. यावरून पद्ये प्रभु-देसाई व शिरोडयाचे प्रभु-देसाई यांचा परस्पर कुलैक्यसंबंध आहे असें उघड होतें.

दुसरें, बोरी येथील यशवंत देवारी याची बायको वय वर्षें सुमारें ६० ही, आपली आजेसासू सुपेंनजीक हुडशें गांवच्या पद्ये घराण्यांतील मुलगी होती असें सांगते. त्याचप्रमाणें बोरीचे विष्णु केशव देसाई हेही असेंच सांगत आहेत. ह्या हुडशे येथील पद्ये घराण्याचा आज निर्वंश झाला तरी तेथील इतर पद्ये मंडळींपैकीं कोणी अनुभवी अशीं म्हातारीं माणसें असलीं तर त्यांचेकडून कदाचित् ही माहिती मिळण्याची आशा वाटते. हा एक पद्ये व प्रभु-समाज याच्यांतला सुहृत्संबंध आहे. गेल्या परिषदेंत वे० शा० अनंतशास्त्री सहकारी, यांनीं–" भट्ट-प्रभु आपल्याला पद्यांपैकीं समजतात तर त्यांचा उपाध्या त्यांच्याच वर्गांतला कां ? पद्यांच्या पंचोपाध्यायांपैकीं एकाद्या घराण्याकडे त्यांचेकडील उपाध्येपण परंपरेनें कां चालूं नये ? तेव्हां पद्ये-समाजाचा खरोखर पोटसमाज–आपला समाज आहे असें जर भट्ट-प्रभूंचें म्हणणें असेल तर त्यांनीं आपला पद्यांतला जुना उपाध्या कोण होता हें घुराव्यानिशीं दाखवून द्यावें." असें आव्हान केलें होतें. तेव्हां ही उपाध्येपणाची बाबदेखील धार्मिक आप्तसंबंध दाखविणारीच असल्यानें वरील आव्हानाचा स्वीकार करीत आहों.

भट्ट-प्रभु व पद्ये-पंचोपाध्यांपैकीं एक उपाध्याय यांच्यांत एक करार झाला होता तो असा—" स्वस्ति श्री नृपशालिवाहन शके १६५३ वरुशें प्रवर्तमान विरोधकृन्नामसंवत्सरे पुश्य (पौष) व॥ (वद्य) ९ इंदुवार. समस्त प्रभुज्ञातिवर्ग म्हाजन अग्रहार बोरी ग्रामीं वे॥ कृष्णभट उपाध्या पुरोहित यांसी लिहून दिलें करारपत्र ऐसाजे–पूर्वीं सालाबाद आमचें पुरोहितपण हव्यकव्यादि कार्यप्रयोजन तुम्हांस चालत होतें. तेनंतर आमचे ज्ञातिसंबंधीं ब्राह्मण प्रवीण जाहले. त्यानंतर हव्यकव्य-कार्यप्रयोजन त्यां हस्तें चालूं लागलें. याकरितां तुम्हांआम्हांमध्यें वेव्हार ( सरकारांत खटला वगैरे ) होऊन तुमचे कार्यास अंतर पडून आलें. त्याउपर आमचें तुमचें बोलणें होऊन राजश्री रामशेणवी आरस तरफदार व मांगशेणवी व गोरख शेणवी कुलकर्णी या विद्यमानें तुमचाआमचा इत्यर्थ होऊन तह केला जे–आमचे स्वज्ञाति ब्राह्मण यांचें अव्हेरी न करितां चालावें आणि तुमचेंही

चालिलेप्रमाणें चालावें ये अर्थीं तुमचें आमचें समाधान होऊन तह केला. बीत॥"

याप्रमाणें उद्देश लिहून त्याखालीं पौरोहित्याचीं कृत्यें नवा स्वज्ञातीचा उपाध्या व मूळचा पचोपाध्यांपैकीं कृष्णभट उपाध्या या दोघांत कसकशीं वांटलीं याचा कलमवार तपशील लिहिला आहे. त्यांत लक्षांत ठेवण्या-सारखी गोष्ट म्हणजे स्वज्ञातिपुरोहितास प्रत्यक्ष भोजनाचे प्रसंग ज्यांत येतात अशीं व्रतबंध, श्राद्धमहालय व और्ध्वदेहिक हीं तीन कृत्यें नेमून देऊन बाकी सर्व कृत्यें मूळ उपाध्या कृष्णभट यास नेमिलीं आहेत. आणि त्यांतही अत्यंत विचारणीय बाब ही कीं, स्वज्ञातिपुरोहितास नेमि-लेल्या कृत्यांत मूळच्या पुरोहिताचा विशिष्ट हक्क राखून ठेविला आहे तसा मूळ पुरोहिताच्या वांटयास आलेल्या कृत्यांत स्वज्ञातिपुरोहितास ठेवलेला नाहीं. त्याचप्रमाणें ह्या करारावरून भट्ट-प्रभु व पद्ये ह्या उभय समाजांचें मूळ एक असल्याची--विचारी माणसाच्या हृदयांत तत्काल प्रकाश पाड-णारी--अंतरंगांतली खूण दृष्टीस पडते ती ही कीं, सदर करारावर ज्या प्रभुमंडळीच्या सह्या आहेत त्यांत 'सोयरा प्रभु जांबुळें' अशी एक सही आहे आणि वेरें येथील 'कृष्ण गोविंदभट जांबळे' अशी पद्ये-ब्राह्मणाची सही प्रभुप्रकरणीं संमतिपत्रावर आहे. यावरून पद्यांत व भट्ट-प्रभूंतही 'जांबळे' उपनांव असल्यानें पूर्वी ह्या उभय समाजांचें ऐक्य असल्याचें सिद्ध होत आहे. आणि प्रभूंतील तें उपनांव आज नष्ट होऊन पद्यांतच उरलें आहे असेंही ठरत आहे. नांवापुढें सन्मानदर्शक 'अप्पा' हें उपपद जोडण्याचा प्रघात कर्नाटकांत असल्याचें प्रसिद्ध आहे. आणि त्या उपाध्ये करारावरील सह्यांत 'लखू बाबई प्रभु दासप्पा' अशी एक सही असून शिवाय 'रामप्रभु तिसेकर', अशीही कानडी लिपींत सही आहे. यावरून ह्या कराराचे वेळीं अंत्रुजींत कानडी नांवें ठेवण्याची पद्धति व कानडी लिपी व भाषाही प्रचलित होती असें उघड होत असल्यानें 'कदंब-राजांनीं पद्ये ब्राह्मणांस गोव्यांत आणलें' ह्या ऐतिह्यास ह्या योगानें पुष्टि मिळत आहे.

आतां वांकडें पहाणारास वांकडें दिसतें, ह्या न्यायानें प्रतिकूलपक्षा-लाही ह्या पुरोहितविषयक निर्विवाद पुराव्यांत छिद्रें दिसूं लागून तो

त्यांचा 'रजाचा गज' केल्याविना राहील तर त्याच्या धर्मरक्षकत्वास बाध येईल असा आम्हांला संशय येतो. आणि त्यास अनुसरून त्यानें जर "पद्यांचे पंचोपाध्ये पांचच गांवांत असून त्या त्या गांवाघुरताच पौरोहित्याचा त्याला अधिकार आहे, आणि त्या पांच गांवांत बोरी व शिरोडें हे गांव येत नसल्यानें व भट्ट-प्रभूंची वस्ती विशेषत: सदरच्या दोन गांवांतच असल्यानें त्यांचा उपाध्या, पंचोपाध्यांपैकीं कोणी असूं शकत नाहीं. अर्थात् अनुकूलपक्षानें पुरावा म्हणून पुढें आणलेला करार स्वतंत्र उपाध्याचा असावा" असा आक्षेप घेतला तर त्यास आतांच उत्तर देऊन ठेवीत आहों.

'पांचां गांवचे पांच उपाध्ये', याचा अर्थ–पद्ये हे प्रथम पांचच गांवांत वस्ती करून होते. त्यांनीं आपापल्या गांवांतील ब्राह्मणांच्या घरचीं धार्मिक कृत्यें वेळचेवेळीं करण्यास अडचण पडूं नये म्हणून आपापल्या गांवीं वेगवेगळा उपाध्या केला, परंतु पुढें पद्यांचा जसजसा वंशविस्तार होत गेला तसतसे ते आजूबाजूच्या गांवांतून पसरले. अर्थात् ज्या गांवांतून ते दुसऱ्या गांवांत गेले त्यांच्या घरचें पुरोहितपण पहिल्या गावच्या उपाध्यानें चालविणें हक्कानें प्राप्त झालें. नेत्रावळीचे पद्ये प्रभु-देसाई हे–तो गांव पंचोपाध्यांपैकीं नसल्यानें ते पद्ये नाहींत असें प्रतिकूलपक्ष म्हणणार काय! ह्याच न्यायानें प्रभु नांवानें ओळखले जाणारे पद्ये बोरी व शिरोडें या गावांतून रहात असले तरी करारांतला कृष्णभट हा पंचोपाध्यांपैकींच असून तोच त्यांचा मूळचा उपाध्या होता हें निरपवाद सत्य आहे, इतकेंच नव्हे तर हा करारनामा बोरीच्या ज्या ब्राह्मणांच्या येथें होता, त्यांचा पूर्वज जो कृष्णभट तोच हा उपाध्या होता. याचें प्रत्यंतर–बोरीचे वे० शंकर वामनभट बोरकर ( यांनींच कराराचा जुना अस्सल कागद दिला ) हे आपल्या अभिप्रायांत परिषदेचे अध्यक्ष श्री० केळकर यांस कळवितात कीं, "प्रथम यांचा ( भट्ट-प्रभूंचा ) उपाध्येपणा आमच्याकडे होता. पण पांक्तिलाभास्तव भट्टप्रभूंनीं खासगी पुरोहित केले. तथापि "हर कृत्यांत तुमचा हक्क गणेशपूजा, गोदान वगैरे–बिनहरकत वेळेवर तुम्हांस देण्यांत येईल." असें त्यांनीं लिहून दिलें असून त्याप्रमाणें तो क्रम अव्याहत चालला. हल्लींच ३०।३५ वर्षें तो बंद पडला आहे. शिवाय केरीचे गणेश

अनंत देसाई यांनीं स्मरणार्थ लिहून ठेवलेल्या जुन्या टिपणांत ( सुमारें ७५।८० वर्षांच्या) 'बोरीमध्यें कृष्णभट होता त्यांची बायको चित्पावनांची मुलगी, तिचें संतान बहुत आहे'. असें लिहिलें आहे. (सदरचें टिपण कऱ्हाडे, कोंकणस्थ. पद्ये व देशस्थ यांच्यांत परस्पर शरीरसंबंध कसकसे झाले हें लिहून ठेवून गणेश देसाई यांनीं त्या त्या ब्राह्मणसमाजावर खरोखर उपकार केले आहेत.) यावरून हा बोरीचा कृष्णभट, भट्ट प्रभूंच्या उपाध्यायांचा वंशज आणि विद्यमान शंकर वामन बोरकर यांचा पूर्वज असावा असें अनुमान होतें. व पंचोपाध्यांपैकीं एक घराणें जें लुप्त झालें आहे तेंही हेंच असावें.

आतां वर सांगितल्याप्रमाणें बोरी व शिरोडें हीं गांवें पंचोपाध्यांच्याच अधिकारांतलीं आहेत व होतीं हें आम्ही म्हणतों म्हणून कोणीं खरें मानूं नये. तर सर्व अंत्रुज प्रांतभर पंचोपाध्यांचा अधिकार असल्याचा लेखी पुरावाच दाखल करितोंः—

फोंडा मुक्कामीं सौंधेकरांचे सर सुभेदार चेनवीर येनवरू यांच्या हुकुमानें अंत्रुज प्रांतांतील समस्त देशमंडळींची सभा भरून तींत भास्करभट सप्रे व पंचोपाध्ये यांच्यांत चाललेल्या पुरोहितविषयक तंटयाचें निवाडपत्र ( महजर ) शके १६५३ विरोधकृन्नामसंवत्सर मार्गशीर्ष शुद्ध ५ सोमवार मितीचें गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें लेखांक ५३ यांत छापिलें आहे. ( ह्या निवाडपत्रानंतर एकाच महिन्यानें वर नमूद केलेला उपाध्याचा करार झाला ही गोष्ट निःसंशय मननीय आहे.) त्यांत " कदीम अग्रहारवासी उपादे तपे मजकूर येथील गांवगना उपादे विरक्तपशील—मौजे कवले उपाधा १, मौजे केरी उपाध्या १, मौजे वेरें उपाध्या १, मौजे पिरयोल उपाध्या १, मौजे खांडेपार उपाध्या १ ..... सदरहु पांचाही गांवचे उपाध्ये याहीं.

या अंत्रुज देशामध्यें ( फक्त पांचच गांवांत नव्हे ) स्ताईक व आगांतुक ब्राह्मण यांचे घरींचे आचारव्यवहार प्रायश्चित्तादिक संपादावें. भास्करभट सफरे यांस व यांच्या बडिलांस या पांचां गांवांमध्यें व संपूर्ण देशामध्यें आचारव्यवहार, प्रायश्चित्ताधिकार व सर ज्योतीस व सर धर्माधिकरण व कांहींयेक वृत्तीशिवाय अदलशाही अमलामध्यें व शिवाजीराजे यांचे

अमलामध्यें व मोंगलाई व आजपावेतों चातुर्वर्ण्यानें येथें एकंदर चालला नाहीं व पुढेंही या देशामध्यें कांहींयेक वृत्तिबाबेस भास्करभट यांस समंध नाहीं." यावरून सर्व अंत्रुज प्रांतांत ब्राह्मणांच्या घरचें उपाध्येपण करण्याचा अधिकार पंचोपाध्यांचा सिद्ध होत असल्यानें वोरी व शिरोडें येथिल भट्ट-प्रभूंचा उपाध्या कृष्णभट हा पंचोपाध्यांपैकींच होता हें ठरतें.

यावरही " ब्राह्मण हा सर्व जातींचा म्हणजे ब्राह्मण, सारस्वतब्राह्मण, शूद्र इत्यादि जातींचा उपाध्या असूं शकतो. त्याप्रमाणें तो भट्ट-प्रभूंचाही उपाध्या कोणी कृष्णभट होता असेंही असूं शकेल. इतक्यावरच भट्ट-प्रभु हे ब्राह्मण असून शिवाय पद्यांतलेही आहेत असें कसें ठरते?" असा कोणी आक्षेप घेतील तर त्यांला आमचें उत्तर असें आहे कीं, आम्ही ज्या काळांतल्या परिस्थितीचें समालोचन करीत आहों त्या २०० वर्षांच्या पूर्वीच्या कालांत अंत्रुज प्रांतांत ग्रामजोशीपणाचे विशिष्ट अधिकार क्रमवित् ब्राह्मणांकडे व द्राविड ब्राह्मणांच्या घरचे पौरोहित्याचे अधिकार पचोपाध्यांकडे अनादिकालापासून चालत आलेले होते. कऱ्हाडे, कोंकणस्थ इत्यादि जे आगंतुक ब्राह्मण मागाहून येऊन येथें वस्ती करून राहिले त्यांचा मूळचा उपाध्या हव्याकाव्यास पोंचला नसेल तर त्यांच्याकडचें पौराहित्य त्या त्या गांवच्या उपाध्यानें संपादावें अशी व्यवस्थित अधिकारविभागणी त्या कालीं होती. अर्थात् जोशी आणि पंचोपाध्ये यावांचून आंणखी कोणी उपाध्या नव्हता. एकाचा वृत्तिलोप दुसरा कोणी करूं लागला तर त्याला तो वृत्त्यपहार राजसत्ता पचूं देत नसे. इतकी वृत्तिरक्षणाविषयीं त्या वेळीं जागरूकता व न्यायनिष्ठुरता होती. वेलिंगच्या सप्रे घराण्यांतील रघभट, हरभट, भास्करभट इत्यादि कऱ्हाडे कुलोत्पन्न पुरुषांनीं जोशांचे सर्वाधिकार व पंचोपाध्यांचा उपाध्येपणा बळकावण्याकरितां वंशपरंपरेनें जंग जंग पछाडलें व कमालीचा नीचपणा केला. याचा सविस्तर वृत्तांत गोमांतकच्या इतिहासाचे प्रसिद्ध झालेले कागदपत्र वाचल्यास कळून येईल. इतकें करूनदेखील सप्रे घराण्याला अधिकाराचें एक सुपारीचें खांडही तत्कालीन न्यायनिष्ठुर अशा राजदरबारनें लाभूं दिलें नाहीं हें विचार करण्यासारखें आहे. वर नमूद केलेलें निवाडपत्र हें सप्रे व पंचोपाध्ये यांच्यांत चाललेल्या पौरोहित्यविषयक वादाचाचें निर्णय

आहे हें वर दाखविलें आहेच. तेव्हां त्या वेळीं अंत्रुज प्रांतांत जोशी व पंचोपाध्ये यांवांचून राजमान्य असा दुसरा उपाध्या नव्हता हें सिद्ध आहे. आतां भट्ट-प्रभूंनीं जो आपला स्वज्ञातीचा उपाध्या केला होता तो मूळचा उपाध्या श्राद्धमहालयांत क्षणास बसण्यास व इतर कृत्यांत भोजन करण्यास कबूल नसल्यामुळें निरुपाय म्हणून केला होता. आणि ह्याच कारणामुळें प्रभु व कृष्णभट उपाध्या यांच्यांत खटके व न्यायमनसुबे झाले, हें प्रभूंनींच करारपत्रांत कबूल केलें आहे. ह्यावरूनच ती गोष्ट ठरत आहे. दुसरें, प्रभूंनीं कृष्णभटउपाध्यास करार करून दिला तो तरी संतोषानें दिला असें मुळींच नाहीं. तर शके १६५३ च्या मार्गशीर्षांत पंचोपाध्यांच्या प्रकरणामध्यें भास्करभट सप्रघास कशी अद्दल घडली—फोंडें किल्ल्याच्या बुरुजावर त्याला चतुर्भुज करून कसें ठेवण्यांत आलें हें ताजें दृश्य (मागील संबंध निवाडपत्र, गोमांतकच्या इतिहासाचीं साधनें—ह्या पुस्तकांत वाचावें) डोळ्यांपुढें असल्यानेंच भट्ट-प्रभूंनीं योडक्यांत शहाणपणा शिकून एकाच महिन्यांत कृष्णभटास करार लिहून देऊन तडजोडीनें आपसांत तंटा मिटविला हें उघड दिसतें. यावरून सिद्धान्त निघतो तो हा कीं, अंत्रुज प्रांतांत स्थायिक व आगंतुक ब्राह्मणांच्या घरचें पौरोहित्य करण्याचा कायदेशीर हक्क पंचोपाध्यांचाच असल्यानें भट्ट-प्रभूंचा मूळचा पंचोपाध्यांतला उपाध्या कृष्णभट उपाध्याच होय. भट्ट-प्रभु ब्राह्मणेतर असते तर त्यांचा उपाध्या कृष्णभट नसता. जोशीच असता. एकंदरींत विचार करितां प्रतिकूलपक्षाच्या आव्हानाप्रमाणें ह्या कराराच्या अस्सल पुराव्यानें भट्ट-प्रभूंचा पंचोपाध्यांपैकीं उपाध्या कोण होता तें दाखवून देऊन प्रभु व पद्ये हे एकच होत असें आम्हीं सिद्ध केलें आहे. याप्रमाणें प्रभु व पद्ये यांचा शक्य झाला तितका आप्तसंबंध दाखविल्यावर अशौचाचा प्रश्न वास्तविक निकालांतच गेल्यासारखा आहे.

परंतु स्वभावतः असंतुष्ट व दुराराध्य अशा प्रतिकूलपक्षाच्या समाधानासाठीं त्या बाबतींत थोडें कष्टानेंच लिहावें लागत आहे. खरें पाहिलें असतां १००।१५० वर्षांच्या गतकालांत प्रभु व पद्ये यांच्यांतलाच अशौचसंबंध कां तुटला ? असें विचारणें ही शुद्ध अडवणूक व निव्वळ

तर्कटपणा होय. पंधरा वर्षांची पिढी मानून १५० वर्षांचा हिशेब केला तर आज १० पिढ्या मागें पडतात. भेट्ट प्रभु वेगळे झाले त्या दिवसापासूनच पिढ्या मोजल्या तर उभय समाजांतील कांहीं घराण्यांत त्रिदिनात्मक अशौच चालू असावें असें वाटतें. तें थोडा तरी आशौच विवेक माहीत असेल तर प्रतिकूलपक्षालाही आपातरम्यच वाटेल. वस्तुतः ह्या विषयाची व्यवस्था अशी लावली पाहिजे कीं, भट्ट-प्रभु पद्ये-समाजांतून फुटले त्यावेळीं कित्येकांचें अशौच आधींच फिटलें होतें व ज्यांचें असेल त्यांचें १५० वर्षांत केव्हां तरी त्रिदिनात्मक झालें असेल. फुटीच्या वेळीं त्रिदिनात्मक असलेल्यांचें आशौच वरील कालांत कधींतरी फिटलें असेल. याच क्रमानें बहुकाल पर्यायामुळें परस्परांचा अशौचसंबंध आज स्मृतींतूनही गेला असला पाहिजे.

वरील विचारसरणी शास्त्रीय म्हणून नमूद केली इतकेंच. वास्तविक खरा प्रकार वेगळा आहे. तो असाः—पद्ये व भट्ट-प्रभु यांच्यांत विभक्तपणा झाला तो शहाणे भाऊ कानाच्या कोंपऱ्यास न कळतां आपसांत समजून विभक्त होतात तसा मुळींच नव्हे. त्यांच्यांत ह्या बाबतींत कितीतरी हाणामाऱ्या झाल्या असतील. व त्या दावाग्नीच्या झळींत उभय समाज पोळून निघाले असतील. तेव्हां याप्रमाणें हटातटास पेटलेल्या उभय समाजांनीं परपस्परांचा आशौचतंतु ताड्दिशीं तोडून टाकणेंच विशेष संभवनीय आहे. यांत अपूर्व अशी नवलाई कांहीं नाहीं. द्वेषाच्या भरांत आशौच तोडलेलीं उदाहरणें प्रत्येकानें आपल्या सभोंवतीं आहेत कीं नाहींत हें सत्यान्वेषणदृष्टीनें पाहून खात्री करून घ्यावी. प्रतिकूलपक्षाच्या अध्यक्षांनीं आपल्या गांवांत अशीं उदाहरणें घडलीं आहेत कीं नाहींत हें शोधून पहावें. ग्रामण्य किंवा अन्य कारणांनीं—आई-बापांला पोटचीं मुलें, बहिणीला भाऊ वगैरे जिव्हाळ्याचीं माणसें एकमेकांस अंतरतात व आशौचही तोडतात; हे प्रकार झाले कीं नाहींत हें त्याच अध्यक्षांनीं प्रतिशेवर सांगावें. एका मोठ्या इनामदारानें द्वेषाच्या भरांत आपल्या भाऊबंदाचें आशौच, गंधाचा टिळा लावून केडून टाकून आपलीं मुलेंबाळें हकनाक इनामाला मुकविलीं; हेंही

उदाहरण प्रतिकूलपक्षाच्या अध्यक्षांनीं नीट आठवणींत आणावें. सारांश, हाच प्रकार प्रभु व पद्यांच्या आशौचसंबंधांत घडलेला आहे.

प्रतिकूलपक्षाच्या १५० वर्षांच्या कल्पित काळांत आशौचसंबंधाची वाट कशी लागते ती आम्हीं दाखविली, आतां खरा प्रकार पहावयाचा. शके १६५३ सालांतला उपाध्यांचा करारनामा मागें दिलाच आहे. सदर करारांत भट्ट-प्रभु हे आपल्या वर्गाला 'स्वज्ञाति' अशा शब्दानें उल्लेखितात. तेव्हां पद्यांतून फुटून निघालेल्या वर्गास 'स्वज्ञाति' शब्द लावण्याइतका वेगळेपणाचा संस्कार मनांवर होण्याला आमच्या मतें १५०।२०० तरी वर्षें व्हावीं लागतील. ह्यावरून हीं २०० वर्षें वरील करारपत्राच्या १६५३ शकापासून चालू सालपर्यंत १९५ वर्षें मिळून जवळ जवळ ४०० वर्षें तरी भट्ट-प्रभु, वेगळे झाल्याला होऊन गेलीं पाहिजेत. अर्थात् ४०० वर्षें वेगळा राहिलेल्या समाजाचा–ज्यापासून तो वेगळा झाला त्या पद्ये समाजाशीं असलेला सुहृत्संबंध व आशौच-संबंध शोधूं जाणें म्हणजे 'सांडलें कोठें व शोधितां कुठें!' असेंच म्हणवून घेण्यासारखें आहे.

याप्रमाणें प्रतिकूलपक्षानें घुढें आणलेला आप्तसंबंधाचा व आशौच-संबंधाचा मुद्दा उखडून टाकल्यावर आतां त्या पक्षानें आणखी कांहीं जीं असमंजस विधानें केलीं आहेत त्यांचाही जातां जातां परामर्श घेत आहों:—"ऐक्य-परिषदेंतील अनुकूलमतवाद्यांस दंतकथेपेक्षां जास्त वजनाचा पुरावा आढळूं नये एवढ्यावरून त्यांची बाजू किती लंगडी आहे हें निर्शनास येईल." असें एक विधान केलें आहे. प्रतिकूलपक्षाला आम्हीं जोरानें असें सांगून ठेवतों कीं, जोंपर्यंत भट्ट-प्रभु वेगळे होण्याचें किंवा ते ब्राह्मणच नव्हत असें स्पष्ट दाखविणारें बलवत्तर प्रमाण तुम्हीं घुढें आणलें नाहीं तोंपर्यंत वरील दंतकथा–वज्रटंकानें कोरलेल्या शिला-लेखापेक्षांही–अनुकूलमतवादी अधिक मोलाची समजत आहेत. कारण, शिलालेख हा एकाद-दुसऱ्याच शिलेवर कोरलेला असावयाचा पण ही दंतकथा, भट्ट-प्रभु वेगळे झालेल्या दिवसापासून आजमितीपर्यंत प्रत्येक पद्ये ब्राह्मणाच्या हृदय शिलेवर सत्याच्या टंकानें कोरलेली अभंगस्वरूपांत आहे. आतां थोड्या विघ्नसंतोषी अशा कलिपुरुषांच्या शिकवणीमुळें

कांहीं भोळ्या पद्यांनीं वरील दंतकथेसंबंधानें कानांवर हात ठेवून जरी आत्मवंचना करून घेतली तरी त्यांचें मन त्यांना खातच रहाणार यांत संशय नाहीं.

ही दंतकथा किती व्यापक आहे त्याचें प्रत्यंतर—कुडाळचे विद्वद्वर्य महादेवशास्त्री बाक्रे. वुइल्सन कॉलेज, मुंबई यांच्या अभिप्रायांत पहावयास मिळेल. ते म्हणतात, "कांहीं कारणानें इतर ब्राह्मणसमुदायाचा यावरील, हल्लीं दोन नांवांच्या समुदायाशीं (पूर्वीं एका समाजांत असलेल्या पण हल्लीं भट्ट-प्रभु व पद्ये ह्या दोन नांवांनीं ओळखले जाणाऱ्यांशीं) व्यवहार बद पडला होता. पण तो 'श्री १०८ शंकराचार्यांच्या आज्ञेनें श्रीचंद्रमौलीश्वराचें तीर्थप्रसादास सर्वांना बरोबर घेऊन सुरू व्हावयाचा असें ठरलें होतें. त्यांपैकीं कांहीं लोक त्या प्रसंगीं ठरलेल्या वेळीं येऊं शकले नाहींत व त्यामुळें ते पुढें तसेच राहिले'. अशी गोष्ट मी गोव्यांत श्रीशंकराचार्यांचे स्वारींतून विद्यार्थिदशेंत गेलों होतों त्या वेळीं ऐकली होती." हा २८ वर्षांपूर्वीचा आपला अनुभव बाक्रेशास्त्री लिहितात. यावरून ही दंतकथा किती सर्वतोमुखी व सत्यमूलक आहे व अनुकूलवादी, त्याला वजनाचा पुरावा कां मानितात हें प्रतिकूल पक्षाच्या लक्षांत येईल व आपलीच विवेकशक्तिविकारवशतेमुळें किती लंगडी, लुली व आंधळी झाली आहे हेंही त्याला समजेल.

"असें जर असतें (म्हणजे दंतकथेंतील कारणामुळेंच भट्ट-प्रभु बहिष्कृत झाले ही गोष्ट खरी असती) तर श्रींची स्वारी जवळ असतां त्यांनीं (प्रभूंनीं) ताबडतोब या गोष्टीचें निरसन करून घेतलें असतें. पण तसें कांहीं केलेलें दिसत नाहीं. एवढेंच नव्हे, तर १००।१५० वर्षेंपर्यंत म्हणजे खरें कारण लोकांस माहीत होतें तोंपर्यंत (!) कोणीच आम्हास जातींत घ्या म्हणून प्रयत्न करूं नये!" असेंही एक हास्यास्पद विधान प्रतिकूलपक्षानें केलें आहे. गेल्या १००।१५० वर्षांत भट्ट-प्रभूंच्या बाबतींत प्रत्यक्ष माहिती असलेले १५० वर्षें वांचलेले चिरंजीव लोक होते अशी प्रतिकूलपक्षाची समजूत आहे काय! तसें असेल तर या शहाणपणास किंमत नाहीं. खरें, "१५० वर्षांत भट्ट-प्रभूंनीं ऐक्याबद्दल प्रयत्न केला नाहीं." असा एकदम सिद्धान्त करण्याचें धाडस जें प्रतिकूलपक्षी करीत आहेत, तें

कशाच्या आधारावर तें त्यांनीं सांगावें. श्रींची स्वारी जवळ असतां ह्या गोष्टीची शहानिशा ताबडतोब कां करून घेतली नाहीं असें विचारणारास 'तुझ्या त्रिकालज्ञानाला आमचा नमस्कार असो' याहून दुसरें उत्तर देण्याचें अमोघ सामर्थ्य आमच्यांत नाहीं. तसा कांहीं प्रयत्न करण्यांत आला होता कीं नाहीं हें प्रतिकूलपक्षाला माहीत नसेल तर तो त्याचा अपराध आहे, भट्ट-प्रभूंचा नाहीं. शके १८०२ भाद्रपद १ चे एक व आश्विन वद्य ३ चें एक अशीं दोन आज्ञापत्रें पेडणें येथें श्रीस्वामींचा चातुर्मास्य मुक्काम होता तेव्हां तेथून रा० रा० सदाशिव प्रभु व रामचंद्र प्रभु-देसाई व गांवकर वास्तव्य शिरोडें यांच्या नांवें आलेलीं सोबत जोडलीं आहेत. पैकीं पहिल्या पत्रांत "तुम्ही पेडणें मुक्कामीं भेटीस येतों असें बोलल्याप्रमाणें आलां नाहीं. तुम्हीं विनंती केलेल्या मजकुराचा करार वे॥ राजश्री महादेवभट येळावलकर हे तुम्हांस कळवितील. ..... येथें चातुर्मास्य होऊन नवरात्र होतांच स्वारीचें परत सत्वर जाणें होणार आहे. सबब लवकर निघोन येण्याची तजवीज करावी. कोणत्याही गोष्टीचा संशय व काळजी न बाळगितां पत्र पावतांच निघोन यावें." असा मजकूर असून दुसऱ्या पत्रांत—" वे॥ मोरेश्वरभट राजापुरकर तिकडे आले आहेत तुम्हांस मजकूर कळवितील त्याप्रमाणें एक वेळ दर्शन घेऊन जावें." अशा अर्थाचा आहे. यावरून भट्ट-प्रभूंकडून ४६ वर्षांपूर्वीं हें प्रकरण श्रींकडे आलें होतें, हें उघड आहे. दुसरा प्रयत्न पंडित वामनशास्त्री इस्लामपूरकर यांच्यामार्फत झाला होता. त्यास साक्ष-प्रतिकूलपक्षाचे अध्यक्ष वेदशास्त्रसंपन्न महादेव पांडुरंग निगळ्ये यांनीं आपल्या अनुकूल अभिप्रायांत दिली आहे. आणि सध्या चालू असलेला प्रयत्न हा तिसरा होय. तेव्हां ४६ वर्षांत म्हणजे जवळ जवळ ५० वर्षांत एकीचे तीन प्रयत्न झाले. बाकी १५० पैकीं उरलेल्या १०० वर्षांत असे प्रयत्न झाले असलेच पाहिजेत. आतां ते कालप्रवाहाबरोबर स्मृतिकक्षेच्या पलीकडे गेले असले तरी ते झालेच नाहींत असें ठरत नाहीं. विस्मरालूपणा हा मनुष्यधर्म असून कालाच्या आधिक्याबरोबर त्याचेंही क्षेत्र वाढत जातें. शके १८४५ तल्या आपल्या अभिप्रायांत " पं० वामनशास्त्री यांनीं एकीचा प्रयत्न केला होता " असें लिहिणारे वेदशास्त्र-

संपन्न महादेवशास्त्री निगळ्ये हे प्रतिकूलपक्षाचे अध्यक्ष होतांच आपल्या मनाशीं ठकबाजी करून तें आपलें लिहिणें विसरून जाऊन '१५० वर्षांत एकीचा प्रयत्न कां केला नाहीं?' असें तोऱ्यानें विचारण्यास पुढें येतात हा सारा विस्मृतीचाच प्रभाव होय! सारांश, 'शितावरून भाताची परीक्षा' म्हणतात त्याप्रमाणें वर लिहिलेल्या ५० वर्षांतील एकीच्या प्रयत्नांवरून त्यामागच्या कालांतही असेच प्रयत्न झालेले असावेत असें अनुमान करणें अपरिहार्य असल्याचें प्रतिकूलपक्षाला पटेल अशी खात्री वाटत आहे.

येथवर दुसऱ्या मुद्द्याचें खंडन करून आम्हीं खालील गोष्टी शाबीत केल्या आहेतः—

( १ ) भट्ट-प्रभु हे पद्ये समाजापासून विभक्त झाल्याला सुमारें ३५०—४०० वर्षें तरी झालीं असावीं.

( २ ) एवढया दीर्घकालाच्या प्रवाहांतून प्रभु व पद्ये-समाजांतील सुहृत्संबंध व आशौच संबंध चालू राहणें कसें अशक्य आहे हें निर्विवादपणें दाखवूनही शक्य त्या समर्पक पुराव्यांनिशीं वरील संबंध उघड करून प्रभु व पद्ये यांच्या मूळ एकीभावाच्या सांखळीचा दुवा जोडून दाखविला आहे आणि—

( ३ ) प्रचलित दंतकथेंतील मूळ बीज किती सत्यपूर्ण आणि व्यापक आहे याची शहानिशा करून प्रत्यक्ष लेखी पुराव्याच्या खालोखाल तो कसा महत्त्वाचा पुरावा आहे हें सिद्ध केलें आहे. शिवाय भट्ट प्रभूंकडून आजपर्यंत अनेकदां एकीचे प्रयत्न करण्यांत आल्याचें पुराव्यानें शाबीत करून त्यांचा आपल्या मातृसमाजाकडे अविच्छिन्न परंपरेचा किती ओढा आहे हें स्पष्ट केलें आहे.

तिसरा मुद्दाः—प्रतिपक्षानें दिलेल्या नव्या दंतकथेवरून भट्ट-प्रभु हे अब्राह्मण अथवा सारस्वत ब्राह्मण ठरतात काय? असा आहे. ही नवी दंतकथा अशी—" गोव्यांतील ( अंत्रुज प्रांतांतील ) पांच गांवच्या अधिकारावर असलेल्या पांच पद्ये घराण्यांपैकीं एकाचा निर्वंश झाल्यानें कोणी तिघां इसमांनीं दोघां गौड सारस्वतांच्या मसलतीनें सरकारांत खोटे दाखले ( निर्वंश झालेल्या पद्ये घराण्याचे जवळचे वारस असल्याचें )

दाखल करून त्या घराण्याचे अधिकार आपण बळकाविले. वर लिहिलेल्या पांच घराण्यांतील पद्यांच्या जात-गोताबद्दल माहिती नसल्यानें त्यांच्याशीं इतर ब्राह्मण पंक्तिव्यवहार करीत नसत. घुढें श्रींची स्वारी गोव्यांत आल्यावेळीं वरील अवशिष्ट चार घराण्यांतील पद्यांनीं आपणांस इतर ब्राह्मणांत सामील करून घेण्यावद्दल श्रींची विनंति केली असतां पांचव्या वद्ये घराण्याचा वृत्त्यापहार करणाऱ्या तिघां उपटसुंभांनींही "आम्हीं पद्ये असल्यानें आम्हांलाही पावन करावें" असें कळवून त्यांतच आपलेंही घोडें दामटलें. तेव्हां श्रींनीं चार घराण्यांस पावन केलें आणि तिघां वृत्तिघातकांला—ज्या घराण्याचे ते आपल्याला वारस म्हणत होते त्याबद्दलचा पुरावा त्यांस दाखवितां न आल्यानें "तुम्ही पद्ये नाहीं" असें सांगून त्यांस निराळें ठेविलें" निर्वाणीचें हत्यार म्हणून अर्जुनाचा कंठनाल फोडण्याकरितां कर्णानें ठेवलेल्या वासवीशक्तीप्रमाणें अनुकूलपक्षाला चारीमुंडी चीत करण्याकरितां प्राणांपलीकडे बुद्धीच्या सात कप्प्यांच्या आंत दडवून ठेवलेली ही दंतकथा प्रतिकूलपक्षानें अनुकूलपक्षाच्या तोंडावर जोराजोरानें फेंकून दिली आहे! यावरून प्रतिकूलपक्षाचें बहुतेक भांडवल खलास झालें असें अनुमान होतें. ह्या दंतकथेला सुंदर कल्पित कादंबरीइतकी किंमत देऊन ती प्रसवणारांच्या कल्पकतेचें अभिनंदन करण्याचें एकदां मनांत येतें; पण पुनः तींतील विसंगति, असंबद्धता इत्यादि गुणसमुच्चयाकडे लक्ष गेलें म्हणजे मन ओशाळें होतें. तरी पण हा प्रबंध रचण्यांत रचणाराची बहुतेक तपश्चर्या खर्च झाल्यामुळें तरी प्रतिकूलपक्षाच्या सात्विक सत्यनिष्ठेचें कौतुक केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं.

"आतां खऱ्या प्रकाराकडे वळूं." अशी प्रस्तावना करून ही खोटी दंतकथा ब्रह्मास्त्राच्या डौलानें अनुकूलपक्षावर रोंखिली म्हणजे आपलें काम झालें असें प्रतिकूलपक्ष समजतोसें दिसतें. पण प्रतिकूलपक्षानें पक्कें समजून असावें कीं, अनुकूल-पक्ष इतका दूधखुळा नाहीं, कीं प्रतिकूलपक्ष म्हणेल तें तो श्रुतितुल्य समजेल वरील दंतकथेच्या खरेपणाबद्दल प्रतिकूलपक्षानें काडीचाही प्रत्यंतर पुरावा दाखविलेला नाहीं. "या पांच घराण्यांच्या नांवावर (तीन ब्राह्मणेतर व दोन सारस्वत) या पद्ये घराण्याचे अधिकार चालू झाल्याबद्दल लेखी पुरावा मिळेल." अशा प्रति-

कूलपक्षाच्या नुस्त्या वाचनीक आश्वासनांनीं लेखी पुरावा मिळालासें होत नाहीं. प्रतिकूलपक्षाला आम्हीं असें विचारतों कीं, जर तसा पुरावा आहे म्हणतां तर तो दाखवावयाचा कधीं ? तुम्हीं धर्माच्या न्यायासना-पुढें भट्ट-प्रभूंच्याविरुद्ध न्याय मांडण्याकरितां उभे राहिलां आहां ना ? मग पुरावा दप्तरांत बांधून ठेवून नुसतें हात हालवीत जे श्रीचरणापुढें उभे ठाकलां ते नुसत्या तोंडच्या गोष्टी सांगण्याकरितांच कीं काय ? निग्रहानुग्रहसमर्थ श्री १०८ जगद्गुरुचरण—तुमच्या तोंडच्या गप्पाच प्रमाण मानून भट्ट-प्रभूंच्या विरुद्ध तुम्हांला न्याय देतील असें तुम्ही समजत असाल तर ही आत्मवंचना करीत आहां असें म्हणावें लागेल. पुराव्याशीं पुरावा व प्रमाणाशीं प्रमाण भिडविल्याशिवाय अनुमान-धपक्यावर न्यायनिष्ठ श्रीचरण निवाडा देतील ही खोटी कल्पना सोडून द्या. "अनुकूलवाद्यांस दंतकथेपेक्षां जास्त वजनाचा पुरावा आढळूं नये एवढ्यावरून त्यांची बाजू किती लंगडी आहे हें निदर्शनास येईल." असें म्हणणाऱ्या प्रतिकूलपक्षानें आपण बिन पुराव्याच्या काल्पनिक अशा खोट्या दंतकथेचाच आश्रय करावा यावरून त्याच्या कमालीच्या दुर्बल-तेची कल्पना होते. तशी, प्रतिकूल-पक्षानें आपली दंतकथा सदा कानां-पलीकडे कोणकोणास माहीत आहे हें सांगावें. ही दंतकथा वास्तविक विचारांत घेण्यासारखीच नाहीं. पण ती विचारांत घेतली नाहीं तर प्रतिकूलपक्षाला उगाच्या उगी हरला ! हरला !! अशी टिमकी वाज-विण्याला वाव दिल्यासारखें होणार. याकरितां तीवद्दल थोडें निरुपायानें विवेचन करणें भाग आहे.

वरील दंतकथेच्या मिषानें प्रतिकूल-पक्षाला असें भासवावयाचें आहे कीं, ज्या दोन गौडसारस्वतांच्या मदतीनें तिघां लफंग्यांनीं निःसंतान झालेल्या पद्मे घराण्याचे अधिकार गिळंकृत केले ते तिघे पद्मे तर नव्हतेच. इतकेंच नव्हे, सारस्वतांचा स्वतांचा उल्लेख असल्यानें सारस्वत ब्राह्मणही नव्हते ! अर्थात् ते ब्राह्मणेतर ठरत असल्यामुळें तेच हे भट्ट प्रभु नांवा-खालीं वावरणारे ब्राह्मणेतर होत. प्रतिकूल पक्षाला आम्हीं असें आव्हान करितों कीं, खोटे कागद करून एखाद्या विजातीय मनुष्यानें " अमक्या गोमाजीचा सजातीय म्हणजे त्याच्याच जातीचा वारस सोमाजी तो

मी 'असें दाखवून त्याची वतनवाडी गिळून पचविल्याचें एकादें उदाहरण दाखवावें, भंडारी लोकांत 'जोशी' असें आडनांव आहे. तेव्हां त्या जोशी भंडाऱ्यानें निर्वंश झालेल्या एखाद्या 'जोशी' नांवाच्या ब्राह्मणाचें वतन खोट्या दस्तैवजांनीं खातां येईल कीं काय! हें दाखवून द्यावें. 'बळी तो कान पिळी' अशा प्रकारच्या अराजकांनींही ढवळ्या दिवसा भलत्याची मुंडी मुरगाळून त्याची शेतवाडी भलत्याला लुबाडतां आली तरी अमक्या भटाचा वारस तो मी असें सांगून एखाद्या ब्राह्मणेतरास तसें करतां येणार नाहीं. दोघां गरीब अशा ब्राह्मणबंधूंची वतनवाडी घशांत उतरविण्यासाठीं एका धर्मकंचुकच्छन्न अशा गब्रूनें जानवीं घालून व भस्माचें त्रिपुंड्र लावून ब्राह्मणांचीं हुबेहूब सोंगें—आपल्या नोकरांस देऊन सरकारी कचेरींत रीतसर दस्तैवज केला होता. परंतु तोच कागद शेवटीं त्या गब्रूच्या गळ्यास गळफांस कसा झाला हें उदाहरण प्रतिकूल-पक्षाच्या अध्यक्षांनीं आठवणींत आणावें. "खोटे दाखले सरकारांत दाखल करून" असें ज्यापक्षीं प्रतिकूल-पक्षी म्हणतात त्यापक्षीं वरील दंतकथेच्या वेळीं सरकार होतें; 'मारील त्याची तरवार' असलें अराजक नव्हतें हें सिद्ध आहे.

अर्थात् वरील दंतकथा म्हणजे प्रतिकूलपक्षाची चिंध्यांची बाष्कळ दंतकंथाच आहे असें ठरतें. तेव्हां बनावट कागदपत्र केल्याचा खात्री-लायक पुरावा दाखवून-तिघे इसम ते कोण व कोणत्या जातीचे! त्यांच्या लुच्चेगिरींत भाग घेणारे गौडसारस्वत ते कोण! व निर्वंश झालेलें पद्ये घराणें कोणत्या गांवचें! इत्यादि बाबी प्रतिकूलपक्षानें निर्विवाद पुरावा दाखवून सिद्ध केल्या नाहींत तोंपर्यंत त्याच्या दंत-कथेला-तो आपला हा नवा अजब शोध म्हणत असला तरी—आम्हीं कवडी-मोल समजतों.

आतां प्रतिकूल पक्षी म्हणतात त्याप्रमाणें पद्ये ब्राह्मणघराण्याचे अधिकार लुबाडणारे तिघे इसम ब्राह्मणेतरच होते असें गृहीत धरलें तर त्यांनीं पद्यांचीं हुबेहुब सोंगें घेतलीं पाहिजेत; अर्थात् त्यांनीं त्या पद्यांचीं गोत्रेंही उसनीं घेतलीं पाहिजेत हेंही ओघानेंच सिद्ध झालें. येथवर सोंगाची बरोबर जुळणी झाली आतां पुढें प्रश्न असा कीं, त्यांनीं आपल्या मुलांमुलीं-

चा शरीरसंबंध कोणाशीं केला ? कारण ते तिघेही एकाच गोत्राचे झाल्या-मुळें उसन्या ब्राह्मणत्वास धोका येईल म्हणून सगोत्रविवाह करतां येणार नाहीं. पद्यांच्या अवशिष्ट चार घराण्यांशीं किंवा इतर कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांशीं करावा म्हटलें तर तेंही शक्य नाहीं. कारण ह्या पद्यांच्या तोतयांनीं आपल्या सजातीयांचा अधिकार हकनाक बळकाविला ह्या द्वेषानें व ते विजातीय असल्याची त्यांना जाणीव असणें शक्य असल्यानें त्यांना मुलगी देणार व त्यांची करणार कोण ? बरें, त्यांनीं एकमेकांतच किंवा त्यांच्या मूळच्या अब्राह्मण जातींतच शरीरसंबंध केला म्हणावें तर तें ब्राह्मणाच्या सोंगास शोभणार नाहीं. तेव्हां प्रतिकूलपक्षानें हें कोडें आधीं कसें तें उकलून दाखवावें. बरें, त्यांचा शरीरसंबंध कोणाशीं-ही व कसाही घडला असो; तिकडे आम्हीं दुर्लक्ष करून विचारतों कीं, भट्ट-प्रभूंची चढत्या काळांत जी लोकसंख्या ६००।७०० होती ती ह्या तिघां प्रतिसृष्टिविधात्याचीच कीं काय हें प्रतिकूलपक्षाच्या अध्यक्षांनीं सांगावें. त्या तिघांपासूनच हा एवढा ७०० लोकांचा वेलविस्तार— कश्यपाप्रमाणें निर्माण झाला असें म्हणणें असेल तर तो कसा झाला ह्या-बद्दलची उपपत्ति पटेल अशी सांगावी. आणि त्याप्रमाणें हे भट्ट-प्रभु अब्राह्मणांचेच वंशज होत असें म्हणावयाचें असेल तर प्रभु-समाजांत पूर्वी सहा गोत्रें; त्यांतून दोन गळून आज कौशिक, भारद्वाज, अत्रि व वत्स अशीं चार अवशिष्ट असून पैकीं एक आज संपण्याच्या मार्गांत आहे. परंतु ही वर्तमान परिस्थिति तूर्त आम्हाला पहावयाची नाहीं. फक्त ह्या तीन माणसांपासून त्यांच्यापुढील वंशजांत सहा गोत्रें कोठून व कशीं आलीं ? हा प्रश्न आहे. कारण गोत्र हें संततींत अनुवृत्त व्हावयाचें असल्यानें व एका व्यक्तीचीं एकाहून अधिक गोत्रें असणें शक्य नसल्यानें ह्या तिघां कूटस्थ पुरुषांच्या संततींत कदाचित् तिघांनीं तीन वेगळीं गोत्रें उसनीं घेतलेलीं असतील तर तीन गोत्रें असतील, सहा असूं शकणार नाहींत आणि भट्ट-प्रभूंत तर मागें सहा गोत्रें होतीं व आज चार आहेत. तेव्हां याचाही उलगडा प्रतिकूलपक्षानें करावा. आतां ह्या तिघां अब्राह्मणांच्या 'लुच्चेगिरीं'त (हा शब्द प्रतिकूलपक्षाच्या कैफियतींतला आहे !) भाग घेणाऱ्या दोघां गौड सारस्वतांचीं गोत्रें दोन-

व पद्यांच्या तीन तोतयांचीं तीन मिळून भट्ट-प्रभूंचीं पांच गोत्रें असें उलट बाजूचें म्हणणें असेल तर तें त्यांचीं गोत्रें सहा असल्यामुळें टिकत नाहीं. तेव्हां ह्या साऱ्या गुंतागुंतीच्या गौडबंगाली प्रश्नांचा प्रतिकूलपक्षानें सर्वसंमत होईल असा समर्पक जबाब द्यावा एक; किंवा आपली कपोलकल्पित दंतकथा निर्विकार मन करून शहाणपणानें मागें घ्यावी एक; याहून दुसरी तोड नाहीं. विकारवश होऊन एका उच्च जातीस नीच जातींत ढकलून देण्याचा मत्सरी डाव साधण्याकरितां टाळ्याला जीभ लावून कांहींतरी बाष्कळ तर्कटें रचण्यानें आपली बाजू सांवरत नाहीं. आणि असलीं बेजबाबदार विधानेंही कोणी ऐकून घेणार नाहीं. तेव्हां "हंसुनि कृप म्हणे कर्णा! सुज्ञांहीं ऐकतांचि डोलावें। ऐसेंचि बोलणें जरि तरि पुरुषानें दहां बोलावें॥' अशी आम्ही प्रतिकूलपक्षाला बंधुभावाची सूचना करीत आहों. आणि काय असेल तो सप्रमाण पुरावा दाखवून भट्ट-प्रभु समाजाला-सारस्वत, मराठे, वाणी, साळी, माळी, कुणबी किंवा दुसरें काय ठरवावयाचें असेल तें एकदांचें ठरवून शतकृत्य करावें असेंही त्यास आव्हान करीत आहों.

विषांतून अमृत निघावें त्याप्रमाणें प्रतिकूलपक्षाच्या दंतकथेंतून दोन ऐतिहासिक सत्यें अवचित निघत आहेत. पांच गांवच्या अधिकारावर पांच पद्ये-घराणीं होतीं हें एक व हीं पांच पद्ये-घराणीं कोणत्या तरी अज्ञात कारणानें बहिष्कृत होतीं हें दुसरें. कदंब राजांनीं अंत्रुज प्रांतांत पांच विद्वान् ब्राह्मण आणून ठेविले असा लोकप्रवाद मूळचाच प्रचलित असून त्यास प्रत्यंतर केरीचे गणेश अनंत ग्रामाधिकारी यांनीं स्मरणार्थ लिहून ठेवलेला शके १७०७ विश्वावसुनाम संवत्सर माघ शुद्ध भौमवारचा १४१ वर्षांचा जुना लेख आहे. त्यांत ते म्हणतात, "पूर्वीं कदमराजे (कदंब) म्हणोन कोंकणप्रांतीं राज्याधिकार करीत असतां गोवें प्रांत व फोंडें प्रांतीं सुज्ञ ब्राह्मण यागादि अनुष्ठानसंपादक कोण नाहींत यास्तव वरघांटी दूर प्रांतीं पत्रें पाठवून उत्तम ब्राह्मण चतुःशास्त्रसंपन्न पांचजण बहुमानपूर्वक आणून त्यांस पांच गांव अग्रहार करून दिले. प्रथम कवळें १, पिर्योळ २, केरी ३, खांडेपार ४, वेरें ५, एकूण पांच गांव धर्मार्थ देऊन स्थापना केली." ही हकीकत वडील सांगत होते ती लिहून ठेविली

असें गणेश अनंत अधिकारी म्हणतात. यावरून ही किंवदन्ति फार जुनी असून तिला प्रतिकूलपक्षाच्या कल्पित दंतकथेंतील उल्लेखिलेल्या पहिल्या सत्याशीं मेळ पडत असल्यानें फोंडे प्रांतांत मुख्याधिकारी पंचोपाध्ये म्हणतात तीं हींच वरील पांच घराणीं होत व बाकी आगंतुक असें सामान्यतः ठरतें. आतां भट्ट-प्रभु-प्रकरणाच्या बाबतींत प्रतिकूलपक्षाच्या दंतकथेंतिल–पद्येसमाज बहिष्कृत, असल्याचें दुसरें ऐतिहासिक सत्य आज प्रभावी होऊन तें प्रभु-समाजाला तारक होईल अशी बळकट आशा वाटूं लागली आहे. आणि अपकार करीत असतां प्रतिकूलपक्षाकडून न कळत उपकार घडल्याबद्दल त्याचे उपकारही वाटत आहेत.

आजपर्यंत सर्वतोमुखीं व सर्वमान्य असलेल्या प्रभुविषयक प्रसिद्ध आख्यायिकेप्रमाणें श्रींच्या प्रसादास वेळीं न पोचल्यानें मागच्या पंक्तीस जेवले ते भट्ट-प्रभु होत अशीच सर्वांची समजूत होती. परंतु एवढयाशा क्षुल्लक कारणावरून समाजचा समाज वार्ळीत पडावा हें विचारी माणसांस चमत्कारिक वाटत नव्हतें असें नाहीं. परंतु आज प्रतिकूलपक्षाच्या दंतकथेंतील वरील ऐतिहासिक सत्यानें जुन्या आख्यायिकेवर बराच प्रकाश पडून भट्ट-प्रभुविषयक प्रसिद्ध आख्यायिकेचा अर्थ सुसंगत लागतो. तो असा कीं, "पद्येसमाज हा कोणत्या तरी अज्ञात कारणानें पूर्वीं अपंक्त होता. आणि त्यास तीर्थप्रसादानुग्रहरूप प्रायश्चित्तविधीनें पंक्तिपावन करण्याचें ठरवून त्याप्रमाणें श्रीशृंगेरीच्या स्वामींनीं कवळ्यांच्या मुक्कामांत सर्व पद्ये व इतर ब्राह्मणांस आमंत्रण केलें, त्या वेळीं कांहीं मानी पद्ये हठाग्रहानें प्रसादास गेले नाहींत. ( अव्यस्थितपणामुळें जेवणें उरकल्यावर पोंचले हा प्रचलित दंतकथेंतला अभिप्राय खरा नाहीं.) बाकी सर्व तीर्थप्रसादग्रहणानें पावन झाले व मुद्दाम जे गेले नव्हते ते पूर्वीं अपंक्त होते तसेच राहिले. ( नवा बहिष्कार श्रींनीं त्यांजवर घातला नाहीं.) आणि तेच आज प्रभु-समाजाच्या रूपानें वेगळेपणाचें दुःख भोगीत आहेत! प्रचलित आख्यायिकेचा खरा अर्थ हा असा आहे. ह्याच अर्थास पोषक अशी माहिती मागें उल्लेखिलेल्या वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री बाक्रे यांच्या अभिप्रायांतही आलेली आहे. तो संबंध वाचल्यास खात्री होईल. त्यांत ते मोकळ्या मनानें असें लिहितात कीं, "वरील-

प्रमाणें भट्ट-प्रभु ज्ञातीविषयींची दंतकथा ऐकून मला त्यावेळीं या भट्ट-प्रभु-ज्ञातीशीं आपला (पद्यांचाच केवळ नव्हे तर कऱ्हाडे वगैरे सर्व ब्राह्मणांचा) तुटलेला व्यवहार सुरू होणें योग्य आहे व तो झाल्यास चांगलें होईल असें वाटलें ..... श्रीजगद्गुरूंनीं ( शृंगेरीच्या त्या वेळच्या स्वामींनीं ) विशेष प्रायश्चित्त न सांगतां केवळ तीर्थप्रसादास हजर रहाणें एवढ्यावर व्यवहार सुरू करण्याचें ठरविलें होतें. यावरून यांच्या हातून पातित्यहेतु असा दोष घडला नसून कांहीं तरी अल्पकारणानें इतर ब्राह्मणांशीं यांचा विरोध आला असावा व एका पक्षाच्या आग्रहानें तो दीर्घकाल चालून अव्यवहार दृढ झाला असावा असें वाटतें." ह्या एकंदर विवेचनावरून इतकें ठरलें कीं, सगळा पद्ये-ब्राह्मणांचा समाजचा समाज कसल्या तरी अविज्ञात कारणानें अपंक्त होता. आणि तें कारण अगदींच अल्प असलें पाहिजे. कारण, सगोत्र, सप्रवर विवाह, गोहत्या, ब्रह्महत्या इत्यादि भयंकर पातित्यास निमित्तभूत होणारें पातक जर या समाजाच्या पदरांत असतें तर बाक्रेशास्त्री म्हणतात त्याप्रमाणें श्रीजगद्गुरूंनीं, त्यांना नुस्त्या तीर्थप्रसादासारख्या सामान्य औपचारिक अनुग्रहावर एकपंक्तिव्यवहारास पात्र करण्याचें योजिलें नसतें. आतां, क्षुल्लक कारणावरून समाजचा समाज अशा तऱ्हेनें दीर्घकालपर्यंत बहिष्कृत रहाणें कसें शक्य होईल ? असें कोणी म्हणण्याचें कारण नाहीं ज्या काळांतली ही गोष्ट समजली त्या काळाचा व परिस्थितीचा विचार केला म्हणजे याबद्दलची नवलाई वाटणार नाहीं. केवढा तो सोवळा काळ! केवढी ती कातडी शुद्ध ठेवण्याकडे ( मन शुद्ध ठेवण्याकडे नव्हे हो ! ) हिंदुधर्मीयांची चिकाटी! कीं जिचा प्रभाव, आज मूर्तिमान अडीच लाख किरिस्तावांच्या रूपानें आमच्या टाळूवर मिऱ्यें वाटीत आहे! आमच्याच रक्तामांसाचे आमचे अडीच लाख भाऊबंद शुद्ध कातडी ठेवण्याच्या चिकाटीनें आज गोव्यांत आमच्या उशालगत आम्हीं ज्वलज्जहाल हाडवैरी करून ठेविले आहेत! तेव्हां कातडी सोवळी राखण्याची गोष्ट मरूं दे. एकीकडे कसला तरी अमेध्य पदार्थाचा तुकडा घरावर फेंकला तर ज्या वेळीं घरच्या घर अर्थात् घराच्या सावलींत सांपडलेलीं सर्व माणसें बाटत होतीं त्या सोंवळ्या काळांत एकादा सामान्य प्रमाददेखील पद्ये-समाज अपंक्त होण्यास पुरेसा होईल. याला

एक गमक, श्री १०८ जगद्गुरु शंकराचार्य संस्थान शृंगेरी यांच्या आज्ञापत्रांत (शके १६०४ फाल्गुन कृष्ण ५ बुधवार) श्रींच्या एका प्रश्नास क्रमवित् ब्राह्मणांनीं दिलेलें उत्तर असें आहे–" एवमेतेऽस्मत्संबंधिनोऽपि इदानीम् किंचित्कालमस्मद्व्यतिरिक्तकरहाटकाद्यागंतुकब्राह्मणसंबंधित्वादेतेऽधुनाऽस्मदीया इत्यस्माभिर्नोच्यते " हे (पद्ये) आमचे असले तरी कांहीं काल कऱ्हाडे, कोंकणस्थ इत्यादि आगंतुक ब्राह्मणांशीं यांनीं संबंध ठेवल्यामुळें यांना आम्ही आमचे म्हणत नाहीं. यावर पुन्हा श्रींच्या प्रश्नास पद्ये उत्तर देतात–" क्रमविद्ब्राह्मणैः शरीरसंबंधादिकमुच्यमानं सर्वं सत्यमेव परंत्वधुना किंचित्कालं पंक्तिभोजनं न क्रियते " क्रमविदानीं सांगितलेलें शरीरसंबंधादि नातें सारें खरें आहे. पण आम्ही त्यांच्याशीं कांहीं काळ पंक्तिव्यवहार करीत नाहीं. त्यावर पुन्हा 'तें कां ?' असें स्वामींनीं विचारल्यावर–" क्रमविद्भिरेव हठान्नाशितम् " क्रमविदांनींच पंक्तींत हट्टानें भोजन केलें नाहीं. असें पद्यांनीं सांगून " कपिलग्रामे गंगाराधनसमये जातपंक्तिभेदभोजनकं निमित्तं सविस्तरमुक्तम् " कवळ्यास गंगाराधन झालें त्या वेळीं पहिल्यांदा वेगळी पंगत झाल्याचें सविस्तर वृत्त पद्यांनीं सांगितलें. हीं श्रींच्या तोंडचीं २४४ वर्षांचीं मोलाचीं अस्सल अक्षरें असल्यानें त्याबद्दल संशय घेण्याचें मुळींच कारण नाहीं. ही हकीकत देण्यांत आम्हांला श्रीशंकराचार्यचरणांस इतकेंच दाखवून द्यावयाचें आहे कीं, कांहीं पातित्यदोष घडला नसतांही केवळ कऱ्हाडे आदिकरून ब्राह्मणांच्या द्वेषमत्सरानें प्रेरित होऊन " हे कऱ्हाडे, इत्यादि आगंतुक ब्राह्मणांशीं संबंध ठेवितात म्हणून यांना आपले म्हणत नाहीं!" असें एकाच वर्गांतल्या एका पक्षानें म्हणावें आणि 'हे' असा कलह माजवून समाजांत दुही व अस्वस्थता उत्पन्न करितात याकरितां आम्ही यांना पंक्तीस घेणार नाहीं " असें दुसऱ्या पक्षानें म्हणावें आणि त्याचें पर्यवसान, समुदायात्मक बहिष्कारांत होऊन मूळ जातीच्या चिंधड्या पडून पोटजाति निर्माण होण्यांत व्हावें! असले समाजघाताचे प्रकार जर २४४ वर्षांपलीकडच्या कालांत होऊं शकतात तर त्याच्याही पलीकडल्या कालांत जातींत पोटजाति उत्पन्न करणारे हटातटाचे प्रकार घडणें अपूर्व नाहीं.

क्षुल्लक कारणावरून पोटजाति कशा बनतात याचें,तावडतोब व हृदयास पटणारें शेजारचेंच उदाहरण पाहाण्यासारखें आहे तेवढें दाखल करितोः—गौडसारस्वत ब्राह्मणांच्या १० पोटजातींपैकीं बारदेशकर पोटजातीची उत्पत्ति अशी—फिरंग्यांच्या धर्मसमीक्षणसभेच्या ( वाटाघाटीच्या ) रोमहर्षण व भयंकर प्रसंगांत कांहीं बारदेशकर मंडळी, आपली वतनवाडी व घरेंदारें टाकून पळून जात असतां एका नदीच्या कांठीं झाडाखालीं उतरली आणि स्वयंपाक तयार करून आतां भोजन करणार इतक्यांत पाद्री लोक पाठलाग करीत येत आहेत अशी त्यांना बातमी समजली. त्या वेळीं आणीबाणीच्या अशरणस्थितींत ईश्वरावर भार घालून ते तयार केलेल्या स्वयंपाकाचीं भांडीं डोकीवर घेऊन होडींतून नदीच्या अलीकडे अंत्युज प्रांतांत सुरक्षितपणें उतरले आणि त्या ठिकाणीं बरोबर आणलेलें अन्न वाढून घेऊन त्यांनीं जेवण केलें. शिजलेलें अन्न होडींतून आणून जेवले हाच काय तो त्यांचा भयंकर धार्मिक गुन्हा. इकडे पाद्री बाटवितात म्हणून जात राखण्याकरितां हे जीव घेऊन पर-अंमलांत आले तर तिकडे पोट जाळण्यासाठीं आणलेल्या अन्नाचे चार घांस खाल्ले म्हणून त्यांच्या ज्ञातिबांधवांनींच त्यांना वाळीत टाकिलें! खासा न्याय! आई 'जेऊं घालीना आणि बाप भीक मागूं देईना' अशी बिचाऱ्यांची स्थिति झाली! "जातीसाठीं जाति। तुका म्हणे खाती माती॥" ह्या साधूक्तीप्रमाणें ह्यांनीं जात राखण्याकरितांच ही माती खाल्ली होती याचा उदार मनानें विचार करून व आपद्धर्म आणि समाजस्थैर्य यांकडे लक्ष देऊन धर्मगुरूंनींही त्यांजवर अनुकंपा केली नाहीं! ह्या बारदेशकरांप्रमाणेंच आणखी नऊ पोटजाति अशाच कोणत्यातरी क्षुद्र निमित्तानें सारस्वतांत निर्माण होऊन त्यांच्या ऐक्याच्या किल्ल्यास भेगा पडल्या आहेत! तात्पर्य, पद्ये-समाजाच्या बहिष्काराच्या बाबतींतही वरीलप्रमाणेंच कांहीं तरी हटातटाचा बनाव झाला असला पाहिजे, ह्या गोष्टीकडे श्रींचें लक्ष वेधावें म्हणून हा इतका आम्ही पाल्हाळ केला आहे.

आतां अनुभविक पुरावा पटल्याशिवाय असल्या कोरड्या शास्त्रार्थांनीं आमचें समाधान होणार नाहीं असें प्रतिकूलपक्षाचें म्हणणें असेल तर त्याच्याकरितां आम्ही एक महत्त्वाची साक्षच दाखल करितोः—कर्ना-

टकांत मंगळूरच्या आजूबाजूस पद्यांची वस्ती असून ते तिकडे आज घटकेला अपंक्त आहेत, याविषयीं वेदशास्त्रसंपन्न विष्णुशास्त्री सावैकर (पद्ये) मु० बेतगी, प्रांत अंत्रुज हे आपला स्वतःचा अनुभव असा सांगतातः—"मी सुमारें १२ वर्षांपूर्वी न्याय शिकण्याकरितां दीड वर्ष शृंगेरीमठांत होतों. मी महाराष्ट्रांतील असें सांगितल्यावरून माझी जेवणाची सोय मठांत झाली होती. त्यापूर्वी तिकडील प्रांतांतील पद्ये-जातीची एक बाई, संस्कृत शिकण्याकरितां आपल्या मुलास घेऊन वेगळें बिऱ्हाड करून तेथें राहिली होती. मीं सहज तिला म्हटलें—'तुमच्या मुलाची सोय मठांत झाली नसती काय?' ती कोंकणी भाषेंत म्हणाली—'इकडे पद्यांला इतर ब्राह्मण पंक्तीस घेत नसल्यानें माझ्या मुलाची सोय मठांत होण्याजोगी नाहीं'. त्यावर तिला मी सहज ओघांत बोलून गेलों. 'तर मीही पण पद्याच आहें'. ती म्हणाली; 'वेड्या, हें मला सांगितलेंस तेवढें पुरे. ही गोष्ट इकडे समजेल. तर तुला मठांतल्या जेवणास मुकावें लागेल'. याप्रमाणें विष्णुशास्त्र्यांनीं कळविलेल्या आपल्या अनुभवावरून व वर सप्रमाण शाबीत केल्याप्रमाणें पूर्वी सबंध पद्ये-समाज अपंक्त होता, त्यास पुढें श्रींनीं पावन केलें त्या वेळीं दुराग्रहानें पावन न होतां राहिले ते 'भट्ट-प्रभु' आणि त्याच अपंक्त पद्ये-समाजापैकीं कांहीं घराणीं, अपंक्त स्थितींत सगळा समाज होता त्या वेळीं येथून कर्नाटकांत जाऊन राहिलीं तीं आजमितीला तिकडे अलग आहेतही. इतक्या गोष्टी यावरून ठरत आहेत. यावरून म्हणजे इकडे आज भट्ट-प्रभू ज्या कारणानें व जसे अपंक्त आहेत त्याच कारणानें व तसे कर्नाटकांतील पद्ये अपंक्त आहेत हें सिद्ध झालें आहे.

येथपर्यंत तिसऱ्या मुद्द्याचें सप्रमाण खंडन करून खालील गोष्टी शाबीत केल्या आहेतः—

(१) प्रतिकूलपक्षाची कल्पित दंतकथा—तिची असंबद्धता, अप्रयोजकता व अनैसर्गिकता सप्रमाण दाखवून देऊन कशी साफ खोटी व द्वेषमूलक आहे हें शाबीत केलें आहे.

(२) प्रतिकूलपक्षाच्या दंतकथेंत न कळत पडलेल्या सत्य तत्त्वाशीं बाक्रेशास्त्र्यांनीं आपल्या अभिप्रायांत दिलेल्या भट्ट-प्रभुविषयक माहितीचा

कसा मेळ पडतो हें दाखवून त्याचा जोड प्रचलित आख्यायिकेशीं केला आणि तिचा सुसंगत व समर्पक अर्थ काय होतो तें विशद केलें आणि

( ३ ) एके काळीं पद्ये-समाजच अपंक्त असल्यानें त्या अपंक्तत्वांतूनच भट्ट-प्रभूंचा वेगळा तट कसा निर्माण झाला हें दाखवून पद्ये आणि प्रभु यांचें मूळ एकच असल्याचें आम्हीं सिद्ध केलें आहे.

मुद्दा ४ थाः—हा मुद्दा " प्रभु ही जात ब्राह्मणांत नाहीं. जातिविवेक ग्रंथावरून भलताच प्रकार निष्पन्न होईल." असा आहे. 'प्रभु' ही जात-ब्राह्मणांत नाहीं. ह्या प्रतिकूल पक्षाच्या घाडसी विधानावरून त्याच्या अज्ञानाची कल्पना होते. हे कूपमंडूकवृत्तीचे प्रतिकूलपक्षी "आपण आणि आपलें घरकूल" याच्या पलीकडे जग संपलें असेंच बहुधा समजतातसें दिसतें. आणि वरील विधानावरून असेंही निश्चित होत आहे कीं, ब्राह्मण काय ते कऱ्हाडे, चित्तपावन व पद्ये; गौडसारस्वतांस हा ब्राह्मण म्हणत नाहीं. ह्या त्याच्या साहसोक्तीचें आश्चर्य वाटतें. पंचगौड आणि पंचद्राविड मिळून ब्राह्मणांचे मुख्य १० मोठे वर्ग आहेत. त्याचेंही याला ज्ञान नाहीं. गौडांना हा पक्ष ब्राह्मण समजता तर वारदेशकर, पेडणेंकर, कुडाळदेशकर इत्यादि सारस्वतांच्या पोटसमाजांत शेंकडों 'प्रभु' उपनांवें असतां व तीं याला माहीत असतां—'प्रभु' जात ब्राह्मणांत नाहीं असें घडघडीत खोटें विधान तो करता ना! जातिविवेक ग्रंथ आत्मसंरक्षणासाठीं ढालेप्रमाणें पुढें करून 'आम्ही भट्ट-प्रभूंला चुटकीसरसे अब्राह्मण बनवूं' अशी धमकी अनुकूलपक्षाला प्रतिपक्षी देत आहेत. आम्हीही त्या धमकीचा तीव्र निषेध करून त्याना असें आव्हान करीत आहों कीं, तुम्हांला छाती असेल तर भट्ट-प्रभूंला कोणत्या जातींत घालावयाचें तें घालून दाखवा. 'जातिविवेकग्रंथाचा क्षारसमुद्र, आपल्या पोंचट बुद्धीच्या मोडक्या मंथनदंडानें घुसळून भट्ट-प्रभूंला मारणारे कोणतें जहर प्रतिपक्षी बाहेर काढणार आहेत, याचा कयास आम्ही आतांच बांधूं शकतोंः—" पूर्वी परशुरामानें कार्तवीर्याला मारलें त्या वेळीं त्याची कन्या भयानें पळून दाल्भ्य ऋषींच्या आश्रयास जाऊन राहिली. कांहीं दिवसानीं त्या आश्रमवनांत एक यात्रेकरू तरुण वैदेहक ( वैश्यापासून ब्राह्मण स्त्रीला झाला तो वैदेहक ) फिरत फिरत येऊन पोंचला

असतां फुलें वेंचीत असलेली ती तरुण राजकन्या त्याच्या दृष्टीस पडली. व त्याच्यापासून त्या कन्येला मुलगा झाला. तेव्हां दाल्भ्य ऋषींनीं–'हा मुलगा तुला कसा झाला तें खरें सांग' असें बजावल्यावर तिनें खरी हकीकत सांगितली. तेव्हां ऋषि म्हणाले—" तदा प्रोवाच स मुनिः परक्षेत्रोद्भवः सुतः, 'परभू' रिति संज्ञा च लोके ख्यातिर्भविष्यति॥" याचा अर्थ–ज्या-पक्षीं हा मुलगा परक्षेत्रांत म्हणजे परक्या ( आपल्या नव्हे ) स्त्रियेचे ठिकाणीं झाला त्यापक्षीं त्याचें नांव 'परभु' असें प्रसिद्धीस येईल." ही गडबडगुंडा पुराणांतली गोष्ट बहुधा प्रतिकूल पक्ष पुढें करून भट्ट-प्रभूंला परभु—जारजात बनविण्याची उमेद धरीत आहे असें दिसतें. आतां हें गडबडगुंडापुराण म्हणजे काय आहे तें सारें आम्हीं गुलदस्तांतच ठेवून प्रति-पक्षाच्या उमेदीची ऊब कायम राखीत आहों. मागील उताऱ्या-वरून उघड होत आहे कीं, भट्ट-प्रभूंला उद्देशून जो 'परब' शब्द रूढींत आहे त्यावर आतां प्रभूंला ब्राह्मणतर ठरविण्याची कसरत–माधवकृत 'शतप्रश्नलतिका ऊर्फ जाति-विवेकाच्या आधारावर प्रतिकूलपक्ष करणार आहे. आणि भट्ट-प्रभु आणि अनुकूलपक्ष यांजकरितां राखून ठेवलेला 'परब' शब्द हाच तोफगोळा होय. बिचाऱ्यांला 'प्रभु' शब्दाचा उच्चार फिरंगी भाषेंत 'परोब' असा होतो आणि तोच सामान्य लोकांच्या व्यवहारांत हें माहीत नसून भट्ट-प्रभु सही करतांना व लोक त्यांस पत्रें पाठवितांना पुरातन कालापासून 'प्रभु' शब्दाचाच उल्लेख करितात याचीही जाणीव नाहीं. एकादी भट्ट-प्रभूची 'परब' शब्दानें केलेली सही किंवा 'परब' शब्द वापरून त्यांस कोणी तरी पाठविलेलें जुनें पत्र पदरास पुण्याई असेल तर प्रतिकूलपक्षानें दाखवून द्यावें. सारांश, 'परोब' पोर्तुगीज भाषेंतला अज्ञानमूलक अपभ्रष्ट उच्चार आहे. एखाद्या पोर्तुगीज भाषाभिज्ञ ख्रिश्चनांकडून 'प्रभु' शब्दांचें भाषांतर करून घेऊन प्रतिकूल-पक्षानें खात्री करून द्यावी.

'प्रभु, हें अधिकारदर्शक उपपद आहे हें न समजतां प्रतिकूलपक्ष, अज्ञानानें ती एक जाति समजतो याचें हंसूं येतें. आतां त्याच्याच समजुती-प्रमाणें ती प्रभु जात ब्राह्मणांत म्हणजे पंचद्राविडांत–इतकेंच नव्हे तर पद्यांतही आहे कीं नाहीं हें पाहूं–कऱ्हाडेसमाजांत वसिष्ठ व जामदग्न्य

अशा दोन गोत्रांचें 'प्रभु-देसाई' आहेत याबद्दल गोत्रावळ पाहून खात्री करून घ्यावी—भट्ट-प्रभूंना ते ब्राह्मण समजत नाहींत म्हणून तूर्त त्यांच्या समजुतीपुरते व ते धारण करीत असलेल्या 'प्रभु' शब्दावरच त्यांचा हल्ला असल्यानें त्यांच्यांतील प्रभु-देसाई आम्हीं जमेस धरीत नाहीं. परंतु पद्यांतलेच प्रभु-देसाई नेत्रावळीस नांदत आहेत हें प्रतिकूलपक्षाला माहीत नसेल तर आम्ही त्याच्या नजरेस आणतों. देशस्थांत व कोंकणस्थांत 'प्रभु-देसाई' असल्याची माहिती आम्हांस अद्याप मिळाली नाहीं. जगांत ब्राह्मणसंज्ञा काय ती पंचद्राविडांलाच आहे अशी ह्या विरोधकांची समजूत असल्यानें 'बारदेशकर, कुडाळदेशकर, पेडणेकर इत्यादि सारस्वतांच्या पोटजातींत 'प्रभु-देसाई' असले तरी तेही आम्ही सांगत नाहीं. यावर प्रतिकूलपक्षी असें म्हणत असतील कीं, "आमचा फक्त 'प्रभु' ह्या एकेरी आडनांवाच्या जातीबद्दल आक्षेप आहे. 'प्रभु-देसाई' ह्या जोड नांवाबद्दल नाहीं." तर त्यासंबंधानें 'प्रभु' एवढेंच एकेरी उपनांव पोटजातींतलें असो एका बाजूस; खुद्द पद्यांतलेंच आम्ही दाखवितों.

विजयनगरचा श्रीमन्महाराजाधिराज परमेश्वर श्रीवीरहरिहरराज याचा प्रधानमंत्री, सकलवेदोपनिषन्मार्गप्रवर्तकाचार्य श्रीमन्माधवराव यांचा ताम्रपट प्रतिकूलपक्षाला अमान्य करवणार नाहीं. हा ताम्रपट १३१३ शकांतला प्रजापतिनाम संवत्सर चैत्र वद्य ३० मंगळवारीं पडलेल्या सूर्यग्रहणपर्वाचे वेळीं आपली आई माचांबिका हिचें नांव दिलेला मांचलापुल नांवाचा जुन्या गोव्यातील बोंबाली व मौलि ह्या दोन गांवांचें एक क्षेत्र करून बनविलेला अग्रहार सहिरण्योदकधारापूर्वक बारा ब्राह्मणांस दिल्याबद्दलचा आहे ह्या ब्राह्मणांचीं नांवें, गोत्रें व ते कोणत्या कोणत्या गांवांतून आणले ह्याचा तपशील दिला आहे. यांत कपिलेश्वर गांवांतून आणलेला अत्रि-गोत्री केशव गोविंद प्रभु नांवाचा एक षडंगवेत्ता ब्राह्मण आहे या-संबंधीं ताम्रपटांतलें संस्कृत वाक्य: "कपिलग्रामात् गोविंदप्रभुपुत्राः केशवषडंगविदः अत्रिगोत्राः" असें आहे. यांत इतर अकरा ब्राह्मणांप्रमाणें याला भट्ट किंवा पंडित असें म्हटलेलें नाहीं. तेव्हां तो कपिलेश्वर येथील पद्यांपैकीं प्रभु उपनांवाचा षडंगवेदवेत्ता महाविद्वान् ब्राह्मण होता असें उघड दिसतें. ह्या बारा ब्राह्मणांत कऱ्हाडे, पद्ये, कोंकणस्थ व क्रमवित्

म्हणजे जोशीही आहेत. हा महत्त्वाचा ताम्रपट तत्कालीन परिस्थिति दाखविणारा केवळ आदर्श असल्यामुळें यथाप्रत शेवटीं जोडला आहे. हे माधवराज, भरद्वाजगोत्री द्विवेदी चौडिभट्टांचे पुत्र अर्थात् पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण आहेत; क्षत्रिय नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एकंदरींत त्या ताम्रपटांतून हा सिद्धांत निघतो कीं, कपिलेश्वर येथील वेदशास्त्रसंपन्न केशव गोविंद प्रभु हे निःसंशय पद्यांतले प्रभु होत. हे केशव प्रभु अत्रि-गोत्री असून भट्ट-प्रभूंत अत्रिगोत्री प्रभु आहेत.

यावरून हे भट्ट-प्रभु पद्यांतीलच आहेत हें कोणिही विवेकी कबूल करील. यावर प्रतिकूलपक्षी म्हणतील कीं, " ताम्रपटांतील केशव प्रभु हा जर पद्ये ब्राह्मणांतील आहे असें म्हणावयाचें तर आज पद्ये ब्राह्मणांत 'प्रभु' आडनांव कां दिसूं नये ? " असा कोणी आक्षेप घेतील तर त्याचें समाधान करणें कठीण नाहीं. आज प्रभु उपनांव पद्यांत नसलें म्हणून तें ५३५ वर्षांपूर्वीं नसलें पाहिजे असें होत नाहीं. वेगळ्या झालेल्या समाजांत प्रभु उपनांवाचींच घराणीं आधिक्येंकरून काकतालीयन्यायानें समाविष्ट झालीं असण्याचाही संभव असून पद्यांत तीं थोडीं अवशिष्ट राहिलीं असावींत व कालवशात् तीं नष्ट झालीं असावींत. आज तरी भट्ट-प्रभु-समाजांत सगळींच 'प्रभु' उपनांवाचीं घराणीं नाहींत.

'प्रभु', 'प्रभु देसाई', 'भट, देवारी', व 'गांवकार' अशा आडनांवांचीं घराणीं आहेत, तेव्हां योगायोगानें त्यावेळीं हटातटाच्या बहिष्कृत मेळ्यांतच अधिक 'प्रभु' सांपडले व कांहीं थोडे पद्यांत राहिले ते काल प्रवाहांत गडप झाले हीच विचारसरणी खरी आहे. दुसरी कोणतीच प्रतिकूलपक्षाला पसंत पडण्याजोगी नाहीं, कारण तो अग्रहारांतला केशव प्रभु पद्यांतला नसून भट्ट-प्रभु-समाजांतला आहे असें म्हणेल, तर भट्ट-प्रभूंचें ब्राह्मण्य त्यांच्या तोंडानेंच शाबीत होणार आहे. आणि तसें होणें तर त्यांना नको आहे. वास्तविक हा केशव षडंगवेत्ता प्रभु, भट्ट-प्रभु समाजांतील म्हटला तरी त्यामुळें त्या समाजाचें नुकसान नसून इष्टापत्तीच आहे. कारण, भट्ट-प्रभूंला " कोणी दान दक्षिणा देत नाहींत " असें धादांत खोटें बोलणाऱ्या प्रतिकूलपक्षाचें म्हणणें त्याच्याच आंगाला येऊन भट्ट-प्रभु हे यजन याजन, अध्ययन अध्यापन, दान प्रतिग्रह,

ह्या षट्कर्मांचे अधिकारी मूळपासूनच आहेत असें सहजच ठरणार आहे. मात्र यांतला खरा प्रकार, ताम्रपटांतला केशव गोविंद प्रभु हा पद्यांतला होता ह्याच होय.

" भट्ट प्रभु हे पद्ये होते असें गृहीत धरलें तर 'भट्ट-प्रभु' हें नांव त्यांना कधीं व कसें प्राप्त झालें ? " असें प्रतिकूलपक्षाचें एक विधान आहे. हें विधान म्हणजे प्रतिकूलपक्षाच्या भाषाज्ञानाची कसोटी होय. भाषेचे संप्रदाय कसे रूढ होतात हें ह्याला माहीत नाहीं. जगांत नांवें पडतात तीं दुसऱ्यानें दिलेलीं असतात. कोणी आपणच आपल्याला नांव ठेवीत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला नांव त्याचीं मातापितरें देतात; हे नामकरणाचे प्रयोग चालविणाऱ्या प्रतिकूलपक्षाचे अध्यक्ष, यांना समजूं नये याचें आम्हांला अत्यंत आश्चर्य वाटतें. आम्हीं त्यांना असे विचारतों कीं, 'अहो ! तुम्हांला निगळ्ये आडनांव कोणी ठेवलें ?' तर त्यास ते काय सांगतील ? आडनांवें पडतात तीं ठिकाणांवरून, वाडीवरून, गांवावरून किंवा धंद्यावरून पडतात व तीं दुसऱ्यानें दिलेलीं असतात. कोणी विलक्षण धाडसी पराक्रम करून वाघ मारला म्हणून त्याला 'वाघमारे' लोकांनीं म्हटलें, तेंच पुढें परंपरेनें त्याच्या वंशाचें आडनांव झालें. जावळे ठिकाणांत मालकानें राहूं लागले म्हणून कुलकर्ण्यानें त्याला जावळे आडनांव कागदोपत्रीं दिलें. कोणी जेवण्याचें ताट राजाकडे पोंचविण्याचें काम पत्करलें म्हणून त्यांचें वंशपरंपरया ताटकर उपनांव झालें. किंजवडे गांवांत राहूं लागले म्हणून किंजवडेकर झाले. सारांश, उपनांवांची उपपत्ति ही अशी आहे. आणि याचप्रमाणें भट्ट प्रभु, ह्या आडनांवाची थोडी निराळी उपपत्ति आहे. ती दोन प्रकारची संभवते. पहिली—भट्ट आणि प्रभु ह्या दोनच आडनांवाचे पद्ये प्रथम फुटले त्यावेळीं पद्यांतून त्यांचें वेगळेपण दाखविण्याकरितां पद्यांनींच त्यांना भट्ट-प्रभु, असें जोडनांव दिलें असलें पाहिजे. आणि दुसरी—सारस्वत ब्राह्मणांत कित्येक इतर जातींतही 'प्रभु' हें आडनांव आहे तेव्हां त्यांच्याशीं व्यावर्तक म्हणजे भटांतले प्रभु बामणांतले,—सारस्वत ब्राह्मणांतले नव्हत. अशा अर्थाचें द्योतक असें 'भट्ट-प्रभु' असें जोडनांव त्याला, पद्ये, सारस्वत ब्राह्मण वगैरे शेजारच्या लोकांनीं सोईसाठीं दिलें. वरील दोन उपपत्तींपैकीं दुसरीच

समर्पक वाटते. सांगावयाचें काय कीं, प्रभुसमाजाच्या मागें 'भट्ट' हें उपपद त्या समाजानें आपण स्वतः लावून घेतलेलें नसून वरीलप्रमाणें रूढींत आलेलें आहे. ते लोकांना व लोक ह्यांना पत्रें पाठवितात तीं 'भट्ट-प्रभु' ह्या नांवानें नसून 'प्रभु' नावानेंच लिहितात, याची कोणींही खात्री करून घ्यावी. " प्रभू ह्या शब्दाचा अर्थ काय ? " असा-ही प्रतिकूलपक्षानें एक प्रश्न करून आपलें अज्ञान व हृदयाचें अनौदार्य प्रकट केलें आहे. आणि मागें दाखवून दिल्याप्रमाणें प्रभुशब्दाचें 'परोब' असें रूढींत असलेलें अपभ्रष्ट स्वरूप उराशीं बांधून तें उपनांव धारण करतो म्हणून भट्ट-प्रभुसमाज, अब्राह्मण अशी त्यानें खोटी समजूत करून घेतली आहे. प्रतिकूलपक्षाच्या समजुतीसाठीं प्रभुसमाजाचें उपनांव 'प्रभु' नसून 'परोब' असेंच आहे हीच गोष्ट गृहीत धरून त्याला आम्हीं असें विचारतों कीं, एकादें चमत्कारिक व अभद्र नांव किंवा उपनांव ब्राह्मण-व्यक्ति किंवा समाज धारण करीत असला तर तितकेंच कारण, भाव दुष्ट व शब्द-दुष्ट असे जेवणांतले पदार्थ अपवित्र होतात त्याप्रमाणें त्याला अब्राह्मण म्हणण्यास पुरेसें होईल काय ? याचें उत्तर 'होय' असें असेल तर–कऱ्हाड्यांत रेडे, ढोरे व माळी आणि कोंकणस्थांत आगलावे अशीं उपनांवें आहेत. व सारस्वतांत वगैरे मांग हें नांव आणि भंगी उपनांव आहे. तेव्हां त्या ब्राह्मणांस ब्राह्मणत्वापासून ढकलून देणार काय ? तात्पर्य, नुसतीं तर्कटें आणि वितंडवाद माजवून कोणत्याही ज्ञातीस कमी लेखणें शहाणपणाचें नाहीं.

येथवर आम्हीं चवथ्या मुद्द्याचें सप्रमाण खंडन करून खालीलप्रमाणें गोष्टी शाबीत केल्या आहेतः—

( १ ) 'प्रभु, देसाई' हीं उपनावें कऱ्हाडे, पद्ये आणि भट्ट-प्रभु यांत आहेत.

( २ ) फक्त 'प्रभु' एवढ्याच उपनांवाचीं घराणीं भट्ट-प्रभु समाजांत आज आहेत व पूर्वीं पद्यांतही होतीं, हें शके १३१३ त माधवराज-मंत्रीश्वरानें बारा ब्राह्मणांस जो अग्रहार दिला त्यांत केशव गोविंद प्रभु नांवाचा एका महाविद्वान् अत्रिगोत्री पद्ये ब्राह्मण होता व आज

भट्ट-प्रभूंतही अत्रिगोत्राचे प्रभु आहेत हें अस्सल ताम्रपटावरून दाखविलें आहे.

( ३ ) त्यांचें अधिकारसूचक 'प्रभु' व 'प्रभु देसाई' हेंच मूळ उपनांव असून 'भट्ट' हें व्यावर्तक उपपद त्यांच्या आडनांवामागें लोकांनीं जोडलें आहे. 'परोब' हें पोर्तुगीज भाषेचें अपभ्रष्ट रूप होय.

( ४ ) भट्ट-प्रभुसमाजांत प्रभु, प्रभु-देसाई, गांवकर व देवारी अशीं आडनांवें आहेत. सर्व समाज 'प्रभु' आडनांवाचा आहे अशी कोणाची समजूत असेल तर ती खोटी आहे. आणि हींच बहुतेक आडनांवें पद्यांतही असल्यानें पद्यांचें व भट्ट-प्रभूचें मूळ एक आहे हें सिद्ध आहे.

मुद्दा ५ वा:—हा मुद्दा " भट्ट प्रभूंची भाषा पद्यांप्रमाणें नसून आचार-विचारही त्यांच्याप्रमाणें नाहीं." असा आहे. वास्तविक विचारी मनुष्याला लक्षांतही न घेण्याजोगा जर कोणता मुद्दा असेल तर तो हा भाषेचा होय. याबद्दल गेल्या परिषदेंत विद्वानांनीं सविस्तर विवेचन करून तो मुद्दा खोडून काढला असतांही असंतुष्ट अशा प्रतिकूलपक्षाचें समाधान झालें नाहीं, व तें पुढें तरी होईलच असेंही सांगवत नाहीं. तरी पण त्याचें समाधान होवो न होवो; भाषेचा मुद्दा कसा फोल आहे हें दाखवून देणें आमचें कर्तव्य असल्यानें त्याविषयीं आम्ही थोडा विचार करीत आहों.

भाषा ही परिस्थितीनें बदलूं शकते. ज्यांच्याशीं बहुकाळ संबंध घडतें त्यांच्याप्रमाणे भाषा बनते हा अनुभव आहे. " एकाच जातीची भाषा निराळ्या देशांत राहून निराळी असूं शकेल पण एकाच खेडेगांवांतील ह्या दोघांची भाषा निराळी कां ?" असें प्रतिकूलपक्षी म्हणतात. या बाबतींत थोडा तरी विचार प्रतिकूलपक्षानें केला असता तर त्याला भट्ट-प्रभूंची भाषा वेगळी असल्याचें नवल वाटलें नसतें. बोरी व शिरोडें या दोन गांवांपैकीं शिरोडें गांवांत—भट्ट-प्रभू वेगळे झाले त्या वेळीं पद्यांचें घर एकही नव्हतें. आज शिरोडयांत पाटील, बुकले, सहकारी, परांजपे व फडके हीं जीं इतर ब्राह्मणांचीं घरें दिसतात, त्यांपैकीं सहकारी हे अलीकडे सुमारें ५० वर्षांपूर्वीं येऊन राहिले आहेत. बोरीचे विद्यमान श्रीमंत रघुनाथ शाबा प्रभुसावकार यांच्या आजोबांनीं परांजप्यांस आणून ठेवलें

आहे. शिरोडयाच्या श्रीशिवनाथाचा पुजारी पूर्वी भट-प्रभूंपैकीं होता त्याचा निर्वंश झाल्यामुळें त्या जागीं फडक्यांना व बुकल्यांना गांवकरांनीं ( म्हणजे प्रभुगांवकरांनीं)आणून ठेविलें. ढवळकर हे तर गेल्या २५।३० वर्षांतले असून पाटील मात्र बरेच जुने असावेत. मिळून सांगावयाचें तात्पर्य हें कीं, भट्ट-प्रभु वेगळे झाले तेव्हां शिरोडयांत त्यांच्यावांचून ( प्रभु-पद्यांवांचून ) दुसरे कोणी पद्ये नव्हते. आतां बोरी येथें आज बोरकर उपनांवाचीं दोन पद्ये ब्राह्मणांचीं घरें आहेत. [ हे आपल्याला बोरकर म्हणवितात; परंतु पूर्वी यांचें आडनांव उपाध्ये होतें. यांचे वारस खांडेपार येथें असल्यानें हेही तेथूनच बोरोला रहावयास केव्हां तरी आले असावे. शिवाय खांडेपारचा पांचवा उपाध्या व्यवहारांत जो आढळत नाहीं तें मूळचें घराणें हेंच असावें. व तो प्रभु-पद्यांचा उपाध्या असून त्यांची वस्ती बोरी-शिरोडयालाच असल्यानें त्यांच्याकडचें पौरोहित्य सांभाळण्याकरितां खांडेपाराहून एक पुरुष बोरीला येऊन राहिला असावा. ही संगति आम्हीं मागें तिसऱ्या मुद्दयांत दिलेल्या करारनाम्यावरून लावीत आहों. याचें दिग्दर्शन तेथेंच केलेलें आहे.] मिळून बोरी-शिरोडें मिळून आज पद्यांचीं हीं सात घरें दिसत असलीं तरी भट्ट-प्रभु पद्यांतून फुटलेले त्या वेळीं बहुधा ह्या दोन गांवांत दोहोंहून अधिक घरें त्याचीं नव्हतीं ही मुख्य गोष्ट दाखवावयाची आहे. आतां ह्या दोन गांवांत आज जर ३५।४० घरें भट्ट-प्रभूंचीं आहेत तर त्या वेळीं ५०—६० तरी असलीं पाहिजेत. आणि त्याच मानानें सारस्वत ब्राह्मणांची वस्ती वरील गांवांत प्रभुसमाजाहून कमी पण जुळती असावी. हा आम्हीं अनुमानप्रमाणावर आंखलेला नक्काशा—आजही दोन गांवांतील वस्तीशीं तुलना करून पाहिल्यास कोणालाही बरोबर वाटेल.

आतां वरील वस्तुस्थितीचा नक्काशा डोळ्यांपुढें ठेवून त्याचा परिणाम भट्ट-प्रभूंच्या भाषेवर कसा होईल याचा निर्विकार मनानें प्रतिकूलपक्ष विचार करील तर तो फिरून त्यांच्या भाषेविषयीं आक्षेप घेणार नाहीं अशी खात्री वाटते. कारण प्रतिकूलपक्षाला ईश्वरानें बुद्धीची देणगी दिलेली आहे. तेव्हां आतां प्रतिकूलपक्षानें सांगावें कीं, भट्ट-प्रभूंची पद्ये समाजाशीं 'गडी फू'! म्हणजे, ताटातूट झाली आहे; पद्यांनीं आपले

दरवाजे लावून घेऊन त्यांना बाहेरच ठेवलें आहे; शिवाय ते पद्येही यांच्या गांवांपासून दूर दूर अंतरावर राहिलेले असून यांच्या शेजारास पद्ये मुळीं नसल्यासारखेच आहेत; आणि सारस्वतांच्या मोठ्या समुदायाशीं अनेक बाजूंनी नित्य संघटन यांना घडत आहे. तर अशा परिस्थितींत शेंकडों वर्षांच्या संघर्षणानें भट्ट-प्रभूंच्या भाषेवर सारस्वत ब्राह्मणांच्या भाषेचा परिणाम व्हावा कीं दारें झांकून यांचा संबंध तोडलेल्या किंवा बोरी-शिरोडें मिळून २।३ पद्ये-घराण्यांच्या भाषेचा परिणाम व्हावा? भाषा किंवा चालचलणूक यांचा एकमेकांवर संस्कार होण्यास एकमेकांच्या येथें जाणें-येणें, एकत्र जेवणें-खाणें, साजात्याच्या मानसिक ओढ्यानें परस्पर विविध सांसारिक व्यवहार अखंड चालू राहाणें इत्यादि गोष्टी अवश्य आहेत. घरांतले-चुलीकडले रीतरिवाज, सणवार, व्रतेवैकल्यें व दानधर्म-संप्रदाय शुद्ध रहाण्यास बायकाबायकांत एकमेकींच्या गांठीभेटीची व खेळीमेळीच्या रहाणीची आवश्यकता असते. वर लिहिलेल्या परिस्थिती-वरून ह्या सर्व आवश्यक गोष्टींचा अत्यताभाव झाल्यानें, शिवाय भट्ट-प्रभु हे जात्याच गृहस्थवाण्याचे व धनिक असल्यानें त्यांचा एकंदर व्यवहार, व्यवसाय, सारस्वत ब्राह्मण व तदितर लोक यांच्याशींच घडत असल्यानें त्यांच्याच भाषेनें भट्ट प्रभूच्या भाषेवर पगडा बसविणें अपरिहार्यच आहे हें कोणीही तज्ज्ञ कबूल करील. यावरून भट्ट प्रभूंची भाषा वेगळी कां याचें कारण प्रतिकूलपक्षानें पटवून द्यावें. आतां समजूतच द्यावयाची नसून आणि आम्ही म्हणूं तें धोरण व बांधूं तें तोरण हाच हट्ट जर धरावयाचा असेल तर अशा दुराराध्य मंडळीस 'ब्रह्माऽपि च तं नरं न रंजयति!' अशा कोटींतली समजून श्रीचरणांवर भरंवसा ठेवून सत्य गोष्टी निवेदन करणें आमचें कर्तव्य आहे. सरस्वतीभूषण वामनशास्त्री किंजवडेकर यांनीं गेल्या परिषदेंत "भाषाभेदावरून वर्ण किंवा जाति ठरविणें अयोग्य होईल." असें सप्रमाण सांगितलेलें होतें तें कोणीं खोडलेलें नाहीं. त्रयस्थ या नात्यानें श्री० भास्कर हरि वेल्हे नि० श्री-जगद्गुरु यांनींही "विषम भाषा असून जाति एक असेल" असें सभें-तच सांगितलेलें आहे. यावरून भाषेचा मुद्दा गौण आहे हीच गोष्ट सर्व-संमत ठरते. आणि भट्ट-प्रभूंच्या सभोंवतींची वर दाखविलेली परिस्थिति

त्यांची भाषा बदलण्यास कशी कारण झाली हेंही श्रीचरणांनीं विचारांत घेतलें म्हणजे भाषेच्या भेदाचें निमित्त पुढें करून भट्ट प्रभूंला, निव्वळ दुराग्रहानें प्रतिकूलपक्षी पेचांत आणण्याचे डाव खेळत आहे याचा प्रकाश त्यांच्या मनावर पडणार आहे.

आतां परिस्थितिभेदानें एकाच जातींत भाषाभेद प्रत्यक्ष पहाणें असेल त्यानें जगाचें सूक्ष्म निरीक्षण करावें. सावंतवाडी संस्थानापैकीं तुळसमातुंड, वडखोल इत्यादि खेडेगांवांतून वंशपरंपरेनें शेती करणाऱ्या ब्राह्मणांचा सर्व काळ कुळवाड्यांशीं वाग्व्यवहार व सहव्यवसायांत जात असल्यानें ते आपल्या घरांतदेखील कुळवाड्यांची मालवणी भाषा बोलतात. पेडणें महालातील एका गांवात असलेल्या एका ब्राह्मण घराण्याचा नित्य सहवास ब्राह्मणेतरांशींच असल्यानें त्यांतील नायकसुद्धां सर्व घरचीं माणसें एकमेकांशीं कुळमटांची भाषा बोलतात ! तेरेखोलनजीक रेडी गावात असेंच एक कुळवाडी भाषा बोलणारें ब्राह्मण घराणें आहे. ह्या गोष्टीची प्रत्यक्ष अनुभवानें प्रतिकूलपक्षानें खात्री करून घ्यावी. अशीं आणखी हवीं तेवढीं उदाहरणें दाखवितां येतील. तेव्हां कुणब्यांची भाषा बोलणाऱ्या ह्या ब्राह्मण घराण्यांस प्रतिकूलपक्ष अब्राह्मण म्हणणार काय ? कुणब्याची भाषा बोलणाऱ्या वरील ब्राह्मणांस श्राद्धमहालयांत क्षणास बोलावतात व त्याचे येथेंही इतर ब्राह्मण क्षणास बसतात. सारांश, परिस्थिति भाषाभेदास कारण आहे. आणि भाषाभेद असला तरी त्यामुळें ब्राह्मण्यास मुळींच हानि नाहीं, हें वर सांगितलेलीं भाषाभेदाचीं प्रत्यक्ष उदाहरणें जमेस घेतलीं आणि भट्ट-प्रभु वेगळे झाल्यानें त्याचें मातृसमाजाशीं बाह्याभ्यंतर संघटन तुटून ते शेंकडों वर्षें सारस्वतसमाजाशीं जडलें, हा इतिहास डोळ्यांपुढें ठेवला तर प्रतिकूलपक्षानें कैफियतींत "भाषा निराळी असूं शकेल व असेलही हें म्हणणें फार सोपें आहे. पण तें कां ? हें सांगणें फार कठीण आहे" हें केलेलें विधान कसें चुकीचें आहे याची त्याला खात्री पटेल. आणि निराळी कां असते हें सांगणें किती सोपें आहे हें त्याचें त्यालाच समजूं लागेल.

परिस्थितीनें भाषा बदलते पण भाषाभेदानें ब्राह्मणत्व नष्ट होत नाहीं हें येथवर दाखविलें; तरी या बाबतींत म्हणजे भट्ट-प्रभूंच्या भाषाभेदा-

विषयीं खरा प्रकार निराळा आहे. तो हा कीं, संबंध पद्येसमाजाची भाषाच कोंकणी होती. याचें प्रत्यंतर, कर्नाटकांत मंगळूर वगैरे भागांत जे पद्ये आहेत त्यांची भाषा आज कोंकणी आहे! याबद्दल तिसऱ्या मुद्द्याच्या खंडनांत वे० शा० विष्णुशास्त्री सावैकर, पद्येब्राह्मण यांची साक्ष दिली आहे ती पहावी. तेवढ्यानें समाधान होत नसेल तर कर्नाटकांत मनुष्य पाठवून प्रत्यक्ष खात्री करून ध्यावी. यावरून हें उघड झालें कीं, साऱ्या पद्यांची मूळची भाषा एक असून ती आज भट्ट-प्रभु बोलतात तीच होय. श्रीस्वामींनीं पद्यांला पावन करून घेतलें त्या वेळीं जो त्यांतलाच भाग आग्रहानें वेगळा राहिला त्याचा व्यावहारिक सबंध सारस्वतांशीं निगडित झाल्यानें उभय भाषैक्यानें भट्ट प्रभूंची जन्मभाषा कायम राहिली आणि पद्यांनीं कऱ्हाडे, चित्पावन यांच्याशीं नित्यसंघटन ठेवून आपली मूळ कोंकणी भाषा,—कऱ्हाडे-चित्पावनांच्या भाषांचीं तीवर पुटें देऊन ना पद्यांची, ना कऱ्हाडयांची आणि ना चित्पावनांची! अशी तिरंगी बेरंगी करून घेतली आहे! व कांहीं कऱ्हाडयांनींही अशीच आपली भाषा बिघडवून ते पद्यांशीं सारूप्य पावले आहेत! याचीं उदाहरणें पिर्येळचे देसाई, शिरोड्याचे पाटील इत्यादि होत. ह्या आमच्या विवेचनावरून प्रतिकूलपक्षाचें समाधान-त्याच्यांत थोडा तरी समंजसपणा व तत्त्व-निरीक्षण करण्याची शक्ति असेल तर झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

आतां आचारादिकांचा विचारः—परिषदेच्या पहिल्या दिवशीं आचाराविषयीं झालेल्या उलटसुलट चर्चेचा निर्णय करण्याकरितां अध्यक्षांनीं प्रत्येक पक्षानें आपआपले पांच पांच प्रतिनिधि निवडून द्यावे असें सांगितल्याप्रमाणें त्या १० प्रतिनिधींशीं अध्यक्षांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं खल केला. ते प्रतिनिधि येणेंप्रमाणें:—

| अनुकूलपक्षी | | प्रतिकूलपक्षी | |
|---|---|---|---|
| १ | वासुदेवभट्ट खेडकर. | १ | अनंतशास्त्री सहकारी, |
| | वेरें, अनुज. | | सांवडें, गोंवा. |
| २ | केशवभट्ट पाटील. | २ | त्रिविक्रम विष्णु सहकारी, |
| | शिरोडें, गोवा. | | फातर्पें—गोवा. |
| ३ | अनंत वासुदेव मराठे, | | |
| | संपादक किरात, वेंगुर्ले. | | |

४ नारायण अनंत नाईक पाटणकर
संपादक आर्यविज्ञान सांगें, गोवा.
५ महादेवशास्त्री दिवेकर, वांई,
प्राज्ञपाठशाला.

३ वासुदेव शिवराम कोल्हटकर,
सांग्वें, सत्तरी.
४ महादेवशास्त्री निगळ्ये, पेडणें.
५ विनायक गंगाधर धवलकर,
ढवळी, कवळें.

प्रेक्षक सभासद—१ सरस्वतीभूषण वामनशास्त्री किंजवडेकर. २ भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग वैद्य. ३ वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री धुपकर. ४ दत्तात्रय तुकाराम पणशीकर. ५ रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, कार्यवाह भट्ट प्रभु-ऐक्य-परिषद्, नि० जगद्गुरु.

वरील सभासदांच्या विषयनियामक कमिटींत अध्यक्षांनीं मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणें:—

१ गर्भाधानादिसंस्कार. २ आन्हिककर्म. ३ कुलाचार. ४ सणवार. ५ देवदेवता. ६ कुलपुरुष. ७ क्षेत्रमर्यादा. ८ वतनवाडी. ९ भाषा. १० आहार. ११ रीतरिवाज. १२ ऐतिहासिक पुरावा. १३ चालू देश-काल परिस्थिति.

वरील मुद्द्यांचा खल, विषयनियामक कमिटींत अनुकूल प्रतिकूल पक्षाच्या प्रतिनिधींकडून अध्यक्षांसमोर होऊन जो निष्कर्ष निघाला तो येणेंप्रमाणें:—

१ गर्भाधानादिसंस्कार पद्धे व भट्ट-प्रभु ह्या दोन्ही समाजांत वेद-मंत्रांनीं एकाच विधीनें होतात. विवाहानंतर करावयाचे दर्शपूर्णमास स्थालीपाकादि सारख्याच प्रमाणांत होतात.

२ आन्हिककर्म
३ संध्या, देवपूजा
४ वैश्वदेव इत्यादि
} दोन्ही समाजांत समान आहेत.

३ कुलाचार:—चैत्र महिन्यांत गौर बसविणें (गौरी दोलोत्सव) तन्निमित्त उत्साह व हळदीकुंकू इत्यादि समारंभ करणें आणि वर्षप्रतिपदेपासून चैत्र महिनाभर सूर्योदयीं नियमानें अंगण सारवून रंगवल्ली करणें

( याला वायका चैत्रांगण म्हणतात ) हे व आणखी अशासारखे कुलाचार उभय समाजांत समान आहेत. अक्षय्य तृतीया, श्रावणी, हरितालिकादि व्रतें हीसारखींच चालू आहेत.

४ सणवार—गणेश चतुर्थीला मोदक वायन इत्यादि सर्व सण दोहोंतही सारखे आहेत.

५ देवदेवता—पंद्यांच्या ज्या कुलदेवता आहेत, त्याच भट्ट प्रभूंच्याही आहेत.

६ कुलपुरुष—( कुलपुरुष म्हणजे ज्या आपल्या कूटस्थ पुरुषापासून वंशवेलीला फांटे फुटून विस्तार झाला त्याचें कांहीं तरी प्रतीक ( दगडाची मूर्ति वगैरे ) करून सगळे वंशज त्याला भजतात, तो.) हा कुलपुरुष, पद्यांपैकीं एका शाखेचा व भट्ट-प्रभूंपैकीं एका शाखेचा मिळून एकच आहे. याबद्दल वे० रा० शंकर वामनभट्ट बोरकर ( पद्ये ) हे आपल्या जबानींत लिहून आमचा घरचा व भट्ट प्रभु समाजापैकीं मिरिंगकर यांचा मूळपुरुष एकच असल्याचें आमचे चुलते वगैरे वडील माणसें सांगत होतीं. या कुलपुरुषाचें स्थान ( प्रतिकाचें स्थल ) शिरोडेंपैकीं मैंगाळवाड्यावर तलावाच्या कांठीं आहे. यावरून आमचा समाज व भट्ट-प्रभूंचा समाज एकच यांत मला संशय दिसत नाहीं." ह्या जबाबावरून उभय समाजांचा कुलपुरुष एकच आहे, गोत्रें व उपनांवेंही सारखींच आहेत.

७ क्षेत्र-मर्यादा—या मुद्द्याच्या बाबतींत खालीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं आहेत—

अध्यक्ष—भट्ट-प्रभूंची वस्ती कोणत्या कोणत्या गांवांत आहे ?

निगळ्ये—( प्रतिकूलवादी ) भट्ट-प्रभूंची वस्ती बोरी व शिरोडें या दोन गांवांत आहे.

अध्यक्ष—पद्ये, समुदायाची वस्ती किती दूर आहे ?

निगळ्ये—अहो, दूर कसली ? भट्ट-प्रभूंमध्यें आणि त्यांच्या सभोंवतीं पद्यांचें वेष्टन आहे !

अध्यक्ष—बरें, पद्ये-आणि प्रभु या दोहोंच्यामध्यें कोणत्या एकाद्या समाजाचा पडदा आहे काय ?

निगळ्ये—समजूत पडली नाहीं.

अध्यक्ष—मी तुम्हांला असें विचारीत आहें कीं, प्रभु आणि पद्ये यांचें परस्परांशीं अत्यंत सान्निध्य असल्याचें तुम्ही सांगतां, तेव्हां प्रभु-समाजाचा आपलेपणाचा संबंध पद्येसमाजाशीं पोंचतो कीं दुसऱ्या कोणत्या तरी समाजाशीं ? तें सांगा.

( निगळ्ये गोंधळांत पडतात.)

अध्यक्ष—प्रभुसमाजाला पद्येसमाज जवळचा दिसतो का सारस्वतसमाज ?

निगळ्ये—त्याला ( प्रभुसमाजाला ) पद्येसमाज जवळचा दिसतो. पण ते पद्यांतले नाहींत.

त्रिविक्रमभट्ट सहकारी—आपल्यासमोर समर्पक उत्तरें देण्याची आमची योग्यता नाहीं.

अध्यक्ष—बरें, भट्ट-प्रभूंचा समाज कोणत्या तरी एका मोठ्या समाजाचा भाग आहे असें तुम्हांस वाटतें, का तो एक आकाशांतून पडलेला स्वयंभू स्वतंत्र समाज आहे असें वाटतें ?

निगळ्ये—तो कोणत्या तरी समाजाचा पोटविभाग आहे असें वाटतें.

अध्यक्ष—तर मग राहणीच्या मानानें व इतर आतांपर्यंत कुलघुरुषैक्य इत्यादि बाबींच्या विचारांत दिसून आलेल्या समानत्वानें प्रभूंला पद्ये-समाज, इतर समाजांहून अधिक जवळचा म्हणजे प्रभुसमाज पद्येसमाजांतूनच निघाला असावा असें तुम्हांला वाटतें ना ?

निगळ्ये—वाटतें, पण त्यांची भाषा निराळी आहे.

अध्यक्ष—तर मग तुम्हांला भट्ट-प्रभु हे ब्राह्मण तरी वाटतात का अब्राह्मण ?

निगळ्ये—तें तरी कोणीं सांगावें ? त्यांना परोब म्हणतात. माहीत असलेलें सांगण्यास भीति वाटते.

श्री० आप्पा देसाई—( प्रभू ) तर मग तुम्हीं आमच्या मुलांचीं नांवें शांकर विद्यालयांत दाखल करून त्यांना वेदाध्ययन कसें शिकवीत होतां ? त्यावेळीं आम्ही ब्राह्मण होतों आणि आतां अब्राह्मण झालों काय ?

निगळ्ये—( उसळून ) येथें असल्या खासगी गोष्टी कां विचारतां ?

आप्पा देसाई—हें विचारणें खासगी काय !

अध्यक्ष—काय तुम्हांला माहिती असेल ती सांगा. प्रभु हे अब्राह्मण चाटतात काय ? कीं ब्राह्मण !

निगळ्ये—ब्राह्मण आहेत.

अध्यक्ष—ठीक आहे. आतां ते कोण ब्राह्मण ? सारस्वत ब्राह्मण काय?

निगळ्ये— नाहीं.

८ वतनवाडी—प्रभु व पद्ये या उभयतांचीही बागबागायतीच आहे.

९ भाषा—भिन्न आहे.

१० आहार—दोनही समाजांचा शाकाहार आहे.

११ रीतरीवाज—लग्नकार्यादि समारंभांतील चालीरीति, शिष्टसांप्रदाय व बायकांचे बारीकमोठे रिवाज दोनही समाजांत एकच आहेत.

१२ ऐतिहासिक पुरावा ( त्यावेळीं उपलब्ध नव्हता. ):—दुसऱ्या व तिसऱ्या मुद्द्याच्या खंडनांत मिळाला तो पुरावा आम्हीं आज दाखल केला आहे. हे ब्राह्मण नव्हेत अशाबद्दल उलट बाजूनें मात्र कांहींही घुरावा घुढें आलेला नाहीं.

१३ चालू देशकाल परिस्थिति:—दोनही समाजांवर आचारविचार, रहाणी इत्यादि गोष्टींत देशकालपरिस्थितीचा परिणाम कमीअधिक प्रमाणानें सारखाच झालेला आहे. आणि हा ऐक्याचा प्रयत्न देखील त्याच देशकालपरिस्थितीच्या बुद्धीवर होणाऱ्या हितपरिणामी आघाताचें मूर्त स्वरूप होय.

वरीलप्रमाणें एका भाषेशिवाय बाकी बाराही मुद्द्यांच्या चर्चेंत भट्ट-प्रभूंच्या तर्फेनें निष्कर्ष निघाला आहे हें उघड आहे. असें असतां " या मुद्द्याकडे ( आचार-विचाराकडे ) नीट लक्ष दिलें असतां आमचें वरील म्हणणें ( भट्ट-प्रभु ब्राह्मण नाहींत हें तें म्हणणें ) किती सयुक्तिक आहे तें दिसून येईल." असें प्रतिकूलपक्षानें अर्थात् अध्यक्ष निगळ्येशास्त्री यांनीं आपल्या कैफियतींत म्हणावें यावरून विषयनियामक-कमिटींतल्या चर्चेंत भाग घेणारे निगळ्ये निराळे व कैफियतींतले निराळे अशी भूल पडूं लागते.

" त्यांच्या आचारविचारांकडे वळूं " असें कैफियतींतलें डौदारल वाक्य वाचतांच, आतां पुढें प्रतिपक्षाचे अध्यक्ष, भट्ट-प्रभुसमाजाचे

काय काय गलिच्छ व किळसवाणे आचार दाखवितात कोण जाणे ! अशी सकृद्दर्शनीं घडकी भरल्याशिवाय राहिली नाहीं. आणि पुढें पहावें तों " भट्ट-प्रभूंचे आचार व पद्ये यांचे आचार यांत किती तरी फरक आहे ! " ह्या वाक्यानें आचारविषयाचा उपसंहार केला आहे; जणुं काय हें वाक्य वाचतांच—केवढा भयंकर फरक आचारांत आहे हें श्रीचरणांच्या लक्षांत ताबडतोब येणार ! 'कितीतरी फरक आहे', ह्या शब्दचतुष्टयाच्या उच्चारमात्रेंकरूनच आचारांत भयंकर फरक दाखविलासें होईल अशी जर प्रतिकूलपक्षाची समजूत असेल तर त्या पक्षाचा दुबळेपणा व बुद्धिमांद्य यांची कींव करावी तेवढी थोडीच होणार आहे. " पद्ये ब्राह्मण सर्व जातींचे उपाध्ये आहेत; पण भट्ट-प्रभूंना त्यांच्याच जातीचें उपाध्येपण करतां येतें. इतर कोणत्याही जातीचें उपाध्येपण करण्याचा त्यांना अधिकार नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्यांना इतर जातींतील लोक दक्षिणा देत नाहींत. दक्षिणा घेण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना असतो. मग यांना हा अधिकार नाहीं याबरून हे ब्राह्मण नसले पाहिजेत," इतका वाक्यसमुदाय लिहून शेवटीं " जर भट्ट-प्रभु हे पद्यांपैकींच आहेत तर हा आचारभेद कां ? " असा सवाल केला आहे ? यावरून प्रतिकूलपक्षाच्या मतें आचार म्हणजे सगळ्या जातींचे घरीं उपाध्येपणा करणें व दक्षिणा घेणें हा होय. ब्राह्मणांच्याच घरचें उपाध्येपण करणाऱ्या ब्राह्मणांला हा निंद्य समजतो आणि अठरापगड जातींचें पौरोहित्य करणारे श्रेष्ठ समजतो ! धन्य आहे प्रतिकूलपक्षाच्या विवेकसरणीची ! तरी एक बरें झालें, कीं भट्ट-प्रभूंला, आपल्याच समाजाचें उपाध्येपण करतां येतें याची प्रतिकूलपक्षानें न कळत कबुली देऊन प्रभूंला, आपल्याच समाजांत कां होईना; पण दक्षिणा घेण्याचा अधिकार आहे हें सिद्ध केलें. कारण पुरोहितपणा करणें म्हणजेच दक्षिणा घेणें आणि दक्षिणा घेणें म्हणजे ब्राह्मणांच्या षट्कर्माधिकाराचें निदर्शन होय. याप्रमाणें फलश्रुतीनें कां होईना, भट्ट-प्रभूंला अब्राह्मण ठरवितां ठरवितां ब्राह्मण ठरविलें ! यावरून केव्हां तरी सत्यच प्रभावी ठरणार ह्या सिद्धान्ताची प्रचीतीही आली.

आतां मागें अवतरणचिन्हांतर्गत वाक्यसमुदायांत प्रतिकूलपक्षानें ज्या साफ खोटया गोष्टी लिहिलेल्या आहेत त्यांसंबंधीं आम्ही विशेष

कांहीं न लिहितां साक्षीपुराव्यानेंच त्यांचीं बोटें त्यांच्याच डोळ्यांत घालितों.

१. वे० रा० रा० बाबू पुरुषोत्तम भट्ट, मु. कुंडई ( प्रभु ) हे आपल्या साक्षींत लिहितात कीं, " भट्ट-प्रभूंतील भिक्षुकांस सर्व हिंदु जातींतून द्रविडांबरोबर दानदक्षिणा निर्बाधपणें मिळत आहे. सारस्वतांच्या घरीं होमहवनादि कृत्यांत कऱ्हाडे, कोंकणस्थ व पद्ये यांच्याबरोबर भट्ट-प्रभु सहानुष्ठान करितात. सातआठ वर्षांमागें रा० अच्युत सोयरू कामत यांचे घरीं झालेल्या वास्तुशांतीत वे० शा० वासुदेवशास्त्री धूपकर, यज्ञेश्वरशास्त्री धूपकर, अनंतभट्ट चांफाडकर, नारायणभट्ट तोटेकर व मी बाबूभट्ट (प्रभु) मिळून १२ ब्राह्मण होतों. दुसरें श्रीमंत कुंडईकर यांचे घरीं नवचंडयनुष्ठानांत वरील तोटेकर पितापुत्र, काशीनाथभट्ट ( प्रभु ) रघुनाथभट्ट ( प्रभु ) येशवंतभट्ट ( प्रभु ) न मी बाबूभट्ट ( प्रभु ) इतके ब्राह्मण होतों. तेरा वर्षांपूर्वी झालेल्या कुंडई येथील नवदुर्गेच्या ( सार्वजनिक ) प्रतिष्ठेंत कऱ्हाडे, कोंकणस्थ, पद्ये व भट्ट-प्रभु असे ब्राह्मण अनुष्ठानास होतों."

२. वे० रा० रामचंद्र विठ्ठल देवारी ( भट्ट-प्रभु ) आपल्या साक्षींत लिहितातः—" बोरी येथील श्रीनवदुर्गेची पूजाअर्चा मी ( प्रभु ), शंकर वामनभट्ट बोरकर व सदाशिव बाळकृष्ण बोरकर ( पद्ये ) असे तिघे करीत आहों. देवालयांत व गांवांतील ( पद्ये वगैरे ) ब्राह्मणांकडे कांहीं अनुष्ठानें झालीं तर पद्ये वगैरे ब्राह्मणांबरोबर मीही भाग घेत असतों. शके १८४२ सालीं रा० वामन पांडुरंग कामत नंदगडकर यांनीं सपल्लव नवचंडी ( हवनपूर्वक शतचंडी, ) केली होती. त्यांत आचार्य सखारामभट्ट उमर्ये, सदस्य वे० दत्तात्रेय तुकारामशास्त्री पणशीकर व गाणपत्य अण्णाशास्त्री करमरकर हे मुख्य ब्राह्मण असून शिवाय तोटेकर, फडके, उपाध्ये, हेही होते. ह्या अनुष्ठानांत भट्ट प्रभूंपैकीं विनायकभट, श्रीपाद भट, विश्वंभर देवारी व मी रामचंद्र देवारी असे चौघे इसम होतों. बोरी, शिरोडें व आसपासच्या गांवांत अनेक शांतिक-पौष्टिक कृत्यें होतात त्यांत पद्ये वगैरे ब्राह्मणांसह आमचेही ब्राह्मण अनुष्ठानांत लागतात. कवळें येथील शांकरविद्यालयाचे अध्यापक वे० शा० सं० महादेवशास्त्री निगळ्ये यांनीं रा० सीताराम नारायणभट ( प्रभु ) यांच्या येथें उपनयन समारंभांत भट्ट-

प्रभूंच्या हातचे फराळाचे जिन्नस ( शिजलेले, तळलेले ) व कॉफी वगैरे इतर ब्राह्मणांबरोबर सहपंक्तीनें घेतली होती. सदरहू शास्त्री यांच्याकडेच शिकत असलेल्या पांच सात भट्ट-प्रभूच्या मुलांकडून ते घरांत पाणी भरणें वगैरे कामें करून घेत होते." अनुक्रमांक १ चा साक्षीदार बाबू-भट्ट यानें असेंही लिहून दिलें आहे कीं " भट्ट-प्रभूंच्या घरचे भात वर्ज करून इतर एकंदर शिजलेले, भाजलेले, तळलेले पदार्थ, येथील शित्पावन, कऱ्हाडे, पद्ये वगैरे ब्राह्मण राजरोसपणें स्वीकारतात. समाराधनेंत पद्ये, भट्ट-प्रभु मिळून विवक्षित संख्यापूर्ति होते. श्रीमंत कुंडईकरांचे येथें झालेल्या चंडिकृत्यांत तोटेकरादि ८।९ व भट्ट प्रभूंतील ५।६ ब्राह्मण सुवासिनी कर्मसांगतासिध्यर्थ समाराधनेस होत्या. "

यावर प्रतिकूलपक्षी असा आक्षेप घेतील कीं, "वरील साक्षीदार जातीनें भट्ट-प्रभु असल्यानें स्वार्थासाठीं त्यांनीं खोटेंनाटें बनवून सांगितलें आहे. त्यांची साक्ष प्रमाण नाहीं " तर आतां आम्ही कोंकणस्थ व पद्येच या बाबतींत काय म्हणतात तें त्यांच्याच शब्दांत सांगतों:—

३. वे० रा० सदाशिव रामचंद्रभट परांजपे मु शिरोडें आपल्या साक्षींत म्हणतात–७।८ भट्ट-प्रभूंच्या येथील धार्मिक कृत्यें इतर कोंकणस्थ वगैरे साह्यास घेऊन पूर्वापार चालत आलेल्या यज्ञिक प्रयोगांवरून मी करीत असतों; त्यावरून मला असलेली माहिती लिहितों कीं, भट्ट-प्रभूंची आचार-पद्धति द्राविड ब्राह्मणांसारखी असून कुलधर्म, कुलाचार वगैरे विषयांत त्यांचें पद्यांशीं पूर्ण साम्य आहे. यांच्या इथें आम्हां पंचद्राविडांचा जलादि पेय पदार्थ व इतर सर्व खाण्याचे जिन्नस सहपंक्तीनें त्यांच्या हातचे सेवन करण्याचा प्रघात आहे. मात्र अन्न ( भात ) त्यांच्या हातचें सेवन करीत नसतों. भट्ट-प्रभूंच्या येथें रोज देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव होत असतात. आम्हां द्रविडांच्या येथें संतर्पणासही ( पंक्तिभेदानें ) भट्ट-प्रभु ब्राह्मण चालतात. व तशींच त्यांचीं व आमचीं सहानुष्ठानेंही होतात. "

४. प्रसिद्ध वैद्य भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग वैद्य, ( पद्ये ) केरी, फोंडा, गोवा–हे आपल्या अभिप्रायांत लिहितातः—" त्यांच्याकडे निलेप पदार्थ. सेवन आणि उदकग्रहण प्रसिद्धरीत्या चालत आहे. अन्नसेवन ( भात ) आणि शरीरसंबंध यांची वहिवाट प्रस्तुत नाहीं."

एवढयाच अभिप्रायांचा आम्हीं नमुन्यासाठीं येथें उल्लेख केला आहे. त्यावरून स्थालीपुलाकन्यायानें भट्ट-प्रभूंच्या बाबतींतील सत्यावर प्रकाश पडेल. बाकी अभिप्राय सोबत जोडले आहेत.

वर दिलेल्या साक्षींवरून श्रीचरणांची पूर्ण खात्री होईल कीं, भट्ट-प्रभु समाजांत आज जीं ५।६ भिक्षुकांचीं घराणीं आहेत, त्यांच्याशीं इतर पद्ये वगैरे ब्राह्मण सहानुष्ठान करतात. अर्थात् दक्षिणा देतात; तसेंच अनुष्ठानादिकांच्या समाराधनेंतील ब्राह्मणांची विवक्षित संख्यापूर्ति पंक्तिभेदानें त्यांना भोजनास घेऊन करितात आणि त्यांच्या व त्यांच्या ( प्रभूंच्या ) घरचे व हातचे भातावांचून एकंदर; शिजलेले व तळलेले पदार्थ पद्ये वगैरे सर्व ब्राह्मण प्रसिद्धपणें सेवन करितात! व या स्पष्ट पुराव्यानें "(प्रभूंना) इतर जातींचें उपाध्येपण करण्याचा अधिकार नाहीं. इतर जातींचे लोक त्यांना दक्षिणा देत नाहींत व ती घेण्याचा त्यांना अधिकार नाहीं, यावरून हे ब्राह्मण नसले पाहिजेत." अशीं जीं निरर्गल विधानें आपल्या कैफियतींत प्रतिकूलपक्षानें केलीं आहेत तीं साफ खोटीं, द्वेषमूलक आणि 'येन केन प्रकारेण' श्रींचें मन बिथरवून भट्ट प्रभूंना हाणून पाडावें या हेतूनेंच केलीं आहेत हेंही श्रींच्या पुरेपूर लक्षांत येईल.

पद्ये व भट्ट-प्रभु या दोन समाजांत साम्य कसें आहे हें दाखविण्याकरितां उभयसमाजांतिल गोत्रैक्य, आचारैक्य, कुलदैवतैक्य इत्यादि एकत्व-बोधक प्रकार अनुकूलपक्षानें शाबीत केले आहेत. परंतु प्रतिकूलपक्षानें आपल्या दुराराध्य स्वभावधर्माप्रमाणें " गोत्रें, आचार, कुलदेवतादेखील एक असली म्हणून काय झालें ? सारस्वतांतही तींच गोत्रें, तींच कुलदेवता आहे. मग पद्यांनीं सारस्वतांना कां आपल्यांत घेऊं नये ? शुद्ध आचार शूद्रांतही असेल; पण ब्राह्मणत्व त्यांच्यांत असूं शकणार नाहीं. अशा अर्थाचीं वरींच तर्कटें रचून अनुकूलपक्षाचा उपहास करतांना आपणच उपहास्य झाला आहे ! एकाच ठिकाणीं राहाणाऱ्या दोन समाजांत घुष्कळशा सारख्या गोष्टी असणें हें दोहोंचें एकत्व ठरविण्यास बरेंचसें महत्त्वाचें प्रमाण होय. आणि अविच्छिन्न ब्राह्मणाचारपरंपरा असलेल्या भट्ट-प्रभूंच्या बाबतींत वरील घुष्कळशा गोष्टी समन्वयानें जुळत्या असल्यामुळेंच तो समाज

पद्यांपैकींच ठरत आहे. हें ठरल्यास एखाद्याच गोष्टींचें साम्य पुरेसें होत नाहीं, हें साधें तत्त्वही प्रतिकूलपक्षाला समजत नाहीं किंवा समजत असेल तर उमजत नाहीं असें म्हणणें भाग पडत आहे. असो.

येथपर्यंत पांचव्या मुद्द्याचें खंडन करून खालील बाबी सिद्ध केल्या आहेत.

( १ ) भाषा ही जाति ठरविण्याचें प्रमाण नसून ती परिस्थितीविशेषानें बदलते हें दृष्टान्तांनीं आधीं दाखवून दिलें. आणि नंतर—आज भट्टप्रभु जी भाषा बोलतात तीच पूर्वी साऱ्या पद्यांची होती; परंतु पद्यांनीं ती आपली मूळभाषा कऱ्हाडे, कोंकणस्थ इत्यादि ब्राह्मणांच्या निकटवासामुळें बिघडवून घेतली आणि प्रभूंनीं समानभाषी लोकांच्या नित्यसहवासामुळें कायम राखिली, हें कर्नाटकांतील पद्यांच्या भाषेचें प्रत्यंतर दाखवून सिद्ध केलें.

( २ ) आचारादिकांचें साम्य दाखवून शिवाय सहानुष्ठान आणि प्रभूंच्या हातचे भाताशिवाय इतर सर्व खाद्यपेयांचें सेवन करण्याची पद्ये वगैरे सर्व ब्राह्मणांची जुनी राजरोस वहिवाट उघड केली आणि प्रभु व पद्ये यांचा अन्योन्य आपलेपणाचा संबंध किती अंतरंगांतला आहे हें स्पष्ट केलें आहे.

## उपसंहार.

आतांपर्यंत आम्हीं श्रीचरणांस स्मरून सत्य प्रकार काय तो श्रीचरणीं सादर करून प्रतिकूलपक्षाच्या कैफियतीस उत्तर दिलें. आणि आतां पुढें योग्य तो विचार करण्याबद्दल श्रीचरणांच्या स्वाधीन शीर व सुरी पूर्ण विश्वासानें केली आहे. तेव्हां आतां भट्ट प्रभूंला योग्य न्याय देऊन त्यांचा उद्धार करणें किंवा ४१६ लोकांचा अनाथ, हताश, दुबळा व श्रीचरणैकनिष्ठ असा समाज जगांतून उठविणें ह्या दोन्ही गोष्टी श्रीजगद्गुरूंच्या परमोदार न्यायबुद्धीच्या सर्वस्वीं हातांत आहेत. आज प्रभुसमाज घसरणीवरून कोलांटया मारीत वेगानें घसरगुंडीला लागून कड्याच्या घारेवर पोंचला आहे! अशा अशरण स्थितींत श्रीचरण तरी आधार

देतील काय ? ह्या आशेनें–मातेनें ताडन केलेलें मूल बापाच्या पायांस बिलगतें त्याप्रमाणें प्रभुसमाज श्रीचरणांस लागला आहे. अशा प्रसंगीं पायांला हिसडा देऊन त्याला ( प्रभुसमाजाला ) गुरुमाउली कडयाखालीं फेंकून देणार कीं पोटाशीं कवटाळणार हा प्रश्न आहे.

भट्ट-प्रभूंची आजची अंतःस्थिति अशी आहेः—नांवाला गोत्रें चार असून पैकीं एक नामशेष झाल्यासारखें आहे. नेमकींच गोत्रें समाजांत असल्यामुळें सगोत्र सप्रवरसंबंधाच्या भीतीस्तव तरुण मुलगे अविवाहित आणि उपवर मुली कोठे द्याव्या असा पेंच पडला आहे. त्याच त्याच घराण्यांत आपद्धर्मानुसार सापिंडयसंकोच करून बेटीव्यवहार चालल्यामुळें रक्ताचें मिश्रण बंद पडून मुकी, बहिरी, लंगडी, व्यंग, नेभळट व निस्तेज अशी संतति वाढत्या प्रमाणांत निपजत आहे ! अल्पायु व अपमृत्यूचें प्रमाणही वाढत असून पूर्वी सुमारें ६०० असलेली लोकसंख्या आज ४१६ वर आली आहे ! ह्या संख्येंतून विधुर, विधवा व अविवाहित निवडून काढून बाकी काय राहतें हें पाहिलें तर माणुसकी असलेल्या कोणाही सहृदयाचें काळीज फाटल्याशिवाय राहणार नाहीं. तेव्हां आमचें श्रीचरणांपुढें असें विचारणें आहे कीं, सगळ्या जगांत एवढा छोटा समाज स्वतंत्र जाति म्हणून अस्तित्वांत आहे काय ? खेळाडू मुलांनीं केलेल्या वाळूच्या पर्वताप्रमाणें हळुहळू पण थोडयाच दिवसांत हा समाज नामशेष होणार आहे तेव्हां ही अंतर्बाह्य यथार्थ वस्तुस्थिति जाणून भट्ट-प्रभुसमाजाविषयीं श्रींच्या दयामय हृदयास पाझर फुटणार नाहीं काय ?

दुसऱ्या कोणाला दोष देण्याची आमची इच्छा नाहीं. पण अकारण वैऱ्याप्रमाणें कोणी हात धुवून पाठीस लागला म्हणजे आपल्या संरक्षणाकरितां निरुपायानें स्पष्ट बोलणें भाग पडतें. आज प्रतिकूलपक्ष–कसला तरी सूड उगवावा त्याप्रमाणें सूक्तासूक्त मार्गांनीं भट्ट-प्रभूंना ब्राह्मणेतरांत दडपूं पहात आहे. याविषयींची खात्री-त्याची कैफियत लक्षांत घेतल्यास श्रीचरणांची होणार आहे. भट्ट प्रभुसमाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या रक्ताच्या परमाणूंत आपण ब्राह्मण असल्याची जाणीव अनादिकालापासून कायम आहे. मानवी प्रयत्नानें कदाचित् भट्ट-प्रभूंला ब्राह्मणेतर बनविलें तरी त्यांचा अंतरात्मा त्यांना ब्राह्मणेतर म्हणणार नाहीं. प्रतिपक्षानें प्रामाणिक

मतभेद खुशाल दाखवावा व पुरावा दाखवून प्रभूंना अब्राह्मण ठरवावें. त्या बद्दल प्रभुसमाजाला वाईट वाटणार नाहीं. आणि प्रभु हे खरेखुरे अब्राह्मण-ठरले तर ब्राह्मण होण्याची मूर्खपणाची महत्त्वाकांक्षा ते धरणारही नाहींत. परंतु सरळ मार्गानें प्रभुसमाजाला अब्राह्मण ठरविण्याचे प्रयत्न न करितां प्रतिपक्ष वाममार्गाचा अवलंब करून अनेक लपंडावांनीं प्रभुसमाजाला चीत करण्याचे त्याचे बेत चाललेले आहेत ह्याचेंच वाईट वाटतें. वस्तु-विपर्यास करून लोकांचा गैरसमज करणें, प्रक्षोभकारक अशीं हस्तपत्रकें लोकांत वांटणें, एका शाईनें व एका टाकानें लिहिलेलीं, भट्ट-प्रभु व अनुकूलपक्षी यांच्या निंदेनें भरलेलीं, फटकळ मजकुराचीं निनांवी पत्रें समाजांत वाटून द्वेषमत्सर वाढविणें, अशासारखे असभ्य उत्पात प्रतिकूल-पक्षाकडून होत आहेत. आणि त्यामुळें लोकमत खवळलें आहे. वेदशास्त्र-संपन्न अनंतशास्त्री सहकारी, मुक्काम सांवर्डे यांनीं अनुकूलपक्ष व इतर कित्येक विद्वान् व सभ्य गृहस्थ यांवर खोटे आरोप करून लिहिलेलें संस्कृत पद्यात्मकपत्रक छापून प्रसिद्ध केलेलें सोबत जोडलें आहे ! यावरून धर्म-संरक्षक म्हणविणारा प्रतिकूलपक्ष सत्यधर्मापासून भ्रष्ट, विकारवश व पूर्वग्रहदूषित कसा झाला आहे याची श्रींना कल्पना होईल. त्याच-प्रमाणें नमुन्यासाठीं कांहीं निनांवी पत्रेंही यासोबत जोडलीं आहेत, त्यां-वरूनही उलट बाजूच्या न्यायीपणावर प्रकाश पडणार आहे. परिषदेच्या अध्यक्षांकडे प्रतिकूलपक्षानें भट्ट-प्रभूंच्या विरुद्ध आजपर्यंत ज्या सह्या पाठविल्या आहेत त्यांत–ज्यांना सही म्हणजे काय ह्यांचेंही ज्ञान नाहीं अशा नऊ दहा वर्षांच्या मुलांच्याही सह्या घेऊन संख्या फुगविण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला आहे. इतकेंच करून प्रतिकूलपक्षी थांबलेले नाहींत; तर एकाच इसमानें एकदां आपलें खरें उपनांव व गांव देऊन सही केली असून एकदां उपनांवांत थोडा अक्षराचा बदल व गांवाचा फरक दाखवून सही केली आहे. याची खात्री अध्यक्षांच्या छापी वृत्तांतांतील अनुक्रमांक २१ व ११२ पहावा. ह्या एकंदर प्रकारावरून प्रतिकूल-पक्षानें आपलें बहुमत दाखविण्याकरितां कसें साहस केलें आहे व किती व कशा लांड्यालबाड्या केल्या आहेत याचें अनुमान होईल. जातीच्या नाजूक प्रश्नांत असले लबाडीचे खेळ खेळणाऱ्या प्रतिकूलपक्षाच्या मतावर

अवलंबून न्याय देणें किती धोक्याचें आहे याची कल्पना श्रींनीं करावी. श्रीचरणीं आम्हीं नम्रभावानें असें कळविण्याचें साहस करीत आहों कीं, आज प्रतिकूलपक्ष भट्ट प्रभुसमाजाचें ब्राह्मण्य हिरावून घेण्याकरितां सत्याची तमा न धरितां कृष्णकारस्थानें रचून बाटेल तें साहस करण्यास प्रवृत्त झाला आहे. त्याच्या सांगण्याबोलण्यावर विश्वासून भट्ट-प्रभूंविषयीं बरेंवाईट मत बनवून तदनुसार निवाडा करणें अत्यंत अन्यायाचें होणार, याचा श्रींनीं पूर्ण विचार करण्याची नाजूक वेळ आली आहे! अशानें भट्ट प्रभूचा कदाचित् घात केलासें होईल! न्यायाच्या नांवावर घोर अन्याय घडेल! बरें करतांना न कळत वाईट घडून येईल! आणि आज अशा विषम परिस्थितींत देखील गोमांतकीय अखिल शिष्यवृंदांत जो श्रींविषयीं अविच्छिन्न पूज्यभाव व अत्यंतादर वसत आहे तो शून्यावर येईल! इतकेंच नव्हे तर त्यामुळें अप्रिय असा भलताच परिणाम घडून येईल! याकरितां धर्मपीठाधीष्ठित श्रीगुरुचरणांनीं-परिषदेच्या पुढें जी उभयपक्षांची बाजू आली आहे व जे अभिप्राय, संमतपत्रें व साक्षीपुरावा उपलब्ध झाला आहे त्याची छाननी-उभयपक्षांतर्फें निवडून घेतलेल्या प्रत्येकीं दोन दोन मिळून चौघां निःपक्षपाती परस्थ विद्वानांच्या सल्लागार-मंडळाच्या सल्ल्यानें उभयपक्ष-निरपेक्ष दृष्टीनें करून त्यांतून हंसक्षीर-न्यायानें न्यायबीज निवडून घ्यावें आणि देशकाल-वर्तमान-परिस्थिति दृष्टीपुढें ठेवून धर्म्य असा अखेरचा निर्णय द्यावा, अशी भट्ट-प्रभूंच्यातर्फें आम्हीं मागणी करीत आहों.

सदर प्रकरणीं न्याय करतांना योग्य वाटल्यास जमेस धरण्यासाठीं एक वहिवाटीची पण महत्त्वाची बाब, धर्माधिकरणाधिष्ठितपीठदेवतेच्या नजरेस आणीत आहों. ती ही कीं, भट्ट-प्रभुसमाज हा अनादिकाला-पासून करवीर व संकेश्वरपीठाचा अनुयायी आहे. दिग्विजयार्थ ज्या ज्या वेळीं संस्थानदेवतेचें आगमन ह्या प्रांतीं झालें त्या त्या वेळीं श्रींना भिक्षेला आणून पाद्यपूजा व यथाशक्ति दाक्षिणा द्रव्यसंतर्पण संघशः किंवा व्यक्तिशः भट्ट-प्रभूनीं केलें आहे. याचा दाखला संस्थानच्या दप्तरीं पहा. ताजें उदाहरणः—शके १८२० ज्येष्ठ शुद्ध १, ता. २१ मे सन १८९८ रोजीं भट्ट-प्रभूंपैकीं बोरीचे श्रीमंत सावकार यांचे येथें श्रीस्वामींची स्वारी

भिक्षेस आली होती त्याचा जमाखर्च सावकारांच्या कीर्दीस आहे; त्यांत एक मनोहर शेषशयनविष्णूची लांकडी मूर्ति व एक नमुनेदार सुंदर खुर्ची श्रींस नजर केल्याचा उल्लेख आहे. सदरहू विष्णुमूर्ति संकेश्वरमठांत आजही असल्याचें ऐकतों. त्यांत आम्हांला इतकेंच दाखवावयाचें कीं, भट्ट-प्रभु अब्राह्मण ( मराठे वाणी इत्यादि ) असते तर त्यांच्या घरांत ब्राह्मण आचाऱ्यांनीं शिजविलेल्या अन्नाचीही भिक्षा श्रीस्वामी घेतेना. यावें प्रत्यंतर ह्याच स्वारीच्या खेपेस घडलेलें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पणजीच्या नापितसमाजानें पाद्यपूजेकरितां स्वामींना आमंत्रण केलें व तें त्यांनीं, स्वतंत्र मंडप घालून तेथें व्यवस्था करण्याच्या अटीवर कबूल केलें. त्याप्रमाणें नापितसमाजानेंही हौशीनें मोठा खर्च करून सुंदर मंडप घालून त्यांत सर्व तयारी केली. आणि शेवटीं आयत्यावेळीं तेथील सोंवळ्या ब्राह्मणांनीं मोडता घातल्यामुळें स्वामींनीं पाद्यपूजा घेण्याचें नाकारून एवढा मोठा सुसंपन्न व मठाभिमानी नापितसमाज आपल्या शिष्यवृंदांतून गमाविला. ह्या एकाच गोष्टीवरून विघ्नसंतोषी व व्यवहाराभिज्ञ ब्राह्मणांचे विचार किती पोंचट व परिणामी घातक असतात याचा विचार अवश्य लक्षांत ठेवणें जरूर आहे. बरें, " भट्ट प्रभु हे ब्राह्मणेतर नसून सारस्वत ब्राह्मण असल्याने त्यांचे घरीं भिक्षा घेण्याची जुनी वहिवाट आहे." असें म्हणणें देखील येथें जुळत नाहीं; कारण सारस्वत ब्राह्मण, जगद्गुरु-मठाला कधींही जाणार नाहींत. मग आपल्या घरीं नेऊन भिक्षा करण्याची गोष्टच नको. बरें, उदारशीलानुरूप एखाद्याच्या मनांत आद्यशंकराचार्यांविषयीं आदरातिरेक असणें असंभाव्य नाहीं. आणि ह्यास अनुसरून सारस्वतांपैकीं वोरी येथील सावकारांच्या घराण्यांत श्रीजगद्गुरूंना—एक मोठी पूज्य विभूति म्हणून भिक्षा करण्याचा सांप्रदाय असूं शकेल असेंही म्हणणें वस्तुस्थितीला धरून नाहीं. तसें असतें तर भट्ट प्रभूंवर धार्मिक सत्ता सारस्वतांच्या धर्मसंस्थांची असली पाहिजे होती व धार्मिक प्रकरणाचे भट्ट-प्रभूंचे व्यवहार त्या संस्थांकडून निवडण्याची वहिवाट असली पाहिजे होती. परंतु तशी वहिवाट प्रस्तुत नसून संस्थान संकेश्वरमठाची सत्ताच या प्रकरणीं केल्याचा दाखला भट्ट-प्रभूंच्या दसरांत किंवा स्मरणांतही नाहीं. तेव्हां या एकंदर विवेचना-

वरून हेंच सिद्ध होतें कीं, भट्ट-प्रभु हे अब्राह्मण तर नाहींच. परंतु सारस्वत ब्राह्मणही बिलकूल नाहींत. तर ते कोणत्या तरी पंचद्राविड ब्राह्मणांच्या पोटजातींपैकीं आहेत. आणि त्यांच्या येथें श्रीजगद्गुरूंना भिक्षा करण्याची जुनी वहिवाट चालू असल्यानें ते पातित्यदोषानेंही बहिष्कृत झालेले नाहींत.

आतां भट्ट-प्रभूंनीं आपले तारक किंवा मारक श्रीगुरुमाउलीचेच पाय मानल्यामुळें जें काय खरें असेल तेंच निर्भयपणें श्रींपुढें निवेदन करणें तो आपलें कर्तव्य समजतो. त्यास अनुसरून आचारासंबंधानें बोलावयाचें तर प्रतिकूलपक्षी म्हणतात त्याप्रमाणें भट्ट-प्रभु आचारभ्रष्ट झालेले नसून ब्राह्मणांनीं त्यांना दूर लोटल्यामुळें अर्थातच त्यांच्या आचारांत मालिन्य आलेलें आहे पण वरवर पाहतां आज ब्राह्मणसमाजांत आणि कर्मठ म्हणविणाऱ्या भिक्षुकांत-गृहस्थांत नव्हे-जसे कितीएक आचारभ्रष्ट व क्रियानष्ट बनून स्वैराचारी झालेले दिसतात तितक्या पायरीला पोंचलेले प्रभु खास नाहींत, हें कळविण्यास आम्हांला अभिमान वाटतो. भट्ट-प्रभु यथाशक्ति स्नानसंध्या करीत असतात. त्यांचीं मुलें सांगलीस वेदशास्त्राध्ययन करीत आहेत. प्रभूचा आचार विशिष्ट रहाणी व बहुकालपर्यंत यामुळें थोडा मलिन झाला तरी त्यांच्यांत अविच्छिन्न ब्राह्मणाचार परंपरेचा झरा जिवंत आहे कीं नाहीं हें सहृदयांनीं पहावें. आणि आचारभ्रष्ट झालेले ब्राह्मण ब्राह्मण्यापासून च्युत न होतां परिस्थितीमुळें आचारांत मालिन्य आलेले भट्ट-प्रभुच मात्र ब्राह्मणत्वाला मुकावे हें शास्त्रसंमत आहे कीं काय याचा विचार करावा.

स्कंदपुराणांतर्गत सह्याद्रिखंडांत असे श्लोक आहेत—

विज्ञाताः कुलधर्मेण पंक्तिग्राह्याः स्वधर्मतः ।
ब्राह्मणा एव ते सर्वे कलौ जीवंति वृत्तिगाः ॥
वैश्यवृत्त्यैव जीवंति ब्राह्मणा धर्मतत्पराः ।
गायत्रीमात्रपाठेन सदाचारेण वा पुनः ।
आपद्धर्मानुसारेण ब्राह्मण्यं नैव गच्छति ।
व्यवहारविमिश्रेण ब्राह्मण्यं नैव हीयते ॥

**तेषां षोडशसंस्काराः कर्तव्यं पंक्तिभोजनम् ।**
**तेषां च याजनं कार्यं विप्रैर्धर्मार्थकोविदैः ॥**

ह्या वचनांवरून आचारांत मालिन्य आलें तरी ब्राह्मण ब्राह्मण्यापासून भ्रष्ट होत नाहीं असें दिसतें. तेव्हां त्या वचनांचा फायदा आपद्ग्रस्त भट्ट-प्रभु समाजास घेऊं देणें न देणें श्रीचरणांच्या कृपाकटाक्षाकडे आहे.

आतां एकाच महत्त्वाच्या प्रश्नाच्या बाबतींत श्रीचरणांपुढें स्पष्टपणें आम्हांला विनंति करावयाची, ती ही कीं, प्रतिकूलपक्षानें आपल्या कैफियतीच्या उपसंहारांत—" जर हा प्रयत्न करण्यांत ( एकीबद्दलचा प्रयत्न ) त्यांना ( अनुकूलपक्षाला ) सत्याचें बळ असेल तर श्रींनीं या बाबतींत योग्य कमिशन नेमावें. व या कमिशननें सर्व गोव्यांत फिरून लोकांचे जबाब घ्यावे." याप्रमाणें कमिशनची मागणी करून आणखी कांहीं वाक्यांच्यापुढें फिरून " जर या बाबतींत श्रींचा घुराव्यानिशीं खात्री केली तर कमिशन नेमून लोकांच्या साक्षी घ्याव्या." अशी कमिशनचीच मागणी करून शेवटीं " वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन श्रींनीं या एकी-प्रकरणाचे बाबतींत भट्ट-प्रभूंना योग्य तें उत्तर देऊन त्यांनीं चालविलेल्या प्रयत्नांस श्रींकडून मदत होणें शक्य नाहीं असें कळवावें." हें भरतवाक्य लिहून ही कैफीयत संपविली आहे !

वरील तीन अवतरणांतील तीन वाक्यसमुच्चयांच्या रूपानें प्रतिकूल-पक्षाच्या हृदयाचा आंतील कप्पा कसा उघडा पडला आहे याचें श्री-चरणांनीं नीट निरीक्षण करून पहावें अशी आम्ही विनंति करितों. वर-च्या तीनही वाक्यसमुदायांचा सरळ अर्थ असा होत आहे.—" अनुकूल-पक्षानें योग्य पुरावा दाखवून भट्ट प्रभु हे ब्राह्मण आहेत व पद्यांतीलही आहेत अशाबद्दल सोळा आणे श्रींची खात्री करून दिली तरी तितक्या-वरच प्रभूंवर अनुग्रह करण्याचा अतिप्रसंग त्यांनीं करूं नये. तर श्रींची प्रभूंच्या ब्राह्मण्याबद्दल बालंबाल खात्री झाली तरी पुनः कमिशन नेमून लोकांच्या साक्षी घेऊन ते त्यांस ब्राह्मण म्हणतात कीं काय तें पहावें. ( प्रत्यक्ष पुरावा लोकांच्या मत्सरग्रस्त तोंडच्या वाफांपुढें तुच्छ आहे असा प्रतिकूलपक्षाचा सिद्धान्त आहे !) कदाचित् त्यांना लोकांनीं ब्राह्मण

म्हटलें तरी श्रींनीं भट्ट-प्रभूंना चक्क सांगावें कीं 'तुम्हीं ब्राह्मण असलां तरी तुमचें ऐक्य होण्याबद्दल आम्ही तुम्हांला आज्ञा देत नाहीं. तुम्हीं आमच्या नादास लागूं नये!" धन्य आहे प्रतिकूलपक्षाची! कांहींही झालें तरी भट्ट-प्रभूंच्या, चिखलास रुतलेल्या, दीन गाईला वर काढूं नका; तशीच मरूं दे! असा निग्रहानुग्रह समर्थ अशा श्रीसंस्थानदेवतेस हा हुकूम करीत आहे! धार्मिक प्रकरणाचा निकाल धर्मगुरु करणार नाहींत तर आद्य-शंकराचार्यांनीं धर्मपीठें स्थापन तरी केलीं कशाला? श्रीस्वामींनीं भट्ट-प्रभूंना तुमचा न्याय आमच्या हातून निभत नाहीं असें सांगणें म्हणजे आपला कमकुवतपणा दाखविणें होय. ह्या प्रकारावरून प्रतिकूलपक्ष वाटेल त्या उपायानें प्रभु समाजावर निर्दय सूड उगविण्यास कसा तयार झाला आहे व तो सत्य आणि धर्म यांना कितीसा भीक घालीत आहे याचें यथार्थ अनुमान श्रींना झालें तरी पुरें आहे. असो.

प्रतिकूलपक्षानें कमिशनाबद्दल पहिली मागणी केली ती गैर नाहीं. फक्त त्या कमिशनाची योजना करण्याची वेळ कोणती याचा विचार करून ती आतां आहे कीं टळून गेली हें पहाण्याचा बोजा श्रींवर आहे. कमिशन नेमावयाचें होतें तर तें परिषदेपूर्वीच नेमावयाचें. तसें न करतां परिषदेच्या पायीं हजारों रुपये खर्च करावयास लावून तिनें केलेल्या कामाचा प्रभुप्रकरणीं काय उपयोग झाला हें जनतेला न कळवितां प्रतिकूलपक्षी मागणी करतात, म्हणून तें नेमणें म्हणजे भयंकर चूक केल्याप्रमाणें होणार आहे! संस्थानच्या आज्ञेनें भट्ट-प्रभूंचे आज हजारों रुपये पाण्यांत गेले त्यास जबाबदार कोण? परिषदेला श्रींच्या तर्फेच्या आमंत्रणानें आलेला विद्वज्जन व लोटलेला ब्राह्मणसमुदाय यांनीं चांगला विचारविनिमय व चर्चा करून पास केलेला ठराव म्हणजे फाटकें चिटोरें असें श्रीचरण समजतात काय? अशा रीतीनें येवढया मोठ्या सभेच्या झालेल्या उपमर्दाचा धनी कोण? जमलेला प्रतिनिधिसमूह व विद्वान् हे सारेच धर्मलंड असून सबगोलंकार करण्यास गोळा झाले होते असा श्रींचा समज झाला आहे काय? इत्यादि प्रश्नांचा भडिमार परिषदेच्या ठरावाप्रमाणें श्रींनीं विचार करून त्याचा निर्णय जाहीर करण्यापूर्वी चौकशीकमिशन नेमण्यांत आल्यास श्रींवर होणार आहे, याचा वेळींच विचार व्हावा.

तसें न करितां कमिशन नेमण्यांत आलें तर त्याचे परिणाम फार अनिष्ट होतील! ब्राह्मणसमाजाच्या चिंघड्या उडून समाजस्वास्थ्यांत माती कालवेल! द्वेषाचा वणवा पेटून त्यांत माननीयांचा मान व मर्यादेचा लांकडी कोट यांची राखरांगोळी उडेल! वृत्तपत्रांतून उलटसुलट चर्चा होऊन स्यांत ब्राह्मण्याचे व धर्मपीठांचे धिंडवडे निघतील! आणि शेवटीं भलत्याच थरावर गोष्ट जाऊन संस्थानचाही बोज रहाणार नाहीं. याकरितां अशा वादग्रस्त प्रश्नांत भलत्याची सल्ला न ऐकतां थोर, कुलीन व अनुभवी अशांच्या सल्लामसलतीनें व चतुराईनें आरंभलेलीं कामें कशीं यशस्वी होतात हें अनुभवानें श्रीसमर्थ गुरुचरणांनीं जाणावें. सारांश, परिषदेच्या कामांचा निर्णय झाल्याशिवाय कमिशन नेमण्यांत येऊं नये अशी आमची प्रार्थना आहे.

आतां शेवटीं भट्ट-प्रभु वर्ग श्रीगुरुमाउलीच्या पायांपाशीं धरणें देऊन बसून करुणा भाकीत आहे कीं, आपल्या ( भट्ट-प्रभूंच्या ) प्रकरणीं काय तो एकदांचा सोक्षमोक्ष करावा. भट्ट प्रभूच्या संबंधीं वितृस्त माहिती व पुरावे आम्ही मांडले आहेत. त्यांचा विचार करून काय ती आज्ञा व्हावी. भट्ट-प्रभुसमाज पंचद्रविडांतर्गत पद्येसमाजाचा पोटभाग ठरल्यास तशी आज्ञा द्यावी; सारस्वत ठरत असतील तर तसा निर्णय द्यावा; ब्राह्मणेतर म्हणावयाचें असेल तर तसें म्हणावें; एकूण कोणती तरी एक जाति त्याला द्यावी. प्रभुसमाज आज मरणसंकटांत आहे त्याची कुतरओढ करून कुचंबणा करूं नये. त्याची मात्र पूर्ण श्रद्धा आहे कीं, आम्ही ब्राह्मण आहोंत. याचा सूक्ष्म विचार करून काय तो निर्णय व्हावा. आद्याचार्यांनीं धर्मरक्षणासाठीं मठाम्नाय स्थापन केला असून त्यापैकींच संकेश्वरमठ आहे. यावरून त्याजवर धर्मरक्षणाची केवढी जोखीम आहे हें उघड ठरत आहे. श्रींनीं जर आज योग्य तो निकाल केला नाहीं तर लवकरच त्याला सगोत्रविवाह करण्याची पाळी येणार आहे. किंवा जी जात त्याला पोटांत घेईल तिकडे तरी त्याला जाणें भाग आहे. आजपर्यंत श्रीचरण आपले धर्मगुरु असें तो मानीत आल्यानें जात्यंतर करणें तेंही श्रींच्या आज्ञेनेंच त्याला करावयाचें आहे. तरी त्यासंबंधींही काय तो निर्णय द्यावा. भट्ट-प्रभूंच्या बाबतींत योग्य निर्णय देऊन एक अनुकरणीय

घडा घालून दिल्याचें चालून आलेलें श्रेय पीठदेवतेनें हातचें गमावूं नये; गोमांतकीय अखिल जनतेची सहानुभूति न दवडितां मर्तुकाम भट्ट-प्रभुसमाज जगतो तर जगवावा एवढीच अखेरची हात जोडून प्रार्थना आहे.

**अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।**
**तस्मात्कारुण्यभावेन रक्ष रक्ष जगद्गुरो ॥**

अध्यक्षमहाराज! वरीलप्रमाणें प्रतिकूलपक्षाच्या कैफियतीचें आमचें उत्तर पाठविलें आहे. तें आपल्या अभिप्रायासह श्रींकडे सादर करावें अशी नम्रपणें विनंती करीत आहों.

बोरी, गोवा. शके १८४८.

( सह्या )

दत्तात्रेय तुकाराम पणशीकर, पेडणें.
दत्तात्रेय रामचंद्र दीक्षित किंजवडेकर, मु. पेडणें.
नारायण अनंत नाईक पाटणकर.
गोविंद लक्ष्मणभट उपाध्ये.
रामचंद्र पांडुरंग वैद्य पानवेलकर, मु. केरी.
गणेश भिकंभट अभिषेकी मंगेशकर.
राम अनंतभट बुकले गांवकर.

सदाशिव बाळकृष्णभट बोरकर.
रघुनाथ शाबा प्रभु.
आपा देसाई.
रामजी विश्वंभर प्रभुगांवकर.
गुणबा शिव प्रभुदेसाई.
गोविंद मंगेश प्रभु.
विठ्ठल त्रिश्वंभर प्रभु गांवकर.
माधव हरि देसाई.
श्रीपाद महादेव बोरकर.

# पुराव्याचे कागद

## अ० नं. ५१

### शके १३१३ तील एक ताम्रपट

नमः श्रीविद्यारण्यगुरुभ्यः
श्रीमहागणपतये नमः । नमस्तुंगशिर-
श्चंबिचंद्रचामरचारवे । त्रैलोक्यनगरा-
रंभमूलस्तंभाय शंभवे ॥ हरेर्लीलावतारस्य
दंष्ट्रादंडः स पातु वः । हेमाद्रिकलशा यत्र धात्री क्षत्र-
श्रियं दधौ । स्वतिश्रीमदशेषसामंतसीमंतिनीसिमंतासिं-
दूरानुरंजितचरणारविंदे । उद्दंड भूपालमंडल भुजादंड
चांडिमखंडनकोदंडे । निजप्रतापासादिताखिला-
वनिमंडळे । पूर्वदक्षिणपश्चिमसमुद्राधीश्वरे । श्रीमन्म-
हाराजाधिराज राजपरमेश्वर श्रीवीरहरिहर राजे ।
राज्यं शासति । तन्निरूपितगोवासिंहासने सकल-
वेदोपनिषन्मार्ग प्रवर्त्तकाचार्यः । श्रौतस्मार्त्तधर्म्मनि-
रतः । पवित्रीकृतभरद्वाजगोत्रो द्विवेदी चौंडिभट्टा-
त्मजः । सप्तर्षितपोमूर्तिमत्सप्तनाथलिंगप्रतिष्ठापकः ॥
श्रीत्रियंबकदेवचरण कमलार्च्चनप्रसादलब्धराज्यो-
दयः ॥ समहीपालमौलिमालालंकृत चरणयुगलः ॥
नानाराष्ट्रसंभूतशरणागतक्षितिपालपालनातिचतु-
रः ॥ सकल वैरिभूपाल कुलाटवीप्रदहन प्रतापदावान-
लः ॥ श्रीमन्माधवमंत्रीश्वरः स्वमातृमाचांबिकानामधे-
यमग्रहारमकरोत् । तस्याग्रहारस्य निर्णयः । गोवाळीग्रा
मसंभूतकररायजटंकका: । सहाष्टाविंशतिशताः स-

द्वाविंशतिजैथलाः । मौलिग्रामकरादायो नवत्रिंशत्सम-
न्वितं । द्विशतं राजटंकानां जैथलद्वादशान्वितं । एवं ग्रा-

( दुसऱ्या पत्र्याची पहिली बाजू )

मद्वयादाय संख्यैकत्र निगद्यते । ससप्तषष्टित्रिशतं सचतु-
स्त्रिंशजैथलं एतद्ग्रामद्वयंत्रिंशद्घाटिकादेशमध्यगं । पंणादि सर्व-
राजोक्त बाधाभिः परिवर्जितं । कृत्वा सर्वनमस्यंच तद्ग्रामद्वितयंपु-
नः । एकीकृत्यैक सीमान्तं कृत्वासीमाः प्रकल्प्यच । पूर्वस्यांराजमा-
र्गस्य प्राकारो दिशि दक्षिणे । गोवालीमांइणीमध्यनिम्नंपश्चिमतः
पुनः । भट्टिकातलवल्योश्च तिर्यग्लग्ना नतीततः । उत्तरस्यां दिशि
प्रावृड्झरिनिः शराणिः स्मृता । एवंप्राक्चतुःसीमांतर्गतं ग्रा-
मं मांचालापुरामिति स्वमातृमाचांबानामांकितं कृत्वा
मांचलासमुद्राख्यस्य तटाकस्य च सेतुं बध्वा ईशान्यप-
र्वतोभ्दूतनिर्झरोदकस्य माधवतीर्थ मितिनामधेयं विधाय
तदुदकंमांचलासमुद्रतटाकोदकं च नवोद्यमितपू-
र्वीविनजीविनाय दत्वा । तत्समीपंरम्यहर्म्यां ब्रह्मपुरींकृत्वा ।
त्रयोदशोत्तर त्रिशताधिक सहस्रसख्येशाके प्रजा-
पतिसंवत्सरे चैत्रेमास्यमावास्यायामंगारकदिने सूर्यो-
परागकाले । द्वीपे श्रीससनाथदेवस्यस्वकुलस्वामिश्रीत्रि-
यंबकदेवस्य च संनिधौ सदाचरणपवित्रीकृतनिजान्वये
सद्विप्रपुरोहितेसमीपगेसति । नानादेशसमागतविद्व-
द्वर्गं च सन्निधाप्य । वक्ष्यमाण नाम गोत्रेभ्यो द्वादशभ्यो ब्राह्म-
णेभ्यः । क्रमेण चरणद्वंद्वं प्रक्षाल्य साहिरण्योदकधारापूर्वकं सर्वन-
मस्यं सकळराजबाधाविनिर्जितं निधिनिक्षेपसहितं शासनी-
कृत्य स्वमातृश्रेयसे श्रीमाधवमहीपालो मांचलापुरमग्रहारं प्रादा-
त् । तेषां ब्राह्मणानां नामानि गोत्राणि चोच्यन्ते । कपिल ग्रामात्

केशवभट्टपुत्राः । गोविंदभट्टाः । अत्रिगोत्राः ।१। तत्रैव घै—।
सास देवभट्टपुत्राः । त्रिठुलभट्टाः । नैध्रुवगोत्राः ।२। वेरग्रामा

(दुसऱ्या पत्राची दुसरी बाजू)

त् केशवपांडितपुत्राः । सोमनाथभट्टाः । कौशिक गो-
त्राः ।३। मल्लौरग्रामात् धर्मदैवज्ञ माइंदेवपांडितपुत्राः । ईश्वरभ-
ट्टाः गौतमगोत्राः ।४। कपिल ग्रामात् । नरसिंहक्रमवित्पुत्राः । गो-
विंदभट्टाः भारद्वाजगोत्रा ।५। वेरग्रामात् । भानुपंडितपुत्राः । हेमाद्रिपांडि-
ताः । कौशिक गोत्राः ।६। **कपिलग्रामात् । गोविंदप्रभुपुत्राः । केशव**
**षडंगविदः । आत्रिगोत्राः** ।७। खड्गग्रामात् । नारायणभट्टपुत्राः ।
कृष्णभट्टाः ।
नैध्रुवगोत्राः । पिर्यलग्रामात् । केशवभट्टपुत्राः गोविंदभट्टाः । भरद्वा-
जगोत्राः ।९। चंद्रग्रामात् विष्णुपुत्राः । पद्मनाभभट्टाः । भरद्वाजगो-
त्राः ।१०। कुलवनग्रामात् । रामदेवभट्टपुत्राः । जनार्दन पट्टवर्धनाः ॥
काश्यपगोत्राः ।११। भल्लावलीग्रामात् । भानुभट्टपुत्राः । वामनभट्टाः
कौशिकगोत्राः ।१२। सर्वेमीऋग्वेदाध्यायिनः । एषांमध्ये योग्रहारं
त्यक्त्वास्थित्यासहान्यत्रगच्छति । तद्ग्रागास्थिताः सर्वे विभज्या-
श्नीयुः । अस्वामिकेंशे पार्श्वस्थगृहानुमत्या सर्वैः स्थापितोभ्या-
गतो वसेत् । स्वांशविक्रयंदान वा सर्वानुमतेनकुर्यात् । वि-
नानुमत्या दानविक्रयौ कुर्वन्विक्रेताक्रेता चोभावपि राज्ञादंड्यौ
अन्यच्च । संवत्सरप्रतिपद्दीपालिकोपायनप्रभृतयोराज्ञो—
न्येषां च सर्वोपदाः । तरवालपांजिका । चतसृषुनदीषुतारिपं-
जिका । सर्वं शुल्कंच । लेखक वाणिजक मालाकार नौवाहक रजक-
स्थपतिकार्म्मारक्रमुकीवृक्षबंधक चर्मकारादीनामशेषकारुग्र-
जानां दशदाणकानि कारुकं चेत्यादि सर्वमेतस्याग्रहार-
स्य मान्यं । एवं सर्वमान्यं सर्वबाधाविवर्जितं यावदाचंद्रतारकमेत-

त्संतानोपभोगार्थं । स्वस्य च । शरच्चंद्रचंद्रिकाविशुद्धकीर्तये शासनीकृत्य । पौरजानापदानेकनागरान् संनिधाप्य षट्षष्टचं-तुरुज द्वादशदेश गोवदेश सप्ततीत्यादिसमस्त देश सन्निधा-वेतच्छासनं प्रायच्छत् । भाविनृपैः पालनगुणगादितपुण्य-

( तिसऱ्या पऱ्याची पहिली बाजू )

लाभायेदं स्वे स्वे काले परिपालनीयम् ॥ सामान्योयं धर्म्म-सेतुनृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः । सर्वानेतान्भा-विनः पार्थिवेंद्रान् भूयो भूयो याचते रामचंद्रः । बहुभिर्वसु-धादत्ता राजभिः सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिः तस्य तस्य तदाफलं ॥ दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयो-नुपालनं । दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदं । गां-पंकाद्ब्राह्मणीं दास्याद् भूमिंलोपाद्द्विजं वधात् । मोच-यन्मुच्यते पापादाजन्ममरणान्तिकात् ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां । षष्टिर्वर्षसहस्राणि विष्टायां जा-यते क्रिमिः ॥ अक्षिपक्ष्मसमुत्क्षेपक्षयक्षायिणि जीविते यो द्विजादाहरेत्क्षोणीं तस्यावींचौक्षयोऽक्षयः ॥ गामेकां रातिकामेकां कन्यामेकां तथैवच । हरन्नरकमाप्नोति भूमे रप्येकमंगुलम् ॥ एकैव भागिनी लोके सेवतांच महीं-भृतां । न भोग्या न करग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा । भूमिता-र्यातथा गावो हिरण्यं चापहारितं । ना वेदयति राजानं सोद्विजब्रह्मघातकः ॥

श्री त्रियंबक श्री

अन्यच्च पूर्वं कदंबादिराजाभिः द्वादशाधिकारिणं ज्योतिर्वि-दामन्येषां च कापिला खड्ग कुलवन दौरंभ्यद्वाग्रहार पिरियल ब्रह्मपूर्यादि दत्ताग्रहारतांम्रशासनान्यवलो-

क्य तानि दत्तानि सम्यक् परिपाल्य मांचलापुरादीन्यग्रहारा
.....दत्तानि भाविनृपैरपिपालनगुणगदित-पुण्य-
लाभायेमानि शासनानि स्वे स्वे काले परिपालनीयानि
श्री त्रियंबक श्री

टीप:—हा अस्सल ताम्रपट श्री० दत्तोपंत आपटे बी. ए. यांनीं गोव्याच्या प्राचीप्रभानामक मासिकांत छापिला होता, त्यावरून घेतला आहे. शिवाय जिनोवा येथील परिषदेंत डॉ० कुन्हांनीं त्यावर एक निबंधही लिहून पाठविलेला *R. A. Soc. of Great Britain and Irland* च्या जर्नलमध्यें प्रसिद्ध झाल्याचें व डॉ० भाऊ दाजी यांनींही त्यावर कांहीं लेख लिहिल्याचें आठवतें असें रावबहादुर वासुदेव अनंत बांबर्डेकर कळवितात.

—रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.

---

श्री

## पंचोपाध्यांतील उपाध्याचा व भट्ट-प्रभूंचा करार, शके १६५३

स्वस्ति श्री नृपशालिवाहन शके १६५३ वरुषें प्रवर्तनाम विरोधिकृत नामसंवत्सर घुष्ष व॥ ९ इंदुवासर समस्त प्रभु ज्ञातिवर्ग ह्राजन अग्रहार बोरी ग्रामीं वे॥ कृष्णभट उपाध्या पुरोहित यांसी लिहून दिलें करारपत्र ऐसाजे पूर्वीं सालाबाद आमचें पुरोहितपण ह्व्यकव्यादिकार्यं प्रयोजन तुम्हांस चालत होतें तें नंतर आमचे ज्ञातीसंबंधीं ब्राह्मण प्रवीण जाहाले त्यानंतर ह्व्यकव्य कार्यप्रयोजन त्यां हस्तें चालूं लागलें याकरितां तुम्हां-आम्हांमध्यें वेव्हार होऊन तुमचे कार्यास अंतर पडून आलें त्याउपर आमचें तुमचें बोलणें होऊन राजश्री राम शेणवी, आरसतरफदार व मांग शेणवी व गोरख शेणवी कुलकर्णी यां विद्यमानें तुमचा आमचा इत्यर्थ होऊन तह केला जे आमचे ज्ञातीब्राह्मण यांचे आव्हेरी न करितां चालावें आणि तुमचेही चालिलेप्रमाणें चालावें. एतदर्थीं तुमचें आमचें समाधान होऊन तह केला बितपशील.

आमचे स्वज्ञाति ब्राह्मणांनीं आमचीं कार्यें चालवावीं व्रतबंदाचें कार्य १ श्राद्धमहालय १ उत्तर क्रियाकार्य इतुकीं तीन कार्यें ज्यांचे घरीं तें कार्य जाहलें उपर व्रतबंदाचें कार्य जाहले तर वे॥ कृष्णभटानें त्याचे यथ जाऊन प्रथम गणेशपूजा करान तीळहोम करावा. आणि यजमान जें देईल तें घेऊन यावें. श्राद्ध जाहलेनंतर भोजन देईल तितुकें व उत्तरक्रियेमध्यें यांनीं जें करून यजमान देईल तें गोप्रदान व दक्षणा कृष्णभटानें घ्यावी. सदरहू तीन कार्यांचें पुरोहितपण स्वज्ञाति ब्राह्मणांनीं चालवावें. कलम १

वरकड लग्नकार्य व फळशोभन व नामकर्ण व व्रतकैवल्य व श्रीकार्य व वरकड जें होईल तें कार्य कृष्णभटानें पुरोहितपण चालवावें यामध्यें स्वज्ञाति ब्राह्मणांस यजमान आपले खुषीनें देईल तें घ्यावें पुरोहितपणा चालवावयास स्वज्ञाति ब्राह्मणास संबंध नाहीं. कलम १

व एकाचे घरीं कार्य आरंभिलें नेमिल्या कार्यास संपादूंस पुरोहित हजर ना होऊन यजमानाच्या कार्याचा खोळंबा होत असेल तर यजमानानें जें कार्य ज्यास नेमिलें आहे त्याचा मान त्यास ठेवून उभयपक्षीयांमधील जो पुरोहित मिळेल त्या हस्तानें करोन घ्यावें आणि आपले बुद्धीनें त्यास देईल तें घ्यावें, त्यास उभयपक्षीं न्याय करावयास संबंध नाहीं. कलम १

येणेंप्रमाणें उभय वर्गाचे संतोष होऊन तह केला आहे तेणेंप्रमाणें चालवावें त्यास अंतर करावयास संबंध नाहीं. लिहिलेप्रमाणें चालावें म्हणोन लिहिलें करारपत्र ते॥ सदरहू राम शेणवी कुळकर्णी

यास साक्षी

मांग शेणवी साक्ष लिहिलेप्रमाणें
कृष्णाप्रभु शिरशिरे
कृष्णाची वोप
नारायण रघुनाथ प्रभु शिरशिरे
नारायणाची वोप-
भाने नारे प्रभु शिरशिरे

लिहिलेप्रमाणें गोरख शेणवी साक्ष.
बाली विठ्ठलप्रभु शिरशिरे
बाले प्रभूची वोप

भानाचरी वोप
विठ्ठलप्रभु दस्तुर–विठ्ठलप्रभु पांडये लखूबाबईप्रभु दासणा
विठोजीची वोप फाटली लखूची वोप
रामप्रभु तिसेकर रामाची वोप कानडीन आहे
गुणे प्रभु विटभोगी सोईरे प्रभु जांबुले

टीपः—सदर्हू लेख वे० मू० शंकर वामन बोरकर उपाध्ये व त्यांचे बंधु यांच्या संग्रहांत होता त्यावरून छापला आहे. मूळप्रत त्यांच्याचजवळ पहावयास मिळेल.

—रा. द. किंजवडेकर,
कार्यवाह.

---

# शके १८०२ सालीं भट्ट-प्रभूंस आलेलीं श्रींचीं दोन पत्रें.

श्रीशंकर

॥ श्री ॥
अनेकशक्तिसंघट्ट प्रकाशलहरीघनः ध्वांतध्वंसो
विजयते विद्याशंकर
भारती ॥

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्री श्रीकृष्णशृंगपूर षड्दर्शनसंस्थानिक–श्रीकमलाजी केतकर वीरसिंह राजेश्वर श्रीमत् शंकराचार्यासंजाताभिनव श्रीविद्याशंकर भारती, स्वामीकरकंजोद्भव श्रीविद्यावीरसिंहभारती स्वामिकृत नारायण स्मरणानिः—

श्रीगुरुभक्तिपरायण रा० सदाशिव प्रभू व रामचंद्र प्रभू देसाई व गांवकार वास्तव्य शिरोडें. परम शिष्योत्तम यांसी विशेषस्तु. तुमचें

कल्याण इच्छित श्रीनिकट असो. तदनंतर तुम्हीं पेडणें मुक्कामीं भेटीस येतों असें बोलल्याप्रमाणें आलां नाहीं असें न व्हावें. तुम्हीं विनंती केलेल्या मजकुराचा करार वेदशास्त्रसंपन्न राजश्री महादेव-भट येलावरकर हे तुम्हांस कळवितील त्याप्रमाणें येकवार येऊन भेटून जाण्याचें करावें. इतक्यावर तुम्ही न आल्यास भेट होणार नाहीं;कारण येथें चातुर्मास्य होऊन नवरात्र होतांच स्वारीचें परत सत्वर जाणें होणार आहे; सबब लौकरच निघून येण्याची तजवीज करावी. **कोणत्याही गोष्टीचा संशय व काळजी न बाळगतां** पत्र पावतांच निघोन यावें. भेटीअंतीं सर्व खुलासा होईल. विशेष लिहिणें तें काय? शके १८०२ विक्रमनाम सवत्सरे भाद्रपद वद्य ४ दा.

पेडणेहून

**महानुशासनं वरीवर्ति**

(हस्ताक्षर)

इत्यलम्

श्रीशंकर

॥ श्री ॥
अनेकशक्तिसंघट्ट प्रकाशलहरीघनः ध्वानध्वंसो विजयते विद्याशंकर भारती ॥

श्रीमत् शंकराचार्य करवीर संकेश्वर श्री विद्यानरसिंह भारती स्वामिकृत नारायणस्मरणाानिः—

श्री गुरुभक्तिपरायण राजश्री रामचंद्र प्रभु व सदाशिव प्रभु व गांवकार शिरवडेकर यांसी विशेषस्तु. तुम्हांस दर्शनास येण्याविषयीं एक दोन वेळ लिहिलें असून येणें जाहलें नाहीं. हल्लीं वे० संपन्न राजश्री मोरेश्वरभट राजापूरकर हे तिकडे आले आहेत. तुम्हांस मजकूर कळवितील त्याप्रमाणें एक वेळां येऊन दर्शन घेऊन जावें" संस्थानचे स्वारीचें आगमन लवकरच संस्थानीं होणार; तुम्हांस कळावें. मि॥ आश्विन व॥ ३ या शके १८०२ विक्रमनामसंवत्सरे

**महानुशासनं वरीवर्ति.**

( हस्ताक्षर )

इत्यलम्

टीपः—दोन्ही अस्सल पत्रें भट्ट-प्रभूंच्याजवळ आहेत.

—रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.

# शके १७०७ मधील गणेश अनंत ग्रामाधिकारी यांचा लेख

पूर्वी कदमराजे म्हणोन कोंकणप्रांतीं राज्याधिकार करीत असतां गोवें प्रांत व फोंडें प्रांतीं सुज्ञ ब्राह्मण यागादि अनुष्ठानसंपादक कोणी नाहींत यास्तव वरघांटीं दूरप्रांतीं पत्रें पाठवून उत्तम ब्राह्मण चतुःशास्त्र-संपन्न पांचजण बहुमानपूर्वक आणून त्यांस पांच गांव अग्रहारां करून दिलीं. प्रथम कवळें, १ ( पिर्योळ २ ) तिसरा गांव केरी, चौथा गांव खंडेपार, व पांचवा गांव वेरें, एकून पांच गांव धर्मार्थ देऊन स्थापना केली. अग्रहार हें नाम पांचागांवीं पटेपानास चालोन आलें आहे व स्थापित ब्राह्मण उपाध्ये ऐसें चालत असतां आणखी ब्राह्मण येऊन आगरां करून राहिले. तेणेंकरून योगक्षेम चालूं लागला, कृषिकर्मांचेवर प्रवर्त चालला, तेणें-करून वेदाभ्यास सोडून दिला. या देशांत कारकून कुडस्थळी शेणवी ते गांवचे कुळकर्णी यांणीं जो ब्राह्मण जे ठिकाणीं आहे तें नाम लिहीत चालला व उपाध्ये होते त्यांतील उकार लोपला तेव्हां पध्ये ऐसें नाम जाहलें. हा सर्व मजकूर वडील सांगत होते तें लिहिलें आहे. श्री शके १७०७ विश्वावसु संवत्सर माघ शु० ३ भौमवासरे लिहित गणेश अनंत ग्रामाधि-कारी केरी ग्रामचे.

# शके १७०९ मधील गणेश अनंत देसाई यांचा लेख.

यादी प्लवसंवत्सर कार्तिक वद्य ५ गणेश अनंत देसाई केरी तपे अंतरुज यास दाखल होतें जें तपे मजकुरीं ब्रह्मवृंद आहेत त्यांत ५ कराडे व चित्तपावन व देशस्थ यांमध्यें विभक्ति न धरितां बहुत काल चालून आलें त्याचा दाखला पूर्वी शरीरसंबंध घडले होते यास तपशील मौजे वळवई ग्रामीं पाटेल आहेत त्यामधें रघु पाटेल म्हणून होता त्याची बहीण श्रीधर गोसावी याची पत्नी. तीस कन्या जाहली ती गोविंदपंत मुजुमदार फोंडेमध्यें होता. त्याचा भाचा नरसोपंत सांगेंकोटची सबनिशी करून होता त्याची बायको. तो देशस्थ आहे हें सर्वही जाणत समंध १; दुसरा समंध नाटेकर गणेश भटाचा सखा मेहुणा त्याचें नाम

विसोबा नाईक पागुले त्याची बायको सुभद्रा अयंगल मादेभट याची कन्या. तीस दोघे पुत्र जाहले होते त्यांचीं नामें वडील कृष्णाजी, दुसरा लक्ष्मण; ते उठोन महायात्रेस गेले. हें पाहिलें होतें, कलम २. तिसरें कलम देसाई पियोंळकर पोकळभटाची आई रामकृष्णभट कांबळये यांची बहीण तिची वंशवृद्धि आहे कलम ३. चवथें कलम पराडकार मादेवभट नार्वेकार याची बायको कराडा मोदभट गांवकार कवळेकार याची बहीण तिची वंशावळ आहे कलम ४. पांचवें कलम म्हाळप्पा नाईक जानवेंकार याची बायको अयंगळ पानवेलकार यांची लेकी तिचें संतान पांडनाईक कोनेकार, कलम ५. सहावें कलम पाटेल गणेशभट गाळाशिरि वाडा मौजे कवळें याची वंशपरंपरा आहे कलम ६. सातवें कलम वासुदेवपंत राजापूरवासी त्याचा बंधु कृष्णाजीपंत यास पराडकार मादेभटाची लेकी दिली होती कलम ७. आठवें कलम अलवणी आपाभट याची आई कवळें गांवकार रामजी भट कलम ८. नवम कलम तळेकार हरबा नाईक त्याची आई वेजभट केरीकार देसाई याची कन्या कलम ९. बाजीपंत घाटावरील यास गुणभट शेकेरीकार याची कन्या लग्न करून घेऊन गेला ती तेथें आहे कलम १०. हालीं मन्वंतरीं वाडीप्रांतीं शरीरसंबंध जाहलेचा तपशील देवराम भट यास बाईल चोरकाराची कन्या दिली आहे कलम १. सदाशिवभट यास कन्या कवळेंगावकर वेजभट कडारकार याची दिली होती कलम २. केसोपंत वास्तव्य तळेघोंसाळें यास गुणभट शेकेरकार याची कन्या दिली होती. चित्तपावनांमधें शरीरसंबंध जाहले होते. गणेशभट कोणकाराचे घरीं राहिला त्यास कोणकार यांनीं आपली कन्या देऊन लग्न केलें त्याची संतत नातू आहेत कलम १. बोरीमध्यें कृष्णभट होता त्याची बायको चित्तपावनाची तिचें संतान बहुत आहे कलम २. कवळेंमध्यें पुजारी कपिलभट होता त्याची बायको चित्तपावनाची कन्या कलम ३. पियोंळगांवीं सेकेरीकर मादेभट व गुणभट होते त्यांची आई चित्तपावनांची कन्या कलम ४. गोवर भाटकार रघुनाथभट याची बायको मादेभटाची बहिणी कलम ५. बेतगीमध्यें पुजारी आहे त्याची बायको सुबाभट सेकेरकार याची कन्या कलम ६. गणेशभट × × × × × × × × रामभट निगळ्ये याची आई चित्तपावनाची कन्या कलम ८. केरीकर

मादेभट पुजारी याची गोमती चित्तपावनाची कन्या कलम ९. रघुनाथ-भट उमर्या याची बायको चित्पावनाची लेक कलम १०. गोविंदभट व वैजनाथ भट यांची आई चित्पावनाची कन्या कलम ११. श्रीमंगेशीं आमचे वृत्तिवंत होते. त्यांचें धर्मसंतान झालें; त्यांणीं चित्तपावनांचें कुल-धर्म पुत्र केले कलम १ पिलाळा ( ? ) नारायण भट यास तोटेकर नारायणभटाची बहीण दिली होती तिचें संतान आहे १ शंभुभट आकु भटणीनें धर्मपुत्र केला त्याची बायको चित्पावनाची कन्या कलम १३

माझे वयामधें इतके संबंध पाहिले होते तत्पूर्वी किती घडले असतील तें मज ठाऊक नाहीं. ऐसें पूर्वापार चालून आलें असतां हालीं बन्धु-तरास नाना प्रकारच्या दिकती काढून मनस्वी वर्तणूक करितात हें ईश्वरास कसें मानेल.

## शके १६१६ मधील सप्तप्रकरणींचा ठराव

भाजसंवत्सर चैत्र वद्य ८ मी स्तीरवारी विठ्ठलापूर तपेसतरी कृष्णा-सेणवी मादनवीस याचे घरीं बैसलों देशतपे—अंतरज

| | |
|---|---|
| १ मौजे बोरी | पंचवाडी |
| फटे-प्रभु देसाई | विठ सेणवी कुलकर्णी ग्रामाची वोप |
| वामन सेणवी कुलकर्णी | श्री शांता दुर्गा |
| ग्रामाची वोप सिद्धनाथ देव | मौजे वेरें |
| २ मौजे बांदिवडें | १ मादे भट गांवकर |
| विठ्ठल नाईक गांवकर | २ वीठ सेणवी कुलकर्णी |
| मांग सेणवी कुलकर्णी | ग्रामाची वोप शांतादुर्गा |
| ग्रामाची वोप × × × | मौजे कवळे |
| मौजे पर्येळ | १ मादे भट १ लक्ष्मीधरभट |
| वेहुजूर रामकृष्ण सेणवी कुलकर्णी | नादी सेणवी कुलकर्णी |
| नागेशदेव ग्रामाची वोप | ग्रामाची वोप कपिलेश्वर |

कुंडई
मतदेसायांसी
मौजे खंडेपार
हरभट पेदेरकर ग्रामाची वोप
श्रीशांतादुर्गा
विठोजी सेणवी कुलकर्णी
ग्रामाची वोप
मौजे केरी
हरभट देसाई

मौजे सीरवडें
कृष्ण प्रभु देसाई मैंगाळी
लखसेणवी कुलकर्णी
ग्रामाची वोप सीवनाथ देव
मौजे मडकई
रामभट गांवकर
सोनसेणवी कुलकर्णी
ग्रामाची वोप
केशवदेव

येवं देशमंडली शर्त लिहिलें जे हरभट सप्रेव रघुभट सप्रे यांनीं हुजूर येवून आपण सालाबाद तागायत सालगुदस्ता मिरास ज्योतीसपण पानमान भोगवटा चालिला आहे म्हणोन परवाना घेवूंज गेला आहे तर त्यास सालाबाद सालगुदस्ता ज्योतीसपणाचे व पानमान धर्मकृत्याचे पूजा येकंदर मुलुखांमध्यें ब्राह्मण, सेणवी व वाजे* खलकाचे× येथें येकंदर लागलें नाहीं. हालीं परवाना घेतला म्हणून भलते गांवीं जावून मागेल तर त्या गांवींचे गांवकरानें मान्य करून न घेणें. हरदुभटास लागू देवूं नये. ये गोष्टीस आम्ही येकमेकांस आहूं म्हणून देशानेम सही लिहीत म्हाबळसेणवी देशगाडा तेरीख २१ वां शाभान सुरसन आरबतीसेन अलफ सीका आहे.

## शके १६५३ पद्यांच्या पंचोपाध्यांचा करार.

स्वस्तिश्री नृपशालीवाहन शके १६५३ वर्तमान विरोधिकृतनाम संवत्सर मार्गशीर्ष शु॥ ५ मी इंदुवासरे केलामहाजर समस्त मंडलीक तपे अंतरुज मामले फोंडा यांणीं केला महाजुर ऐसाजे. भास्कर-भट सफेरे आपण मामले मजकुराचा सरधर्माधिकरणी व सरज्योतिसी. आपणास गणेशपूजा व आचार-वेव्हार प्रायश्चित सर्व सता येणें म्हणोन कसबे व कवळें आदीकरून अग्रहारवासी वुपाध्ये यांकडे अनेक

* इतर. × लोक.

वेव्हार सफरे मशारनिल्हे हे करूं लागले तेवर समस्तांनीं त्यास सफरे यास सांगितलें जे–या देशीं तुमास कांहींच वृतिविशय पुरातन कधीं चालिला नाहीं ऐसें असतां दुराभिमानानें या देसींचे पुरातन वृत्तीवंत जे आहेत त्यांचा वुछेद करून हालीं आपण वृत्ति संपादेन म्हणीतले या धर्मसंस्थानामधें नूतन कर्तृत्व सर्वथा चालणार नाहीं. महत कदीम* अग्रहार यासी वुपाध्ये तपे मजकूर येथील गांवगन्ना वुपाध्ये बी तपसील—

मौजे कवळें वुपाध्या–मौजे प्रियोळ वुपाध्या–मौजे केरी वुपाध्या–मौजे खंडेपार वुपाध्या–मौजे वेरें वुपाध्या–याणीं स्ताईक व जगांतुक ब्राह्मणांचे येथें सर्व आचारव्यवहारप्रायश्चित्त आदि अगदीं पुरातनपासोन संपादोन आले आहेत. याबराबर तुम्हीं दूरासेनें मनस्वी वेवहार न करावा म्हणीतलें या ऐकेना होऊन नष्टत्व करू लागला ते फिर्याद दिवाणांत पावलेनंतर समस्त महाजन व वुपाध्ये यांस व भास्करभट सफरे यांस आणोन करी जे व्यवहार तो लिहोन घेतले त्याचा परीच्छेद करून टाकावा याकरितां वेदशास्त्रसंपन्न कृष्णाचारी तथा वेदमुहूर्त नारायणाचारी तथा वेदमुहूर्त बाबूभट वाळवे यांसही राजश्री सरसुभेदार चेनवीर येनवारु यांणीं बोलावून आणोन या वुपाध्याचा व भास्करभट याचा वेव्हार मनास आणोन पुन्हा खटला न होय तें करणे म्हणोन राजश्री सुभेदार यांणीं या सर्वांस सांगितलें हे निवडणेकरितां भास्करभट मशारनिल्हे यांस बोलावूं लावून सर्वांही आणिले. तो येऊन समस्त महाजन व मध्यस्त वुपाध्ये निवाडेस बैसले होते तेथें बैसोन, आपला मजकूर सांगावयास पुर्वेना याकरितां मुख चुकवून दूर आणखी जागा सफरामजकूर बैसला. तें वर्तमान राजश्री सरसुभेदार यांस विदीत जाहलेनंतर त्यास सांगोन पाठविलें कीं, तुमचा खटला वारावया करितां समस्त पीर याचे सदरेवर बैसले आहेत. तेथें जाऊन आपली काय नीति असेल ती सांगणें म्हणोन. त्यावर तेथें आपण जात नाहीं म्हणोन बोलिला. तें वर्तमान राजश्री सरसुभेदार यास विदीत जाहलेनंतर सफरामजकूर दुरबुद्धीनें वुपाध्याबरोबर व्यवहार करीत होता. नीतीचा अर्थ कांहीं नाहीं ऐसे कळोन

---

* फार प्राचीन काळापासून.

भास्करभट सफरा यास किल्ह्याच्या बुरुजावर नेऊन ठेविला आणि समस्तांस आपलाले स्थलीं सुखरूप जाऊन राहणें म्हणोन आज्ञा केली. तेप्रमाणें वुपाध्ये-ही स्वस्थळीं गेले. हा मजकूर कोणेही समयीं कोठेंही सर्वांस जाहीर असावयाकरितां हा म्हाजरनामा लिहिला आहे जे सदर पांचाही गांवचे वुपाध्ये यांणीं या अंतरुज देशामध्यें स्थायीक व आगंतुक ब्राह्मण यांचे घरींचे सर्व आचारव्यवहार प्रायश्चित्तादिक संपादावें भास्करभट सफरे यास व याच्या वडिलांस या पांचा गांवांमध्यें व संपूर्ण देशामध्यें आचार-व्यवहार प्रायश्चित्ताधिकार व सरज्योतीष व सर धर्माधिकरण व कांहीं एक वृत्तिविषयक अदलशाही अमलामध्यें व शिवाजीराजे यांच्या अमला-मध्ये व मोंगलाई व आजपावेत व चतुर्वर्णाचे येथें यकंदर चालला नाहीं व पुढेंही या देशामध्यें कांहींयेक वृत्तीबाबेस भास्करभट यांस समंध नाहीं म्हणून म्हाजरनामा लिहिला. सही शिका आहे.

[टीप:—वर दिलेले चारही कागद श्री० दादासाहेब वैद्य, केरी यांच्याकडून आम्हांस मिळाले असून मूळ अत्यंत जीर्ण कागद पंचो-पाध्यांकडे पाहावयास मिळतील. ज्या ठिकाणी × अशी खूण आढळेल तो मजकूर गहाळ झाला असें समजावें. तसेंच पंचोपाध्यांच्या कराराच्या आरंभीं महाजर या शब्दानंतर अंतरुजींतील पंचवीस सद्गृहस्थांच्या साक्षीदार म्हणून सह्या आहेत व अखेर 'रुद्राजी नाईक प्रतापराव सरदेसाई मामलेगोवा शिका आहे'. अशीं अक्षरें आहेत व त्याच्यापुढें मुख्य मज-कुरास आरंभ झाला आहे. —रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.]

## शके [ १७०० ] पाळीसंबंधींचा स्मरणलेख

अंतर्ज देशामध्यें कुकळये ग्राम तेथील गांवकर ज्योतिसी फटये प्रभूचा बंधु पुर्शे प्रभूच्या मुलाची स्त्री रुवेकार हरीभट्टाची मुलगी दिली होती तो पद्या फटयेप्रभूच्या बहिणी सात त्यांमध्यें कवळेच्या सांताल जोशाची स्त्री १, मडकईच्या घारशेभट्टाची स्त्री १, चंद्रवाडी रामजोशास १, त्याचे बंधु धाकुलजोशास १, तिमा विठ्ठलभट पद्या गोवेंचा वैद्य त्यास दिली १, वैद्य अमरभट्टाची माता व कुकळवें सुकडघाची माता १; एकूण भयणी सात. ७. बाबेप्रभू गोवेंचा वैद्य घर मोतीमध्यें तो फट्टयेप्रभू कुंकळेकाराचा गोत्री त्याचे वंशपौत्र बाबेप्रभूची सखी भईण कोरडयानंदभट्टाची स्त्री बाबे-

प्रभूचा मूल कोरडा मसण त्या मसणभट्टाची माता पद्माजीभट्ट म्हाडशींचा मूल त्याची कन्या तिमा विठ्ठलभटाची मुली, तिचें नाम रुक्मीणी. ती बाबे-प्रभूच्या मुलास दिली. तिची बहीण केरीच्या वैजारीच्या धाकुलभट्टाची स्त्री उडीद विठ्ठलभट्टाची स्त्री बाबेप्रभूची चुलतबहीण बाबेप्रभूचा मूल पुसी त्याची धाकटी स्त्री रुवेकर हरिभट्टाची कन्या तिचें नांव गौरी. पाळीयेचा देसाय रामप्रभु खेमप्रभु ते ज्योतिषी कौंडिण्य गोत्री त्यांचा पुरोहित रामेशी हा कवळेंचा पद्या त्याचा पुरुषोत्तमदेव वाडरामभट्टाची स्त्री पद्यांची मुली बाबेप्रभूची स्त्री कुपीरकार तो पद्या त्याची मुली वैद्य रंगोपंताचें मौंजीबंधन गिमोण्यामध्यें दिवाकर जोशानें संपादिली. रंगोपंत गुरु म्हणून दिवाकर जोशास पिंड दे कवळेंचा रामकृष्ण जोशी याची माता होडाळ-च्या पद्याची मुली वाडेकार बाबशेभट्टाची स्त्री पद्याची मुली नारवेंच्या गंगाईचा विठ्ठल जोशी याची स्त्री देशस्थ पंताची मुली आणखी भतग्रामामधें पाळीकारदेसाई खेमप्रभू कौंडिण्यगोत्री त्याचा पणतु रामप्रभू देसाई तो ज्योतिषी त्याचा चुलत बंधू लखे प्रभू दायाद त्यास खटपटून जावून नेतोल्ली ( नेत्रावळी ) ची देशगत जोडून अद्यापि त्याचे पुत्रपौत्रादिक तेथें देशगत भोगितात आणि त्याच खेमप्रभूचा नातू तोही रुसून जाऊन केळोशीमध्यें रासै भूमिका जोडून तेथें होता मग सासष्टी बार्देश फिर्गण झालें. शके १४८७ क्रोधन संवत्सरीं तेथून येऊन त्याचे पुत्र आकारामध्यें अनंतसीम्याची पूजा करून राहिले त्यांचे पुत्रपौत्रादिक अद्यापि आकारामध्यें आहेत.

आणि त्यांचे भोगी श्रीमहालक्ष्मीची पूजा करीत होते. नारायण तथा बाबू त्यांचें कौंडिण्यगोत्र फटयेप्रभू कुंकळयेकार त्याचा मूलहारी त्यास केरीकारा गांवकाराची कन्या तिचें नांव देवकू. तिचा. चुलते भाव बांदोडयास श्रीमहालक्ष्मीचा अभिषेकी अद्यापि वर्ततो. आतां प्रत्यक्ष फटयेप्रभूचा भाचा म्हांडगांवकर कृष्ण जोशी वास्तव्य जांवावली तो तिळतर्पण करितो त्यांत पितृगणांचीं नांवें पहावीं. अद्यापि पाळीग्रामामध्यें क्षेत्रपाळ देवाच्या दक्षिणभागाबाहेर शिलाशासन करून ठेविलें आहे. बांदोडे नागेश देवापाशीं वागळ्याचें शासन लिहिलें तें व पाळ्येस क्षेत्रपाल देवाकडे एकाच टांकीनें लिहिलें जाणिजे.

[टीपः—सदरहू स्मरणलेख वे० मू० शिवराम रघुनाथ जोशी राहणार आमोणें गोवा यांजकडे मिळाला असून त्याची ही नक्कल आहे. ह्या लेखांत उल्लेखिलला शिलालेख पाळी (सांखळी गोवा) येथें क्षेत्रपाळाच्या होता तो आम्हीं तेथें जाऊन पाहिला असून तेथील प्रभूंनीं आपल्या देवास वर्षासन करून दिलें होतें त्याचा हा दानलेख आहे. ही शिला आज बरींच वर्षें ऊन व पाऊस यांचा अव्याहत मारा सहन करीत असल्यामुळें तीवरचीं अक्षरें बरींच दुर्बोध झालीं आहेत. व क्षेत्रपाळ देवाचें देऊळही मोडकळीस आलेलें आहे. या गांवांत आतां प्रभु किंवा प्रभुदेसाई यांची वस्ती मुळींच नाहीं हा शिलालेख व क्षेत्रपांळाचें देऊळ इतकेंच कायतें गतवैभव त्यांचें येथें शिल्लक आहे!

—रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.]

## शिवकालीन लेख 'अ'

देसाई मामुले गोवा या × ×
होती त्यासी शरीफन मलीक त्याचा × ×
हवाला करून आला तल कोंकणास्त × ×
नागनायेक सरदेसाई करनाटकासी गेला
त्याचा भाव विठ्ठल नायेक किले खीलणे
गडावरि दिवाणीचे खंडाचे वसूलास
धरून घातिले वरकड दोघां भावांची
संततीचे मलिकाची सेवा करून होते. त्या-
मधें बोबड नायेक तो शूर थोर त्याणें
चंदा × × रजें पैलेकडील करनाटकी तेथें
मलीक भांडणास गेलेवरी घोडेसहित
बावीमधें पडिला कोण कोण मारावा म्हण
× × बोबड नायेकानें राखिला. मग

× × × नांव ठेविलें मग कितेकादि
× × करनाटकामधें मेला यैसें
× × × × जण देसाई

(कागदाची मागील बाजू)

× × × प्रभु म्हणजे यासी म्हणावें
यासी गांवीं मिरास नाहीं देवमाल
आहे. ३

पद्ये ब्राह्मण देसाई
१ मौजे कविलेकर
१ मौजे प्रियोळकर
१ मौजे केरीकर
१ मौजे खांडेकर
४
१ गांवकर × × × ×
ना × × × × ×

## 'आ' कागद.

अंतरुजे मधें गांव देशमताचे
प्रभुचे २ पदीये ४
कोंकणे ३ वेरेकर गांवकर पद्ये व × × कर
मत नाहीं २ गांव

प्रभुचे गांव देसाई

मौजे बोरी श्रीदुर्गादेव ता तेथें प्रभुयात × × × स्वतंत्र १

मौजे शिरोडें श्रीशिवनाथ देव तेथें प्रभु बोरी सिरोडेचे एकचमत १

[टीपः—हे दोन्ही कागद आम्हांस श्री० रा० ब० वासुदेव अनंत बांबर्डेकर यांजकडून मिळाले असून यांपैकीं 'अ' कागद हा अत्यंत जीर्ण झाला आहे व × अशी खूण केलेला भाग गहाळ झाला असून कांहीं अक्षरें जीर्णपणामुळें दुर्बोध झालीं आहेत. त्यांपैकीं कागदाच्या मागील बाजूस 'ना'——या अक्षरापुढें ३ अक्षरें पुसट झालीं आहेत तीं बरोबर

लागत नाहींत. लिपी मोडी आहे; तिचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला असतां हा कागद श्रीशिवाजीमहाराजांच्या वेळचा असावा असें ठरतें. शिवाय श्री० बांबर्डेकरांस ज्या कागदांबरोबर हा जीर्ण कागद सांपडला त्यांत शेवटची माहिती 'सन सबा तीसैन आलफ म्हणजे शके १६१८ पर्यंतची लिहिलेली आहे त्यावरून हा कागद २३० वर्षांपूर्वीचा असल्याचें सिद्ध होत आहे. यांत गांवीं मिरास नाहीं, देव मात्र आहे; ह्या विधानाचा विचार करते वेळीं प्रभु आणि पाळी या प्रश्नाचा विचार केल्यास स्पष्ट उलगडा होतो. दुसरा कागद 'आ' हा 'अ' या कागदापूर्वीचा असावा असें श्री० बांबर्डेकर म्हणतात. मूळ कागद श्री० बांबर्डेकर यांजकडे पहावयास मिळतील.

—रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.]

## गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें.

लेखांक २० । १६४० कार्तिक वद्य १३ या कागदांत २५ व्या पृष्ठावर असलेल्या अनेक साक्षीदारांच्या सह्यांमध्यें खालीलप्रमाणें ( भट्ट ) प्रभूंच्या सह्या आहेत.

मौजे बोरी

× × ×

मौजे सिरवडें

तालुके अष्टग्रहार देसाई तुके प्रभु
कोलबा व कृष्णप्रभु गांवकार
कोलबा याची निशाण

## गोमांतकाच्या इतिहासाचीं साधनें. पृ० ४५

लेखांक ४१ । १६१६ चैत्र वद्य ८ या लेखांत

मौजे बोरी

१ फटे प्रा॥ देसाई

मौजे सिरवडें

१ कृष्ण प्रा॥ म्हेगाली देसाई

याप्रमाणें 'देशमंडळी' म्हणून ( भट्ट ) प्रभूंचा उल्लेख असून त्याचं लेखांत पद्यांचाही उल्लेख खालीलप्रमाणें आहे:—

**मौजे केरी**

१ हरभट देसाई

१ रामभट गांवकार

**मौजे वेरें**

१ मादेभट गांवकार

**मौजे कवळें**

१ मादे भट

१ लक्षुमीधर भट

**मौजे खंडपार**

हरभट पंदरकार ( पैदरकार )

भारत इतिहास सं० मंडळ वार्षिक इतिवृत्त शके १८३७ पृष्ठ ८३–८६ या पुस्तकांत शके १२२१ श्रावण वद्य ८ सोमवार रोजीं दिलेला तिम्म मंत्री यांचा ताम्रपट आहे. तो गोव्यांतील असूनही त्याची लिपी जुनी कानडी ( हळेगन्नड ) व भाषा मात्र शुद्ध मराठी म्हणजे ज्ञानेश्वरीची आहे. यांत १० व्या ओळींत 'अंत्रुजे' चा उल्लेख असून ३१ व्या ओळींत 'श्रीकपिलेश्वर देऊं' याचा उल्लेख आहे.

तेरवण ताम्रपट हा शके ११८३ तील असून तो Selections Bom. Goor. Records No. X New sesies page 281 यांत छापल्याचें श्री० बांबर्डेकर कळवितात त्यांत

**भारद्वाज गोत्रोत्पन्नाय । अष्टभोग सहित केशव प्रभवे ।**
**हस्तोदकेन प्रदत्तः ।**

असा उल्लेख आहे.

—रा. द. किंजवडेकर, कार्यवाह.

## पुराव्याचे कागद या सदरांत दाखल केलेल्या कागदांची कालानुक्रमवार यादी.

| | | |
|---|---|---|
| १ | शके ११८३ | तेरवण ताम्रपट |
| २ | शके १२२१ | तिम्म मंत्री यांचा ताम्रपट |
| ३ | शके १३१३ | माधवाचार्यांचा ताम्रपट |

| | | |
|---|---|---|
| ४ | शके (१३३८) | पळीगांवचा प्रभूंचा शिलालेख |
| ५ | | शिवकालीन कागद 'अ' |
| ६ | | कागद 'आ' |
| ७ | शके १६१६ | सप्रे प्रकरणींचा ठराव |
| ८ | शके १६१६ | गो. इ. सा. पृष्ठ ४५ |
| ९ | शके १६४० | गो. इ. सा. पृष्ठ २५ |
| १० | शके १६५३ | पंचोपाध्यांचा करार |
| ११ | शके १६५३ | उपाध्ये व भट्ट-प्रभू यांचा करार |
| १२ | शके (१७००) | पाळीसंबंधीं स्मरणलेख |
| १३ | शके १७०७ | ग. अ. ग्रामाधिकारी यांचा लेख |
| १४ | शके १७०९ | ग. अ. देसाई यांचा लेख |
| १५ | शके १८०२ | संकेश्वर मठाकडून प्रभूंस पत्र |
| १६ | शके १८०२ | " " " " |

---

## भट्ट-प्रभु पद्यांतीलच आहेत.

अ० नं० ५२

लेखकः—रा० ब० वासुदेव अनंत बांबर्डेकर, मुंबई.

पद्ये आणि भट्ट-प्रभु या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या जाती मूलतः भिन्न नसून पूर्वी 'पद्ये' या एकाच नांवानें ओळखिल्या जात होत्या; परंतु गेल्या २०० किंवा २५० वर्षांपूर्वी कांहीं क्षुल्लक कारणामुळें भट्ट-प्रभु ही जात निराळी झाली, ती आतां आपल्या मूळ जातींत समाविष्ट केली जावी म्हणून श्रीमच्छंकराचार्य यांच्या आज्ञेनुसार गोव्यांत कपिलेश्वर येथें भट्ट-प्रभुऐक्यपरिषद् भरविण्यांत आली. त्या परिषदेचें वृत्त 'केसरी' 'किरात' वगैरे वृत्तपत्रांतून मीं वाचलें असून अध्यक्षांनीं सुचविल्याप्रमाणें 'अनुकूल किंवा प्रतिकूल विचार मांडतांना प्रामाणिकपणाबरोबर सहानुभूतीनें ते मांडावे' या सूचनेचा मीही आदरपूर्वक स्वीकार करून या प्रकरणीं माझें मत कळवीत आहें.

या प्रकरणीं " आज ज्या घुराव्याची जरूरी आहे तो लेखीपुरावा होय.

पद्ये आणि भट्ट-प्रभू ह्या एक जाति होत, ह्या प्रश्नाचें उत्तर लेखी पुराव्याशिवाय देतां येणार नाहीं व तशा प्रकारचा एकादा लेखी पुराव्याचा कागद सांपडेल " असें अध्यक्षांनीं सभेंत आपलें मत प्रदर्शित केलें होतें. त्या दृष्टीनें शोध केला असतां मला जे अनुकूल कागद सांपडले त्यांचा विचार करून विरुद्ध पुराव्यांचें खंडण करून तेही अनुकूल कसे आहेत हें या लेखांत दाखविणार आहें.

## अनुकूल पुरावा; 'अ' कागद

हा कागद माझ्या ऐतिहासिक संग्रहांत होता. तो अति जीर्ण झाल्यामुळें त्यावरील सर्व मजकूर समजण्यास अडचण पडते. तरी आहे त्या स्थितींतही त्यावरून उपकारक अशी थोडी तरी माहिती मिळण्यास हरकत नाहीं. कागदाचें प्रामाण्य आणि त्यावरून काढलेला निष्कर्ष पहावयाचा तर ज्या इतर कित्येक इतिहासोपयोगी कागदांबरोबर हा कागद सांपडला ते कागद पाहिले पाहिजेत. त्यांतील शेवटची माहिती सन सबा तिसैन अलफ म्हणजे सन १६९६ पर्यंतची लिहिलेली आहे. त्यावरून ह्या कागदांतील भट्ट प्रभू आणि पद्येसंबंधाची माहिती निदान २२९ वर्षांपूर्वीची निदर्शक आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. ह्या कागदांतील एका माहितीचा संबंध दुसऱ्या बाजूच्या माहितीशीं मुळींच नसल्यामुळें तिचा विचार करण्याचें कारण नाहीं. दुसऱ्या बाजूच्या माहितीचा जो मजकूर मला लावितां आला तो दिला आहे. आरंभींचे दोनतीन शब्द गहाळ झालेले दिसतात. त्याचा पुढचा मजकूर शाबूत आहे. त्यांतील "×××प्रभु म्हणजे यासी म्हणावें यासी गांवीं मिरास नाहीं देवमात्र आहे." ह्या माहितीच्या खालीं लगेच 'पद्ये' ब्राह्मणांचा उल्लेख आहे, त्यावरून वरचे 'प्रभु' हेच सध्यांचे भट्ट-प्रभुच होत यांत संशय नाहीं. इतकेंच नव्हे, तर ज्याअर्थीं हा कागद '××× प्रभु आणि पद्ये या दोन समाजांबद्दल तत्कालीन व्यवहारासंबंधाचा उल्लेख करीत आहे त्याअर्थीं ह्या दोन जातींचा परस्पर पोषक असा तत्पूर्वीचा संबंध होता हें दर्शविण्यासाठींच तो लिहिला असा तर्क केल्यास तो अप्रस्तुत होणार नाहीं. आतां या कागदावरून असें म्हणतां येईल कीं, सध्यांचा भट्ट प्रभूंचा समाज इ० सन १६९६ च्या पूर्वी कित्येक वर्षें पद्ये ब्राह्मणांपासून

विलग झालेला होता. आणि त्यामुळेंच ह्या कागदांत त्यांच्या स्थानिक हक्कांचा उल्लेख जवळ जवळ केला गेला. 'प्रभूंस गांवांत मिरास नाहीं देवमात्र आहे'. ह्या व ह्याच्या खालीं; पद्ये ब्राह्मणांची गांववार यादी देऊन ते त्या त्या गांवचे देसाई होत. या दोन्ही उल्लेखांवरून असें अनुमान होतें कीं, भट्ट-प्रभूंचा समाज आपल्या मायजातींतून विलग झाल्यामुळें आपल्या देशकाच्या मिराशीस मुकला. आजमितीस पद्ये ब्राह्मणांत देसाई व गांवकर उपनांवांचीं घराणीं आहेत. तसेंच भट्ट-प्रभूंतही देसाई व गांवकर आहेत.

## अनुकूल पुरावा 'आ' कागद.

हा कागद अस्सल नसून अस्सलाची नक्कल आहे. तो माझ्या वरील उत्कर्षास पोषक दिसत असल्यामुळें जशाचा तसा खालीं देत आहें.

### " अंतरुजेमध्यें गांव देशमताचे "

| | |
|---|---|
| प्रभुचे २ | पदीये ४ |
| कोंकणे ३ | वेरेकरगांवकर पद्ये + + कर |
| | मत नाहीं २ गांव |
| मौजे बोरी श्रीदुर्गादेवता तेथें | मौजे शिरोडें श्री शिवनाथदेव तेथें |
| प्रभुयात × × × | प्रभु बोरी शिरोडेचे येक |
| स्वतंत्र १ | चमत १ |

ह्या कागदांतही 'प्रभु आणि पद्ये' यांचा उल्लेख समोरासमोर केला असून 'कोंकणे' म्हणजे सांष्टीकर सारस्वत यांचा उल्लेख फक्त देशमताच्या गांवाघुरताच केला आहे, आणि प्रभु व पद्यांच्या मतांचा तपशीलवार उल्लेख केला आहे. त्यावरून पुढील अनुमानें निघतातः—

( १ ) हा कागद पहिल्या कागदाच्या किंचित् पूर्वीचा, पण पद्ये आणि प्रभु विभक्त झाल्यानंतरचा दिसतो.

( २ ) ह्या कागदांत प्रभूंचे देशमताचे दोन गांव बोरी आणि शिरोडें हें स्पष्टपणें नमूद केलें असल्यामुळें पहिल्या कागदांत दिसणाऱ्या पद्ये देसायांप्रमाणें प्रभु हेही देसाई होते.

( ३ ) ज्याअर्थी पाहिल्या कागदांत प्रभूंची मिरास गेल्याचा ( आणि त्यामुळें फक्त त्यांचा देव तेवढा शिल्लक राहिल्याचा ) उल्लेख आहे, त्याअर्थी ते मूळचे एकच असून देशमताच्या व्यवहारनिर्णयामुळें किंवा आपसांतील तद्विषयक कलहामुळें ते पद्यांतून फुटून बाहेर पडले.

सदरील दोन्ही कागदांतील प्रमुख अंगे परस्परांशीं जुळतीं दिसतात. अनुकूल व सकृद्दर्शनीं प्रतिकूल अशीं जीं अंगें एकाच वेळीं दिसतात त्यावरून एकच अनुमान निघतें; तें हें कीं, प्रभूंचा समूह दुसऱ्या कोणत्याही कारणामुळें पद्ये-समाजांतून भिन्न झालेला नसून तेथील परंपरागत मिरास व ग्रामसंस्थेंत मत-मान या बाबतींत तेढ उत्पन्न झाल्यामुळें निराळा झाला असावा. वर दिलेल्या दोन्ही कागदांतील माहितीवरून माझें असें स्पष्ट मत झालें आहे कीं, भट्ट-प्रभु हे पद्यांपैकींच होत व तें या ठिकाणीं नमूद केलें आहे.

लेखारंभीं उल्लेखिलेल्या भट्ट-प्रभुऐक्यपरिषदेंत विरुद्ध पक्षाचे एक वक्ते वे० शा० सं० महादेव पांडुरंग निगळ्ये शास्त्री हे असें बालले होते कीं " भट्ट-प्रभूंचे नांवावरून वगैरे पाहतां त्यांचें पद्यांपेक्षां कुडाळ देशकरांशीं अधिक साद्दश्य दिसून येतें." किरात–वेंगुर्ले ( ता. १०।५।२५ ) या विधानाविषयीं मला थोडें लिहावयाचें आहे.

प्रस्तुत लेखक हा कुडाळदेशकर ज्ञातीचा असून त्याचें उपनांव 'प्रभु' असेंच आहे आणि त्यानें स्वतःच्या ज्ञातीच्या इतिहासाचें परिशीलन केलेलें आहे. कुडाळदेशकर ज्ञातींतून १।२ समाज सुमारें ३७५ वर्षांपूर्वी असल्याच कांहीं सामाजिक कारणामुळें बाहेर पडले आहेत. पण ते समाज कुडाळदेशकरांप्रमाणेंच आपल्या ज्ञातीला गौड ब्राह्मण म्हणतात. द्राविडांशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. या दोन समाजांशिवाय तिसरा समाज बाहेर पडल्याचें ऐकींव किंवा ऐतिहासिक लेखी पुराव्याने उपलब्ध नाहीं. प्रभु हें उपनांव कुडाळदेशकर ब्राह्मणांत शेंकडा ३५।४० याप्रमाणें आहे. तसेंच सामंत हेंही आहे.

प्रभु हें नांव ज्ञातिदर्शक नसून ग्रामसत्तेचें निदर्शक होय. तें जसें कुडाळदेशकरांत आहे तसें कऱ्हाडे ब्राह्मणांतही राजापूर प्रांतीं आहे.

आणि क्वचित् देशस्थांतही आहे! करितां• भट्ट-प्रभु हे कुडाळदेशकर असावे हा निगळ्येशास्त्रांचा तर्क द्वेषमूलक नसल्यास सामाजिक व ऐतिहासिक अज्ञतेचा निदर्शक तरी असला पाहिजे. शास्त्रीबुवांच्या याच तर्कावरून ते कऱ्हाडयांतले असावे असा तर्क क. करूं नये! 'भट्ट प्रभु' यांतील प्रभू ह्या एकाच पदाचा शास्त्रीबुवांनीं विचार केला. तें पद या ठिकाणीं ज्ञातिदर्शक आहे. कुडाळदेशकरांप्रमाणें उपनांवदर्शक नाहीं. भट्ट आणि प्रभु यांपैकीं पाहिलें नांव कोणतें याचा विचार झालेला नाहीं. कोंकणांत द्राविड ब्राह्मणांस 'भट्ट' आणि गौडांस 'बामण' म्हणण्याचा प्रघात आहे. भट्ट-प्रभु यांतील भट्ट हें पद भट याचें शुद्ध रूप आहे. सामान्य जनता भट या नांवानेंच संबोधित असते. आणि तेंही क्वचित् प्रसंगीं कागदोपत्रीं प्रभु, प्रभु देसाई इत्यादि नांवानेंच संबोधिलेलें आढळतें. कऱ्हाडे पद्ये हे 'भट' या नांवानें संबोधिले जातात. तेंच 'भट' हें नांव प्रभु या शब्दापूर्वीं लाविलेलें आहे. तें ह्याच हेतूनें कीं, प्रभु ह्या उपनांवाचीं जीं घराणीं निराळीं झालीं तीं 'भटां'तील म्हणजे द्राविडांतील अर्थात् पद्ये ब्राह्मणांतील होत. मग हें नांव सामासिक माना किंवा कसेंही माना. भटांतील जे प्रभु ते भट भट्ट प्रभु हाच त्यांतून अर्थबोध होतो. आणि हे भट बामणांहून-गौडांहून भिन्न हें दाखविण्याकरितां इतरांकडून त्यांस भट्ट-प्रभु असें म्हणण्यांत आलें. त्यांचा कुडाळदेशकर ब्राह्मणांशीं संबंध लावण्याचा निगळ्येशास्त्र्यांचा हा प्रयत्न हास्यास्पद होय. आपल्या विधानाला इतिहासाचा लेखी आधार असल्यास शास्त्रीबुवांनीं अजूनही उजेडांत आणावा!

## विरुद्ध पुरावा (?)

हा विरुद्ध पुरावा म्हणजे कोंकणाख्याननामक ओवीबद्ध एका छापील प्रतींतील माहिती होय. ही माहिती सभेंत भाग घेतलेल्या तत्प्रांतस्थ कोणत्याही वक्त्याकडून पुढें आली नसल्यानें त्या माहितीचा याच वेळीं विचार होणें युक्त आहे. करितां मींच याचा विचार करून ती पुराव्यास योग्य कशी नाहीं हें दाखविणार आहें आणि तसें करण्यापूर्वी त्या आख्यानाबद्दल थोडी माहिती सांगूं:—ह्या पोथीचा रचनाकाळ इ० सन १७२१ आहे रचणाऱ्या मनुष्यानें आपण कोण जातीचा, आपलें

नांव काय? वगैरे माहिती मुळींच दिली नाहीं. ह्या पोथीचें मूळचें नांव 'कोंकणाभ्युदय' असें होतें. नंतर १२० वर्षांच्या सुमारास गोवें, सावंतवाडी-कडे कऱ्हाडे किरवंतादि ब्राह्मण व गौड सारस्वत यांमध्यें मोठें ग्रामण्य उपस्थित झालें, त्या वेळीं कोंकणाभ्युदयाची एक प्रत दुरुस्त करण्यासाठीं ग्वालेरीस पाठविण्यांत आली. उपरोक्त ग्रामण्यावरून शेणव्यांच्या स्वामीनें कऱ्हाडे किरवंतादि ब्राह्मणांविरुद्ध गोमांतकांत कट करविला होता. " १५ बंदांचा ग्रथ पाठविला आहे. तो गुपचूप दुरुस्त करून पाठवावा स्वामींनीं इकडे कट केला आहे." वगैरे मजकुराचीं पत्रें जिवबादादा बक्षींच्या चरित्रांत आहेत. "कुक्कुळवेंतील कऱ्हाडे मनस्वी वल्गना करुन आमच्या-वर दाब टाकतात. प्रांतांत प्रभूची सत्ता × ×" इ० इ० मजकुरांचीं २।३ पत्रें जिवबाचा मुलगा नारायणराव बक्षी यास लिहिलेलीं आहेत. त्यांवरून तत्कालीन ग्रामण्याची कल्पना होईल, याच वेळीं मूळ पोथींत घुसडाघुसड झाली व तीच सध्यांची छापील प्रत होय. ग्वालेरीस दुरुस्त होऊन आलेल्या प्रतीची हस्तलिखित प्रत मी मिळविली आहे. तींत व सध्यां-च्या छापील प्रतींतसुद्धां बराच फरक आहे. उदाहरणार्थ त्या हस्तलिखित प्रतींत 'सारस्वत' हा शब्द नाहीं. 'कोंकणे' हा शब्द आहे. पण छापील प्रतींत सारस्वत शब्द रेलचेलीनें भरलेला आहे. तसेंच मूळ लेखी प्रतींत ओव्या 'असें केल्यानें दक्षिणेंत अद्भुत रीतीनें सारस्वतांची वाढ होईल आणि इतर विप्र म्हणजे कऱ्हाडे, किरवंतादि ब्राह्मण'या सारस्वत-च्या पदाग्रीं लोळण घेतील.' या मजकुराच्या नाहींत! असो. यावरून कोंकणाख्यान हा ग्रंथ रचींव व कऱ्हाडेवगैरे ब्राह्मणांस हिणविण्याकरितांच कसा केला तें लक्षांत येईल. त्यांत सत्यत्व मुळींच नाहीं. या ग्रंथांत कर्त्यानें द्रविडांतर्गत-पद्मे, क्रमवंत व भट्ट प्रभु या तिघांविषयींही एकाच प्रकारची थोडयाशा फरकानें माहिती दिली आहे. ती अशी कीं:—'ह्या तिन्ही ब्राह्मणांना सारस्वतांकडून कन्यादानें झालीं. तिघांनाही २।२ पुत्र झाले पैकीं एक मातुलपक्षीं मिळाला. दुसरा पितृवंशांत स्थिरावला आणि त्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, ही सगळी माहिती मागील युगांतील आहे. कलि-युगांतील नव्हे! व ती सांगणारा राजापूरचा कऱ्हाडा ब्राह्मण होय! कशास कांहींच मेळ नाहीं! तेव्हां ही माहिती कितपत घुराव्यास ग्राह्य आहे त्याचा

आणि क्वचित् देशस्थांतही आहे! करिता. भट्ट-प्रभु हे कुडाळदेशकर असावे हा निगळ्येशास्त्रांचा तर्क द्वेषमूलक नसल्यास सामाजिक व ऐतिहासिक अज्ञतेचा निदर्शक तरी असला पाहिजे. शास्त्रीबुवांच्या याच तर्कावरून ते कऱ्हाडयांतले असावे असा तर्क क. करूं नये? 'भट्ट प्रभु' यांतील प्रभू ह्या एकाच पदाचा शास्त्रीबुवांनीं विचार केला. तें पद या ठिकाणीं ज्ञातिदर्शक आहे. कुडाळदेशकरांप्रमाणें उपनांवदर्शक नाहीं. भट्ट आणि प्रभु यांपैकीं पहिलें नांव कोणतें याचा विचार झालेला नाहीं. कोंकणांत द्राविड ब्राह्मणांस 'भट्ट' आणि गौडांस 'बामण' म्हणण्याचा प्रघात आहे. भट्ट-प्रभु यांतील भट्ट हें पद भट याचें शुद्ध रूप आहे. सामान्य जनता भट या नांवानेंच संबोधित असते. आणि तेंही क्वचित् प्रसंगीं कागदोपत्रीं प्रभु, प्रभु देसाई इत्यादि नांवानेंच संबोधिलेलें आढळतें. कऱ्हाडे पद्ये हे 'भट' या नांवानें संबोधिले जातात. तेंच 'भट' हें नांव प्रभु या शब्दापूर्वीं लाविलेलें आहे. तें ह्याच हेतूनें कीं, प्रभु ह्या उपनांवाचीं जीं घराणीं निराळीं झालीं तीं 'भटां'तील म्हणजे द्राविडांतील अर्थात् पद्ये ब्राह्मणांतील होत. मग हें नांव सामासिक माना किंवा कसेंही माना. भटांतील जे प्रभु ते भट भट्ट प्रभु हाच त्यांतून अर्थबोध होतो. आणि हे भट बामणांहून-गौडांहून भिन्न हें दाखविण्याकरितां इतरांकडून त्यांस भट्ट-प्रभु असें म्हणण्यांत आलें. त्यांचा कुडाळदेशकर ब्राह्मणांशीं संबंध लावण्याचा निगळ्येशास्त्र्यांचा हा प्रयत्न हास्यास्पद होय. आपल्या विधानाला इतिहासाचा लेखी आधार असल्यास शास्त्रीबुवांनीं अजूनही उजेडांत आणावा!

## विरुद्ध पुरावा (?)

हा विरुद्ध पुरावा म्हणजे कोंकणाख्याननामक ओवीबद्ध एका छापील प्रतींतील माहिती होय. ही माहिती सभेंत भाग घेतलेल्या तत्प्रांतस्थ कोणत्याही वक्त्याकडून पुढें आली नसल्यानें त्या माहितीचा याच वेळीं विचार होणें युक्त आहे. करितां मींच याचा विचार करून ती पुराव्यास योग्य कशी नाहीं हें दाखविणार आहें आणि तसें करण्यापूर्वीं त्या आख्यानाबद्दल थोडी माहिती सांगूः—ह्या पोथीचा रचनाकाळ इ० सन १७२१ आहे रचणाऱ्या मनुष्यानें आपण कोण जातीचा, आपलें

नांव काय? वगैरे माहिती मुळींच दिली नाहीं. ह्या पोथीचें मूळचें नांव 'कोंकणाभ्युदय' असें होतें. नंतर १२० वर्षांच्या सुमारास गोवें, सावंतवाडी-कडे कऱ्हाडे किरवंतादि ब्राह्मण व गौड सारस्वत यांमध्यें मोठें ग्रामण्य उपस्थित झालें, त्या वेळीं कोंकणाभ्युदयाची एक प्रत दुरुस्त करण्यासाठीं ग्वालेरीस पाठविण्यांत आली. उपरोक्त ग्रामण्यावरून शेणव्यांच्या स्वामीनें कऱ्हाडे किरवंतादि ब्राह्मणांविरुद्ध गोमांतकांत कट करविला होता. " १५ बंदांचा ग्रथ पाठविला आहे. तो गुपचूप दुरुस्त करून पाठवावा स्वामींनीं इकडे कट केला आहे." वगैरे मजकुराचीं पत्रें जिवबादादा बक्षींच्या चरित्रांत आहेत. "कुक्कुळवेंतील कऱ्हाडे मनस्वी वल्गना करुन आमच्या-वर दाब टाकतात. प्रांतांत प्रभूची सता × ×" इ० इ० मजकुरांचीं २।३ पत्रें जिवबाचा मुलगा नारायणराव बक्षी यास लिहिलेलीं आहेत. त्यांवरून तत्कालीन ग्रामण्याची कल्पना होईल, याच वेळीं मूळ पोथींत घुसडाघुसड झाली व तीच सध्यांची छापील प्रत होय. ग्वालेरीस दुरुस्त होऊन आलेल्या प्रतीची हस्तलिखित प्रत मी मिळविली आहे. तींत व सध्यां-च्या छापील प्रतींतसुद्धां बराच फरक आहे. उदाहरणार्थ त्या हस्तलिखित प्रतींत 'सारस्वत' हा शब्द नाहीं. 'कोंकणे' हा शब्द आहे. पण छापील प्रतींत सारस्वत शब्द रेलचेलीनें भरलेला आहे. तसेंच मूळ लेखी प्रतींत ओव्या 'असें केल्यानें दक्षिणेंत अद्भुत रीतीनें सारस्वतांची वाढ होईल आणि इतर बिप्र म्हणजे कऱ्हाडे, किरवंतादि ब्राह्मण'या सारस्वत-च्या पदाग्रीं लोळण घेतील.' या मजकुराच्या नाहींत! असो. यावरून कोंकणाख्यान हा ग्रंथ रचींव व कऱ्हाडेवगैरे ब्राह्मणांस हिणविण्याकरितांच कसा केला तें लक्षांत येईल. त्यांत सत्यत्व मुळींच नाहीं. या ग्रंथांत कर्त्यानें द्रविडांतर्गत-पद्मे, क्रमवंत व भट्ट प्रभु या तिघांविषयींही एकाच प्रकारची थोडयाशा फरकानें माहिती दिली आहे. ती अशी कीं:—'ह्या तिन्ही ब्राह्मणांना सारस्वतांकडून कन्यादानें झालीं. तिघांनाही २।२ पुत्र झाले पैकीं एक मातुलपक्षीं मिळाला. दुसरा पितृवंशांत स्थिरावला आणि त्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, ही सगळी माहिती मागील युगांतील आहे. कलि-युगांतील नव्हे! व ती सांगणारा राजापूरचा कऱ्हाडा ब्राह्मण होय! कशास कांहींच मेळ नाहीं! तेव्हां ही माहिती कितपत घुराव्यास ग्राह्य आहे त्याचा

विचारचाणाक्ष करतीलच. पण ही माहिती मागील युगांतील (द्वापारयुगांतील) जरी असली तरी लिहिणारा साष्टीकर व सांगणारा त्रिकालज्ञ कऱ्हाडा! हे कलियुगांतील आहेत ते भट्ट प्रभूंसंबंधीं माहिती पुढीलप्रमाणें देतात.

"प्रभु नामे ब्राह्मण भले । कैसे दुरावले तें ऐका । ओ० ४४
बोरी आणि शिरोडेसी । वृत्ति जोडिली दोन्ही ग्रामासी ।
ते महाराष्ट्र कराडे देशी । प्रभु ऐसे त्यांसी म्हणती ४५

या माहितीचा विचार केला असतां आख्यानकर्ता भट्ट-प्रभूंस ते महाराष्ट्रीय कऱ्हाडे देशावरी ब्राह्मण म्हणत आहे, हें सिद्ध होत असल्यामुळें भट्ट-प्रभूंविषयीं तो अनुकूलच पुरावा आहे असें म्हटलें पाहिजे. खोटयांतून खरें निघतें तें असें. असो. याप्रमाणें भट्ट-प्रभूंच्या ऐतिहासिक माहितीचा विचार केला असतां ते व पद्ये एकच होत अशाविषयीं खात्री होते. शिवाय भट्ट-प्रभू यांचीं अनेक साजात्येंही आहेत ( तीं उपनांव, गोत्र, कुलदेवता, कुलपुरुष, अधिकार, वतनवाडी, आहार, गुरुपरंपरा वगैरे )

मुंबई, ता. २६।५।२६ (सही) वासुदेव अनंत बांबर्डेकर.

---

श्रीसत्यमेवजयते

अ० नं० ५३

वे० शा० सं० रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, कार्यवाह, भट्ट प्रभु ऐक्यपरिषद् नि॥ श्री संस्थान संकेश्वर व करवीर यांसी.—कृ. सा. न. वि. वि. आपलें पत्र पोंचलें. त्याला अनुसरूनं अलीकडे चार वर्षें चालविलेल्या आमच्या चळवळींत आम्हांला कसकसे अनुभव आले ते सर्वांस विदित व्हावेत व आमच्यासारखेच जे चळवळ करणारे असतील त्यांसही मार्ग-दर्शन व्हावें म्हणून थोडक्यांत श्रींस स्मरून सत्य तें लिहीत आहों.

आम्हीं आमच्या ऐक्यविषयक चळवळीस शके १८४५ सालीं वे० शा० सं० अनंतशास्त्री धूपकर, श्री० दादासाहेब वैद्य, वे० शा० सं० दत्तात्रेयशास्त्री पणशीकर, श्री० नारायण अनंत नाईक पाटणकर यांच्या सहाय्यानें आरंभ केला. प्रथमारंभीं वे० धूपकरशास्त्री यांचेंच

नेतृत्व आम्हांस लाभलें. त्यांनीं असा क्रम आंखून दिला होता कीं, ( १ ) पद्यांच्या पंचोपाध्यांकडे व इतर विद्वानांकडे अर्ज करून त्यांचे अभिप्राय घ्यावे. ( २ ) व ते जोडूनच श्री स्वामीस अर्ज करावा. त्याप्रमाणें आम्हीं धूपकरांकडून अर्जाचा मसुदा तयार करून घेऊन त्या कामास लागलों. त्यांत आम्हांला कल्पनेच्या बाहेर यश येऊन अवघ्या चार महिन्यांच्या अवधींतच पंचोपाध्यांचे व इतर सर्व विद्वानांचे अनुकूल अभिप्राय स्वयं-प्रेरणेनें आम्हांस मिळाले. कोणींही आमच्या कार्यास विरोध केला नाहीं. उलट आज आमच्या विरोध्यांचे मेरुमणी झालेले वे० शा० सं० महादेव शास्त्री निगळ्ये यांनींही आम्हांस सहानुभूति दाखवून आमचें व तुमचें ऐक्य होणार तरी तुम्ही आमचे आचार सूक्ष्म तऱ्हेनें पाहून त्याप्रमाणें आपल्या आचारांत सुधारणा करा. बाकी बरेच दिवस तुम्ही बाहेर राहिल्यामुळें तुमच्या आचारांत फरक होणें वाजवीच आहे. इत्यादि सांगून आमची चळवळ यशस्वी होण्याविषयीं अंतःकरणपूर्वक आशीर्वाद दिला. इतकेंच नव्हे तर त्याप्रमाणें लेखी अनुकूल अभिप्राय देऊन त्यांत 'बोरी व शिरोडें' वगैरे भागांत 'भट्ट-प्रभु' या जातिदर्शक नांवाचीं सुमारें ४०।५० द्राविड ब्राह्मणांचीं घराणीं आहेत' असें स्पष्ट आपल्या हातानें लिहून दिलें आहे व तो संपूर्ण अभिप्राय आपल्याकडे आहेच. तेव्हां याप्रमाणें प्रथमारंभींच आम्हांस १५।२० विद्वानांचे अभिप्राय मिळाले व ते सर्व अनुकूल आहेत हें पाहून आम्हांस विशेषच उमेद वाटली व याप्रमाणें गोमांतकांतील एकंदर ब्रह्मवृंदांस विनंति करून त्यांचेंही मत अजमावून पहावें या उद्देशानें गोमांतकीय द्रविड ब्राह्मणांला उद्देशून दुसरें विनंतिपत्र काढलें व तें सर्व सुज्ञ ब्रह्मवृंदीं सादर करून त्याच्यावर संमतिदर्शक सह्या घेण्यास सुरवात केली. ती अगोदर आम्हीं ज्या प्रांतांत राहतों त्या अंत्रुज प्रांतांतच केली. यांत आपल्यासंबंधीं माहिती ज्यांना आहे, त्यांसच अगोदर विचारावें असा आमचा उद्देश होता व या प्रयत्नांतही आम्हांस

## अपेक्षेबाहेर यश मिळालें

व अंत्रुजांतील बहुतेक पद्यांच्या संमतिदर्शक सह्या आम्हांस मिळाल्या. विरोध कोणींच केला नाहीं. फक्त कवळें भागांतील डबळकर पद्यांचीं

५।६ घरें व त्यांचेच अनुबंधी रा० पेंडसे रा० बेहेरेप्रभृति ३।४ कोंकणस्थ यांनीं मात्र आम्हांस विरोध करण्यास निष्कारण सुरवात केली! व यांच्याचपैकीं एक दोन महात्म्यांनीं (?) ठिकठिकाणीं हिंडून आम्हांस सह्या न मिळूं देण्याविषयीं आपल्यापरी बरीच खटपट चालविली. पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. उदाहरणार्थ, केरी येथें देवीच्या उत्सवप्रसंगीं तेथील ब्रह्मवृंदांस प्रार्थना करण्याकरितां आम्ही गेलों असतां ही मंडळी तेथें गेली व आम्हांस साहाय्य न करण्याविषयीं इतर ब्राह्मणांस सांगू लागली. त्या वेळीं पंचोपाध्यांतील एक विद्वान् उपाध्ये, अग्निहोत्री व आमच्याविषयीं सर्व माहिती असलेले वे० शा० सं० गोविंदशास्त्री उपाध्ये यांनीं त्या विरोधी महात्म्यांस विरोधाचीं कारणें विचारलीं तेव्हां तसें बलवत्तर कोणतेंच कारण त्यांना सांगतां येईना. शेवटीं

आजपर्यंत झालें नाहीं तें होऊं नये

अशासारखें कांहींतरी कारण त्यांनीं सांगितलें. नंतर तेथें असलेल्या मंडळीस वे० गोविंदशास्त्री उपाध्ये यांनीं आमच्याविषयीं सर्व प्रकार समजावून सांगितला व सर्वांची समजूत पडल्यावर तेथील सर्व मंडळींनीं संतोषानें आपल्या सह्या आम्हांस दिल्या. दुसरें उदाहरण पियोंळचें. तेथेंही वरील मंडळी आमच्या अगोदरच जाऊन आली होती. पण तेथेंही श्री० वासुदेवराव देसाई प्रभृति सज्जनांपुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं व तेथिलही मंडळींनीं बिनहरकत आम्हांस साहाय्य केलें. तात्पर्य, अंत्रुज महालांतील बहुतेक सर्व ब्राह्मणांनीं व सत्तर, भतग्राम, सांगें, पेडणें वगैरे भागांतील जे जे ब्राह्मण आम्हांस भेटले त्यांनींसुद्धां संतोषानें आपापल्या मान्यतेच्या सह्या करून पुढेंही साहाय्य करण्याविषयीं आश्वासन दिलें व त्याप्रमाणें पुढें वेळोवेळीं त्यांच्याकडून शक्य तें सहाय्य झालें आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. तेव्हां याप्रमाणें अंत्रुजप्रांतांत बिनहरकत ढवळकर कंपू ढवळाढवळ करीत असतांही सर्व ब्राह्मणांच्या सह्या होतांच लोकमत अजमावण्यास झाल्या तेवढ्या सह्या पुरे करा असें वे० शा० सं० धूपकरशास्त्री प्रभृतींचें म्हणणें पडल्यावरून त्यांच्या सांगण्याप्रमाणें पुढें आम्हीं सह्या घेण्याचें काम बंद केलें. याप्रमाणें लोकमत पाहिल्यानंतर दुसरी क्रमप्राप्त गोष्ट म्हणजे श्रीसंस्थानीं अर्ज

करावयाचा. त्याप्रमाणें आम्ही श्रीसंकेश्वर संस्थानीं भाद्रपद वद्य १ श. १८४६ सांत अर्ज केला. त्या अर्जाचें उत्तरः— 'श्रींची स्वारी लवकरच गोवें प्रांतीं येणार तेव्हां योग्य निर्णय देण्यांत होईल' असें २।३ महिन्यांनीं आलें. आमच्यासंबंधानें श्रीसंस्थानच्या दप्तरांत काय उल्लेख आहे तें समजावें म्हणूनच मुख्यतः आम्हीं अर्ज केला होता, पण त्यासंबंधीं कांहींच लिहून न आल्यामुळें श्रींच्या दप्तरांतसुद्धां आमच्यासंबंधीं कांहीं विरुद्ध पुरावा नाहीं असें आम्हीं समजलों, व तपासाअंतीं तो आमचा तर्क खरा झाला. नंतर श्री इकडे येणार व आमचा निर्णय करणार, श्रींस आमची कळकळ आहे असें त्यांच्या आलेल्या पत्रावरून वाटून आम्ही

## श्रींच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा

करीत बसलों. परंतु आमच्या दुर्दैवानें त्याच वेळीं श्रीस्वामी ( वांईकर ) समाधिस्थ झाल्यामुळें तो आशांकुर तेथेंच कोमेजला. नंतर शिष्यस्वामी ( प्रस्तुतचे शिरोळकर स्वामी ) गादीवर बसले व त्यांच्याकडे सर्व अधिकार आल्याचें आम्हांस कळून पुनश्च त्या दृष्टीनें सुरुवात करण्याच्या बेतांत आम्ही होतोच. कर्मधर्मसंयोगानें गोव्यांतील संस्थानी कामांत उत्पन्न झालेला बखेडा दूर करण्याकरितां गेल्या मार्च महिन्यांत श्रींचे वडीलमुक्त्यार व कारभारी श्री० ग० पु० इनामदार नेरलीकर हे गोव्यांत आले व त्यांनीं जाहिरनामे काढून सर्व द्रविड ब्राह्मणांची सभा बोलविली. त्या सभेस गोव्यांतील सर्व विद्वान् व अंत्रुज भागांतील बहुतेक ब्राह्मण आले होते तेव्हां ही संधि योग्य जाणून आमचा प्रश्न श्री० नेरलीकर श्रींचे कारभारी यांजपुढें मांडला व त्याच वेळीं खासगी रीतीनें त्यांची व वे० धूपकरशास्त्रीप्रभृतींची याविषयीं चर्चा झाल्यावर श्री० नेरलीकरांनीं हा प्रश्न सभेंत काढण्यास परवानगी दिली व त्याप्रमाणें सभेचें मुख्य कार्य होतांच सदर सभेंत जमलेल्या सर्व ब्रह्मवृंदांसमोर वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री धूपकर यांनीं आमच्या ऐक्याला अनुकूल भाषण करून हें ऐक्य झालेंच पाहिजे, असा ठराव पुढें मांडला. त्यावर श्री० पाटणकर, श्री० दादासाहेब वैद्य यांचीं अनुकूल भाषणें झाल्यावर हें प्रकरण श्रींनीं हातांत घ्यावें असें ठरलें. त्या वेळीं सभेंत आमच्या माहितीची सर्व मंडळी होती. आमचे विरोधी ढबळकर व त्यांचे

सांगाती रा० पेंडसे, बेहेरे वगैरे मंडळी, तसेंच आज आमच्या विरोध्यांचे अग्रणी होऊन खोट्यानाट्या कृत्यांनीं आम्हांस गोत्यांत आणूं पहाणारे वे० निगयळेशास्त्रीहो त्या सभेंत उघड्या कानांनीं हा सर्व प्रकार ऐकत होते! तरी पण कोणीही त्या वेळीं श्री० नेरलीकरांस 'हें असें नव्हे असें' म्हणून सांगूं शकला नाहीं. उलट सभेपूर्वी 'तुम्ही आपला प्रश्न सभेपुढें अवश्य मांडा, तुम्हास यश येईल' असें निगळ्यांनीं सुचविलें होतें! सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं, या वेळपर्यंत त्या ढवळकर विरोध्यांस कसलाच जोर नव्हता व पुढें कोणत्या तरी अंतस्थ प्रेरणेचें सहाय्य त्यांस न मिळतें तर आज विरोधीपक्षाचा बागुलबोवा जो दिसतो आहे तोही मुळींच दिसला नसता. असो. सभेंत श्रींनीं हें प्रकरण आपल्या अंगावर घ्यावें असें ठरल्यावर तें कसें घ्यावें, पुढें संस्थाननें यांत काय करावें वगैरे विचार ठरून शेवटीं श्री० नेरलीकर यांनीं

## भट्ट-प्रभु ऐक्यपरिषदेचा जाहिरनामा

काढला. याच वेळीं ढवळकर विरोधी तोंडानें कांहीं बोलत तितकेंच, पण विरुद्ध चळवळ करण्याचा त्यांचा मुळींच विचार नव्हता. सामर्थ्यही नव्हतें. पण त्या वेळीं त्यांस आधार देणारी एक अंतस्थ शक्ति होती व त्या शक्तीनें (कोणत्याही उद्देशानें कां होईना) ढवळकरकंपूस प्रोत्साहन दिलें. नंतर या ढवळकरबंधूंस जोर चढून पेंडसेप्रभृति ४।५ कोंकणस्थांना जवळ करून व अध्यक्षपदाची माळ निगळ्येशास्त्र्यांच्या गळ्यांत ते नको नको म्हणत असतां कशीबशी अडकवून 'कोंकणस्थ, कऱ्हाडे पद्ये ब्राह्मण ज्ञातिसंरक्षक (!) पक्ष स्थापन केला. तो इतक्या गुप्त रीतीनें कीं, आजूबाजूच्या मंडळीसही त्याची दाद नव्हती. नंतर विरुद्ध चळवळीस पक्षाचें नांव देऊन व फितूर झालेल्या निगळ्येशास्त्र्यांस घेऊन सत्तर, भाटग्राम, सांगें, नेत्रावळी वगैरे भागांत रात्रीचे दिवस करून या परोपकारी(!) महात्म्यांनीं विरुद्ध मत करण्याकरितां अविश्रांत परिश्रम चालविले! परंतु त्यांत त्यांस यश येईना. नंतर या निगळ्येशास्त्रीप्रमुख लोकांनीं साध्याभोळ्या कांहीं लोकांचीं (आपल्या नात्यागोत्याच्याच) मनें आमच्याविषयीं खोटयानाट्या गोष्टी सांगून व आम्हांस निरपेक्षपणें साहाय्य करणाऱ्या मंडळीवर लांच खाल्ल्याचा अक्षम्य आरोप करून

आपला पक्ष सबळ करण्याचा उपाय चालविला तरीही यश येईना. शेवटी तुम्हीं जर आमच्या पक्षांत सामील होणार नाहीं तर आमचातुमचा सर्व संबंध यापुढें तुटला असा धाक घालून लोकमत जमविण्याचा आत्मघातकी प्रयत्न करण्यांत आला! व जे जे लोक विरोधी मंडळांत सामील झाले त्यांनीं त्यांनीं तशा प्रकारची आमच्याजवळ कबुली देऊन जुलमामुळें मी विरुद्ध झालों असें सांगितलें आहे. कोंकणस्थ मंडळी रा० पेंडसेप्रभृति ४।५ यांनीं आपले आप्त जे सत्तर भागांतील ब्राह्मण (कीं ज्यांचा आमचा जन्मांत कधींच संबंध येणें शक्य नाहीं व जे आमच्याहून बरेच दूर असणारे ) त्यांला भाडेभिडेनें आमच्याविरुद्ध चिथवून कांहीं विरुद्ध लोक उभे केले! तरी पण तें ओढून ताणून आणलेलेंच चंद्रबळ परिणामीं ठरलें. खरेखुरे विरुद्ध म्हटले म्हणजे ढवळकरकंपू, त्यांचे सांगाती व या सर्वांचे आजचे मुगुटमणी वे० निगळ्येशास्त्री इतकेच काय ते. हें आम्हीं येथील सर्व अंतस्थ परिस्थितीचें ज्ञान असल्यामुळें सत्य तेंच लिहीत आहों. यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं व हे तरी विरोधी कां झाले तर केवळ आपसांतील द्वेषामुळेंच होय. तो द्वेष कसा ? कोणाचा ? वगैरे मजकूर या जाहिरपत्रांत येणें अयोग्य असल्यामुळें देत नाहीं. असो. यावरून या मत्सरग्रस्त

## विरोधाचा फोलपणा

आपल्या लक्षांत आलाच असेल. या मंडळीनें शेवटीं सर्व हेतु फसल्यामुळें श्रींनीं भरविलेली सभाच उधळून लावण्याचा घाट घातला होता; पण श्रींचे कारभारी श्री० इनामदार नेरलीकर यांच्या चाणाक्षपणामुळें व दक्षतेनें तो प्रसंग टळला. सभा निर्विघ्न रीतीनें पार पडून विरोधी पक्ष किती योग्यतेचा आहे हें जनाच्या निदर्शनास येऊन चुकलें. त्यामुळें या प्रकरणाची विशेष बाटाघाट करीत नाहीं. पण इतकेंच येथें नमूद करावेंसें वाटतें कीं, पूर्वीं एकदोन ठिकाणीं आम्हीं अंतस्थ चेतना-शक्ति असें म्हटलें आहे, तें आम्हीं श्रींच्या धर्ममंडळास उद्देशून म्हटलें आहे. ( जें कांहीं दिवसाकरितां येथील मठ बांधण्याच्या व्यवस्थेखातर श्री० नेरलीकरांनीं नेमले होते ) व विरुद्ध मंडळी ठिकठिकाणीं त्याचा आपणांस बळकट अंतस्थ आधार असल्याचें सांगून लोकमत बनवीत होती. शिवाय

परिषदेच्या दिवसांतील धर्ममंडळाचें वर्तन; त्याच्या व विरुद्ध कंपूच्या गुप्त रीतीनें झालेल्या सभा, धर्ममंडळाचे अध्यक्ष विरुद्ध पक्षाचे वकील म्हणून उभे राहतात, इत्यादि प्रकार यास पुष्टिकारक आहे. पण हें मंडळ ज्या-अर्थीं श्रींच्या कारभाऱ्यांनीं नेमलें होतें त्याअर्थीं त्यासंबंधीं याच्याहून विशेष चर्चा न केलेली बरी. त्याकरितां

ऋषीचें कुळ व नदीचें मूळ

शोधण्याच्या भानगडींत आम्हीं पडत नाहीं. एवढयावरूनच आपल्या लक्षांत सर्व प्रकार आला असेल. धर्ममंडळाकडून एका पक्षास चेतविण्याचा प्रयत्न झाला तो अत्यंत अनिष्ट परिणामीं आहे. तो न झाला असता तर आज विरुद्धपक्षाच्या कैंद्रांत वावरणारे पूर्वी आमच्या येथें अन्नोदक-व्यवहारांत कसलाच भेद मानीत नसत; तेच लोक चार अलबते-गलबते जमवून कों. क. प. ब्रा. ज्ञातिसंरक्षक (कीं भक्षक ?) पक्षाच्या नांवें आम्हांस विरोध करण्याचें कृतघ्नत्व करतेच ना अशी आमची निःसंशय खात्री आहे. पण असे असत्यपक्षाधिष्ठित विरोध कितीही झाले तरी जोंपर्यंत आमचा पक्ष बळकट सत्यावर अधिष्ठित झाला आहे तोंपर्यंत आम्हांस त्याची बिलकुल पर्वा नाहीं, व जितका जितका विरोध जास्ती तितकें तितकें आमच्याकडे जनतेचें जास्त लक्ष वेधून आमचा प्रश्न आज ना उद्यां सुटल्याशिवाय राहणार नाहीं अशी आम्हांस खात्री वाटते. व त्यामुळें आम्हांस विरोध करणाऱ्यांही मित्रवत् उपकारी होत असल्यामुळें स्नेहभावें त्या सर्वांचे आम्ही आभारी आहों व लवकरच त्यांनीं झालेला प्रकार विसरून जाऊन पूर्ववत् आमच्याशीं प्रेमानें वागावें. निष्कारण जगास तमाशा दाखवून आपसांत भांडून आपलें सामर्थ्य क्षीण करून घेऊं नये. तर ५ चे ५०० होऊन सर्वांचें हित करावयास झटूं अशी देशबंधुत्वाच्या भावनेनें आमच्या विरोध्यांस विनंति करितों. असो. अशा रीतीनें आमचा ऐक्यविषयक चळवळीचा झरा भट्ट-प्रभु-ऐक्य-परिषद्रूपी महानदीस मिळवीपर्यंतचा सर्व इतिहास सूत्ररूपानें कोणाची निंदा किंवा स्तुति करण्याचा इरादा न धरितां केवळ इतिहास कथन करणें याच बुद्धीनें लिहिला आहे. त्यांत न्यूनातिरिक्ताबद्दल आपण क्षमा कराल्च. आतां भट्ट-प्रभु-ऐक्यपरिषदेच्या आरंभापासून अखेरपर्यंतचा

वृत्तांत सर्व आपल्याच देखरेखीखालीं झाल्यामुळें तो इतिहास आपल्याकडून योग्य वेळीं जनतेस श्रुत होऊन शेवटीं गंगेचें पाणी गंगेस मिळून एकजीव व्हावें अशी त्या जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करून हें लांबलेलें पत्र संपवितों. कळावें, लोभ असावा हे विनंति.

आपले नम्र
(सह्या) गुणबा शिवप्रभु देसाई
विठ्ठल विश्वंभर प्रभु गांवकर
सेक्रेटरी, भट्ट-प्रभु ब्राह्मणसमाज, बोरी–गोवा.



# भट्ट-प्रभु-पद्धेप्रकरण

## परिशिष्ट १ लें

## शके १८४९ श्रावण शुद्ध ११ रोजीं भरलेल्या भट्ट-प्रभु-समाजाच्या सभेचा अहवाल.

शके १८४५ रुधिरोद्गारीसंवत्सर श्रावण शुद्ध ११ रोज बुधवार सायंकाळीं ४ वाजतां गांव बोरी, वाडा शिराशिरें येथें श्रीसिद्धपुरुषाच्या देवालयांत श्रीं० श्रीपाद महादेव प्रभु बोरकर यांचे अध्यक्षतेखालीं अखिल भट्ट-प्रभु समाजाची जाहीरसभा भरली होती.

प्रारंभीं रा० गुणबा शिवप्रभु देसाई, मुक्काम शिरोडें यांनीं स्वागतपर भाषण केलें. ते म्हणालेः—आमचा समाज गेल्या पन्नास वर्षांपूर्वी पांचशें साडेपांचशेंच्या वर होता तो उत्तरोत्तर कमी होत होत आज तीनशें साडेतीनशेंवर येऊन पोंचला आहे! व त्यांतही मुके, लुले व बहिरे यांची संख्या पाहिली असतां अंगावर शहारे येतात, आणि प्रत्येकाला मुलांमुलींचीं लग्नें करते वेळीं सगोत्रप्रवरांचें जाळें तुडविता तुडवितां नाकीं नऊ येतात व नको हा जन्म असें होऊन जातें! असा आमचा ऱ्हास–अवनति होण्याचें कारण काय? तर पूर्वीं दोनशें वर्षांमागें आमच्या वाडवडिलांनीं इतर द्राविड ब्राह्मणांशीं, विशेषतः पद्ये ब्राह्मणांशीं बेबनाव आणला व ते वेगळे राहिले. त्यामुळें आमचा समाज आकुंचित होऊन समाजवृद्धीस कारण असलेली रक्ताची सरमिसळ होण्याचें बंद झालें व याचा समाजशास्त्र व वैद्यशास्त्र यांना अनुसरून व्हावयाचा तो परिणाम होऊन आमचा अधःपात झाला. याला उपाय फक्त एकच आणि तो हाच कीं, पुन्हा त्यांची व आमची एकी होणें. व ती झाली तरच आमचा तरणोपाय आहे. तेव्हां ऐक्याकरितां प्रयत्न करणें आणि 'आम्हांस पदरांत घ्या' अशी पद्ये वगैरे ब्राह्मणांस विनंति करणें हेंच आमचें प्रस्तुतचें कर्तव्य आहे. असा विचार करून गेल्या चैत्र महिन्यांत कवळें येथें

भरणाऱ्या हिंदुधर्मपरिषदेनिमित्त वेदशास्त्रसंपन्न धूपकर, श्री० दादासाहेब वैद्य, श्री० पाटणकर इत्यादि पुढारी मंडळी जमणार हें आम्हांस निश्चित कळल्यावरून आम्ही श्रीमंत सावकारादि चारपांच मंडळी तेथें गेलों व वैद्यराज दादासाहेब यांचे विचारें दुर्गा जोशी यांचे येथें या विषयाचा विचार करण्याकरितां खासगी बैठक भरविण्याचें ठरविलें. आणि त्याप्रमाणें सदर धूपकरादि मंडळीस आमंत्रण केलें. त्याप्रमाणें बीसपंचवीस मंडळी आल्यावर त्या सर्वांस श्री० दादासाहेब वैद्य यांनीं आमची पूर्वापार माहिती, प्रस्तुतची अवनति व तदंगभूत अडचणी, आमचे आचारविचार वगैरे सर्व माहिती सांगितली. व 'यांना परत आमच्यांत घेण्यास कांहीं हरकत आहे कीं काय?' असा सर्व मंडळींना प्रश्न केला. तेव्हां अनंतशास्त्री धूपकर. यांनीं सांगितलें कीं:—" धर्मशास्त्र आणि इतिहास यांत यांच्या ( भट्ट-प्रभूंच्या )संबंधीं कांहींच आढळत नाहीं. तीसचाळीस घरांची स्वतंत्र ज्ञाति असणें शक्यच नाहीं. पूर्वापार माहितीप्रमाणें पाहिलें तर हे ( भट्ट प्रभू ) ब्राह्मणच असून आमच्याच कोणत्या तरी एका वर्गांतील आहेत, हें निःसंशय सिद्ध होत असल्यावरून भट्ट-प्रभूंस आमच्यांत सामील करून घेण्यास कोणतीच हरकत नाहीं. एका क्षुल्लक दंतकथेच्या जोरावर त्यांस इतकीं वर्षें हालअपेष्टा भोगल्यावरसुद्धां बाहेर ठेवणें माणुसकीस शोभणार नाहीं."

यानंतर या ऐक्यप्रकरणीं कार्यास कशी सुरवात करावी असा श्री० दादासाहेब वैद्य यांनीं प्रश्न विचारला असतां ते म्हणाले:—" शास्त्रीपंडितांचे मिळतील तितके अभिप्राय घ्यावेत व ते जोडूनच श्रीजगद्गुरु शंकराचार्य, संस्थान संकेश्वर व श्रीजगद्गुरु शंकराचार्य ( डॉ० कुर्तकोटि ) संस्थान करवीर यांना अर्ज करावे, म्हणजे उभयतां शंकराचार्य योग्य निकाल देतील, इ० इ०" मग आम्हीं 'शुभस्य शीघ्रम्' या न्यायानें वे० शा० सं० धूपकरशास्त्री यांस आमच्या कार्याचें आधिपत्य स्वीकारण्याविषयीं विनंति केली; ती त्यांनीं उदार अंतःकरणानें मान्य करून आमचें साम्यदर्शक आठदहा मुद्दे लिहून घेतले व अर्जाचा मसुदा तयार केला आणि तो आमच्या हवालीं करून " आळस न करितां कार्य चालवा " म्हणून सांगितलें. शेवटीं श्री० दादासाहेब वैद्य

यांनींही सांगितलें कीं:—" तुमची व आमची (पद्यांची) एकी होणारच्च अशी खात्री बाळगा. आणि त्याबरोबर हेंही विसरूं नका कीं, तुमचा आमचा संबंध सुटल्यास आज बरींच वर्षें झालीं असल्यामुळें तुमच्या आमच्या आचारांत कांहीं फरक पडणें स्वाभाविक आहे. तरी एक वेदशाळा स्थापन करून मुलांस शिकविण्याची व्यवस्था करा " ही त्यांची सूचना आम्हीं मान्य केली व कार्यास लागलों. आज आम्ही आमच्या ऐक्यप्रकरणीं आठनऊ अभिप्राय मिळविले आहेत. (ते वाचून दाखविले.) आतां त्या कार्याची जबाबदारी व्यक्तिशः आम्हां सर्वांवर येऊन पडली आहे व हें आपणां समाजबंधूंस सुचविण्याकरितांच ही सभा बोलविलेली आहे. नंतर वे० रा० बाबू पुरुषोत्तमभट्ट, मुक्काम कुंडई यांनीं श्रीयुत रा० श्रीपाद महादेव प्रभु बोरकर यांस सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं विनंति केली. तीस रा० गुणबा शिवप्रभु देसाई यांनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्षांनीं आपलें स्थान स्वीकारलें. नंतर त्यांचें समाजऐक्याबद्दल कळकळ व्यक्त करणारें प्रास्ताविक भाषण झाल्यावर रा० बाबू पुरुषोत्तमभट्ट यांस सेक्रेटरीचे जागीं नेमल्यावर श्री० नारायण व्यंकटेश देसाई यांचें सहानुभूतिपर आलेलें पत्र वाचून दाखविलें. त्यानंतर खालील ठराव पास झाले.

## ठराव १ ला

श्रीमंत दादासाहेब सावकार, श्री० रामजी विश्वंभर प्रभुगांवकर व गुणबा शिवप्रभु देसाई यांनीं जें हें आमचें समाजोद्धाराचें कार्य चालविलें आहे त्यास या सभेची पूर्ण संमति असून पाठबळही आहे आणि या सभेची अशी खात्री आहे कीं, पद्ये-ब्राह्मणांपैकींच आम्ही आहोंत.

प्रस्तावकः—अध्यक्ष.

अनुमोदकः—रा० गोविंद मंगेश प्रभु व रा० अ० ज० प्रभु देसाई.

## ठराव २ रा

श्री० दादासाहेब वैद्य केरी, वे० शा० सं० अनंतशास्त्री धूपकर, श्री० नारायण अनंत नाईक पाटणकर, वे० शा० सं० दत्तात्रेयशास्त्री पणशीकर या विद्वद्वर्यांनीं उदार अंतःकरणानें आम्हांस आपल्यांत सामील

करून घेण्याचें ( ठरविलें ) व त्याप्रमाणें उभयसमाजैक्य करण्याचें अभिवचन देंऊन ऐक्याचें कार्य नेटानें चालू करण्यास उत्तेजन दिलें याबद्दल ही सभा त्यांची अत्यंत आभारी आहे. आणि या आमच्या ऐक्यप्रकरणांत कदाचित् येणाऱ्या अडचणींतून आम्हांस मुक्त करून आमचें कार्य लवकर घडवून आणण्याविषयीं ही सभा सदर विद्वन्मंडळास अत्यादरपूर्वक विनंति करीत आहे. तिचा ते उदार अंतःकरणानें स्वीकार करितील-च अशी या सभेची पूर्ण खात्री आहे.

प्रस्तावकः—अनंत सगुण देसाई.

अनुमोदकः—विनायक महादेवभट्ट.

## ठराव ३ रा

प्रस्तुत आमच्या या छोट्याशा समाजांत उपाध्येपणा करणारीं घराणीं अगदींच कमी असल्यामुळें आमच्यांत वैदिकशिक्षण बरेंच कमी आहे. ही उणीव भरून काढण्यासाठीं आमच्या समाजांतील सर्व मुलांस वैदिकशिक्षण देण्याकरितां एक वेदशाळा स्थापन करण्याचें ही सभा ठरवीत आहे. या कार्यांत वे० मू० सितारामभट्ट, वे० मू० विनायकभट्ट यांनीं साहाय्य करावें.

प्रस्तावकः—वे० मू० बाबू पुरुषोत्तमभट्ट.

अनुमोदकः—विश्वंभर नारायण देसाई.

## ठराव ४ था

नंबर २ चा ठराव व इतरही ठराव श्री० दादासाहेब वैद्य, वेदशास्त्रसंपन्न दत्तात्रेयशास्त्री पणशीकर, वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री धूपकर, श्री० ना. अ. नाईक पाटकर यांजकडे पाठविण्याचा अधिकार अध्यक्षांस ही सभा देत आहे.

प्रस्तावकः—गुणबा शिवप्रभु देसाई.

अनुमोदकः—विनायभट.

## ठराव ५ वा

हें कार्य सुरळीत चालण्यासाठीं ही सभा खालील गृहस्थांचें मंडळ नेमीत आहे.

अध्यक्षः—श्री० रामजी विश्वंभर प्रभुगांवकर.
उपाध्यक्षः—श्री० नारायण व्यंकटेश देसाई.
खजिनदारः—श्री० रघुनाथ शाबा प्रभु.
सेक्रेटरीः—रा० विठ्ठल विश्वंभर प्रभुगांवकर.
दुय्यम सेक्रेटरीः—रा० गुणबा शिवप्रभु देसाई.
मदतनीसः—रा० अनंत सगुण प्रभु देसाई.

वे० मू० सीताराम नारायणभट्ट.
वे० मू० रामचंद्र विठ्ठल देवारी.
वे० मू० बाबू पुरुषोत्तमभट्ट.

प्रस्तावकः—श्रीधर हरि प्रभु देसाई.
अनुमोदकः—अनंत सगुण प्रभु देसाई.

नंतर अध्यक्षांनीं समारोपादाखल भाषण केल्यावर, आभारप्रदर्शन वगैरे झालें व सभेचा कार्यक्रम खलास झाला.

सेक्रेटरी,
बाबू पुरुषोत्तमभट्ट.

सुरवणीः—

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री किंजवडेकर यांसीः—कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष. शके १८४५ श्रावण शुद्ध ११ रोजीं बोरी येथें श्री० श्रीपाद महादेव प्रभु बोरकर यांच्या अध्यक्षतेखालीं आमच्या समाजाची सभा भरली होती. त्या सभेंत पुढील कार्य करण्याकरितां मंडळ निवडण्यांत आलें होतें. त्यांत खालीं सह्या करणारे आम्हीं इसम असल्यामुळें वरील संघटनाकार्यांत शक्य तें साहाय्य करण्याकरितां आपणांस निवडीत आहों. तरी या कार्याचें शीघ्रकारित्व व महत्त्व ध्यानांत आणून कार्य करण्यास लागावें अशी आमची आपणांपाशीं विनंति आहे. सदर कार्यांत ज्या ज्या प्रसंगीं आमच्याकडून साहाय्याची अपेक्षा

आपणांस लागेल त्या त्या वेळीं ती आम्ही अवश्य पुरी करूं. कळावें, कृपा असावी हे विनंति. फाल्गुन वद्य १४ शके १८४७.

आपले नम्र

(सह्या) { गुणबा शिवप्रभु देसाई.
रामजी विश्वंभर प्रभुगांवकर.
आपा देसाई (ना. व्यं. देसाई).

---

## परिशिष्ट २ रें.

### भट्ट-प्रभु-ऐक्य-परिषद्—शके १८४८

### साग्र वृत्तांत.

पूर्वीं प्रसिद्ध केल्याप्रमाणें एप्रिल ता. २३।२४ ( १९२६ ) ह्या दोन दिवसांत श्रीकपिलेश्वर ( फोंडा–गोवा ) येथें भट्ट प्रभु-ऐक्य-परिषदेचें अधिवेशन श्रीं० दे० भ० न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं निर्विघ्नपणें पार पडलें. श्रीशंकराचार्यमंदिरासमोर परिषदेकरितां भव्य मंडप उभारून तो ध्वजापताकांनीं, छतझालऱ्यांनीं व प्रेक्षणीय रंगीत कामानें अत्यत सुंदर रीतीनें शृंगारण्यांत आला होता. म० गांधी, लो० टिळक, श्रीमच्छंकराचार्य इत्यादि थोर विभूतींचीं छायाचित्रें व्यवस्थित रीतीनें ठिकठिकाणीं लाविलीं होतीं. तसेंच निरनिराळ्या रंगांचीं व आकाराचीं सुबोध धार्मिक वचनें मधून मधून लावण्यांत आल्यामुळें मंडपास विशेषच शोभा आली होती. तिकिट ऑफिस, स्वयंसेवकगृह, कार्यवाहकचेरी, प्रवेशद्वारासमोर उभारलेलें ॐकारयुक्त उत्तुंग निशाण, भोजनगृहें, मोटार गाडयांची अविरत येरझार, अध्यक्षांना उतरण्याकरितां मुद्दाम शृंगारलेला बंगला इत्यादि तेथील प्रकार पाहिल्यावर छोटयाशा राष्ट्रीय सभेच्या प्रतीकाची आठवण झाल्यास नवल नाहीं.

परिषदेचे सन्माननीय अध्यक्ष श्री० केळकर हे तारीख २३ एप्रिल रोजीं सकाळीं ६ वाजतां बोटींतून पणजीस उतरतांच श्री० दादासाहेब वैद्य,

वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, श्री० नारायण अनंत नाईक पाटणकर, श्री० यशवंत सूर्यराव सरदेसाई व श्री० दत्तात्रेय व्यंकटेश पै अशी मंडळी स्वागतार्थ घक्क्यावर होतीच. त्यांनीं स्वागत केल्यावर अध्यक्षांनीं थोडासा उपाहार केला व मोटारींतून सर्व मंडळी सुमारें दहा वाजतां फोंडघास येतांच तेथून थाटाची मिरवणूक निघाली, ती सुमारें बारा वाजतां चौघडादि वाद्यांच्या गजरांत व स्वयंसेवकपथकांच्या जयघोषांत अनेक सन्मान घेत घेत कपिलेश्वरीं आली. तेथें धर्मकचेरी, ब्राह्मणसंघ वगैरे संस्थांतर्फे अध्यक्षांस हारतुरे अर्पण झाल्यावर पानसुपारी घेऊन अध्यक्षांना त्यांच्याकरितां मुद्दाम शृंगारलेल्या श्री० बुकले यांच्या बगल्यांत पोंचविण्यांत आलें.

सभेच्या कामास सुरुवात बरोबर साडेचार वाजतां झाली. व्यासपीठावर अध्यक्षांशिवाय श्री० नेरलीकर इनामदार वट्ट मुक्त्यार व कारभारी संस्थान संकेश्वर व करवीर, धर्माधिकारी वेदशास्त्रसंपन्न बाघांबेकर, सभेचे कार्यवाह वेदशास्त्रसंपन्न रामचंद्रशास्त्री किंजवडेकर, श्री० दादासाहेब वैद्य, वेदशास्त्रसंपन्न दत्तात्रेय तुकारामशास्त्री पणशीकर, वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री दिवेकर, वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री धूपकर व डॉ० आत्माराम गोविंद बोरकर बसले होते. प्रथम ह० भ० प० भिकु गणेश अभिषेकी यांनीं आपल्या मधुर आवाजांत स्वागतपर पद्यें तबलापेटीवर गाऊन दाखविल्यावर स्वागत मंडळाचे अध्यक्ष व श्रींचे वट्ट मुक्त्यार कारभारी श्री० नेरलीकर हे टाळ्यांच्या प्रचंड गजरांत स्वागतपर भाषण करण्यास उभे राहिले.

## स्वागताध्यक्षांचें भाषण.

ते म्हणालेः—सनातन वैदिकधर्माभिमानी प्रिय बांधवहो! अलीकडेच जागृत झालेल्या या भक्तिभावना-प्रधानगोमांतक प्रांतांतील या लहानशा 'कपिलेश्वर' नामक पुण्यक्षेत्रीं श्रीसंस्थानच्या वतीनें आपलें स्वागत करण्याचें सन्माननीय कार्य मजकडे सोंपविण्यांत आलें, याबद्दल मला अभिमान व आनंद वाटत आहे; पण त्याबरोबरच श्रीसंस्थानकडून सोंपविलेली ही जबाबदारीची कामगिरी आपल्या हातून कशी पार पडेल ह्याविषयीं

मनाला थोडीं भीतिही वाटत आहे. तथापि प्रस्तुत प्रसंगाच्या निमित्तानें कां होईना; श्रीआचार्यपीठाची व जनतारूपी परमेश्वराची सेवा करण्याची ही अमूल्य संधि अनायासें प्राप्त होणारी आहे या विचारानेंच हें साहस-कर्म करण्यास प्रवृत्त झालों आहें.

आम्ही या प्रांतांत अननुभवी व अपरिचित असल्यामुळें आमची साधनसामुग्री अपुरी पडणारी आहे. तसेंच मोठ्या शहरीं ज्या सुखसोई सहज होऊं शकतात त्यांचा शहरापासून व रेल्वेपासून बऱ्याच दूर असलेल्या या गांवीं अभावच दिसून येतो. तथापि आपली स्वधर्मनिष्ठा व धर्मकार्याविषयींची कळकळ आणि उत्कंठा हीं इतकीं उच्च पायरीचीं आहेत कीं, जरी आपल्या आदरसत्कारांत न्यून पडलें तरी आपण उदार अंतःकरणानें तिकडे दुर्लक्ष कराल अशी मला पूर्ण आशा आहे.

## धर्माची स्थिति.

ज्या काळीं गुरुदंडाला राजदंडाचा आधार होता अशा कालाकडे दृष्टि फेंकली तर असें दिसून येतें कीं, सर्व जनतेला धर्मशास्त्राप्रमाणें चालविण्यासाठीं सदुपदेश, गुरुदंड किंवा राजदंड या तिन्ही उपायांचा यथाप्रसंग उपयोग करून अभ्युदय व निःश्रेयस या दोहोंची प्राप्ति करून देण्याची जबाबदारी धर्मगुरु, ब्राह्मण व क्षत्रिय राजे यांनीं आपल्या शिरावर घेतली होती. आणि त्या काळीं ब्राह्मण व क्षत्रिय सनातन-वैदिकधर्माच्या संरक्षणासाठीं एकजीवानें एकमेकांशीं सहकार्य करीत असल्यामुळें अधर्माचें निवारण करून सद्धर्मपालन करण्याचें कार्य, ब्राह्मणांना राजाश्रय असल्यामुळें फार सुकर होत असे. गुरुदंडाशीं राजदंडाचें सहकार्य असल्यामुळें आपल्या या भरतभूमींत सर्व जनता स्वधर्मानें वागणारी व ऐहिक-पारलौकिक ऐश्वर्यानें संपन्न झालेली होती. असा पूर्वीचा काळ होऊन गेला याबद्दल भारतीय इतिहास साक्ष देत आहे. अशा भाग्यकाळीं फलाकडे दृष्टि न देतां केवळ धर्माकरितांच धर्माचरण करणें या अत्युच्च कोटीला पोंचलेलीं शेंकडों नररत्नें चारी वर्णांत निपजलीं यांत नवल नाहीं.

परंतु सांप्रतकाळीं समाज-धारणेला अत्यंत अवश्य असलेलें ब्रह्मदंड व राजदंड यांचें साहचर्य नष्ट झालेलें असून सर्व प्रजा व तिचे परंपरागत

शासनकर्ते परकीय सत्तेच्या स्वाधीन होऊन बसले आहेत. राजा व प्रजा उभयतां समानधर्मी असल्यावांचून धर्मरक्षणासाठीं त्यांचें सहकार्य होणें शक्य नसतें. उलट परकीय शास्ते शासित प्रजेच्या संस्कृतीचा पाडाव करून आपल्या संस्कृतीची उभारणी करण्याचा अहर्निश आटोकाट प्रयत्न करीत असतात, अशी सर्व देशांतील इतिहास आपणांस साक्ष पटवीत आहे. आपल्या हिंदुस्थानांत आपल्या धर्माला सध्यां अशाच अत्यंत विपरीत स्थिति प्राप्त झाली आहे. धर्माला राजाश्रय राहिला नसून व्यक्तिस्वातंत्र्य बेसुमार वाढलें आहे. आपला धर्म व संस्कृति यांवर सध्यां बाहेरून व आंतून उघड अथवा गुप्त रीतीनें हल्ले होत आहेत. एका बाजूस आर्यसमाज, ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधकसमाज, इ० इ० नवीन धर्मपंथ व धर्ममतें निर्माण होऊन तीं आपल्या धर्मांत व समाज-रचनेंत भयंकर गोंधळ माजवीत आहेत; तर दुसऱ्या बाजूस इस्लामी, थिऑसॉफिस्ट इत्यादि धर्मांचे व धर्ममतांचे हल्ले होत आहेत. अशा या भयंकर आपत्तींत सांप्रत आपला धर्म व संस्कृति सांपडल्यामुळें त्यांचें संरक्षण करावें कसें व धर्माची विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसवावी कशी, हा हल्लीं सुविचारी, स्वधर्माभिमानी व विद्वान् लोकांपुढें मोठा बिकट प्रश्न येऊन पडला आहे. हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविण्यासाठीं लोक प्रयत्नही पण करीत आहेत.

आपल्या देशांत चालू पिढींत व मागल्या पिढींत ज्या कित्येक धार्मिक व सामाजिक परिषदा भरल्या व हल्लीं होत आहेत त्या अशा प्रकारच्या प्रयत्नांचेंच फळ होय. या परिषदा क्वचित् अपवाद खेरीज करून लोक-समुदायाच्या सहाय्यानेंच भरल्या व परिषदांत ठरलेल्या नियमाची व निर्णयांची अंमलबजावणी लोकसमुदायाकडूनच झाली व होत आहे. यावरून कालाच्या एकंदर प्रवाहाकडे लक्ष दिल्यास यापुढें धर्मनिर्बंधांची अंमल-बजावणी राजाश्रयानें होणारी नसून लोकाश्रयानेंच होणारी आहे ही गोष्ट उघड दिसते.

'संघे शक्तिः कलौ युगे' या वचनांत सांगितल्याप्रमाणें शक्तीचें अधिष्ठान आतां राजापासून निघून लोकसमुदायाकडे येत आहे. अर्थातच धर्माला भविष्यत्कालीं स्वसंरक्षणासाठीं व संवर्धनासाठीं लोकसमुदायाचाच

आश्रय पाहिल्यावांचून गत्यंतर नाहीं. धर्माचा राजाश्रय बहुतांशीं गेला व तो आतां पुन्हा मिळण्याची आशा दिसत नाहीं; पण त्यामुळें आपण किंकर्तव्यमूढ होऊन बसूं नये. राजाश्रयापेक्षां लोकाश्रय मिळण्यास अधिक श्रम व काल लागेल ही गोष्ट खरी; तरी पण तो एकदां मिळाल्यावर अधिक सामर्थ्यप्रदायक, अधिक विस्तृत व अधिक चिरंजीव असा अनुभवांतीं ठरेल हें निःसंशय समजावें. मात्र आपण——

न जातु कामान्न भयान्न लोभाद्धर्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः ॥
धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये जीवो नित्यो हेतुरस्य त्वनित्यः ॥

या व्यासमुनींच्या वचनावर विश्वास ठेवून धैर्य, निश्चय, उत्साह व ऐक्यबुद्धि यांच्या योगानें सनातन-वैदिक-धर्म-प्रतिपादित मार्ग पुढें पुढें आक्रमित गेलें पाहिजे. आपल्या निष्काम दृढ भक्तीनें व कळकळीच्या नित्य प्रार्थनेनें जनतारूपी परमेश्वर प्रसन्न होऊन आपल्या प्रिय सनातनधर्माचें सांप्रत ओढवलेल्या भयंकर आपत्तींतही संरक्षण करील, अशी आमची दृढ श्रद्धा असली पाहिजे. धर्मावरील संकटांचें निवारण करण्यासाठीं परमेश्वरानें आजपर्यंत अनेक अवतार धारण केले अशी आमच्या पुराणइतिहासग्रंथांतून वर्णनें आहेत. आणि स्मृत्यादि धर्मशास्त्रें त्यांची ग्वाही देत आहेत. श्रीकृष्णांनीं——

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

असें भगवद्गीतेंत अवतारग्रहणाविषयीं पूर्ण आश्वासन देऊन ठेवलें आहे.

असो. आतां आपण सर्वजण या ठिकाणीं एकत्र जमण्याचें कारण म्हणजे भट्ट प्रभूंकडून आलेल्या अर्जाचा विचार करणें हें असून त्याचा आशय खालीलप्रमाणें आहे.

"आम्हीं भट्ट-प्रभु पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण असून आमचीं गोत्रें, प्रवर, घरचे वैदिक धर्मसंस्कार, हव्यकव्य, आचारव्यवहार, सोवळें-ओवळें, कुलदेवता, कुलपुरुष, इ० सर्व प्रकार येथील पद्ये ब्राह्मणांचा व आमचा एकच आहे. करितां या सर्व गोष्टींचा विचार करून येथील

पद्ये ब्राह्मणांशीं आमचें पंक्तिभोजन व विवाहादि संबंध घडून येण्यास श्रींची आज्ञा व्हावी."

विरुद्ध पक्षाकडून एक पत्र आलें आहे त्यांत ते म्हणतात कीं:-'भट्ट-प्रभूंचा आचारविचार, घरच्या चालीरीति आमच्याहून बऱ्याच भिन्न आहेत. मांसाहार मात्र मुळींच नाहीं'. तरी वेदशास्त्रसंपन्न दत्तात्रेय तुकारामशास्त्री पणशीकर यांनीं आपल्या अभिप्रायांत ग्रथित केलेले मुद्देच मला योग्य दिसतात. ते मुद्दे विचाराकरितां आपल्या समोर मांडीत आहें.

१. " भट्ट-प्रभु नांवाचा अल्पसंख्याक वर्ग पंचद्रविडांतर्गत नसून अमक्या एका जातीपैकीं आहे असें मानण्यास प्रमाण काय?

२. " तो अमक्या एका विशिष्ट वर्गापैकीं आहे असें ठरल्यास त्यानें (पद्ये ब्राह्मणवर्गानें) त्यांस ( भट्ट-प्रभूंस ) बाहेर टाकण्यास कारण कोणतें ?

३. " दुसऱ्या मुद्द्याविषयीं पुरेसें समर्पक कारण नसेल तर विभक्त वर्गास संशयाचा फायदा देऊन मुख्य वर्गानें त्यास आपल्यांत एकजीव करून न घेणें न्यायाचें होईल काय ? "

त्याचप्रमाणें " आचारव्यवहारांत लोप झाला नसेल तर सहपंक्तीनें भोजनादि व्यवहार करण्यांत प्रत्यवाय नाहीं " या शृंगेरी पीठाधिष्ठित जगद्गुरूंच्या एका आज्ञापत्रांतील आज्ञा लक्षांत आणून वरील सर्व गोष्टींचा निर्विकार व निःपक्षपात बुद्धीनें विचार करावा व या वादा-संबंधानें सभेचें निश्चित मत ठरवावें. येथें सभेंत झालेला निर्णय श्री-चरणीं निवेदन करण्यांत येईल व श्रींकडून त्याचा शास्त्र व व्यवहार या दोन्ही दृष्टींनीं युक्त विचार होऊन योग्य निर्णय श्रींकडून प्रसिद्ध होईल. करितां सभेचें कार्य निर्विघ्नपणें पार पाडण्यास सहाय्य करावें अशी आपणां सर्वांस माझी नम्र विनंति आहे.

या प्रसंगीं स्वदेश आणि स्वधर्म यांसाठीं अहर्निश अंतःकरणांत तळ-मळणारे व या कार्यासच ज्यांनीं स्वतांस आजन्म वाहून घेतलें होतें अशा कै० लो० टिळकांचें अनुयायी आणि पट्टशिष्य देशभक्त श्री० तात्यासाहेब केळकर हे आजच्या सभेला फारच योग्य असे अध्यक्ष लाभले आहेत, हें

आपलें सद्भाग्यच समजलें पाहिजे. यांच्यावर केसरीसारख्या लोकमान्य वृत्तपत्राच्या संपादकत्वाची जबाबदारी आहे, तसेंच प्रतियोगी सहकारितेच्या धोरणाचा त्यांनीं प्रथमतःच अखिल हिंदुस्थानांत पुरस्कार केला असून त्याच्या सिद्धयर्थ त्यांना रात्रंदिवस कराव्या लागणाऱ्या चळवळीची ऐन वेळही पण हीच आहे. त्यामुळें त्यांना आमच्या कार्यासाठीं इकडे येण्यास जरी मुळींच सवड नव्हती तरी श्रीसंस्थानच्या आज्ञेस मान देऊन त्यांनीं या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें; यावरूनच आचार्यपीठां-विषयीं व स्वधर्मकार्याविषयीं असलेला त्यांचा अभिमान व प्रेम व्यक्त होत आहे.

शेवटीं आपण सर्वांनीं निर्विकार आणि निःपक्षपात बुद्धीनें या कार्यांत भाग घ्यावा व आपणांपुढें आलेल्या प्रश्नांचा समतोल बुद्धीनें पण सहानुभूतीनें विचार करावा, आणि जरी इतर बाबतींत कांहीं गैरसोय झाली असली तरी ती मनावर न घेतां आहे त्यांत गोड करून घ्यावें अशी पुन्हा एकवार आपणां सर्वांस विनंति करितों आणि आपणही श्रींच्या आज्ञेस अनुसरून माझ्या निमंत्रणपत्रिकेचा स्वीकार केला याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून 'धर्मे मतिर्भवतु वः सततोत्थितानाम्' अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून आपणां सर्वांची रजा घेतों."

याप्रमाणें स्वागताध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्री० दादासाहेब वैद्य ह्यांनीं श्री० न. चिं. केळकर यांना अध्यक्षस्थान मंडित करण्याविषयीं प्रार्थना केली. त्या वेळीं ते म्हणालेः—"श्री० तात्यासाहेब केळकर यांची ओळख करून देण्याचें मुळींच कारण नाहीं. अखिल हिंदुस्थानमध्यें राजकारण अगर अन्य कोणत्याही बाबतींत वादरण माजून तीव्र मतभेदाचे तट पडले असतां कोणाचेंही मन न दुखवितां समतेचा दुवा सांधून देण्याचा यशस्वी प्रयत्न करणारे अशी त्यांची ख्याति आहे. तेव्हां याही परिषदेंत ते यशस्वी होतील असें म्हणावयास हरकत नाहीं." या सूचनेस सांगें येथील प्रसिद्ध 'आर्यविज्ञान' मासिकाचे संपादक श्री० नारायण अनंत नाईक पाटणकर यांनीं अनुमोदन दिल्यावर श्री० नरसिंह चिंतामण केळकर हे टाळ्यांच्या प्रचंड घोषांत स्थानापन्न झाले व त्यांनीं आपलें भाषण केलें.

## अध्यक्षांचें भाषण

आजचा प्रसंग मी अनेक दृष्टींनीं अपूर्व मानतों. गोवें प्रांतांतील एका विशिष्ट ज्ञातींतून वगळल्या गेलेल्या एका उपवर्गाला आपल्यावर पडलेल्या बहिष्काराची दुःसहता भासूं लागली. त्यानें त्या ज्ञातीकडे आपलें सामाजिक दुःख कळकळीनें निवेदन केलें. ज्ञातीला या दोन अंगांकडून फिरून फिरून एकजीव होण्याच्या प्रयत्नाला श्रीमच्छंकराचार्य यांनीं आपल्या अधिकाराचा योग्य उपयोग करून संमति दिली. आणि हा बहिष्कार दूर झाल्याची गोष्ट ठरल्यास जगप्रसिद्ध करण्याकरितां आजची ही सभा भरत आहे. वर ज्या गोष्टींचा निर्देश मीं केला त्या माझ्या मतें हिंदुसमाजास्थितीला उपकारक व उत्कर्षजनक अशा आहेत. अशा प्रसंगीं भरणाऱ्या सभेचें अध्यक्षस्थान मी घेऊन सभेचें कार्य करावें अशें श्रीमच्छंकराचार्यांचें आज्ञापत्र मला आलें हा श्रींचा मजवर मोठा अनुग्रह झाला असेंच मी मानतों. कारण हिंदुसमाजाच्या सुस्थितीला कारणीभूत होणाऱ्या अशा कार्यांत प्रमुखपणे भाग घेतां येणें याहून हिंदु-माझ्या अधिक भाग्य कोणतें लाभणार ?

आज सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची आज्ञा श्रींकडून मला झाली यांत माझा बहुमान झाला हें तर खरेंच. परंतु माझ्यासारख्या एखाद्या व्यक्तीचा बहुमान करण्यापेक्षां अधिक उदात्त असाही एक हेतु श्रींचा असावा असें मला वाटतें. तो हेतु हा कीं, महाराष्ट्राच्या नैर्ऋत्य दिशेच्या एका कोपऱ्यांत ही जी इष्ट सामाजिकसुधारणा श्रींच्या कृपेनें व स्थानिक जनतेच्या स्फूर्तीनें आज घडून येत आहे तिची प्रसिद्धि मजकडून सर्व महाराष्ट्रभर यथाशक्ति केली जावी, आणि आजच्या सभेचें कार्य केवळ ठरावानेंच नव्हे तर प्रत्यक्ष कृति व व्यवहार यांनीं फलित झालेलें पाहतांच मी तें एकंदर हिंदु-समाजाला एक अनुकरणीय उदाहरण म्हणून त्याची शक्य तितकी प्रसिद्धि करण्याचें एक साधन म्हणजे केसरी पत्राचें संपादकत्व हें मला सुदैवानें लाभलेलें आहे; व त्या साधनाचा उपयोग या कामीं मी मोठ्या आस्थेनें व आनंदानें करीन.

या प्रकरणांतील जे कागदपत्र मला पहावयास मिळाले त्यांवरून असें दिसतें कीं, कांहीं एका क्षुल्लक कारणावरून पद्ये नामक पंच-

द्रविडांतर्गत ब्राह्मणज्ञातींतील कांहीं लोक सुमारें दोनशें वर्षांपूर्वी बहिष्कृत झाले. व यदृच्छेनें त्यांना भट्ट-प्रभु हे नामाभिधान मिळालें. या दोनही ब्राह्मणवर्गांत गोत्रप्रवर, कुलदेवता कुलपुरुष, धंद्याचा प्रकार, व्रतानुष्ठानांचें आचरण, आहारपानादिकरून मुख्य व इतर किरकोळ आचार आणि रीतरिवाज हीं जवळ जवळ अन्वयव्यतिरेकानें समान असल्याचें पुराव्यानें जवळ जवळ निर्विवादपणें शाबीत होत आहे. असें असतां बहिष्काराचें मूळ कारण शोधूं जातां कागदोपत्रीं किंवा इतर निश्चयात्मक पुराव्यानें तें कारण उमगत नाहीं व जें उमगतें तें फक्त एका दंतकथेवर अवलंबून आहे; व त्या दंतकथेंतही इतकेंच आढळतें कीं, सुमारें दोनशें वर्षांपूर्वी या सताक्रोशींतील लोकांना श्रींच्या तीर्थप्रसादास निमंत्रण आलें असतां कांहीं लोक उशिरां येऊन पोंचल्यामुळें त्यांना मागच्या पंक्तीस बसावें लागलें. या पंक्तिभेदाला उभयपक्षांच्या स्वभावदोषामुळें बहिष्काराचें स्वरूप आलें व तो बहिष्कार दूर करण्याचा प्रयत्न पुढें लवकर न झाल्यामुळें तो बहिष्कार जवळ जवळ वज्रलेप बनून भट्ट-प्रभूंचें मूळच्या ज्ञातींतून ( पद्येज्ञातींतून ) कायमचें उच्चाटन झालें. बहिष्कृत झालेल्या या समाजानें आपला वेगळेपणा ही प्रथम स्वाभिमानाची खूण म्हणून कदाचित् मानली असेल; पण कदाचित् या बहिष्काराचा त्यांच्यावर जुलूम झाला असेल हेंही संभवनीय आहे. तें कसेंही असो. असें कोणतेंही कारण या बहिष्कारांत कोणास दाखवितां येत नाहीं कीं, तो बहिष्कार पूर्वी पडला तेव्हां सयुक्तिक असला किंवा नसला तरी आजही तो कायम राहावा. कारण समाजाचीं अशीं शकलें पडल्यानें हानि होते ती एकाच पक्षाची होते असें नाहीं, तर ती हानि उभयतांची सारखीच होते. कोणत्याही बहिष्काराचें योग्य कारण म्हटलें म्हणजे पातित्त्व व तें विशेष प्रकारच्या पापाचरणामुळें किंवा समाजघातक अशा अनिष्ट आचारामुळें प्राप्त होतें. भट्ट-प्रभु या ज्ञातीच्या बहिष्काराला तो पडला तेव्हां असलें एखादें बलवत्तर कारण घडून आल्याचें दिसत नाहीं. आणि त्यांचा आजचा आचार-विचार पहावा तर तो निरपवाद व पद्ये ब्राह्मणवर्गाशीं समरस होण्यासारखाच असल्याचा पुरावा अनेक सद्गृहस्थांनीं दिलेला आहे. असें असल्यानें प्रस्तुतचा

बाहिष्कार निष्कारण व निरर्थक ठरतो; आणि भट्ट-प्रभुवर्गाकडून तो बाहिष्कार निघून जावा अशी इच्छा प्रदर्शित होऊन प्रत्यक्ष अर्जरूपानें तशी विनंति करण्यांत आल्यावरही तो झाडून न टाकणें हा मोठाच अन्याय होईल.

हिंदुसमाजांतील ज्ञातिबंधनें मोठीं कठोर असतात. तीं सहसा मोडून निघत नाहींत व शिथिलही होत नाहींत असा अनुभव आहे. होईल तितकें एकानें दुसऱ्यापासून वेगळें व स्वतंत्र रहावें, अशी प्रवृत्ति हिंदुधर्मीयांत बहुशः सनातनच आहे ही गोष्ट खोटी नाहीं. तथापि ही प्रवृत्ति अयुक्तिकपणें परमावधीस जाऊन समाजघात होतो असें दिसलें किंवा बहिष्कारामुळें उद्वेगजनक परिस्थिति उत्पन्न होते असा समय आला तर या समाजाच्या मनांत तत्संबंधीं प्रतिक्रियाही संभवते असा पूर्वापार अनुभव आहे. वंश, ज्ञाति, आचारविचार, संस्कृति व धर्माचरण यांची शुद्धता राखण्याची तीव्र इच्छा अबाधित राखीत असतां हिंदुसमाजानें पतितपरावर्तनाची परंपरा अबाधित राखिलेली आहे. जुन्या काळीं हिंदुस्थानांत आलेल्या कांहीं ग्रीक लोकांना हिंदुधर्माची दीक्षा देऊन त्यांना व्यवहारांत समाविष्ट करून घेतल्याचा दाखला आढळतो. अर्थात् जो धर्म म्लेंच्छ व यवन यांना स्वकीय बनवूं शकतो तो आपल्याच समाजांतील भ्रष्ट व पतित लोकांना फिरून स्थानापन्न करण्याची अनुज्ञा देईल यांत काय आश्चर्य? आणि हल्लींप्रमाणें उपकारक अशीं ग्रामण्यें म्हणजे ग्रामस्थ लोकांच्या चळवळी घडून येऊन एक वेळ पडलेले बहिष्कार दूर झाल्याचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील.

ब्राह्मणसमाजाची हल्लींची विकट स्थिति लक्षांत घेतां ब्राह्मण-समाजांत जी फूट पडलेली आहे ती अशी उपकारक ग्रामण्याची चळवळ करून भरून काढणें हें समाजांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य ठरतें. वेदशास्त्रसंपन्न पणशीकरशास्त्र्यांच्या शब्दांनीं बोलावयाचें झालें तर "कोणत्याही कारणानें फुटून वेगळे झालेले समाजाचे तुकडे प्रेममय वज्रलेपानें सांधून विस्कळित झालेला समाज सुसंघटित करण्याला सर्वांनीं झटावें. जुन्या ग्रामण्यांना चिकटून बसण्याची ही वेळ नाहीं. आज जवळ-जवळ चारशें लोकांचा—भट्ट-प्रभूंचा—समाज आपण विकल आणि निर्बल

करीत आहों. आपल्यांतलिच चाळीस घरें व आपल्याच रक्तमांसाचे चारशें लोक कुचंबत ठेवून त्यांची गैरसोय व आपलें सामर्थ्य क्षीण करून घेणें मुळींच शहाणपणाचें नाहीं." प्रसंगोपात बहिष्कृत झालेला ज्ञाति-खंड फिरून मन मोठें करून स्वकीयांत समाविष्ट करून घेणें हें दुर्बल मनाचें लक्षण नसून सुदृढ मनाचें व आत्मप्रत्ययाचेंच लक्षण आहे. जातीला जर गंगेची उपमा आपण देतों तर मनांत आणल्यास जातीला गंगेप्रमाणें जें अशुद्ध तेंही शुद्ध करून घेण्याचा पराक्रम कां करतां येऊं नये ?

केवळ दयाबुद्धीनेंही ही गोष्ट प्रस्तुत प्रकरणीं घडून येणें अपरिहार्य ठरतें. चारशें लोकांच्या या समाजानें बहिष्कृत स्थितींत दिवस कसे काढावे ? पंक्तिभोजनासारखें सामाजिक समाधान नाहीं व हें समाधान भट्ट-प्रभृतिसारख्या निरपवाद आचारांच्या लोकांना कायमचें अंतरविणें यांत कोणाचा कोणता पुरुषार्थ साधतो ? पण पंक्तिभोजनाचा आनंद ही एक क्षुद्र गोष्ट मानली तरी बहिष्कृत झालेल्या या चारशें लोकांच्या समाजानें आपल्या मुलांमुलींचीं लग्नें कशीं करावीं याचाही विचार सदयबुद्धीनें व्हावयास नको काय ? कोणताही समाज संख्येनें कांहीं मर्यादेपलीकडे संकुचित झाला म्हणजे योग्य समयीं मुलांमुलींचीं लग्नें होणें अशक्य होतें व वय, कुटुंबस्थिति पात्रापात्रता या गोष्टींचें तारतम्य संभाळून वधू-वरांची निवड करतां न आल्यामुळें पुढें कौटुंबिक दुःख वाढून ठेवलेलें असतें हें सांगावयास नकोच. कांडवाडयांत घातल्याप्रमाणें अतिसंक्षिप्त झालेल्या अशा किती तरी जातींचीं उदाहरणें महाराष्ट्रांत व विशेषतः गुजराथेंत दाखविता येतील. तात्पर्य, राष्ट्रीय भावनेच्या मोठमोठया गोष्टी आपण बोलत असतां समाजामध्यें निष्कारण पडलेले तट ढांसळून टाकण्याची जर इच्छा आपणांला झाली नाहीं किंवा इच्छा होऊनही क्रिया घडली नाहीं तर ती राष्ट्रीय बुद्धि खोटी किंवा दिखाऊ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हे तट ढांसळून टाकण्यामध्यें निव्वळ स्वेच्छाचाराची कोणाची बुद्धि असेल तर वेगळी. कोणीही समंजस सुधारक घेतला तर तो आपल्या समाजाची संस्कृति उच्च पदावरून ढांसळावी असें इच्छित नाहीं. तथापि समाजांत वर्ग, उपवर्ग, तट, हद्दी, कुंपणें वगैरे अस्वाभाविक

प्रकार निष्कारण राहूं देणें यांत समाजाचें संगोपन किंवा संवर्धनसाधन नाहीं. उलट समाजांत जितकी फूट तितका समाज दुबळा राहतो, परस्पर सहानुभूति व सहायता कमी होते, निराधार अहंकार मनांत राहतो व एकंदरींत समाजाचें अनहित होतें. सामाजिक यंत्राची गति बाहेर फेकण्याची नसावी तर आंत ओढून घेण्याची असावी. आपली पृथ्वी ही अत्यंत वेगानें परिभ्रमण करीत असते; तथापि तिच्या ठिकाणीं आकर्षणशक्ति आहे म्हणूनच आपण स्थिरचर पदार्थ तिजवर राहतों व नांदतों. विषम संस्कृतीचे लोक एकदम एकजीव करणें हा जसा अविचाराचा प्रकार तसाच समान संस्कृतीचे लोक निष्कारण दूर ठेवणें हाही अविचाराचा दुसरा प्रकार होय. आचारपरंपरा व रूढि यांची सर्वमान्यता प्रसिद्ध आहे; हिंदुधर्मशास्त्राचा तो पाया आहे. तथापि त्या हिंदुधर्मशास्त्रांतच असेंही सांगितलें आहे कीं, योग्य कारण उपस्थित असतां आचार बदलण्यास प्रत्यवाय नाहीं. शिवाय बहिष्काराच्या शिक्षेविषयीं तर असें म्हणतां येईल कीं, शिक्षाविषयक आचार जितका जुना तितका तो बदलण्यास अधिक पात्र होतो; कारण अशी कोणतीही शिक्षा नाहीं कीं जिला अंत नाहीं. किंबहुना, शिक्षेचा काल जसजसा अधिकाधिक वाढत जातो तसतशी दया, अनुकंपा, सहानुभूति या भावना उदित होऊन शिक्षा हा ज्यांचा परिणाम त्या रागद्वेषादि भावना कमी कमी होत जातात. स्मृतिग्रंथांतील प्रायश्चित्तविभाग स्मृतिकारांनीं याच तत्त्वावर रचला आहे. तें मुख्य तत्त्व असें कीं, प्रायः असें कोणतेंही पाप नाहीं कीं ज्याची निष्कृति प्रायश्चित्तानें होत नाहीं. महाराष्ट्रांतील शुद्धिसंस्काराचा इतिहास हीच गोष्ट सांगतो. कबुली दिलेल्या किंवा सिद्ध केलेल्या पातकासंबंधानें ही गोष्ट झाली; पण पुष्कळ सामाजिक बहिष्कार पापमूलक नसतात. त्यांना वरिष्ठांनीं दिलेल्या शिक्षेच्या स्वरूपापेक्षां बरोबरीच्या लोकांनीं आपसांतील भांडणामुळें एकमेकांना दूर राखल्याचेंच स्वरूप असतें. अशा ठिकाणीं कालांतरानें तें भांडण मिटावें व बहिष्कार बंद व्हावे हेंच सयुक्तिक आहे. सत्य व्यवहार कोणता व असत्य व्यवहार कोणता याचा विवेक जागृत ठेवणें हा एक मोठा पराक्रम आहे.

प्रस्तुत 'बहिष्कारप्रकरणीं भट्ट प्रभुजनतेनें 'आज दोनअडीचशें वर्षें ( किंवा त्याहून जास्तीच ) बहिष्कारदुःख सोसून एक प्रकारची तपश्चर्याच केली. ती लक्षांत घेऊन तत्सजातीय अशा मोठ्या वर्गानें त्याला अभीप्सित वर मागण्याची आज्ञा केली; त्या आज्ञेनुसार आपणाला पक्तिपावन व शरीरसंबंधार्ह करून घेण्याचा वर त्यानें मागितला. तो त्याला देण्याची त्यांच्या बंधुवर्गानें इच्छा प्रदर्शित केली. हा सर्वच कथाभाग अद्भुतरम्य वाटतो. आणि त्यापासून' समाजसुधारणेविषयीं उत्साह बाळगणाऱ्यांना आशा वाटूं लागेल असें मी आनंदानें म्हणतों. मजकडे या विषयासंबंधानें जे कागदपत्र आले त्यांत इकडील समाजापैकीं कांहीं विद्वान् लोकांचे मीं अभिप्राय वाचले व ते वाचून मला फार आनंद झाला. कारण मी युक्तिसिद्ध समाजसुधारणेला लोकमान्यता मिळवावयाची तर ती जुन्या पद्धतीच्या शास्त्रीपंडितांकडून मिळाली तरच मिळेल. जुन्या शास्त्री-पंडितांच्या आशीर्वादाशिवाय हें कार्य सिद्धीस जावयाचें नाहीं. वर उल्लेखिलेल्या अभिप्रायांत शास्त्राधार घेऊन समाजघटनेचा युक्तिकलाप ठाकठीक बसविण्याचें काम अभिप्राय देणाऱ्यांनीं निःपक्षपातपणानें व प्रांजल मनानें केलें आहे. समाजाच्या आचारांत अतिव्याप्ति व अव्याप्ति ही पदोपदीं घडत असते; परंतु मधून मधून पुढें येऊन युक्ति व आचार यांची समव्याप्ति सिद्ध करणें हें काम तत्कालीन विद्वानांचें आहे.

आजची ही सभादेखील या प्रांताचे अभिमानी विद्यमान् शास्त्रीपंडित यांच्या सहाय्यावांचून घडून आलीच नसती असें मला वाटतें. आणि या सभेचें हें उदाहरण इतर प्रांतांना अनुकरणीय वाटेल असें मी खात्रीनें सांगतों. पण याहून विशेष महत्त्वाचें सहाय्य श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांचेकडून झालें असेंच म्हटलें पाहिजे. शंकराचार्य हे संन्यासवृत्ति धारण करून आमच्या सर्व व्यवहारोपयुक्त वस्तूंचा त्याग करून समाजांत कालपरिस्थितीनें होणारें मालिन्य नाहींसें करण्याकरितांच बसले आहेत, त्यांना पक्षपात करण्याचें कारण नाहीं. अपेक्षित धार्मिक हक्क, नवीन कालांतील शिष्यांना येणाऱ्या धार्मिक अडचणींचें दूरीकरण, या सर्व गोष्टी जशा शास्त्रीय परिस्थितीनें शक्य असतील तशी

वेळोवेळीं या विषयांची मागणी संघशः गेली पाहिजे. जर मागणीच नाहीं तर त्यांनीं मठांत बसून नुसतीं आज्ञापत्रें काढून उपयोग काय ? समाजाच्या गरजा विद्वानांपुढें समाजानें आणाव्या; त्यांचा विचार विद्वान् शिष्टांनीं करावा, साधकबाधक प्रमाणांची एकवाक्यता करून त्या श्रींकडे पाठवाव्या, श्रींनीं पुन्हा "**अलूक्षधर्मकाम**" विद्वान् सामाजिकांची त्या प्रकरणीं योजना करावी, व त्यांनीं केलेल्या निर्णयाचा निर्विकार-चित्तानें निकाल द्यावा. परस्परांची गरज परस्परांना आहेच, व असें केल्यानें ती वाढत्या प्रमाणांत राहील याबद्दल आम्हांस मुळींच संशय वाटत नाहीं.

श्रीशंकराचार्यांच्या पीठाचा उपयोग जनतेस दोन प्रकारांनीं आहे— (१) संसारविरक्त लोकांकरवीं वेदान्तग्रंथांचा अभ्यास करविणें. (२) समाजाच्या धार्मिक, नैतिक, सामाजिक अडचणी ज्या ज्या वेळीं उत्पन्न होतील त्या त्या वेळीं तिच्हाईत इतकेंच नव्हे तर अधिकारी धर्मगुरु म्हणून त्या दूर करणें. याकरितांच जगद्गुरु संन्यासी असावा असा मठ-संप्रदाय आहे. त्या संप्रदायाला अनुसरून श्रींकडून व्यवस्था झाली तर जनता जी प्रसंगविशेषीं स्वकर्तव्यपराङ्मुख होते ती होणार नाहीं. समाज व आचार्य हे एकमतानें परस्परांची कार्यक्षेत्रता ओळखून वागल्यास आजच्या या प्रसंगासारखे सुप्रसंग पुष्कळ येतील, व "**परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ**" असें होऊन उभयतांसही हितकारक होईल. असो.

हें सर्व भाषण मी केवळ प्रास्ताविक म्हणून केलें आहे. आणि तेंही मजपुढें आलेल्या कागदपत्रांच्या आधारावरूनच आहे. त्यांत जी चुकभूल असेल ती कोणी माझ्या नजरेस आणून दिल्यास तिचा स्वीकार करण्यास मी सिद्ध आहें. शिवाय ही गोष्ट माझ्या लक्षांत आहे कीं, मी या ठिकाणीं आलों तो केवळ या सभेचा नियोजित अध्यक्ष याच नात्यानें आलेला आहें, प्रस्तुत प्रकरणीं अधिकृत न्यायाधीश म्हणून नव्हे. या प्रकरणीं न्यायाधिशाचा अधिकार व न्याय-निर्णय प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याचा अधिकार इकडील जनतेचाच आहे. तो अधिकार बजावण्या-करितांच आजची ही सभा भरविण्यांत आलेली आहे. तींत साधक-बाधक विचारांची चर्चा कोणास करावयाची असल्यास त्याला सधि

मिळेल. शेवटीं विद्वान् शास्त्रीपंडितांचीं मतें आणि सभेंतील वक्त्यांचीं भाषणें ऐकून ही सभा जो निर्णय देईल किंवा जो ठराव करील त्याप्रमाणेंच या प्रकरणीं इकडील जनतेचें मत आहे असें समजण्यांत येईल. श्रीशंकराचार्य हे फक्त सत्स्फूर्ति आशीर्वाद देऊं शकतील, विद्वान् शास्त्रीपंडित हे शास्त्रार्थ सांगूं शकतील, माझ्यासारखा त्रयस्थ मनुष्य लौकिकदृष्ट्या ग्राह्याग्राह्य काय हें सांगूं शकेल. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, " तुम्हांला घोड्याला पाणवठ्यावर नेतां येईल, पण पाणी पिणें हें स्वतः घोड्यानेंच केलें पाहिजे." या म्हणीप्रमाणें प्रस्तुत प्रकरणीं न्याय व समाजहितसाधक अशी जी गोष्ट असेल ती ही सभाच ठरवील, व या सभेला ज्या जनतेचें प्रतिनिधि आले आहेत तीच पार पाडील. इतकें बोलून सभेच्या कामास रीतसर प्रारंभ व्हावा असें मी सुचवितों'. याप्रमाणें भाषण झाल्यावर पुढील कार्यक्रमाचें दिग्दर्शन करितेवेळीं अध्यक्ष म्हणाले, " परिषदांतून विषयनियामक कमिटी निवडण्याची चाल आहे. तथापि या परिषदेंत चर्चा करावयाचा विषय एकच असल्यामुळें व वेळही फारशी झाली नसल्यानें परिषदेच्या विषयासंबंधीं थोडी अनुकूल प्रतिकूल चर्चा झालेली बरी. चर्चेअंतीं जरूरच वाटली तर उभयबाजूंचे प्रतिनिधि निवडून विषयनियामक कमिटीच्या धर्तीवर चर्चा करितां येईल. तेव्हां प्रथम पद्ये-भट्टप्रभूंच्या ऐक्याला अनुकूल असें कोणीं तरी भाषण करावें. परंतु तत्पूर्वी भट्ट-प्रभूंनीं श्रीसंकेश्वरपीठाकडे केलेला अर्ज वाचून दाखविणें इष्ट होईल; कारण त्यामुळें जी साधकबाधक चर्चा व्हावयाची ती कोणकोणत्या मुद्द्यांवर व्हावी तें कळून येईल." या सूचनेप्रमाणें अर्ज वाचून दाखविण्यांत आला व अध्यक्षांनीं त्यांतील मुद्दे थोडक्यांत पुन्हा सांगितल्यावर भट्टप्रभूंना अनुकूल असा वेदशास्त्रसंपन्न दत्तात्रेयशास्त्री पणशीकर यांचा विस्तृत अभिप्राय वाचून दाखविण्यांत आला. व त्याचवेळीं आशीर्वादात्मक श्रींची तार व इतर सहानुभूतीच्या तारा व पत्रें वाचून दाखविलीं नंतर प्रतिकूल बोलण्याकरितां रा० वासुदेव शिवराम कोल्हटकर उभे राहिले. ते म्हणाले, "अध्यक्षमहाराज ! व सर्व सभासद हो ! आज मी आपल्या समोर बोलावयास उभा राहिलो आहें; परंतु मी पद्ये ब्राह्मणांपैकीं नाहीं इतकेंच नव्हे तर येथील रहिवाशीही नव्हे. त्यामुळें मी या विषयावर बोलणें घाडसाचें आहे; तरीही

ज्याकरितां अनुकूल बाजूला सर्व विद्वान् लोक आहेत, व विरुद्ध बाजूला सारी अज्ञ जनता आहे म्हणून प्रतिकूल लोकांच्या मतीनें मी विद्वान् नसतां केवळ बोलतां येतें म्हणून बोलावें लागत आहे. अनुकूलवादी पद्ये व भट्ट-प्रभू यांचे आचार सारखे आहेत असें म्हणतात; पण ते सारखे नाहींत, असें लोक बोलतात. त्याचप्रमाणें दोघांच्या भाषेंतही महत्त्वाचा फरक आहे. हे दोन्ही वर्ग जर एक तर त्यांच्या भाषेंत फरक कसा? अनुकूल अभिप्राय देणारे आतां लटपटले आहेत असें म्हणतात. स्वतः पद्ये प्रभूंना पंक्तिपावन करून घेण्यास कितपत तयार आहेत? या प्रश्नाचा उलगडा झाला पाहिजे. ते स्वतः तयार असल्यास इतर कशाला विरोध करतील?" याप्रमाणें रा० कोल्हटकरांचें आवेशपूर्ण भाषण झाल्यावर **'आर्यविज्ञान'** मासिकाचे संपादक श्री० **नारायण अनंत नाईक, पाटणकर** हे अनुकूलपक्षातर्फे भाषण करावयास उभे राहिले. ते म्हणाले, " भट्ट-प्रभूंचा प्रश्न आज सर्वांपुढें जो ठेवण्यांत आला आहे तो त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं पूर्ण विचार करूनच ठेवला आहे. तीन वर्षांपूर्वी 'हिंदुसभें'त या प्रश्नाची वाटाघाट होऊनच येथवर विद्वान् व लोकहितदक्ष अशा पुढाऱ्यांच्या विचारानेंच हें प्रकरण येऊन ठेपलें आहे. माझ्या पूर्वीचे वक्ते रा० कोल्हटकर यांनीं आपल्या भाषणांत " अनुकूलवादी आतां लटपले आहेत " असें एक धाडसी विधान केलें आहे. वास्तविक पाहिलें असतां प्रतिकूलवादीच आतां लटपटले आहेत हें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसेल. याला उदाहरण माझेंच देतों. मी पूर्वीं भट्ट-प्रभु व पद्ये यांचें ऐक्य होऊं नये अशा मताचा–प्रतिकूल–होतों; परंतु योगायोगानें एक दोन वेळा भट्ट-प्रभूंच्या येथें मजला जाण्याचा प्रसंग आला व त्या संधीचा फायदा घेऊन त्यांच्या आचाराकडे मी सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें व तेव्हांपासूनच पद्ये व भट्ट-प्रभु यांच्या ऐक्यास मी अनुकूल झालों व नंतरच मी अभिप्राय लिहून दिला. आज भट्ट-प्रभु हे आपण पद्यांतील असें साक्षेपानें जें सांगतात तें कशाकरितां? पद्ये-ब्राह्मणांची तशी विलोभनीय स्थिति आहे काय? तर याचें कारण ते दोघेही समान शीलाचे–संस्कृतचे आहेत हेंच होय. भट्ट-प्रभूंत पद्यांचे आनुवांशिक संस्कार प्रबळ असल्यानेंच ते पद्यांत येऊं पहात आहेत; हा

मुद्दा लक्षांत घेण्यासारखा आहे. भाषा ही स्थळभेदानें बदलत असते " अशा आशयाचें श्री० पाटणकर यांचें भाषण झाल्यावर प्रतिकूल-पक्षाचे एक प्रतिनिधि **वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री निगळ्ये** हे भाषण करावयास उभे राहिले. ते म्हणालेः—" श्री० पाटणकर म्हणतात त्याप्रमाणें ते ब्राह्मण असतील पण पद्यांतले आहेत हें कसें सिद्ध करावयाचें? आचारावरून भट्ट प्रभु हे बरेच खालावलेले आहेत, त्यावरून ते कुडाळ देशकर-गौड असावेत असें वाटतें! आहार मात्र त्यांचा व पद्यांचा एकच आहे. पद्ये व भट्ट-प्रभु एकाच प्रांतांत राहात असतां भाषा वेगळी होण्याचें कारण काय? या प्रश्नाचा प्रामुख्यानें विचार झाला पाहिजे." नंतर रा० वेल्हे म्हणालेः—" मी याही पक्षाचा नाहीं व त्याही पक्षाचा नाहीं. केवळ त्रयस्थ या नात्यानें दोन शब्द बोलतों. केवळ आचारावरूनच जाति ठरवितां येत नाहींत. सम आचार असून जाति भिन्न असूं शकेल व विषम भाषा असून देखील जाति एक असूं शकेल." नंतर **वेदमूर्ति अनंतशास्त्री सहकारी** म्हणालेः—" सारस्वत ब्राह्मण, कऱ्हाडे वगैरे अनेक लोक एका देवतेला भजतात. म्हणून एकदेवतोपासनेनें निर्णय होत नाहीं. विचार करण्याचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, भट्ट प्रभु जर पद्यांतले आहेत तर पद्यांच्या पंचोपाध्यांपैकीं आपला उपाध्या कोणता हें दाखवावें." पेडण्याचे **वे० बाळकृष्णशास्त्री पणशीकर** हे भाषण करावयास उठले. प्रथम त्यांनीं असा खुलासा केला कीं, " मी जें बोलणार तें माझें स्वतःचें मत आहे असें कोणी समजूं नये. माझें मत याहून निराळें म्हणजे अनुकूलच आहे." असा खुलासा झाल्यावर शास्त्रीबोवा जें बोलले त्यांत खालील मुद्दे प्रामुख्यानें होतेः—" भाषेच्या मुद्द्याचा विचार मुख्य आहे. २ तसेंच आचारासबंधीं. ३ आनुवंशिक स्फूर्ति हा सबळ पुरावा नाहीं. हवा तो हव्या त्या वर्गांत शिरूं पाहील. उदाहरणः— 'पळशे' प्रकरण! मुंबईचे 'चर्मकुट्ट ब्राह्मण'! विश्वामित्र गायत्री निर्माता म्हणून ब्राह्मण नव्हे. ४ व्यसनाच्या स्फूर्तीवरून पूर्वकुल दूषित ठरणार नाहीं." याला उत्तर देण्याकरितां श्री० **पाटणकर** म्हणाले, " आनुवंशिक संस्काराचा प्रश्न हा शास्त्रीय असल्यानें त्यावर बोलणाऱ्यांनीं त्या विषयाचा अभ्यास केला असेल तरच बोलणें बरें. आनुवंशिक संस्कारांची उपपत्ति

आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें पाश्चात्त्य विद्वानांसही मान्य आहे. भट्ट-प्रभु हे मूळचे पद्यांतील नसते तर त्यांच्याकडून पद्यांत शिरण्याचें धाडस केव्हांहि झालें नसतें. चुकून शिरलेली भाषा कुळांत चालू होते. बहिष्कृत कुलांत निराळी भाषा कांहीं कारणानें चालू झाली ती बहिष्कारानंतर तशीच राहिली. समान आचार हें समान वंश मानण्याचें प्रास्ताविक अनुमान कारण आहे. भट्ट-प्रभूंची स्फूर्ति फार पूर्वीची आहे. भट्ट प्रभु व पद्ये यांच्यांत द्वेषभाव नाहीं. करितां आनुवंशिक स्फूर्ति हें प्रमाण मानण्यास हरकत नाहीं. प्रतिकूलवाद्यांनीं एकाच प्रांतांत ३०० लोक यांची जात कोणती तें तरी सिद्ध करून दाखवावें. नुसतें कानावर हात ठेवून भागणार नाहीं." यावर वेदशास्त्रसंपन्न **निगळ्येशास्त्र्यांनीं** पूर्वीच्या आपल्या भाषणाचा पुन्हा एकवार अनुवाद केल्यावर प्रतिकूलपक्षाला उत्तर देण्याकरितां **वेदशास्त्रसंपन्न अनंतशास्त्री** धूपकर हे उभे राहिले. ते म्हणालेः— " भाषाभेदाचा जो एक मुद्दा ऐक्यप्रतिकूल बाजूकडून पुढें करण्यांत आला आहे तो लक्षांत घेण्यासारखा नाहीं. भाषा ही स्थानभेद, व्यक्तिभेद व ऐतिहासिक कारण यांनीं बदलूं शकते. ज्ञानेश्वरी, निबंधमाला, केसरी यांची भाषा उत्तरोत्तर बदलती नाहीं काय? पद्ये ब्राह्मण आज आपणांस कऱ्हाडयांतले म्हणवितात. तर कऱ्हाडे व पद्ये यांची भाषा एक असावयास नको का? पद्यांच्या भाषेंत व कऱ्हाडयांच्या भाषेंत एवढें अंतर कां हें पद्ये सांगू शकतील काय? इतकें असून सुद्धां आज जर पद्ये आपणांस कऱ्हाडे म्हणवितात आणि त्यांस जर भाषाभेदाचा प्रश्न नडत नाहीं तर तो एकट्या भट्ट प्रभूंसच कां नडावा? आचारभेदाचा प्रश्न घेतला तर आज सगळ्याच वर्णांचा आचार भ्रष्ट झालेला आहे. त्या मानानें भट्ट-प्रभूंच्या आचारांतही कालमानाप्रमाणें काहीं फरक पडला असेल. आजच्या कालांत वसिष्ठवामदेवांसारखा आचार असावा अशी कोणी महत्त्वाकांक्षा धरील तर भट्ट-प्रभुच काय, पण जगांतील विद्यमान ब्राह्मणांपैकीं तें कोणालाही शक्य नाहीं असो. कोणत्याही दोन वर्गांचे वैदिक संस्कार, आचार, कुलदेव, कुलपुरुष यांपैकीं एक एक समान असेल परंतु हे सारे प्रकार भट्ट-प्रभु व पद्ये यांचे एकसमयावच्छेदेंकरून सम आहेत, करितां ते दोन वर्ग मूळचे एकच असले पाहिजेत. अनंत हें नांव पुष्कळांना

असेल; पण अनंत यशेश्वर धूपकर आणि ते पुन्हा माशेलचे; अशा दोन व्यक्ति असूं शकणार नाहींत. दुसरें असें कीं तुम्हीं पद्यांतले कसे ? असा प्रश्न जसा भट्ट-प्रभूंना करितां येतो तसा पद्यांनाही तुम्हीं कऱ्हाडयांतले कसे ? असा प्रश्न विचारतां येईल. भट्ट प्रभूंस घेण्याविषयीं पद्यांच्या उपाध्यांचे पंचोपाध्यांचे व निकटवर्ति पद्यांचे अनुकूल अभिप्राय आहेत; आचार भिन्न असोत, पण शास्त्र शुद्ध असले म्हणजे झालें. प्रतिकूलपक्षी म्हणतात कीं, 'भट्ट प्रभूंनीं दाखविलेला पुरावा अपुरा आहे. आणखी पुरावा दाखवा'. पण त्यांस आम्ही असें विचारतों कीं, असें तोंडानें पुरावा अपुरा असें म्हणूं नका, आज भट्ट प्रभूंनीं आपण व पद्ये एक अशाविषयीं जो पुरावा पुढें आणला आहे त्याच्या दुप्पट विरुद्ध पुरावा तुम्हीं आणा म्हणजे आपोआपच त्यांचा पुरावा अपुरा ठरून याच्यापेक्षां जास्ती वजनाचा पुरावा आहे किंवा नाहीं हें ते पहातील. आम्ही एक रेघ-मारली ही तुम्ही न पुसतां लहान केली तरच तुमचें कौशल्य. तेव्हां एकंदरींत प्रतिकूलपक्षानें भट्ट-प्रभूंस न घेण्याबद्दल जे मुद्दे पुढें आणले आहेत ते कसे लंगडे आहेत हें आम्हीं दाखवून दिलेंच आहे. पुराव्याचा बोजा भट्ट प्रभूंवरच सर्वस्वीं पडतो असें कोठें आहे? तो प्रतिकूलपक्षाच्या शिरावरही पडतो, तरी प्रतिकूलपक्षाला भट्ट-प्रभु हे पद्यांतले नव्हेत असें जर वाटतें तर तें त्यांनीं पुराव्यानिशीं शाबीत करून द्यावें म्हणजे झालें. वास्तविक पाहतां ऐतिहासिक स्थित्यंतरें लक्षांत घ्यावीं म्हणजे आचार व भाषा या मुद्द्यांवर प्रकाश पडेल. व त्यांबरोबर पद्येजात निर्माण कशी झाली हेंही पाहावयास पाहिजे." याप्रमाणें धूपकरशास्त्री यांचें सुमारें अर्धापाऊण तास अस्खलित व जोराचें भाषण झाल्यावर टाळ्यांच्या प्रचंड गजरांत ते स्वासनस्थित झाल्यावर सभेचे अध्यक्ष श्री० केळकर म्हणालेः-" सभेच्या आरंभापासून आतांपर्यंत झालेल्या विवेचनावरून सभेचें स्वरूप पुष्कळ अंशीं कळून आलें आहेच. तरी आचारभेदासारख्या प्रश्नाची सोदाहरण चर्चा करणें खासगी रीतीनें अधिक प्रशस्त असल्याकरणानें अनुकूल व प्रतिकूल पक्षानें आपापल्या बाजूचे ५।५ प्रतिनिधि निवडावे व त्यांनीं आपल्या बिऱ्हाडीं ( बुकले यांच्या बंगल्यांत ) सकाळीं ८॥ वाजतां जमावें " असें सुचविलें आणि ४॥ वाजतां सुरू झालेलें सभेचें काम

रात्रीं ८॥ पर्यंत अखंड चालल्यावर सभेच्या पहिल्या दिवसाचें काम समाप्त झालें.

## दिवस दुसरा.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८॥ वाजतां अध्यक्षांच्या बिऱ्हाडीं उभय पक्षांचे ५।५ प्रतिनिधि आणि इतर कांहीं सभ्य यांच्यासह भट्ट-प्रभूंच्या आचारविचारांची चर्चा सुमारें तीन तासपर्यंत मोकळेपणानें झाली; नंतर पुन्हा सायंकाळीं ३॥ वाजतां सार्वजनिक सभेच्या बैठकीस सुरुवात झाली. त्यावेळीं थोडीशी उभय पक्षांसंबंधानें चकमक उडाली, ती अशीः—

प्रतिकूलपक्षानें शंकराचार्यांकडून गोव्यांत आलेले वेदशास्त्रसंपन्न **शंकरशास्त्री अळतेकर** यांस आपलें वकीलपत्र दिलें होतें व तें त्यांनींही स्वीकारलें होतें. तेव्हां अनुकूलपक्षानें असा प्रश्न पुढें आणला कीं:— "संकेश्वरपीठाचे आचार्य हे एकपरीनें न्यायाधीशाचे जागीं असल्यानें त्यांच्यामार्फत आलेल्या शास्त्र्यानें तटस्थ रहाणेंच उचित होय. तसें न करितां ज्याअर्थीं ते एका बाजूची तरफदारी करण्याचें काम करणार आहेत त्याअर्थीं याविषयीं आमची हरकत आहे." ही हरकत अध्यक्षांनीं ग्राह्य धरली; पण लगेच अशी तोड सुचविली कीं, वेदशास्त्रसंपन्न अळतेकरशास्त्री यांनीं आपण जे बोलणार तें पीठाचें व स्वतःचेंही मत नाहीं तर केवळ प्रतिकूलपक्षाचेंच मत मांडणार आहें, असा खुलासा केल्यास त्यांनीं वकील म्हणून खुशाल काम करावें. या गोष्टीस अर्थातच अनुकूलपक्षानें विरोध केला नाहीं. व सभेच्या कामास सुरुवात झाली. वेदशास्त्रसंपन्न **शंकरशास्त्री अळतेकर** यांनीं अध्यक्षांच्या सांगण्याप्रमाणें खुलासा करून आपलें वकीलपत्र वाचून दाखविलें तेव्हां अध्यक्षांनीं त्यांस आपली बाजू पुढें मांडण्यांस सांगितलें पण मध्येंच कुठें माशी शिंकली कोणास ठाऊक; कारण वकीलसाहेब म्हणाले कीं:— "अगोदर अनुकूलवादी बोलल्यावर मी बोलणार आहें." यावर पुन्हा अध्यक्ष म्हणाले कीं:— "प्रतिकूल पक्षाच्या लोकांनीं वकिलांना आपलें म्हणणें काय याची माहिती दिली असलीच पाहिजे. शिवाय कालच्या सभेंत झालेली चर्चा व विषयनियामक

कमिटींत झालेला खल आपणास समजला आहेच. तरी उगीच पुन्हा अनुकूल वक्त्यांस बोलूं देऊन वेळ कशास दवडतां? तुम्ही बोलण्याकरितां म्हणून आलांच आहां तर आपली बाजू पुढें मांडा व नंतर तुम्हाला प्रत्युत्तराकरितां बोलावयाचें असल्यास त्यासही मी परवानगी देईन.'' या अध्यक्षांच्या दुसऱ्या सूचनेसही दाद न देतां आधीं अनुकूलवादी बोल-ल्यावरच मी बोलेन असा आग्रह धरिला. त्यावेळीं आपल्या जागेवरून उठून उभे राहून अध्यक्ष म्हणाले कीं:—''आधीं कोणीं बोलावें व मग कोणीं बोलावें हें ठरविण्याचा अधिकार वकिलांचा नसून तो सभाध्यक्षां-चा आहे. अनुकूल-प्रतिकूल बाजूंची माहिती असतांही अगोदर अनुकूल बाजूचें भाषण झालें पाहिजे असा आग्रह धरण्यांत कमी प्रामाणिकपणा दिसून येतो; तरी मी अळतेकरशास्त्री यांस पुन्हा एकवार सूचना करितों व हीही सूचना त्यांनीं अमान्य केल्यास या सभेंत बोलण्याच्या आपल्या हक्काला त्यांना मुकावें लागेल.'' याप्रमाणें अध्यक्षांनीं आपला 'नरसिंहावतार' प्रगट केलेला पाहून अखेर अळतेकरशास्त्र्यांनीं 'माझें डोकें यावेळीं अस्वस्थ झालें आहे. मी उद्यां माझी लेखी कैफीयतच देईन'असें सांगितलें. या वकिलांच्या विनंतीस अध्यक्षांची मान्यता मिळाल्यावर रा० कोल्हटकर हे वकिलांच्या जागीं उभे राहून उसळून म्हणालेः—'' असल्या प्रकारांनीं एकी होणार नाहीं. एकीला अंतःकरणाचें मीलन पाहिजे. आमच्या बाजूच्या वकिलांना अध्यक्षांनीं बोलण्याची मनाई करणें हें ऐक्याला मारकच होणार आहे. (या आक्षेपाचा इनकार अध्यक्षांनीं करून पुन्हा एकवार खरा प्रकार निवेदन केला.) जगांत खरी एकी व्हावयाची तर ती असल्या सभांनीं साध्य होणार नाहीं, तर त्याकरितां प्रभूनें अवतार घेतला पाहिजे. आपण दैविक सामर्थ्य संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परमेश्वराची करुणा भाकली पाहिजे. आपण सर्वांनीं कंबर बांधून स्वतःचें कर्तव्य करण्याचा निश्चय केला तर परमेश्वर अवतार घेतल्याशिवाय राहणार नाहीं व असा अवतार झाल्यावर समाजाची सर्व व्यवस्था सुरळीत चालूं शकेल. आपण कोणतीही नवीन गोष्ट करतांना बारीकसारीक बाबतींतही धर्माचा अभिमान बाळगतों हें आमच्या अंतःकरणशुद्धीचें लक्षण आहे. धार्मिक सुधारणा घडवून आणतांना पूर्वपरंपरागत आचारविचारांना धक्का

लाणूं नये व जी गोष्ट आजपर्यंत घडून आली नाहीं ती जबरीनें घडवून आणूं नये. अशा आशयाचें भाषण करून रा० कोल्हटकर खालीं बसले. नंतर त्यांना उत्तर देण्याकरितां भट्ट-प्रभु ऐक्यपरिषदेकरितां मुद्दाम आलेले वे० शा० सं० महादेवशास्त्री दिवेकर, उपाध्यक्ष प्राज्ञपाठशाला वाई, हे अनुकूलपक्षातर्फे बोलावयास उभे राहिले. ते म्हणालेः—"अध्यक्ष-महाराज! व सद्गृहस्थ हो! कालपासून चालत असलेली चर्चा मी लक्ष-पूर्वक ऐकत आहें. मला या प्रांतांतील सर्व स्थिति बारकाईनें माहीत नसली तरी प्रस्तुत विषयापुरती माहिती मीं मिळविली आहे. भट्ट-प्रभु हे अ-ब्राह्मण आहेत असा पुरावा अद्याप कोणींच पुढें आणिला नाहीं आणि तसा असेल तर त्यांनीं आणावा असें माझें प्रतिकूलपक्षीयांस पहिलें आव्हान आहे. 'भट्ट प्रभु असे आहेत, त्यांची अशुद्ध भाषा आहे, त्यांचे सस्कार अमुक आहेत' या म्हणण्यांत कांहीं जीव नाहीं. भाषेवरून जात ठरत नसते. शीर्षमापनशास्त्राधारें कुणी असा पुरावा आणिला असता, कीं भट्ट-प्रभु हे अनार्य आहेत तर मी त्याला किंमत दिली असती. परंतु प्रतिपक्ष हा अगदीं भुसभुशीत पायावर उभा आहे. तो ढांसळून पाडण्यास आमच्यासारख्या तिऱ्हाइतास मुळींच वेळ नाहीं.

"भाषा ही दर बारा कोसांवर बदलते. एका कोंकणस्थाचे चार मुलगे चार ठिकाणीं असले तर प्रांतभेदानें त्यांच्या ठिकाणीं भाषाभेद होतो. भाषा ही चांगली असली म्हणजे ब्राह्मण होतां येतें असें वाटत असेल तर पुष्कळ खिश्चन सुरेख मराठी भाषा बोलतात, म्हणून त्यांना ब्राह्मण म्हणणार काय? शिवाय भाषा चांगली कोणती हें ठरविणार तरी कसें? भाषेचें गमक शोधणें फार कठीण जाईल. भाषेचा जन्माशीं अर्थात् जातिनिर्णयाशीं कांहीं संबंध पोंचत नाहीं. एखादा मनुष्य १०।५ भाषा बोलूं लागला तर तेवढ्यानें त्याला गुजराथी, मराठा, फ्रेंच, अशा जातींत घालतां येईल काय? सद्गृहस्थ हो! असलीं बालिश प्रमाणें पुढें आणूं नका. ठसठशीत छातीठोकपणें 'भट्ट-प्रभु हे अब्राह्मण आहेत ब्राह्मण नाहींत' असें तुम्हांला म्हणावयाचें तर म्हणा.

"आज सकाळीं अध्यक्षांनीं प्रत्येक पक्षाचे ५।५ प्रतिनिधि घेऊन त्यांमध्यें आचार, संस्कार, नैमित्तिक कृत्यें, सण, दैवतें, धार्मिकविधि

यांसंबंधीं अगदीं कसोशीनें तपासणी केली त्यावेळीं मीही हजर होतों. त्यावरून मी असें सांगूं शकतों कीं, भट्ट-प्रभु हे खास खास ब्राह्मण आहेत. वैदिक संस्कार, आचारविचार जर त्यांमध्यें कित्येक पिढ्यांपासून चालत आले आहेत तर मग त्यांना कोणत्या तोंडानें अब्राह्मण म्हणणार? भट्ट-प्रभु हे ब्राह्मण आहेत असें निश्चित झाल्यावर त्यांचें स्थान कुठें आहे हा विचार पुढें येतो.

"गोमांतकांत सारस्वत ब्राह्मण पुष्कळ आहेत. परंतु सारस्वत हे भट्ट-प्रभु आपल्यांतील आहेत असें म्हणत नाहींत. ते आपणांस द्रविड ब्राह्मणच म्हणवितात. व याचें दृश्य कारण म्हणजे भट्ट प्रभूंचा निर्मांस आहार हें होय, व इतर गोष्टीही कारण आहेत. गोमांतकांत कऱ्हाडे व कोंकणस्थ ब्राह्मण बरेच आहेत, परंतु त्यांच्या आचारविचारांशीं भट्ट-प्रभूंचें फारसें साम्य नाहीं. अर्थात् सारस्वत, कऱ्हाडे, कोंकणस्थ, यांहून गोमांतकांत विशेषतः ह्या अंत्रुज प्रांतांत प्राचुर्यानें असलेली जी पद्ये ब्राह्मणांची जात आहे त्यांतच पुष्कळ साम्यामुळें यांचा समावेश केला पाहिजे. भट्ट-प्रभु हे आम्ही पद्ये-ब्राह्मण आहों असें म्हणतात. आणि त्यांना एका काळीं पद्ये ब्राह्मणांतून बहिष्कृत केल्याची दंतकथा अध्यक्षांच्या भाषणांत आहे. हें आपण सर्व जाणतांच.

"भट्ट प्रभूंचा पद्ये-ब्राह्मणांत समावेश करण्यास मुख्य अडचण आजपर्यंतच्या रूढीची वाटते. पण मी आपणांस असें सांगतों कीं 'अष्टवर्षा भवेत्कन्या' ही एकदां रूढि पडली. पुढें 'द्वादशवर्षा'ही रूढि पडली. फार काय पण स्वयंवराचीही रूढि स्मृतीमध्यें आहे. त्या त्या काळीं त्या त्या रूढि पडल्या. सध्यां इतर रूढींमध्यें फरक पडला असतां आपण या एकाच रूढीचें समर्थन कसें करावें बरें? 'अन्ये कृतयुगे धर्माः' युगाप्रमाणें धर्म म्हणजे आचार व रूढि बदलत असतात. हें जर खरें आहे व धर्मशास्त्रसिद्ध आहे, तर कोणत्या रूढी आम्ही कवटाळून धरणार? आजचें जग, वातावरण, हवा, शोध, अन्न, हवेंतील परमाणु हे सुद्धां जेथें नवीन आहेत, तेथें जुन्या कल्पनांवर तुम्हीं जिवंत रहाल काय? कसें राहाल याचा विचार करा. श्रौतधर्माची रूढि तुम्ही टाकिली आणि स्मार्तधर्माची रूढीच तुम्ही पाळिली. पुढें तीही गेली. आणि पौराणिक

व्रतवैकल्यांच्या नादीं तुम्हीं लागलां अशी साक्ष इतिहास देत आहे. श्रौत, स्मार्त आणि पौराण आचारांमध्यें व रूढींमध्यें पडलेले फरक जर तुम्ही मान्य करतां तर मग ही भट्ट-प्रभूंबद्दल निष्कारण पडलेली रूढि तशीच चालविण्याचा हट्ट कशाला ?

" कुणी म्हणतात परमेश्वरानें या सर्व मुख्य जाति व पोटजाति निर्माण केल्या आहेत. म्हणून प्रत्येक जातीनें 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः' या न्यायानें स्वकर्मे करीत स्वस्थ असावें त्यांतच मोक्ष आहे. स्वकर्तव्यांत मोक्ष आहे हें मला मान्य आहे. पण तीं कर्तव्यें ठरवावयाचीं कोणी ? ईश्वरानें सर्व जाति निर्माण केल्या नाहींत, ती गोष्ट सर्वथैव खोटी आहे. मुंबई इलाख्यांत १४४८ जाति आहेत. त्या सर्व निर्माण करण्याइतका परमेश्वर बेडा हिंदुस्थानांत खास नाहीं. ईश्वरानें फार तर १८ जाति निर्माण केल्या हें तत्त्व मी या सभेपुरतें कबूल करतों. परंतु मुख्य जातींच्या ज्या असंख्य पोटजाति झाल्या आहेत त्या आहारभेद, आचारभेद, वृत्तिभेद, देशभेद, क्रांति, उत्पात इत्यादि अनीश्वर व कृत्रिम कारणांनींच झाल्या आहेत, हें लक्षांत ठेवा.

" पोटजातींचें एकीकरण म्हटल्याबरोबर कांहीं धर्मभोळीं माणसें 'सर्व गोलंकार करणार काय ?' म्हणून विचारतात. जणुं गोलंकाराशिवाय सुधारणा नाहीं, असेंच ह्यांना वाटतें. कुणी अमुक करा असें म्हटलें कीं, अवतारार्चा सबब पुढें करण्याची पुष्कळांना संवय असते. पण मी म्हणतों अवतार हे अशक्य बारीकसारीक गोष्टींकरितां कशाला पाहिजेत. जी गोष्ट आमच्या हातून होईल ती आपण करूं. न होईल तर ती करण्याविषयीं ईश्वराची करुणा भाकूं. परंतु कांहींच न करितां व हातपाय न हालवितां ईश्वरानें अवतार घेऊन हें कार्य करावें असें म्हटलें तर देवास प्रिय होईल काय ? कारण-" न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः । " देव पुरुषार्थविरहित माणसाच्या सख्याची इच्छा करीत नाहींत. असें ऋग्वेदांत म्हटलें आहे. तेव्हां यत्न हाच देव जाणून मनुष्यानें उद्योग करावा, म्हणजे ईश्वराचें सहाय्य होतें. शिवाय ईश्वरावतार होण्यापूर्वी देवादिकांनीं सुद्धां यत्न केल्याचीं उदाहरणें पुराणांतरीं सांपडतात. तीं आपण लक्षांत

घ्यावीं व नुसतें ईश्वरावताराकडे बोट दाखवून स्वस्थ बसूं नका. 'देवाहातिं रूप धरवूं आकार' असें तुकाराममहाराज आत्मविश्वासानें म्हणतात. तसें म्हणून आपण उद्योग करूं.

"सारांश, कोणत्याही दृष्टीनें विचार केल्यास भट्ट-प्रभूंचा समावेश पद्मे-ब्राह्मणांत करण्यास कांहींच अडचण दिसत नाहीं. हल्लींच्या मुसलमानांच्या चळवळीकडे पहा. सहा कोट हिंदु; मुसलमानांनीं मुसलमान केले ! एक कोट हिंदु; खिश्चनांनीं खिश्चन केले ! तरी ते शुद्धच राहिले. पण आम्ही ब्राह्मणांना ब्राह्मण म्हणण्यास व त्यांच्या पंक्तीला जेवण्यास मुळींच तयार नाहीं ! ही किती शोचनीय स्थिति !। मुसलमानांचें तोंड मोठें, खिश्चनांचेंही मोठें, पण आम्ही मात्र इतके संकुचित आहोंत कीं, आमच्या घरांतील माणसें आमच्या तोंडांत मावत नाहींत. म्हणूनच तीं बाहेर जाऊं लागलीं आहेत ! श्रीसमर्थ म्हणतात, "मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा" ॥ हल्लींचे लोक 'हिंदुधर्म वाढवावा' असें म्हणत आहेत. आपण निदान 'ब्राह्मण तितुका मेळवावा।' ही वृत्ति धरावी. तशी न धराल तर त्यांत ब्राह्मणद्रोह आहे आणि परंपरेनें ईश्वरद्रोह आहे. हा द्रोह जोंवर आपण करीत आहों तोंवर आपल्या देशाला चांगले दिवस दिसावयाचे नाहींत. शेवटीं एकच मुद्दा सांगून मी हें भाषण संपवितों.

"माणुसकीच्या दृष्टीनें रंजल्यागांजल्यांना मदत करणें हेंच मुख्य कर्तव्य आहे. आज भट्ट-प्रभु रंजले आहेत, त्यांची स्थिति अत्यंत निकृष्ट आहे ! म्हणून मी आपणांस अशी विनंती करितों कीं:—निकृष्टाला उत्कृष्ट स्थितीप्रत नेणें हेंच खरें कर्तव्य आहे. साधु हे कृपा करून इतरांना तत्काळ आपल्यासारखें करितात. तसेंच आपण तत्काळ भट्ट-प्रभूंना आपल्या पंक्तीला घ्या. त्यांचें सर्व आचार-विचार हळुहळू तुमच्यासारखे होतील. निकृष्टाला हिणविण्यांत शहाणपण नाहीं तर त्याला वर आणण्यांतच मोठेपण आहे हें विसरूं नये. ही गोष्ट कालावर ढकलूं नका. काल हा नियंता आहे तो ही गोष्ट आज ना उद्यां तुम्हाकडून खचित करविणार. तेव्हां आज आयता आलेला मोठेपणा गमविण्यांत स्वारस्य नाहीं हें लक्षांत ठेवा. ही गंगा आळशावर आली आहे तिला

भिऊं नका. ती केव्हां तरी तुम्हांला अवगाहन करावयास लावणार यांत शंका नाहीं. इतकेंही असून तुम्हीं आपला हट्ट कायम धराल तर घांटावरून कोंकणस्थ ब्राह्मणांच्या व्यागिनी भरून आणूं व भट्ट-प्रभूंचा प्रश्न सोडवूं. इतकें सांगून मी आपली रजा घेतों."

इतकें बोलून टाळ्यांच्या घोषांत वेदशास्त्रसंपन्न दिवेकरशास्त्री स्थानापन्न झाले.

नंतर एक प्रवासी—रामकृष्ण केशव गाडगीळ हे अनुकूलपक्षातर्फे भाषण करते वेळीं म्हणालेः—" दया, क्षमा, शांति हीं जर ब्राह्मण्याचीं लक्षणें धरिलीं तर तीं भट्ट-प्रभूत वसत आहेत हें मी स्वानुभवावरून सांगूं शकतों. गोव्यांत पूर्वीं ब्राह्मणांची वस्तीच नसल्यानें त्याला प्रत्यंत देश—म्लेंच्छ देश—समजत असत. पण नंतर जसजसे गोव्यांत हिंदु राजे येऊं लागले तसतसे कर्नाटक वगैरे भागांतून राजाश्रयामुळें येथें कांहीं ब्राह्मण येऊन राहिले. तो आश्रय दोन प्रकारचा. १ उपाध्येपणा—पूजावृत्ति. व २ राजसेवा. तेव्हां पूर्वी जे ब्राह्मण आले त्यापैकीं पद्ये-ब्राह्मण ह्यांनीं उपाध्येपणा वगैरेच्या योगानें राजाश्रय धरिला तर त्यांतल्याच कांहींनीं राजसेवा पत्करिली. तेच हे आजचे भट्ट-प्रभु असावे. ते पूर्वीं अधिकारी होते याविषयीं त्यांचीं अधिकारदर्शक आडनांवें ( पूर्वीचे हुद्दे ) साक्ष देतील. पहा भट्ट-प्रभु, प्रभुदेसाई, देसाई, गांवकर इत्यादि. तेव्हां अशा रीतीनें पूर्वीं एकच असलेले पण व्यवसायावरून दूरचे वाटणारे असे हे दोनही पोटभेद ( पद्ये व प्रभु ) एकच आहेत. जर ह्या स्वतंत्र जाति असत्या तर त्यांची सर्वत्र व अधिक व्याप्ति व संख्या असली पाहिजे. भट्ट प्रभु ४०० व पद्ये ५०० इतके थोडे कां !

" व्यवसायानें भिन्न भिन्न पेशाचे बनलेले हे ब्राह्मण नेहमीं परस्पर सहानुभूतीनें वागत. विशेषतः पद्ये-ब्राह्मणांना भट्ट-प्रभूंनीं पूर्वीं वेळोवेळीं अधिकारावर असतां मदत केल्याचें आढळतें. इतकेंच नव्हे तर अजूनही सूक्ष्म दृष्टया पाहिल्यास दोघे भाऊबंदासारखे दिसतात. भाषाभेद महत्त्वाचा नाहीं."

याप्रमाणें रा० गाडगीळ यांचें अनुभवपूर्ण भाषण झाल्यावर वेदशास्त्रसंपन्न धूपकरशास्त्री भाषण करावयास उभे राहिले. त्यांचें—

खालील मुद्द्यांवर भाषण झालें. " 'ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्यात् वैदिको धर्मः' असें असल्यानें धर्मरक्षणाकरितां भट्ट-प्रभूंस घेतलें पाहिजे. त्यांच्यांत जर कांहीं न्यून असेल तर तें भरून काढण्याविषयीं ब्राह्मणांनींच झटलें पाहिजे. कारण परोद्धारकशक्ति ब्राह्मणांतच आहे. तिचा उपयोग करून आपण ईश्वरावतारांची पूर्ण तयारी केली पाहिजे. ईश्वराचा धांवा करणें म्हणजे ईश्वरनियतकर्म करणें. भट्ट-प्रभूंस न घेण्यास असा एक मुद्दा आहे कीं, पूर्वपरंपरा मोडते. कबूल; पण तो पूर्वपरंपरेचा अभिमान योग्यायोग्य पाहून धरला पाहिजे. अज्ञानपिणानें 'बाबावाक्यं प्रमाणम्' असा नव्हे. सध्यां पंक्तिपावन असलेले ब्राह्मण देखील पूर्वीं अपंक्त असून नंतर पंक्तिपावन झाले आहेत; तसेच भट्ट प्रभु व्हावेत. जाति या परंपरा किंवा रूढीवरून न ठरवितां शास्त्रवचनानें जितक्या सिद्ध होतील तेवढयाच मानण्यांत याव्या. माझ्यापूर्वी बोललेले रा० दिवेकरशास्त्री यांच्याशीं माझा थोडा मतभेद असला तरी आजच्या मुख्य विषयांत त्यांचें व माझें ऐकमत्य आहे."

याप्रमाणें भाषण होतांच श्री० अध्यक्षांच्या सूचनेवरून वामनशास्त्री किंजवडेकर हे भाषण करावयास उभे राहिले. ते म्हणालेः—" आज गोव्यांत शास्त्राभिरुचि जी अत्यंत दुर्मिळतेला येऊन पोंचली आहे त्याविषयीं दोन शब्द बोलावयाचे आहेत. आज अखिल हिंदुस्थानांत धर्मजागृतीसंबंधीं उसळलेली लाट या अतिशय मागसलेल्या प्रांतापर्यंत येऊन पोंचली हें एक शुभचिन्हच आहे. कोणत्याही कारणानें कां होईना; विद्वानांचे अभिप्राय समजावून घेण्याचा प्रसंग आणल्याबद्दल सभेच्या चालकांचें अभिनंदन करणें जरूर आहे व या सभेचा निर्णय कसाही झाला तरी विद्वानांचे अभिप्राय जनतेला कळले इतकाच आजच्या सभेचा मी उपयोग समजतों.

दशविध ब्राह्मणांपैकीं गोव्यांत द्रवीड व गौड दोन्ही प्रकारचे ब्राह्मण राहतात. एके काळीं द्राविड ब्राह्मण, सारस्वतांची छात्रवृत्ति पत्करून होते. संस्कृत वाङमयांत जें शास्त्रीय ज्ञानभांडार आहे त्यांत गौड सारस्वतांचाच वांटा अधिक आहे. त्यांतल्या त्यांत न्यायशास्त्र हें तर गौडांचें धन असल्याबद्दल खुद्द द्राविडांनींच कबुली दिली आहे. न्यायशास्त्रांतील एक प्रमुख ग्रंथ जो 'व्युत्पत्तिवाद' त्याचे टीकाकार कृष्णंभट्ट हे म्हणतात कीं,

'गौडानां धनमाहृतम्' गौडांतील कांहीं ग्रंथकर्त्यांचीं नांवें सांगावयाचीं तर पार्थसारथिमिश्र, गदाधरभट्ट, वाचस्पतिमिश्र, जगदीशभट्टाचार्य, शिरोमणि, मधुसूदन सरस्वती इत्यादि सांगतां येतील. द्रविड ब्राह्मण मत्स्याहार भ्रष्ट मानतात तरी गौड सारस्वतांनीं आपल्या विद्वत्तेच्या प्रभावानें द्राविडांना खालीं पहाण्यास लावलें होतें. पण एका कालीं इतके उच्च दर्जाला पोंचलेले हे गौड सारस्वत आज कोणत्या स्थितीला पोंचले आहेत हें पाहून फार वाईट वाटतें! गौडांची जर ही स्थिति तर द्रविडांसंबंधीं बोलणेंच नको. एवढया मोठया सभेंत विरुद्ध पक्षाच्या प्रतिनिधींनीं 'आपल्यांत विद्वान् नाहीं' अशी कबुली देणें ही खरोखर समाजाला लाजिरवाणी गोष्ट आहे!

"कालपासून येथें जी चर्चा झाली तींत भाषाभेदाचा प्रश्न प्रतिकूल पक्षाकडून वारंवार पुढें येत होता. परंतु आपल्या शास्त्रांत श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान आणि समाख्या अशीं जीं सहा प्रमाणें मानलीं आहेत; त्यांतील कोणत्याही प्रमाणांत भाषेचा अंतर्भाव होऊं शकत नाहीं. असें असतां ही गोष्ट लक्षांत आलेला एकही गृहस्थ येथें असूं नये ही आश्चर्याची आणि शरमेची गोष्ट आहे! धार्मिक अगर सामाजिक प्रश्न शास्त्राधारेंच सोडवावयाचे असतात. आणि शास्त्र हें सामान्य जनांचा विषय होऊं शकत नाहीं, तेव्हां अशा प्रश्नांचा निर्णय बहुमतापेक्षां शास्त्रसंपन्न लोकांच्या मतानेंच लावणें इष्ट असतें. आपल्यांतलें शास्त्रप्रेम आज नष्ट झालें आहे. ब्राह्मणांमध्यें 'आपण इतर समाजांपेक्षां शास्त्रज्ञानांत केव्हांही उच्च राहूं' अशी महत्त्वाकांक्षा असावी. आपल्यांत कोणी विद्वान् नाहीं असें सांगावयाची पाळी येणें हें लांच्छनास्पद आहे. लौकिक प्रमाणें पुढें आलीं असतां तीं शास्त्रीय नाहींत म्हणून सोडून देणें; आणि शास्त्रीय प्रमाणें पुढें केलीं असतां तीं समजत नाहींत असें म्हणणें; अशानें वादाचा निर्णय कधींच होणार नाहीं; अशा परिस्थितींत वादाचा. निर्णय बहुजनसमाजाकडून करवून घेण्याची पाळी यावी हें दुर्भाग्य होय! तेव्हां माझी सर्व ब्राह्मणांना अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या प्रश्नांचा निर्णय विद्वानांकडून करून घ्यावा, अविद्वानांनीं अनुकूल अभिप्राय दिला तरी त्याची किंमत तितकीच

असते, हें लक्षांत ठेवावें. आणि दोन्ही पक्षांनीं शास्त्र व विद्वानांचीं मतें पाहूनच काय तो निर्णय ठरवावा. विद्वत्तेनें जातिभेद कमी होतो. श्रीमदाद्यशंकराचार्य हे ज्या ब्राह्मणांतील पोटजातींत जन्मले ती पोटजातही द्रविड ब्राह्मणांकडून कमी दर्जाची मानण्यांत येत होती. पण त्याचा 'नंबुद्री' ब्राह्मणांच्या वंशामध्यें उत्पन्न झालेले श्रीमदाद्यशंकराचार्य हे आज सर्वांना धर्मगुरु म्हणून मान्य आहेत व त्यांची परंपरा सांप्रत पीठस्थ आचार्य चालवीत आहेत. श्रीमदाद्यशंकराचार्य हे आपणांस मोठया आदरानें 'द्रविडशिशु' म्हणवीत. द्रविडशिशु म्हणजे नंबुद्री ब्राह्मण. नबुद्री ब्राह्मण हे आजच्या भट्ट-प्रभूंसारखेच होते. यावरून काय तो बोध घ्यावा." याप्रमाणें सरस्वतीभूषण किंजवडेकरशास्त्री यांनीं भाषण केल्यावर शेजारी व माहितगार या नात्यानें सारस्वत समाजांतील श्री० रा० रा० यशवंतराव सूर्यराव सरदेसाई, मडगांव हे शेजारधर्माच्या सहानुभूतीनें म्हणाले, " आज भट्ट-प्रभूंविषयीं उपस्थित झालेला प्रश्न पंधरा वर्षांपूर्वी गौड सारस्वतांच्या एकीकरणाचे वेळींही उपस्थित झाला होता व तो लोकमतानें अनुकूल निर्णय देऊनच सोडविला. भाषा ही व्यवहारानुरूप बदलते, तेवढ्यावरून भट्ट प्रभु हे ब्राह्मण नाहींत असें ठरत नाहीं. या ऐक्यप्रकरणीं ऐक्याकरितां प्रभूनें अवतार घेतला पाहिजे असें रा० कोल्हटकर यांचें म्हणणें आहे. पण मनुष्यांच्या रूपानें चालते बोलते ३००-४०० प्रभु आपणांस घ्या घ्या म्हणत असतां त्यांचा निर्दयपणें अव्हेर जे करितात त्यांच्यामध्यें प्रभु अवतार कसा घेईल ! या ऐक्यप्रकरणीं धर्माचा व देवाचा संबंध जोडण्यांत आला आहे. पण माझी अशी खात्री आहे कीं, तुम्ही कोणत्याही देवाला प्रसाद लाविला तरी तो भट्ट-प्रभूंना अनुकूल अभिप्रायच देईल ! आचारसाम्यावरून भट्ट प्रभु हे कुडाळ देशकरांपैकीं होत असें अनुमान रा० निगळ्येशास्त्री यांनीं काढिलें आहे, कां कीं त्यांच्यांतही प्रभु आहेत ! तर्‍ी बरें, नामसादृश्यावरून भट्ट-प्रभूंना त्यांनीं पाठारे प्रभु म्हटलें नाहीं हें सुदैवच म्हणावयाचें. अशा नामसादृश्यावरून जर जाति ठरवावयाच्या असतील तर आजच्या सभेचे अध्यक्ष केळकर हेही गौडसारस्वतांतील केळेकर यांच्या वंशांतील आहेत; असें सिद्ध करितां येईल ! मात्र एक मात्रा जास्त दिली म्हणजे झालें. शेवटीं माझी अशी

नम्र विनंति आहे कीं, ज्यांना ज्यांना भट्ट-प्रभूंविषयीं सहानुभूति वाटत आहे त्यांनीं तावडतोब भट्ट-प्रभूंशीं रोटीबेटीव्यवहार करून प्रत्यक्ष कृति करून दाखवावी. म्हणजे हळुहळू तो समाजांत रूढ होईल; हें मी स्वानुभवावरून सांगत आहें.” श्री० सरदेसाई यांच्या अशा आशयाच्या भाषणानंतर अध्यक्षांनीं

## समारोप.

केला. ते म्हणाले कीं, “ अशा प्रश्नांची इतकी व्यवस्थित झालेली चर्चा ही मीं माझ्या जन्मांत पहिल्यानेंच पाहिली. जातिप्रकरणांत श्रींकडे अर्ज गेल्यानंतर त्यांनीं त्या अर्जाचा मामुली वहिवाटीप्रमाणें निकाल न देतां लोकमत मागविलें; हा उपक्रम निःसंशय अभिनंदनीय आहे. अशा प्रकरणीं संस्थानी जुलुमापासून एकेरी बंडापर्यंतचे सर्व प्रकार मीं पाहिले आहेत. तेव्हां श्रींनीं अर्जाचा निकाल न्यायाच्या सर्वमान्य पद्धतीप्रमाणें करण्याचें ठरविलें हा जो श्रींकडून समाजाचा एक प्रकारें आदर करण्यांत आला त्याचप्रमाणें आपणही श्रींची अब्रू संभाळिली पाहिजे. मी स्वतः प्रागतिक मताचा असलों तरी जुन्या परंपरेचा अभिमान सोडावा असें म्हणणारा नाहीं. विवेचकबुद्धीनें पुराणमताची अब्रू राखावी असेंच म्हणणारा मी असल्यामुळें मी हें अध्यक्षाचें काम हौसेनें पत्करलें. ज्या प्रश्नाची येथें चर्चा सुरू आहे, तसला प्रश्न देशस्थ-कोंकणस्थांमधील शरीरसंबंधाचा मीं प्रत्यक्ष कृतीनें सोडविला आहे. यांत जुलमाचा कांहीं प्रकार नसून हा तुमच्या धर्मबुद्धीचा किंवा न्यायबुद्धीचा प्रश्न आहे. व अशा प्रकारची चळवळ सुरू होणें. यांतच कालांतरानें यश आहे. आज तुम्ही या प्रश्नाचा कोणत्याही तऱ्हेनें निकाल केला तरी मीं असें खात्रीचें भविष्य वर्तवितों कीं, आणखी पांच वर्षांनीं हें ऐक्य खास घडून येईल, मी येथें येईन किंवा ऐक्य झालेलें ऐकेन, त्यावेळीं विरोधीपक्षाला मी जर असा प्रश्न केला कीं ‘असें कसें झालें ?’ तर ‘कालमहात्म्य’ असेंच उत्तर त्यांना द्यावें लागेल. श्री० किंजवडेकरशास्त्री यांनीं सांगितल्याप्रमाणें शास्त्राची दृष्टि अतिशय महत्त्वाची आहे. जुन्या मतवाद्यांना प्रथम शास्त्रानेंच अडविलें पाहिजे. विद्वानांनीं सांगावें व

बहुजनसमाजानें ऐकावें असेंच मला वाटतें. मात्र ते विद्वान् निःपक्षपाती व कालवर्तमान पाहून शास्त्रमर्यादा सांगणारे असावेत.

" आज दोन दिवस जी येथें चर्चा झाली ती ऐकून मनाला फार आनंद झाला. ह्या परिषदेवरून पहिली गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, आपला समाज जिवंत आहे, व तो उत्तरोत्तर प्रगतिपर होत जाणार.

## रूढीला पाऊलवाटेचा दृष्टान्त

बरोबर लागू पडतो. मैदानावर प्रथम हिरवें दाट गवत उगवलें असतां एखादा इसम तेथें येतो व त्या उभ्या गवतांत निसर्गानें कोठें वाट ठेवलेली आहे काय पहातो व ती नसल्यास त्या गवतांतूनच तो स्वतः वाट काढीत निघून जातो. त्याच मार्गानें दुसरा एखादा जातो; असें होतां होतां कांहीं दिवसांनीं तेथें एक स्वच्छ पाऊलवाट पडलेली आपण पाहतों. त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणा ह्या अशा प्रत्यक्ष कृतीनें सोडविल्या पाहिजेत. प्रत्यक्ष कृतीचें तींत फार महत्त्व असतें. श्रीशंकराचार्यांनीं आज्ञापत्र दिलें तरी प्रत्यक्ष कृतीला सुरुवात झाल्याशिवाय मात्र हा प्रश्न सुटावयाचा नाहीं. पद्ये ब्राह्मणांच्या हृदयाला दयेनें स्पर्श केला आहे ही गोष्ट स्पष्ट दिसते. कालपासून येथें जीं भाषणें झालीं त्यांत विरुद्ध बोलणाराही एकी होऊं नये असें इच्छिणारा एकही पद्या नाहीं. तेव्हां त्यांतूनच कोणी तरी पुढें येऊन शास्त्रमर्यादा पाळून प्रत्यक्ष कृति करून दाखवावी. दुसरी गोष्ट—आज आपल्यासमोर हिंदुधर्म जगणार कीं मरणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे; त्याच्यावर चहूंकडून आघात होत आहेत; तेव्हां परिस्थितीचा विचार हा सर्वापेक्षां श्रेष्ठ आहे, ही गोष्ट लक्षांत घ्या. हिंदुधर्मीयांचीं सुस्थिति असतांना उत्पन्न झालेलीं भांडणें अवनत स्थितींतही तशींच चालू ठेवणें हा मूर्खपणा होईल. गोमांतकांतील कोंकणस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांना माझें असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपल्या मनांतील अढी टाकून दयार्द्रबुद्धीनें पद्यांना मदत करावी. या चर्चेंत जुने कागदपत्र पुढें आले नाहींत; पण या दिशेनें प्रयत्न सुरू केल्यास भट्ट-प्रभु हे पद्यांपैकींच आहेत असें दर्शविणाराही एखादा कागद आढळेल. श्रींनाही या बाबतींत एकदम मत देतां येईल असें नाहीं. पण श्रींच्या आजच्या

प्रयत्नाची दिशा पाहून त्यांना यश मिळण्याचा हरएक प्रयत्न करणें व अशा रीतीनें त्यांचें ऋण फेडणें हें आपलें कर्तव्य आहे. असो.

" आतां प्रत्यक्ष परिषदेच्या विषयाच्या बाबतींत मला असें सांगावयाचें आहे कीं, मी येथें न्यायाधीश या नात्यानें आलेलों नाहीं व तसा श्रींचा उद्देशही नाहीं. तर फक्त शिरस्तेदार या नात्यानें आलों होतों. तेव्हां मी असें ठरविलें आहे कीं, या दोन दिवसांच्या चर्चेंत विरुद्धपक्षाचे जे जे वक्ते बोलले त्यांत पुराव्याच्या दृष्टीनें पाहतां एकही मुद्दा पुढे आलेला नाहीं ! तरी त्यांस मी अजून एक महिन्याची मुदत देतों. जो कांहीं पुराव्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा पुरावा असेल तो त्या मुदतींत माझ्याकडे पाठवून द्यावा म्हणजे त्यांचा विचार करून नंतर श्रींकडे रिपोर्ट सादर करीन. वास्तविक पाहतां शिस्तीच्या दृष्टीनें एक महिन्याची मुदत म्हणजे फाजील सवलत आहे असेंच अनुकूलपक्षास वाटेल. कारण सभेचा जो जाहिरनामा प्रसिद्ध झाला त्यांत 'नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं' हीं अक्षरें मुद्दाम स्पष्ट ठशांत छापलीं होतीं व तो जाहिरनामाही गोव्यांतील सर्व ब्राह्मणांना पोंचविला होता. त्यावरून पाहतां आतां एक महिन्याची मुदत देणें योग्य नव्हे; पण असें असतांही ज्या अर्थीं असले प्रश्न समाजाधीन असतात त्या अर्थीं विरुद्धपक्षाला एक महिन्याची मुदत देऊन त्याच्याकडून तितक्या मुदतींत जर एकादा सबळ पुरावा पुढें आला तर त्याचाही विचार करितां यावा म्हणूनच ही प्रतिकूलपक्षास सवलत दिली आहे. याचा विचार विरुद्धपक्षीयांनींही करावा. याप्रमाणें अध्यक्षांचें समारोपादाखल भाषण झाल्यावर कांहीं पद्ये ब्राह्मणांनीं भट्टप्रभूच्या येथें रोटीव्यवहार करण्यास आपण तयार असल्याचें जाहीर केलें; व नंतर तीन ठराव पुढें मांडण्यांत आले; त्यांपैकीं—

## पहिला ठराव

या ब्राह्मणसंघटनेच्या कार्यांत प्रामुख्यानें लक्ष घालून या सभेच्या रूपानें थोडक्याच कालांत हा प्रश्न लोकांपुढें प्रामुख्यानें विचाराकरितां ठेवून इतरांस एक अनुकरणीय उदाहरण घालून दिल्याबद्दल सभेचे मुख्य प्रेरक व धर्मगुरु श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांचे आभार ही सभा परमादर-

पुरःसर मानीत आहे आणि असेंच यापुढें धार्मिक कार्यांत लक्ष घालण्या-विषयीं विनंति करीत आहे."

याप्रमाणें पहिला ठराव मांडला व तो सर्वानुमतें पास झाल्यावर अध्यक्षांनीं

## दुसरा ठराव

सभेपुढें मांडला, त्याचा आशय असा कीः —

"दोन दिवस सभेंत झालेली चर्चा, विद्वानांचें अभिप्राय व एकंदर उपलब्ध पुरावे यांचा विचार करून जगद्गुरु शंकराचार्य जो निकाल आम्हांस देतील तो मान्य असून त्याप्रमाणें आम्हीं वागूं."

हा ठराव मांडल्यानंतर अध्यक्षांनीं यावर कोणास विरुद्ध बोलावयाचें असल्यास किंवा उपसूचना जोडावयाची असल्यास अगर निराळाच एखादा ठराव सुचवावयाचा असल्यास तसें करण्यास मोकळीक आहे, असें सांगितलें; तरी दहा मिनिटेंपर्यंत कोणी कांहींच विरुद्ध न बोलल्या-मुळें हा ठराव एकमतानें पास झाल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें. नंतर

## तिसरा ठराव

पुढें आला. त्याचा आशय असाः—"कांहीं अडचणीमुळें सभेचा जाहीर-नामा पोंचूनही ज्यांस श्रींच्या आज्ञेप्रमाणें सभेस उपस्थित होतां आलें नाहीं किंवा ज्यांस कांहीं भट्ट-प्रभु पद्धे-प्रकरणांसंबंधीं पुढें पुरावा सांपडणें शक्य आहे, त्यांस आपलें सप्रमाण मत श्रींस कळविण्यास संधि मिळावी याकरितां पुन्हा एकवार जाहीरनामा केसरींतून प्रसिद्ध करून त्यांस एक महिन्याची मुदत द्यावी."

हाही ठराव सर्वानुमतें पास झाल्यानंतर श्री० दादासाहेब वैद्य यांनीं सर्व गोमांतकवासी द्राविड ब्राह्मणांतर्फे अध्यक्षांचे व श्रींचे आभार मानले व श्री० पाटणकर यांनीं स्वयंसेवकांनीं केलेली सेवा मानून घेतल्याबद्दल सभाचालकांचे आभार मानले. नंतर श्रींचे वट्ट मुक्त्यार व कारभारी श्री० जी. पी. इनामदार, नेरलीकर यांनीं श्रींतर्फे अध्यक्षांस एक महावस्त्र, पगडी व आशीर्वादफळं अर्पण केल्यावर स्वयंसेवकपथकाचे एक सेनापति मि० लेंगडे यांच्या थोडयाशा भाषणानंतर सभेचा समारंभ खलास झाल्याचें अध्यक्षांकडून जाहीर करण्यांत आलें.

अशा रीतीनें भट्ट-प्रभु-ऐक्य-परिषदेच्या निमित्तानें गोमांतकांतील

अखिल द्राविड ब्राह्मण-समाजांत जागृति घडवून आणून आज महाराष्ट्रांत हिंदुसंघटनेच्या बाबतींत कसकसे प्रयत्न करण्यांत आले व पुढें गोमांतकीय द्रविडब्राह्मणांचें कर्तव्य काय याची माहिती तज्ज्ञांकडून करवून देण्याचा गोड प्रसंग आणल्याबद्दल श्रींचे गुणानुवाद गात गात सर्व मंडळी आपापल्या निवासस्थानीं निघून गेली व दुपारीं ३॥ वाजतां सुरू झालेला कार्यक्रम रात्रीं ९ वाजतां संपला.

या सभेस गोमांतकांतील निरनिराळ्या भागांतून आलेले निवडक प्रतिनिधि व सभासद यांची संख्या खालीलप्रमाणें होती:—

| विभागाचें नांव. | प्रतिनिधींची संख्या. |
|---|---|
| अंत्रुज | १९४ |
| भतग्राम | ३४ |
| केपें, सांगें, काणकोण. | १७ |
| सत्री. | १४ |
| पेडणें. | ६ |
| | २६७ |
| सभासदः— | ३५० |
| | ६१७ |

3809

यावरून गोमांतकांतील द्रविडांत असलेले भट्ट-प्रभु, व क्रियावंत यांची संख्या वगळली तरी इतर ब्राह्मण संपूर्ण गोव्यांत ८।९शेच्या आंतच आहेत; त्यांपैकीं भट्ट-प्रभु-परिषदेस सुमारें सहाशें ब्राह्मण [illegible] होते. यावरून त्यांस या कार्याविषयीं कळकळ व आस्था किती अ- कळून येईल. शिवाय शेजारधर्माच्या नात्यानें सन्मान्य पाहुणे र सारस्वतांतील निवडक इसम ५० आले होते ते निराळेच.

येणेंप्रमाणें ता. २४।२५ एप्रिल १९२६च्या भट्ट-प्रभु-ऐक्य-प चा कार्यक्रम श्रींच्या आशीर्वादानें व ब्रह्मवृंदांच्या सक्रिय सहानु- निर्विघ्नपणें यथासांग पार पडला.

—रा. द. किंजवडेकर, कार्य-